# व्यक्तिमत्व विकास

## दिवाळी अंक २०२०



वर्ष : ५

स्वागत मूल्य १००/-

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**साप्ताहिक**

व्यक्तिमत्व विकास

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**संपादक -**

श्री. मंगेश विठ्ठल कोळी.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**कार्यकारी संपादक -**

डॉ. सुनिल दादा पाटील.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**अतिथी संपादक -**

श्रीमती. माणिक नागावे.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**अक्षर जुळणी -**

कवितासागर फीचर्स, जयसिंगपूर

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**विशेष सहाय्य -**


सौ. माधुरी कोळी.

सौ. संजीवनी पाटील.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

या अंकात छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# ...विशेष आभार...



## - मार्गदर्शक -

श्री. विठ्ठल आप्पा कोळी.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-



## - मुखपृष्ठ -

अंजली पाटील, विटा.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटना
सदस्य
Member
International Diwali Ank Association

# ...अंतरंग...


| | |
|---|---|
| वैशिष्ट्ये दिवाळी अंकाची.. | ०४ |
| प्रोत्साहन | ०५ |
| आत्मनिर्भर भारत ! | ०७ |
| कोरोनाने तोडली... | ०९ |
| आई बदलतेय | ११ |
| अबोल जगणे | १२ |
| सर्वे संयोग लक्षणा: | १३ |
| समर्पण | १५ |
| सांजवेळ | १६ |
| प्रतिशोध | १७ |
| बापाची कहाणी | २४ |
| लढवय्या | २५ |
| काळजाला भिडणारा.... | २६ |
| सुगी | ३० |
| असेच तुझे आता जगायचे | ३१ |
| वेळ वाचवा, आयुष्य वाचवा | ३२ |
| विवाह संस्था | ३६ |
| शब्द | ३७ |
| मी अनुभवलेला लॉकडाऊन | ३८ |
| संस्काराची शाळा | ४५ |
| मन | ४६ |
| फिटनेसचा फंडा | ४७ |
| मैदा बर्फी | ५१ |
| राहू शकतात | ५२ |
| एक बार पंखावरुनी | ५३ |
| गरुड पुराण | ५४ |
| बालगीत | ६१ |
| पाऊस | ६२ |
| जगप्रसिद्ध लोणार सरोवर | ६३ |
| गीत गुंफिल सोन्याच | ६५ |
| दैवगती यमदूत | ६६ |
| कृतघ्न | ६७ |
| वाटचाल ही | ७३ |
| जग भासे कोडे सुंदर | ७४ |
| बहादूर अक्की | ७५ |
| अभंग | ७८ |
| आई | ७९ |
| स्पर्श | ८० |
| करु | ९३ |
| नात जपलं | ९४ |
| पुणे ते टेंभूर्णी | ९५ |
| सैनिकी परंपरेचे गाव | ९८ |
| कळीची होतील फुले | ९९ |
| कोरोनाने टाकले जहर | १०० |
| परिचारिका | १०३ |
| आपले जगणे | १०४ |
| ऋण | १०५ |
| तांका | १०७ |
| क्षणचित्रे | १०८ |
| संघर्ष | ११० |
| वसुधैव कुटुंबकम | १११ |
| अबोली | ११२ |
| स्वार्थ | ११६ |
| मुलगा मुलगी भेद नसे | १२४ |
| शिक्षणवारी | १२५ |
| तर्पण | १२६ |
| पर्यावरण | १३० |
| ओंजळ | १३१ |
| सरकारी नोकरवाला जावई | १३२ |
| खरी जात | १३५ |
| बीज अंकुरे अंकुरे | १३६ |
| कोकण बघायचं... | १३७ |
| या भारत देशा | १४३ |
| बांधिलकी | १४४ |
| विडंबन | १४५ |
| कपबशीच्या कळा | १४६ |
| व्यक्ती परिचय | १५१ |
| इतिहासाच्या पानावर | १५८ |

# वैशिष्ट्ये दिवाळी अंकाची..

- संपादकीय

दिवाळी अंक हे मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण अंग आहे. दिवाळी सणाच्या सुमारास निघणाऱ्या विशेष अथवा वार्षिक नियतकालिकांना दिवाळी अंक असे म्हणतात. मनोरंजन हा सन १९०९ साली छापला गेलेला मराठीतला प्रथम दिवाळी अंक होता. सन २००९ मध्ये दिवाळी अंकांचे शतक पूर्ण झाले आहे. दिवाळीचा फराळ, फटाके, मिठाया या समवेतच दिवाळी अंक ही सुशिक्षित व साहित्यप्रेमी घरांसाठी एक आवश्यक घटक आहे. पूर्वीच्या दिवाळी अंकांत मनोरंजनासमवेतच परंपरा, संस्कृती याची माहिती असे. काळानुरूप त्यात बदल झाला आहे. आता महाराष्ट्रात सुमारे ८०० च्या जवळपास दिवाळी अंक प्रदर्शित होतात.

अनेक मराठी वृत्तपत्रेही वाचकांसाठी दिवाळी अंक काढत आहेत. त्यासोबतच आरोग्य, खेळ यांसारख्या अनेक विषयांना वाहिलेले दिवाळी अंकदेखील छापण्यात येतात. या सोबतच ऑडियो व्हिज्युअल दिवाळी अंकही निघत आहेत.

दिवाळी अंकांनी वाचकांना वाङ्मयीन दृष्टी दिली. वाचक अभिरुचीवर संस्कार करणे आणि लेखकांना नवनिर्मितीसाठी उद्युक्त करणे अशी दुहेरी जबाबदारी दिवाळी अंकांनी समर्थपणे पेलली आहे. लेखक नसलेल्या विविध क्षेत्रांतील लोकांना लिहिते करण्याचे काम दिवाळी अंकांनी केले आहे. चंद्रहास जोशींच्या मते "दिवाळी अंकाची एक ठराविक चाकोरी निर्माण झालेली असली, तरी काही विशिष्ट क्षेत्र निवडून वाचकांना विचारप्रवण करण्याची योजकंताही त्यांतून दिसून येते. विशेषतः काही दिवाळी अंकांतून महत्त्वपूर्ण परिसंवादांचे पद्धशीर संयोजन केले जाते व त्यामुळे त्यांची उपयुक्तता कायम स्वरूपाची ठरते."

१९०८ साली श्री. बाळकृष्ण विष्णू भागवत यांच्या 'मित्रोदय' या मासिकाने दिवाळी विशेष अंक काढला होता. 'नोव्हेंबर दिवाळीप्रीत्यर्थ' असा उल्लेख या मासिकावर होता. पूर्णपणे वाङ्मयाला प्राधान्य देणारा हा अंक होता. इ.स. १८८५ मध्ये सुरू झालेल्या आणि का.र. मित्र हे संपादक आणि मालक असलेल्या 'मनोरंजन' मासिकाने मराठीतला पहिला दिवाळी अंक काढला होता.

हल्ली मराठी नियतकालिकांच्या सृष्टीत प्रतिवर्षी दिवाळी अंकांची पर्वणी असते. लेखक, प्रकाशक, संपादक व वाचक, सर्वांचाच उत्साह तेव्हा जणू शिगेला पोचतो; ललित वाङ्मयाच्या अनेक शाखांमधील प्रतिवर्षाच्या स्थितिगतीचे स्वरूप एकदम लक्षात येण्याला वाव मिळतो. म्हणून यंदाच्या वर्षी व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक बनवत असताना सर्व लेखकांना समान न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सर्वांना दिवाळीच्या मनपूर्वक शुभेच्छा...

# प्रोत्साहन

- अथिती संपादक



“अरे वा!!! सुरज, किती छान चित्र काढलेस तू, मस्तच हं” “नमिता, तुझी वही दाखव पाहू? छान!!! तू पण छानच काढलेस हं “शाब्बास दोघांनाही.”

अशा प्रतिक्रिया ऐकल्या की, समोरच्या व्यक्तीला खूप बरे वाटते. आपल्या केलेल्या कामाचे चीज झाले असे वाटते. तो दुप्पट उत्साहाने कामाला लागतो. यालाच त्या व्यक्तीला प्रोत्साहन देणे असे म्हणतात. प्रोस्ताहन म्हणजे, एखादे काम चांगले करण्यासाठी त्या व्यक्तीला दिलेला शाब्दिक, भावनिक आधार होय. प्रोत्साहनाने सर्वजण काम करण्यास उद्युक्त होत असतात.

लहान बाळ जेव्हा हळूहळू चालायला लागते, बोलायला लागते, तेव्हा त्याच्या पहिल्या शब्दावर, त्याच्या पहिल्या पावलावर सर्वांचे लक्ष असते. जेव्हा ते पहिला शब्द बोलते, पहिले पाऊल टाकते सर्वजण त्याच्याकडे कौतुकाने पाहत असतात, टाळ्या वाजवत असतात, त्याला प्रोत्साहन देत असतात. त्यावेळी त्या बाळाला असे वाटते की, आपण काहीतरी चांगले करत आहोत. आपल्या कृतीमुळे समोरच्या लोकांना खूप आनंद झालेला आहे, म्हणून मग ते आणखीन बडबडायला लागते, आणखीन पाऊल पुढे टाकायला प्रयत्न करते. त्याच्या मनामध्ये बिंबते आपण काहीतरी चांगले काम केले की, समोरच्याला आवडते व तो आपल्याला प्रोत्साहन देतो. आणखीन चांगलं करण्यास ते मुल प्रवृत्त होते.

जेव्हा त्याच्या हातून नको ती गोष्ट घडत असते, तेव्हा त्याला लोक रागावून सांगतात, प्रसंगी मारतात. त्यामुळे त्या मुलाच्या मनात बसते की, हे काम केल्यानंतर आपल्याला मार बसतो, रागावून घ्यावे लागते. त्यामुळे ती गोष्ट न करण्याकडे त्याचा कल असतो. मूल पुढे मोठे झाले की ते शाळेत जाते, समाजात वावरते. त्यावेळीही त्याच्या चांगल्या गुणांचे कौतुक हे सगळीकडे होते. विविध स्पर्धांच्यामध्ये भाग घेत असतो. जर त्याचा नंबर आला तर त्याला पुढच्या स्पर्धेमध्ये भाग घेण्यास बरे वाटते. अशाप्रकारे प्रोत्साहनाने व्यक्ती क्रियाशील होतो कार्यरत होतो.

प्राण्यांच्यामध्ये सुद्धा लहान पीले चांगली वागली की जनावरे आपल्या पिलांना चाटतात, त्यांच्या मनाविरुद्ध केले की त्यांना ढकलून देतात. म्हणजेच प्रोत्साहन देण्याची प्रवृत्ती माणसाबरोबर जनावरात सुद्धा असते. परीक्षेत चांगले गुण पडले, तर अभ्यास करणाऱ्याला सुद्धा प्रोत्साहन मिळते. सर्व वर्गापुढे सर्व शिक्षकांनी त्याला चांगले म्हटले तर तो आणखीनच प्रोत्साहित होतो. परंतु ज्यापद्धतीने आपण चांगल्या

गुणांना प्रोत्साहन देतो ते सर्वांच्या समोर करावे.

परंतु जर चुका दाखवायच्या असतील तर त्या आपण सर्वांच्या समोर न दाखवता वैयक्तिक एकट्याला बाजूला बोलवून आपण त्याच्या चुका सांगितल्या तर त्याला अपमानित वाटणार नाही. तो पुढच्या वेळेला चांगला करण्याचा प्रयत्न करेल. कंपनीमध्ये काम करतानासुद्धा जेव्हा एखादा अधिकारी आपल्या कर्मचाऱ्याला एखादे चांगले काम केल्यानंतर त्याला वाढीव रक्कम देऊन त्याची प्रशंसा केली, तर ते बाकीच्या लोकांच्यासाठी सुद्धा एक चांगले उदाहरण बनते. तेही चांगले काम करण्याचा प्रयत्न करतात. परिणामी कंपनीचे कार्य सुद्धा चांगले होते.

बोनस देणे हा जो प्रकार आहे तो म्हणजे प्रोत्साहनाचाच एक भाग आहे. एखाद्या साहित्यिकांच्या साहित्याचे जर आपण कौतुक केले तर त्याला लिहिण्यास उभारी येते. आपण फक्त चुका काढत बसलो तर समोरच्या व्यक्तीला अजिबात उभारी येणार नाही. आपल्याबद्दल ही त्याचे मत चांगले होणार नाही. तेव्हा आपण नेहमी चांगल्या गोष्टीला प्रोत्साहन द्यावे. नवनवीन गोष्टींना प्रोत्साहन दिल्यामुळे ती करणाऱ्या व्यक्तीला खूप बरे वाटते. नवीन जोमाने, जोरदार कामे होतात. नव उर्मीमुळे नवकार्याची नवसंजीवनी मिळते. मनाला समाधान मिळते.

कोणत्याही क्षेत्रातील नवागतांना त्यांच्या क्षेत्रात यशस्वी करायचे असेल तर त्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. प्रोत्साहनामुळे कामाची प्रेरणा मिळते व ती व्यक्ती न घाबरता प्रयत्नशील बनते.

व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंकामध्ये सुद्धा आजपर्यंत अनेक नवीन लेखक, कवी, साहित्यिक, त्याच बरोबर विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींच्या साहित्याचा खजिना संपादक श्री. मंगेश विठ्ठल कोळी यांनी सालाबादप्रमाणे यावर्षी देण्याचा प्रयत्न केला आहे. यावर्षी व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंकामध्ये ज्या ज्या साहित्यिकांच्या साहित्याचा समावेश झाला आहे, त्यांना पुढील लेखन कार्यास शुभेच्छा देते. आणि पुन्हा एकदा व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंकास शुभेच्छा देऊन मी माझ्या लेखणीस पूर्ण विराम देते.

**- श्रीमती माणिक नागावे / कुरुंदवाड**
**मो.- 9881862530**

# आत्मनिर्भर भारत !

वाजू दे नगारा, फुंका तो शंख घुमू दे
तुतारी
प्रत्येक क्षेत्रात हवीत, भारतीय उत्पादने
सर्वतोपरी
पाहिजे दर एक गोष्टीत, भारतीय
आत्मनिर्भरी
त्यासाठी मनाची मनगटासी देऊ या
उभारी.....१.

संकटे येतातच एकामागून एक,
घरोघर देशावर
तसाच आलेला करोना, महामारी
आहे तो तर
हजारोंचे प्राण घेतले कोविड १९ ने
जगभरी
कठीण दिसते, परी अशक्य नाही,
शोधा उत्तर सत्वरी .....२.

उपाय जरी नसे जवळी आजमितीस
करोना वरी
आजीचा बटवा आहे ना, देशात
प्रत्येकाच्या घरोघरी
उघडा त्याला, हुंगा -गिळा, रोखेल तो
रोगांची स्वारी
सोडा फुकाचा डामडौल, स्मरा
पूर्वजांची शिदोरी.....३.

सांभाळा स्वत:ला, प्रियजनांना, रहा



आपुल्या घरी
नका सोसू फार,
एक रिंग द्या ना
शासन दरबारी
घाबरु नका,
घाबरवू नका,
लढाईत होतेच मारामारी
ठेवा विश्वास स्वत:वरी, वर बसलेल्या
मायबापावरी .....४.

आत्मनिर्भर शब्द नवा तुला, परीक्षितां
तुला उमजेल
भरकटलेला तू कदाचित, जाणता चूक
बरोबर फरक समजेल
अंधारा नंतर उजेड, दिवसा नंतर रात्र हे
कालचक्र फिरे
स्वीकारुनी वर्तमाना, विचारे मनी
क्षणा जावे सामोरे .....५.

ऐकलीस ती हाक, अरे...कोणाची
काय विचारतोस?
आपल्या भारत मातेची, होय तिचीच
हाक तू ऐकतोस
कान उघडे ठेव, मन स्थिरावता येईल
ऐकू तुझ्या मना
तिचा आवाज; आज तिने पुकारले
तुला, मला सर्वांना .....६.

कशासाठी काय विचारतोस गड्या
असा कसा तू? चघळतोस त्याच त्या वावड्या
सुधारला देश, धावत आहे. यातही लक्ष घाल वेड्या
स्वप्न उरी, 'भारत महासत्ता, घालतील सारे पायघड्या'....७.

सांभाळाया अर्थव्यवस्था, रुजवाया आत्मनिर्भयता
उठ गड्या तू सत्वरी, वाजव 'स्वदेशी' तुतारी .....८.

संकल्प देशाच्या सुपुत्राचा, जागर केला आत्मनिर्भरतेचा
फेकुनी दे इतरांचे सारे, फक्त हवे स्वदेशीचे वारे .....९.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गेला गजर
समृद्ध भारत देश होण्या आत्मनिर्भर
उचलोनी माती श्रद्धेने, मस्तकी लाव टीळा प्रेमाने .....१०.

अशी संकटे अनेक आली, निधड्या छातीने झेलली
तुजवरी ठेवोनी विश्वास, जयहिंद आपुला श्वास ....११.

काही चालू काही बंद, थोडी संधी थोडी कोंडी
चलन वलन सुस्तावले झाली व्यवसायावर बंदी
त्यासी सावरता आर्थिक परिस्थितीतुनी
यशोमार्ग पार करायचा यत्नांनी .....१२.

म्हणोनी दिला आवाज सर्वांना
आता फक्त 'स्वदेशी' म्हणा
आपला रुपया ठेवू कनवटीला
लगेच, पहा तो मजबूत झाला .....१३.

सुधारेल भारताची अर्थव्यवस्था,
हिंदुस्थानी देशाप्रती कार्यरत होता
कामासी लागले, आत्मभानी एकेक राज्य
मातृभूमिसी देण्या आत्मनिर्भर स्थिर सुराज्य .....१४.

जोश हवा! जयहिंद गर्जा !!
"भारत माता की जय"
गर्जा जयजयकार !!!
गर्जा जयजयकार भारताचा!!!... १५

**- वंदना धर्माधिकारी / पुणे**
**मो.-9890623915**

# कोरोनाने तोडली माणुसकी?



पुर्वी खेड्यांमध्ये घराघरांत आपुलकी आणि जिव्हाळा होता. लांबलचक पंगती बसत होत्या. एखादा पदार्थ केला तर चार घरात पोचत होता.

रात्रभर गप्पा रंगत होत्या. पहाटे कामांची लगबग सुरु होती. शेतंशिवार आनंदात डोलत होती. सर्जा-राजाची जोडी घुंगराच्या तालावर दौडत होती. चंपा, पारु, चंद्री(म्हैशींची नावं) ह्या रानामाळात चरायला जात होत्या.

सायंकाळी त्या घरचा रस्ता धरून थेट दावणीत जाऊन बसत होत्या. आईने धारेसाठी केलेली लगबग आणि कासांडी भरून दूध घरात येत होतं. खाऊन-पिऊन माणसं सुखात राहत होती.

परंतु प्रगतीच्या नावाखाली नोकरी धंद्याच्या आशेने माणसं गाव सोडून शहरात गेली. उच्च शिक्षणासाठी मुलांनी परदेश गाठला आणि गावाची गोडीच संपून गेली. चार दोन जुनी जाणती मग गावच्या पारावर बसून जुन्या आठवणी काढून रमत होती. पाणावलेल्या डोळ्यांनी लेकरांची वाट पाहत होती आणि परस्पर लग्न करून आलेल्या सुना, नातवंडे, बघण्यासाठी व्याकुळ झाली होती. पोटच्या पोराला मात्र याची खातरच नव्हती.

यंत्रासारखं धावणारा आणि पैशापाठी लागणारा पोरं, त्याला मायेची ऊब कितीही खूणावली तरी कर्तव्य म्हणून शे-पाचशे रुपडे पाठवण्यापलिकडे तो काहीच करत नव्हता. हाच फरक जनरेशन गॅप म्हणून मित्रांमध्ये सांगत होता. अगदी तसाच जनरेशन गॅप निसर्ग सुध्दा करतोय असं वाटतं.

कारण, गेल्या मार्चपासून भारतात कोरोनान थैमान घातलेलं आहे. आरोग्य यंत्रणा, आशा, अंगणवाडी सेविका, पोलीस, स्वच्छता कर्मचारी, डॉक्टर आणि शिक्षक सुध्दा आपला जीव धोक्यात घालून सेवा बजावत आहेत. हा कोरोना जरा अजबच निघालाय गरीब, श्रींमत कोणताही भेद न करता तो उच्च, प्रतिष्ठीतांपासून ते मोलमजुरी करणाऱ्यापर्यंत साऱ्यांनाच आपल्या विळख्यात घेत चाललाय. साधी सर्दी, ताप, कणकण जरी झाली तरी रोग प्रतिकार शक्ती कमी होऊन तो कोरोना रुग्ण म्हणून घोषित व्हायलाय.

संपर्क टाळला जातो साऱ्यांच गोष्टी वेगळ्या ठेवाव्या लागतात. माणूस माणसापासून दूर चाललाय. फक्त आरोग्य कर्मचारी धाडसाने पुढे जाऊन सेवा बजावत असतात. तेव्हा अर्ध्याहून अधिक पिडीतांना आपण यातून बरे होऊ की नाही? या काळजीने खचून आत्मविश्वास गमावून प्रसंगी जीव सुध्दा गमावत आहेत. काही पिडीतांना माणसांचा तुसडेपणा, एकटेपणा देऊन जातोय. "कोरोना म्हणजे एक प्रकारे वाळीत टाकलेलं

असावं" असा अनुभव तो रूग्ण आणि त्यांचे नातेवाईक घेत आहेत. खरंच जगायचं कसं हा मोठा प्रश्न सतत भेडसावत आहे. आधीचा काळ किती सुखाचा होता. कुणी आजारी पडलं, चव बदलली तर घरचे सोडाच पण शेजारी-पाजारी सुध्दा एखादा पदार्थ करून घेऊन यायचे. "चव लागतंय का बघ" असं म्हणायचे आणि आता...

बैलाला घालाव्यात तशा मुसक्या घालून, जो तो फिरत आहे असं वाटतं. जणू त्या मूक प्राण्यांनी दिलेला आशिर्वादच असावा की, "जैसी करणी वैसी भरणी". निसर्ग शेवटी सहन तरी किती करेल बरं! रसायनयुक्त मैला मिश्रीत पाणी थेट नदीत आणि नळांवाटे घराघरांत पोचतंय. प्लास्टिकचा अती वापर आणि स्वच्छतेचा अभाव या साऱ्यांचाच दुष्परिणाम या कोरोनाला खतपाणी घालणारा आहे.

परदेशातून आलेला हा आजार माणसाला माणसापासून दूर करत आहे. चार माणसं एकत्र बोलू, बसू शकत नाहीत. एकमेकांच सांत्वन करू शकत नाहीत. ज्या प्लास्टीकने नद्या, गटारी, तलावं तुंबलीत त्याच प्लास्टीकमध्ये कोरोनाने मृत झालेल्या व्यक्तीला गुंडाळून दहन केले जाते. ज्या घरांसाठी, मुलांसाठी, कुटूंबासाठी आयुष्य झिजविले तीच आपली माणसं मयत व्यक्तीची दहनाची जबाबदारी घेत नाहीत. मग रेस्क्यु फोर्सच्या मदतीने दहन करण्यात येतं. हा कोणता न्याय? बापाची इस्टेट, पैसा, मालमत्ता सारं काही पाहिजे. पण बापाचा अंत्यविधी करावा इतकंही मन निर्मळ नसावं.

दुसरीकडे मोलमजुरी करून घरच्यांना सांभाळतो. आईबाप यांच्यात देव बघतो. तरीही सुखाला गालबोट लागलेच आणि घरचा आधारवड हरपला. चुटकीसरशी अनंतात विलीन होतो. तेव्हा हे असं झालंच कसं या विचाराने कोलमडलेला तो मुलगा सैरभैर होतो. आपल्या बापाचे आकस्मिक निधन झालं हे त्याच्या मनाला चटका लावून जाते. भितीने त्याचा थरकाप उडतो. पूर्ण घराची जबाबदारी ज्या खांद्यावर असते. तो खांदा बापासाठी हळवा होतो. कितीही समजावलं तरी त्याचं मन मानत नाही.

हातातोंडाला आलेली पोरं आपल्या बापाची ही अवस्था बघून घाबरून जातात. या दवाखान्यातून त्या दवाखान्यात घेऊन जातात. सारेच रिपोर्ट चांगले आलेले असतात. पण... त्याचं मन खचलेलं असतं.

माझा बाप कालपर्यंत ठणठणीत होता. साधा तापच त्याला आला आणि माझा बाप निघून गेला. हे सत्यच त्याला पटत नव्हतं. तो आतल्या आत कुढत असतो. सावरणारे हात कुटूंबाशिवाय दुसरे नसतात. अशावेळी मित्र मंडळ आणि नातेवाईक सुध्दा पाठ फिरवतात. आपलीच माणसं परकी वाटत असतात. नव्हे तर ती तशीच वागून माणुसकी विसरत असतात. मग खरंच मनापासून वाटत राहतं की, खरंच या कोरोनाने नात्यातली आपुलकी आणि माणसांतली माणुसकी तोडली काय हो?

**- सौ. मनिषा वराळे / धरणगुत्ती**

**मो.- ७०९७२२९४०७**

**(- लेखिका, व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक २०१९ च्या अतिथी संपादक आहेत.)**

# आई बदलतेय



आई आता दिसत नाही सतत
कळकट मळकट धुडक्यात
दिवसभर कामाच्या रगाड्यात
आई आता मस्त जीन्स टॉप
घालतेय
आई आता स्वत:साठी सुद्धा वेळ
काढतेय
कारण आई आता बदलतेय ।

आई आता बसत नाही चुलीपुढे
लाकडं फुंकून फुंकून डोळे लाल
करत
आई आता स्मार्ट किचनमध्ये
नवं नव्या रेसिपी बनवते
कंटाळा आला तर चक्क स्विगीचे
पार्सल मागवतेय
खरचं आई आता बदलतेय ।

आई आता पसरत नाही बाबांकडे
हात छोट्या छोट्या गरजांसाठी
आणि खात नाही सासूचा आणि
नवऱ्याचा मार
उलट आई आता बाबांच्या
खांद्याला खांदा लावून कमावतेय
हो खरंच आई आता बदलतेय ।

आई आता रडत नाही जुन्या
दिवसांचे गाऱ्हाणे
सासवा, नणंदा, जावांचे ते घेत
नाही उखाणे
ती आता म्हणत नाही बाईचा
जन्म खोटा
उलट मुलाला पराठे आणि
मुलीला कराटे शिकवतेय
हो खरचच आई आता बदलतेय ।

आई आता हसतेय, नाचतेय,
मनासारखे जगतेय, काळाप्रमाणे
बदलतेय, आवडेल तसंच वागतेय

पण.....
बाळाचं रडणं ऐकू येताच
तिचे पाऊल मात्र थबकतेय
खरंच का आई अगदी पुर्णपणे
बदलतेय?

**- सौ. तनुजा मुळे / नाशिक**
**मो.- ९८८१२४७११७**

# अबोल जगणे



समद जगच जागी स्तब्ध झाले
काय दिसं हे वाईट आज
आले।।धृ।।

पूर्वि कोणीतरी आजारी
असता
भेटायला त्याला जायचो
इकडच्या तिकडच्या गप्पा
मारुन
धिर त्याला थोडा द्यायचो
आता आधार द्यायचा कूणा
सारे प्रवेशच बंद झाले ।।

आता तस करता येत नाही
शेजारी असो वा घरचा
कोरोनाच्या धास्तीन या
मजला रिकामा झाला वरचा


कंटाळा आलाय या समद्याचा
मास्क बांधून सहा महिने
झाले ।।

नात्यामधील अंतर वाढताना
आपूलकीचा श्वास कोंडला
स्वत:च प्रेत स्वत: जाळताना
माणुसकीचा गंध सांडला
बोंब सुध्दा न मारता,
तिला विधवेच जिन आले ।।

कोरोनाशी झुंजत असताना
कित्येक देवाघरी गेले
सख्खा असुनहि अग्नी द्यायला
रक्तामासाचं कोणी ना आले
ज्याचा त्याचा जीव प्यारा
हेच जगणे नशीबी आले ।।

- श्री. हरिबा कोळी / दानोळी
मो.- ७५८८२७००९३

# सर्वे संयोग लक्षणा:



जो पर्यंत कुटुंबप्रमुख मिळवता असतो तोपर्यंत सर्व कुटुंबीजन त्याचेवर खूप प्रेम-सेवा करतात. पण एकदा का तो निवृत्त झाला म्हणजे मात्र त्यामध्ये फरक जाणवतो.

हा अनुभव आता जुना झाला असला तरी त्याची अखंड पुनरावृत्ती दीर्घकाळापासून आजतागायत तशीच चालू आहे. कारण माणूस हा मुळातच कृतघ्न बनला आहे. क्वचित आढळलेच तर तो अपवाद समजावा.

एवढे असूनही हा धन-संपत्तीचा हावरट माणूस शहाणा होत नाही. कारण धनार्जन ही नशा चढलेली असते ना ! ती एकदा चढली की धर्म-अधर्म, नीती-अनीती यांचा विवेक राहत नाही. त्याला प्रथम जीवनावश्यक वस्तू पुरेशा वाटतात. पुढे कुटुंबसंख्या वाढते तसतशी सर्वसोयींनी युक्त असे सर्व हवे असते. त्याच आवश्यक वाटू लागतात. प्रॉपर्टी कशी वाढवता येईल याकडे अधिक लक्ष केंद्रित होते. मग त्यात भल्याबुऱ्या मार्गाचा अवलंब ही केला जातो. वास्तविक सुरुवातीच्या काळात त्यानेही खूप कष्टात, हालाखीत दिवस काढलेले असतात आणि आता आपल्या अपत्यांसाठी, त्यांच्या सुखासाठी पुन्हा कफल्लक होतो.

हे सर्व कौटुंबिक सव्यापसव्य करता-करता म्हातारपण जवळ आलेले असते. तो असहाय्य बनतो, दयनीय बनतो. अशावेळी अनेक व्याधींनी पीडित अवस्थेत तो येऊन पोहोचतो.

नवयुगातील सुना स्वच्छंदतेला चटावलेल्या त्यांना वृद्धांची सेवा नको असते. अशा अवस्थेत पडून राहण्यापेक्षा लवकर हे म्हातारे 'राम' का म्हणत नाहीत? असे त्यांना वाटत असते.

"उगाच तरुणपिढीच्या उमेदीच्या जीवनात ही ब्याद का नशिबी असावी" हा ही प्रश्न मुला-सुनांना सुटत नाही.

अहो, सुनांचे सोडा. बोलून-चालून त्या परक्याच. पण मुले, ती तर अखेर आपलीच ना? पण त्यांचे विचार त्यांच्या निकटवर्तियांकडून ऐकावयास मिळाले म्हणजे तर म्हाताऱ्याला ब्रह्मांड आठवतो, म्हातारीच्या अगोदर आपणच जायला हवे होते असे वाटू लागते.

नातूकडून होणारी अवज्ञा-अवहेलना असह्य होते. यावर औषध सापडत नाही कारण ते अस्तित्वातच नसते.

वडीलोपार्जित इस्टेटीचा मनमुराद उपभोग घेत असताना जन्मदात्या माता-पित्यांकडे दुर्लक्ष्य करताना पाहून कोणा सज्जन प्रौढाने त्यांना विचारले तर

क्षणाचाही वेळ न लावता उत्तर देतात - 'आम्ही कधी अर्ज केला होता की आम्हाला जन्म द्या म्हणून?' तो तर त्यांच्या रतिसुखाचा स्वाभाविक परिपाक होय, त्यानंतर पुन्हा जर विचारले की तुमचे पालनपोषण, शिक्षण आजार-आरोग्य ह्यासाठी त्यांनी हातभार लावला, खस्ता खाल्या त्याचे काय? यावर त्यांचे उत्तर असे - 'तो आमच्या पूर्वपुण्याचा परिपाक आहे. तुमच्या उपकाराचा नाही!'

वृद्ध आणि व्याधीजर्जर माता-पित्यांची किंवा सासूसासऱ्याची सेवा जुन्या पिढीत आस्थेवाईकपणे केली जात असे पण केवळ सामान्यांकडे ! श्रीमंतांच्या कोषात हे बसत नाही ते म्हणतात, 'हे सेवेचे काम आमचे नव्हेच' त्यासाठी शेकडो हॉस्पिटल्स सज्ज आहेत, रात्रंदिवस डॉक्टर, नर्सेस सेवेला असतात; तेथेच या म्हाताऱ्यांनी रहावे. असे उत्तर देणारा पुत्र, बाप-दादांच्या कमाईवर मौजमजा करताना हे संपूर्ण विसरतो की आपणही कधी वृद्ध होणार आहोत, आपल्याही वाट्यास आपल्या संततीकडून असेच उत्तर मिळणार आहे, म्हणून यासाठी मित्रांनो, एकतर अलोट संपत्ती मिळवण्याच्या भरीस पडून वाईट मार्गाचा अवलंब करू नये, ह्या पापाचे वाटेकरी कोणीही होणार नाहीत.

दुसरे असे - व्याधीजर्जर अवस्था येण्यापूर्वीच घरदार सोडा, झेपेल तेवढा संयम पत्करा, एखाद्या तीर्थक्षेत्री, एखाद्या संत श्रेष्ठांच्या सहवासात व्यतीत करा.

प्रापंचिक ममत्व, यापूर्वी अनंत वेळा जोडून पापबंधनाचेच कारण ठरले.

हे जग कृतघ्न आहे, सर्व अपेक्षा सोडा, एकमेव आत्माच शाश्वतस्वरूप आहे.

एको मे शाश्वतश्चात्मा, ज्ञानदर्शन लक्षणः ।
शेषा बहिर्भवा भावा, सर्वे संयोग लक्षणाः ।।

**- प्रा. प्रवीण वैद्य / जयसिंगपूर**
**मो.- ९७६६५८१३५३**

**(- लेखक, व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक २०१७ चे अतिथी संपादक आहेत.)**

# समर्पण



कोरोनाची महामारी
आली आपल्या हो घरी
सुखी ठेवण्या कुटुंबा
घ्याना रे जबाबदारी

करी समर्पण सेवा
येती ताई, आशा दारी
करा सहकार्य तया
नका लावू रे माघारी

सेवा डॉक्टर करती
जीव धोक्यात घालूनी
करा सन्मान तयांचा
थोडे लहान होवूनी

रोग कोरोना मरण
नाही रे समीकरण
जगा आयुष्य तुमचे
थोडे पाळून बंधन

झाला कोणी रे बाधित
नका तोडू बंध नाती
घ्यावी आरोग्य काळजी
लावा आधाराच्या वाती

आळा साथीला घालण्या
द्यारे मदतीचा हात
तोडा कोरोना साखळी
देवू संकटाला मात

**- श्री. युवराज जगताप / काटेगाव**
**मो.- ९४०५२३७०८१**

# सांजवेळ



सांजवेळी फिरता शिवारी
आभाळ भरू आले डोईवरी
झिपरे कणीस मारी मुसंडी
मिलनाची आस ढगाशी

शिवार सजले मोत्यांचे दाणे
हुरूप वाढे पाखरांची
चरताता नंदी पाखरासवे
घुंगराचा नाद शिवारी घुमे

बापाच्या डोळा सपन सुगीचे
भरल्या बाजारी कधी जाऊ
राणीला नवार कधी घेऊ
धरा सजली हिरव्या पाचुनी

चैत्यन्याचा सोहळा सजला
शिवारी

मुगाची रास भोनगी सुगीची
तिळा काराळाची आस गोड
दिवाळी
बहिण भावाला औक्षण मागते

सजली दिवाळी झेंडुची
मांदियाळी
धन्यधान्याची भरूदे आरास
गायी गोट्यात वाढो गणगोत
दुधदह्याच होऊदे गोकूळ

वामनाचा नाश करू आता
बळीच राज्य येवो सदा
मागतो मागणं देवा ईश्वरा
पिल्या मुखी चारा मिळो
सदा...

- श्री. शिवा जोगदंड / सावरगाव
मो.- ९५४५६६१९२३

# प्रतिशोध



संध्याकाळच्या कातरवेळी ज्योती स्वयंपाक घरात लगबगीने संध्याकाळचा स्वयंपाक करीत होती. तिने अगदी हट्टाने भरपूर पैसे खर्च करून बक्कळ मोठे स्वयंपाकघर करून घेतले होते. एल आकाराचा किचन कट्टा, त्याच्यावर पांढरेशुभ्र स्फटीकासारखे ग्रॅनाईड, सगळे दरवाजे अगदी लाल भडक द्राक्षाळाच्या फुलासारखी, समोर पिवळी अगदी मोगऱ्याच्या फुलासारखी काच, दोन दरवाज्याचा उंचच्या उंच फुलाफळांच्या हिरव्या निळ्या नक्षीने नटलेला फ्रीज, किचन ट्रॉली, डीश क्लीनर, ओव्हन, सुंदर तीन बत्त्यांची शेगडी, स्वच्छ पाण्यासाठी पांढऱ्या-निळ्या रंगाचा वॉटर प्युरिफायर, समोर मुद्दामुनच एक खिडकी ठेवली होती येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी, अगदी स्वयंपाक घरात कॅमेरे बसवले होते. अगदी दरवाजावर कोणीही अनाहुताने बेल वाजविली की, समजून यावे म्हणून डाव्या बाजुला देवघर आणि मागच्या बाजूला डायनिंग टेबलं त्याच्या भोवताली अगदी सागवानात केलेल्या अन् शिस्तीत उभारलेल्या खुर्च्या, अगदी लक्षावधी रुपये खर्च करून सागरचा विरोध असतानाही तिने हे तिचे विश्व उभारले होते.

मागच्या वर्षी तिच्या या घरकुलात जेव्हा प्रवेश केला तेव्हा तिला अगदी आपण स्वर्गात आहोत की काय असा भास झाला होता. तिच्या जीवाभावाच्या चार मैत्रीणी, आल्या होत्या. पण त्यांच्या हसऱ्या चेहऱ्यामागची असुया कितीही झाकावी म्हंटले तरी लपत नव्हती. तिलाही तेव्हा अगदी वाटले 'बरी जिरवली यांची' म्हणून ती अगदी शाळेत असताना तिच्या फाटक्या, झिजलेल्या चपला, अगदी जीर्ण ठिगळं लावलेला फ्रॉक बघून त्या कशा तिच्यावर हसायच्या आणि तिला जगणे नको नको वाटायचे हे दिवस तिला आठवले.

कोणाचही भवितव्य कोण ठरवू शकत नाही. ते दुःखाचे, हलाखीचे तिचे दिवस कधीच तिच्या हातातून बर्फासारखे अलगद निसटून गेले होते आणि आता सोनेरी सुखाच्या संधीप्रकाशात ती अलगद तरंगत होती. तिच्याकडे पूर्वी हिनकस नजरेने पाहणाऱ्या प्रत्येकाच्या गालावर आता आपण जोराची थप्पड मारली आहे असा विचार करून कधीकधी ती स्वतःवरच खुश होऊन हसायची.

तिने जेव्हा पंधरा वर्षापूर्वी अगदी हलाखीत सागर बरोबर संसार थाटला तेव्हा तिला इतक्या मोठ्या यशाची अपेक्षा नव्हती. दोघेजण डॉक्टर होते, सुरुवातीला अगदी दोनचार पेशंट रोज व्हायचे. पण हळूहळू सागर बोलका असल्यामुळे आणि अगदी मनापासून पेशंटवर उपचार करत असल्यामुळे अगदी रात्री बारा-बारापर्यंत त्याची ओ.पी.डी

चालायची. नाही म्हंटले तरी त्याचे सासरे आनंदराव, सासुबाई सुशीला ह्यांचीही साथ होती. तिचे सासरे अगदी मुख्य कार्यकारी अधिकारी निवृत्त झाले होते. त्यांचा मान आणि दरारा प्रचंड होता. त्यामुळे सुरुवातीला शहरामध्ये त्यांच्या मदतीनेच फ्लॅट घेतला होता. तिथे ही सर्व अगदी गुण्यागोविंदाने रहायची. मागच्यावर्षी त्यांनी हा सुंदर अगदी तीन हजार स्केवर फुटचा बंगला बांधला होता. अन हा बंगला आणि दवाखाना अगदी त्याच्या दोघांचा स्वकष्टातील होता.

ज्योती-सागरसाठी एक बेड रूम, सासु-सासऱ्याची एक खोली, स्वाती आणि परागसाठी एक खोली, एक पाहुण्यांची खोली आणि प्रशस्त हॉल. बाहेर बाग, मोगरा, जास्वंद आणखी बरीच शोच्या झाडासकट रातराणीचे झाड ही तिने हट्टाने लावले होते. सागरने घराला अगदी पितळी अक्षरातून 'आनंद निवास' असे नाव कोरून घेतले होते.

तिच्या आयुष्याकडून अगदी भलत्या सलत्या अपेक्षा नव्हत्या. पण देवाने क्षितिजे खुली करून, अगदी तिच्यावर मनसोक्त भौतिक, ऐहीक सुखांचा वर्षाव केला होता. नाही म्हंटल तरी तिला या सगळ्या गोष्टीचा अभिमान वाटायचा. स्वाती आता आठवीला होती, अगदी तिचेच रुपडे घेऊन जन्माला आली होती. तिचा गोरा ताजेपणा अगदी कुणालाही फुलाची आठवण व्हावी असा. तिचे लांबसडक नाक, खांद्यापर्यंत पसरलेला काळ्या केसांचा संभार, तिचा बदामी ड्रेस तिच्या खांद्यावरची हिरवी ओढणी तिला पाहताच अगदी घरातच रातराणीचं झाड उगवले आहे की काय असे तिला वाटायचे.

त्यांनी अगदी संयमाने परत घरात पाळणा हलवू दिला नव्हता. पण अगदी बारा वर्षांनी अनवधानाने मोहाच्या क्षणांनी तिच्या विचारावर दबक्या पावलांनी निसर्गाने विजय मिळवला. तिला उलट्या सुरु झाल्यावर सुरुवातीला पित्त झाले असावे म्हणून तिने दुर्लक्ष केले. पण तिची प्रेगनन्सी टेस्ट पॉझिटीव्ह आल्यानंतर मात्र तिच्या मनात चलबिचल सुरु झाली. तिला पस्तिसाव्या वर्षी हे ओझे नकोसे झाले होते. पण सासु-सासऱ्यांच्या दबावामुळे पराग जन्माला आला.

देखण्या परागचं पोरसवदा हसण्याने तिच्या हदयाची धडधड वाढायची. तिला पाहतच केवळ एक मिनिटात आनंदाने हुंकार भरे, बाळाच्या गोड हसण्यात ती स्वतःला हरवून जायची. तो अगदी हुबेहुब त्याच्या वडीलासारखा झाला होता. तो अगदी एखाद्या स्पंजासारखा होता. अगदी प्रत्येक गोष्टीचे हुबेहुब आचरण तो करायचा. स्वातीच्या मागे अगदी वर्षातच तो लुडूलुडू धावायला लागायचा. एखादी बाहुली किंवा खेळणं जरी दिल तरी तो तासनतास खेळत रहायचा. तो वर्षाचा कधी झाला हे कुणालाही समजुनही आले नाही.

सुरुवातीचा तिचा बाळाबद्दलचा नकार कसा कुचकामी आणि निरुपयोगी होता हे तिला आताशे जाणवू लागले. त्याचे गोबरे गुलाबी गाल, त्याचे गोड हास्य, सुंदर गोरे हात-पाय, अगदी कधी कधी दोघे त्याचा एकाचवेळा पापा घ्यायचे आणि तीन नाक एकत्र येऊन वेगळचं चित्र निर्माण व्हायचे. कधीही तो रडला नाही, किंचाळला नाही,

कुणालाही त्रास दिला नाही म्हणून तिच्या सासू-सासऱ्यासकट सगळेजणच त्याच्या बाललीलांनी भारावून जायचे.

पण हे सगळे तिचे जीवन सुखकारक जाणार नव्हते. प्रत्येकाचं भविष्य त्या विश्वात्म्याने लिहून ठेवलेले असते. पृथ्वीवरच्या प्रत्येक गोष्टी वेगवेगळ्या भाषा बोलत असतात. तिच्या ताटात काय वाढले आहे. याची तिला जाणीवही नव्हती आणि तिला तिची जाणीवही करून घ्यायची नव्हती. ती ज्या व्यक्तीवर प्रचंड प्रेम करीत होती, तो तिच्यापासून अगदी दूर कधीही तिला न दिसण्यासाठी जाणार होता.

ती बंगल्याच्या व्हरांड्यात उभी होती, आज तिची डावी पापणी उगीचच फडफड करीत होती. असल्या फालतू गोष्टींकडे लक्ष द्यायचे नसते असा तिचा ठाम निश्चय झाला होता. निळे आकाश अगदी स्वच्छ धुतल्यासारखे होते. पण एक काळ्या ढगांचा पुंजका उगाचच तिच्याकडे दात विचकावून हसतोय असा तिला भास झाला. रातराणीची जुणी चरबट पाने जाऊन त्याच्यावर नाजूक हिरव्या रंगाचा पर्णसंभार आला होता. तरी उगाचच एखादं पिवळं चरबट पान तिच्याकडे रोखून बघतय की काय असे वाटू लागले. तिच्या स्थिरावलेल्या आयुष्यात तृप्तीची ढेकर तिला जाणवत होती. पण उगाचच अधूनमधून लागणारी उचकी सरड्याची ठिबकी डोळ्यासारखी भितीची आग ओकत होती. तिच्या बंगल्याच्या आवारात गेले वर्षभर कष्ट करुण तिने बाग फुलवली होती. ॲस्टरचा अनेक रंगी फुलोरा, निशिगंधाच्या उंच उंच पांढऱ्या छड्या, जाई जुईचा सुगंधी हास्य. द्राशाळ लालभडक सुंदर चमचम सगळं अगदी मनासारखं झालं होतं. पण ह्या सगळं मनमोही तिच्या विश्वात सुद्धा कुठेतरी कोणीतरी तिच्या सुंदर स्वप्नात बागेत, कोणतरी विष कालवून उद्ध्वस्त करणार आहेत असं तिला वाटू लागले.

तोपर्यंत तिच्या मोबाईलची रिंग वाजली, ती धावतपळत तिच्या स्वयंपाकघरात गेली आणि सागरला कोणीतरी चारचाकीने उडवले आहे आणि तो हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे ही बातमी सांगितली. ते सर्वजण हॉस्पिटलमध्ये पोहोचेपर्यंत सागरने अखेरचा श्वास घेतला होता.

आज त्याचे दिवस होते. आज सगळी सारवा सारव करीत स्वयंपाकघरात तिच्या भुतकाळात शिरली होती. आज तिच्या भविष्यात सटवाईने काय मांडले आहे याच्या विचारात गुंग झाली होती.

नियतीला तिचं सुख मानवल नव्हते. तिच्या नशीबावर संकटाचे सावट पसरले होते. "होत्याचे नव्हते झाले होते" माणूस जातो, जन्माला येणाऱ्याला एक ना एक दिवस जायचे असते. पण त्याच्या जाण्यामुळं तिच्या आयुष्यात न भरण्यासारखी पोकळी निर्माण झाली होती. आपण माणूस म्हणजे सर्वसामान्य पामर, आपण परमात्म्याच्या नितीबंधनात अडकलेले असतो. नियतीने अक्षरश: गवताचा पाला समजून त्याला पायाखाली चिरडले होते. एका क्षणात ब्रम्हांडाला भस्मसात करणाऱ्या नियतीच्या क्रूर खेळापुढे ती आता हतबल झाली होती. तिचे एकटेपण तिला आता जाळू लागले होते.

वेळ हेच काळावरचं उत्तम औषधं असते. हळूहळू ती सावरायला लागली होती. सासु-सासरे सावरल्यासारखेच वाटत होते. पराग मात्र बाबा कुठे आहेत? म्हणून भोकांड पसरायचा, त्याची समजूत काढेपर्यंत तिची पुरती दमछाक व्हायची.

ती रात्री अंथरुणावर पडली तर तिची अवस्था आणखीनच नाजूक व्हायची, तिला सगळं आयुष्य अर्थहीन, रंगहीन वाटू लागायचे. त्याच्या आठवणीचे भूत तिच्या मनाच्या, हृदयाच्या, मेंदुच्या कानाकोपऱ्यात रुंजी घालू लागायचे. त्याचा समोर हार घातलेला फोटो बघून तिला गलबलून यायचे. तिच्या मनात, जाणीवेत, दु:खाची, निराशेची छाया पसरून जायची. हजार दुखऱ्या देठांची निराशा तिच्या शरीरात पसरु लागायची.

त्याचा शरीरावर अलगद फिरणारा हात तिला आठवला की तिला उष्ण काटेरी वेदना जाणवू लागायच्या. बाहेरील चाफ्याच्या फांद्यांची सळसळ तिच्या अतृप्तीत आणखी भर घालायची. सारी रात्र कोणतरी तिला अनकुचीतदार नखांनी फाडतंय किंवा तिच्या शरीरात लाल तप्त सुया टोचतायत असं तिला वाटू लागायचे.

ती अंथरुणात पडली की तिला त्याच्या जवळकीची उब आठवायची. तिचे मन त्याच्यासाठी आक्रंदत, रडत, विव्हळत रहायचे. त्याच्या बरोबरचे दिवस तिला परत मिळावेत अशी इच्छा ती करत रहायची. ते अगदी गेली पंधरा वर्ष एकमेकांचे साथीदार होते, सुख दु:खाचे भागीदार होते, उत्कट प्रेमाच्या बंधनात एकमेकांशी जोडून गेले होते. दोन शरीर पण एक प्राण, पण आता ते सरले होते. तिची त्याच्याबद्दलची तीव्र भावना मनात उसळून यायची. दोघे एकरुप होताना काय करु, किती करु अशी उचंबळणारी भावना तिला जाणवत रहायची. एकमेकाबद्दलची असणारी अनाकलनीय तहान, त्याची घट्ट मिट्टी आणि रातक्रिडेनंतरची शांत झोप आठवून तिचे मन उदविग्न होऊन जायचे. कधी पहाट होईल आणि ही काळी मांजरासारखी रात्र संपून जाईल अशा विचारात संवेदना बधीर होऊन तिला कधी डुलकी लागायची हे तिला समजायचे ही नाही.

दिवसामागून दिवस कासवाच्या संथगतीने पुढे सरकू लागले. रोज कुणीतरी सगे सोयरे, नातेवाईक, मित्र परिवार जखमेवरचा ढपला काढून जाऊ लागले. त्यांच्या चेहऱ्यावर सहानुभूतीची हिरवीगार पाती बघून तिच्या मनाला काटेदार बाभळीसारखे टोचण लागायची. तिच्या बंगल्याच्या उद्घाटनासाठी आलेल्या मैत्रीणी उदासीचा आव आणून भेटण्यासाठी आल्या. त्यांच्या चेहऱ्यावरची असूया काळोख्या अंधारासारखी गडप होऊन गेली. तिच्याच गालावर खरबरीत चपराक बसल्याचा भास तिला झाला. तिच्या नशिबाचा मखमली डबा बंद होऊन गेला. तो आता कदाचित कधीच उघडणार नव्हता. त्यातून माणिक मोती खळ् करुन घरंगळून बाहेर पडण्याची शक्यता नसल्यासारखीच होती. तिच्या जीवनातील सनईचे सुर हरपल्यासारखेच होते. मुक, ठसठसीत असहाय्य दु:खाची विहिरीची काळीज कातरणारी विषणता दाटून आली होती, तिने स्वत:ला काटेरी बाभळीच्या कोशात अंग दुमडून घेतले.

स्वाती, पराग थोडेसे स्थिरावल्यासारखे वाटू लागले. स्वातीची शाळा, परागच्या

बाललीला सुरु झाल्या. समुद्राचा वाळवंट जरी झाला तरी माणसाचं जगणं सुख दु:खासकट चालूच राहत असते. ती सुद्धा पुर्ववत दवाखान्याला जाऊ लागली.

तिचे भकास लाल टिकलीशिवायचे कपाळ, मंगळसुत्राविना गळा हा लोकांच्या दृष्टीने अगदी सहानुभूतीचा विषय झाला. लोकांच्या चवताळलेल्या, चेकाळलेल्या आशाळभूत नजरा टाळता टाळता तिच्या परिसरातील रातराणीच्या सुगंधाने मस्तवाल, बेभान झालेले लक्ष सापांचा विळखा पडलाय अशी जाणीव तिला व्हायची. शेवटी अगदीच वैतागुन कंटाळून ती कपाळावर रक्ताळलेली टिकली व गळ्यात मंगळसुत्र अडकवू लागली.

तो शेजारचा मान वाकडा, ढेरपोट्या रम्या, सागर असताना कधी मान वर करुनही बघायचा नाही. “वैनी, काय अडचण असली तर सांगा मी एका पायावर तुमच्या मदतीसाठी उभा आहे” असे म्हणत चौकोनी तोंडाने उगाचच फदकन हसायचा. तो असा फदकन हसला की त्याचे पिवळे वेडेवाकडे दात बघून तिला अगदी शिसारी यायची. त्याच्या अनावश्यक आपुलकीने तिच्या डोक्यावर कोणतरी शंभर किलोचा हातोडा मारतोय असे वाटायचे.

तो खापरतोंड्या, चोंबडा सुनिल पुर्वी इंजेक्शनचे तीस रुपये देताना अगदी खिसे चाचपून पँटच्या उजव्या खिशातून एक दहाची नोट, डाव्या खिशातून एक दहाची नोट द्यायचा आणि म्हणायचा ‘राहिलेले दहा मांडून ठेवा’ आजकाल त्याचे वरचेवर दुखणे, ताप, कणकण अगदी वाढलेली होती. सारखे तो इंजेक्शनचा आग्रह करायचा. त्याच्या डावा दंड इंजेक्शन देताना तिला पकडावा लागायचा तेव्हा तो इतक्या विचित्र हालचाली करायचा जेणेकरुन त्याच्या अंगाच्या किळसवणा स्पर्शाने तिला शिसारी यायची. आजकाल तो पाचशे रुपयाची नोट द्यायचा आणि पुढच्या बिलासाठी आगाऊ रक्कम दिल्याचा आव आणायचा. ह्याला एखादे इंजेक्शन देऊन कायमचे आडवे करावे की काय असा विचार तिच्या डोक्यात चमकून जायचा.

तिच्या छोट्या बहिणीच्या नवऱ्याच्या फेऱ्या पण आजकाल अनाहूतपणे वाढल्या होत्या. तासन्तास इकड तिकडच्या गप्पा अगदी फतकल मांडून रंगवून रंगवून सांगायचा.

तिला असा भास व्हायचा की समोर अगदी लांबच्या लांब मोकळ मैदान आहे. सोसाट्याचा वारा कर्कश शीळ घालत सुटला आहे. मैदानात मध्यभागी ती एकटी उभी आहे. तो भयंकर वारा तिच्या अंगाशी झोंबतो आहे. तिचा पदर उडतो आहे. तिच्या पायाशी नागांची झोंबाझोंबी चालू आहे. असंख्य नागांनी तिच्या दोन्ही पायावर, हातावर, शरीरावर गोल गोल वेटोळे केले आहे. ते सगळे नाग एकत्र येऊन तिच्यावर दंश मारतायत. ती एक एक सर्प तिच्या अंगावरुन उजव्या, डाव्या हाताने काढून टाकत आहे. पण जितक्या सापांना ती बाजुला करतेय तितकेच साप तिच्या अंगावर चढत आहेत. शेवटी हताश होऊन ती शांत झाली आहे.

इकडे घरात वेगळाच खेळ सुरु झाला. आनंदराव अगदी रोज रात्री अगदी सागर असताना सुद्धा थोडी व्हिस्की घ्यायचे. कधीकधी बापलेक दोघे मिळून सुद्धा घ्यायचे.

पण आता अगदी रात्री एक एक वाजेपर्यंत ते पीत बसायचे. वरचेवर हाक मारून पाणी, शेंगदाणे, डाळ, पापड, भजी, कांदा, लिंबू या गोष्टीची फर्माइश सोडत रहायचे. सगळे एकदाच सांगावे ना. पण एक झाल्यावर एक गोष्ट सांगत राहायचे. तिचे पाय अगदी थकून गारठून कंटाळून जायचे. पण तिला सासऱ्यांची सेवा करताना गैर वाटायचे नाही. पण आजकाल त्यांच्या भिरभिरत्या संपुर्ण अंगावर जिभळ्या चाटणाऱ्या नजरेचा त्रास व्हायचा. पाण्याचा पेला तिच्या हातून घेताना त्यांचा हात पेल्यावर थोडा जास्त वेळच रेंगाळायचा. जाता येता त्यांचे शरीरच उगाचच तिरके चालत तिला स्पर्शून जायचे. सासुबाई बाहेर गेल्या की हा खेळ वाढायचा.

तिची सासुबाई म्हणजे अगदी अजस्त्र पिंपासारखी होती. तिचा चेहरा जाड कातडीसारखा होता. कपाळ अरुंद, केस तोकडेच होते. ती चालताना अगदी दोन तीन बायका एकत्र चालल्याचा भास व्हायचा. तोंडाने पण भारी फटकळ होती. तिच्या नवऱ्याची अशी सलगी दिसायची पण ती सुनेलाच घालून पाडून बोलत रहायची.

ज्योती तिच्या खोलीत कपडे बदलत असली की कोणतरी दाराच्या फटीतून अधाशा, हावऱ्या नजरेने बघतंय असे तिला वाटायचे. पण दरवाजा उघडून बाहेर बघायचे तिला धाडस व्हायचे नाही.

ती आरशासमोर पुर्वी अशी तासनतास उभी रहायची. तिचा सडपातळ, कमनीय देह, खांद्यापर्यंत रुळणारे काळे केस, तिचे तेजस्वी डोळे, त्यातील मिश्कील छटा, तिची मुलायम त्वचा, रुंद कपाळ, त्या कपाळावरचा लाल तेजस्वी टिपका, तिचे कमळाच्या पाकळ्यासारखे पाय, ती स्वतःमध्येच हरवून जायची. अशा नाजूक वेळी सागर मागून येऊन तिच्या कंबरेला विळखा घालायचा. दोघे अगदी धुंद होऊन एकमेकात सामावून जायचे.

आजकाल ती आरशासमोर उभारायला घाबरायची. तिच्या या सुंदर देहाची तिला किळस वाटायची. ह्या सुंदर देहामुळे लक्ष कामांध नजरांना तिला सामोरे जावे लागते अशी तिची तक्रार असायची. देवाने तिला अशी अगाध शक्ती दिली असती तर अशा सगळ्या डोळ्यात तीक्ष्ण, अनुकुचीदार बाण सोडून तिने सगळ्यांना अगदी आंधळे करून सोडले असते.

आज सासुबाई नणंदेकडे गेल्या होत्या. अशावेळी जाणून भुजून ती स्वाती आणि परागला तिच्या खोलीतच झोपवायची. अभ्यास करता करता ती दोघे त्यांच्या खोलीतच झोपी गेले होते. तिचा एकटीचा जीव अगदी टांगणीला लागला होता. आनंदराव अगदी रात्री उशीरापर्यंत पित होते. जोडीला कर्कश आवाजात टी.व्ही. चालू होता. बाहेर रातकिड्यांची किरकिर तिला भयानक वाटू लागली. कधी नाही ते टिटव्या कर्कश आवाजात गाऊ लागल्या. तिने करकचून दरवाजा लावून घेतला. दोन तीन वेळा झोपेतून उठून जाऊन परत परत खात्री केली.

अर्धवट ग्लानीत असतानाच तिच्या दरवाज्यावर धाप पडली. तिने घाबरत

घाबरतच दरवाजा उघडला. कोणतरी तिला ढकलून दिले. जाड सुजलेली बोटे तिच्या कानशीलावर पडली. ती तडफडतच खाली पडली. त्या जबरदस्त तडाक्यातून सावरणे शक्य नव्हते. व्हिस्कीचा घाणेरडा दर्प त्या खोलीत घुमू लागला. 'आरडाओरड करशील तर मारून टाकीन' तो आवाज तिच्या कानात घुमला. त्या उग्र, रानवट वासाने तिला अगदी मळमळून उलटी आल्यासारखे झाले. त्याचे डोळे, मिशा, तोंड सापांप्रमाणे तिच्या शरीरावर फिरू लागले. त्याच्या दोन्ही हाताची पाची बोटे छातीवर रुतू लागली. लाख नागांचे दंश तिच्या शरीरावर केले गेले. तिने त्याच्यापासून सुटका करण्याचा प्रयत्न केला. पण त्या हिस्त्र श्वापदापासून तिच्या छोट्या देहाची सुटका होणे अशक्य होते. तिच्या तोंडातून आवाज फुटेना तिचा प्रतिकार अगदी तकलादू होता. ती अगदी चुरगळली गेली. तिचे शरीर शरमेने जळू लागले. लातेनेच त्याने तिचे शरीर ढकलले आणि लटपटत त्याने तिच्या खोलीचा दरवाजा उघडला व तो बाहेर चोरपावलाने निघून गेला. ती तशीच कितीतरी वेळ पडून होती. तिच्या अंगाला प्रचंड वेदना होत होत्या. ती असहाय अवस्थेत उठून तिच्या स्नानगृहात गेली. तिने शंभरवेळा साबण लावून तो ओंगळवाणा स्पर्श घालवण्याचा प्रयत्न केला. पण तो स्पर्श त्या शेणातल्या चिकट घाणेरड्या अळीसारखा चिकटून राहिला होता. तिने कितीवेळा तिच्या मुलायम शरीरावरची वळवळणारी जिभेला विसरण्याचा प्रयत्न केला. पण तो डंक तसाच ठसठसत राहीला होता.

इतक्यात तिला जुनी एक घटना आठवली. गंगु नावाची कोमल त्वचेची अकाली तरुणपणातच विधवा झालेली तिची स्वयंपाकीन रडत तिच्यासमोर असहायपणे उभी होती. ती पोटूशी दिसत होती. तिचे वाढलेले पोट हे सागरने केलेल्या कृत्याचे फळ आहे. असे धुमसुन-धुमसुन सांगत होती. गेल्या महिन्यात चार दिवस ती माहेरी गेली होती. तोपर्यंत तिच्या नवऱ्याने असे गुण उधळंल म्हणून मनातल्या मनात ती प्रचंड संतापली होती. पण गंगेने कुठेतरी गुण उधळले असतील म्हणून तिने अगदी रागाने, झिंज्या खेचत तिला घरातून बाहेर काढले होते. 'विस्तवाशिवाय धुर निघत नाही' हे जरी खरे असले तरी विस्तव तिचा होता म्हणून तिची पंचायत झाली होती. काही दिवसांनी तिचा कुजलेला देह तरंगत विहरीतून वर आला बरं झाले. संकट टळले म्हणून तिने सोडलेला सुटकेचा सुस्कारा आठवला आणि ती आणखीनच अस्वस्थ झाली.

तिच्या नजरेसमोर गंगुचा तरंगता देह, तिचा कुस्कटलेला देह, असंख्य सर्पांनी वेढलेली रातराणी, दोघांचे भोंड कपाळ, लक्ष दंश करणाऱ्या नजरा, ओंगळवाणे स्पर्श, एक झाल्यावर एक चलयंत्रासारखे येऊ लागले.

**डॉ. सतिशकुमार पाटील / जयसिंगपूर**
**मो. ९९६०२ ९९६९९**

**(- लेखक, व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक २०१८ चे अतिथी संपादक आहेत.)**

# बापाची कहाणी



खिसा भरलेला असो
किंवा राहोत रिकामा
बाप देतो लेकरांना
सदा मायेचा मुलामा

राबूनिया दिसरात
येती तळहाती फोडे
लेकरांच्या सुखापायी
त्याने झिजवले जोडे

भाऊ, पती आणि बाप
निभावतो सारी नाती
भार संपूर्ण घराचा
तोलूनिया एकहाती

लेकरांच्या ताटामध्ये
कमी पडताच काही
त्याच्या घशातून घास
खाली उतरत नाही

भेट देतो लेकरांना
नव्याकोऱ्या कापडांची
स्वतः वापरतो जुने
जोड देतो ठिगळांची

आहेराच्या स्वरूपात
देतो आयुष्याची पुंजी
सुख लेकीचे घालते
त्याच्या मनामध्ये रुंजी

वर फणसासारखा
आत नारळाचं पाणी
खरं सांगायचं तर
हीच बापाची कहाणी

**- श्री. सागरराजे निंबाळकर / उल्हासनगर**
**मो.- ८८७९८९७७९७**

# “ लढवय्या”



जीवन एक सप्तरंगी प्रवास
पदोपदि भेटती अनेक लढ म्हणण्या
असाध्य ते साध्य करण्या
लढ म्हणती जीवन जगण्या
एका मागुनी एक वर्ष ही सरती
अनुभव सुख दुःखाचे देवुनी जाती

दुनिया ही अतरंगी बेढंगी मृगतृष्णे समान
हो लढवय्या सकारात्मकतेची धरूनि
कमान
नैराश्या वर करुनी मात हो सज्ज
जगण्या
होती प्रहार तुजवरी तुला कमजोर
बनवण्या
खडतर प्रवास जरी हा, असाध्य कदापी
नाही
मिळव विजय सर्व काहि साध्य करण्या

नको मानु हार या स्वार्थी संसारा
आत्मनिर्भर होउनि सिद्ध हो लढण्या
घात प्रतिघात आरोप प्रत्यारोप उभे
सामोरी दुर्बल तुज करण्या नको डगमगु
इच्छा शक्तिच्या बळावर
सिद्ध हो चार हात करण्या

अबाल, वृद्ध,
अबला, युवा
सर्वची बेहाल
बेबस हे चक्रव्यूह
भेदण्या
कुठे वैश्विक आधुनिकतेचा पगडा, कुठे
महामारीचा गरका सोसण्या
जीवन संगीत गाण्या, लढण्या हो सज्ज
तू मनुजा हो सज्ज तू मनुजा

अमानवीयता, क्रूरता पदोपदि घाव घाली
ना संस्कृती, संस्काराचा इथे तालमेल
लढवय्या म्हणुनी हो धैर्यशील खंबीर
हो तूच तूझ्या भविष्याचा आधार
राखण्या मनाचा समतोल
लढ म्हणणारे दोन शब्द सुदीजनांचे
ऐकण्या आतुर अजूनी,

तिमिरातुनि तेजाकडे मार्गस्थ होवू सारे रे
एक मेका वाट दाखवु नको झगडण्या
बनु कारण रे
थाप पड़ता पाठीवरी कौतुकाची रे
जोमाने कार्य करण्या धडपड आमुची रे
डोंगर दुःखाचे किती ही येवो फक्त लढ
म्हणा, फक्त लढ म्हणा

**- प्रा मनीषा नाडगौडा /बेळगाव**
**मो.- ९२४१९२३४१८**

# काळजाला भिडणारा ज्वलंत प्रश्न : वाळवाण



भारतासारख्या विकसनशील देशात आजही मोठया प्रमाणात पाणी टंचाई विषयीचा मूलभूत प्रश्न तीव्र असून गाव ते देश अशी सार्वत्रिक असणारी ही अवस्था दिवसेंदिवस जटिल रुप धारण करत असून त्या विषयीच्या असंख्य योजनापैकी काही फलद्रुप होतात. तर काही तशाच धुळखात पडून राहतात. मोठमोठाले सिंचन प्रकल्प न्यायालयीन प्रक्रियेच्या अवस्थेत वर्षानुवर्ष तसेच रखडले जातात. सध्या जागतिकीकरणाच्या युगात पाण्याविषयीची सरकारची निर्णायक भूमिका मात्र स्पष्ट होताना दिसत नाही. पाण्यासारखा मूलभूत आणि ज्वलंत प्रशन सोडवताना सरकारला अनेक स्थित्यतरांतून जावे लागते. शासन निर्णय आणि अमंलबजावणी या प्रदीर्घ चालणाऱ्या अवस्थेत शोषण ही नित्याची बाब ठरली आहे. हे समीकरण सर्वसामान्य माणसांनी गृहितच धरले आहे.

जिराईत जमिनी बागायती करून वंचित मानवी समूहाचा आर्थिक स्तर उंचावून त्यांना किमान समान पातळीवर आणण्याचा सरकारचा मानवीय दृष्टीकोन अनेकदा प्रशासनिक पातळीवर डागाळलेला दिसतो. सर्वांगिण विकास हा दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून बहुतांश प्रकल्प मंजूर होतात. परंतू प्रत्यक्षात मात्र हे प्रकल्प पुर्णात्वास जाताना बाधित मानवी समूहाला सोसाव्या लागणाऱ्या नरक यातनांची दखल मात्र कुठेच घेतली जात नाही. लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला देखिल असलेली मर्यादा, न्यायदानाच्या प्रक्रियेत होणारा अतिविलंब या सर्वच बाबी वंचित, बाधित समाजाला हतबल करण्यास कारणीभूत ठरताहेत. समाजात घडणाऱ्या कित्येक चांगल्या वाईट घडामोडींचा प्रभाव मोठ्या प्रमाणात साहित्यात दिसून येतो. काल्पनिकता वगळता साहित्यात व्यक्त होणारा आशय हा सामाजिक घडामोडीचे प्रतिंबिंबच असते.

लेखक हा समाजातला एक घटक असून तो या सर्वांपासून विभक्त होऊच शकत नाही. लेखकाची साहित्य निर्मिती प्रक्रिया ही समाज सापेक्ष असते. समाज आणि साहित्य हा सहसंबंध असून साहित्य हा समाजाचा एकप्रकारे आरसाच असतो. कुठल्याही साहित्य निर्मिती प्रक्रियेची सुरवात ही तत्कालीन कार्यकारण भावातून प्रभावीपणे होत असते. दिवसेंनदिवस साहित्याचे बदलते स्वरूप आणि आशय हे नव्या सामाजिक अवस्थांचे प्रतिबिंब असून तिची अवस्था अतिशय गुंतागुंतीची व तितकीच व्यामिश्र स्वरूपाची आहे. आजवरच्या वाङःमयीन इतिहासावर नजर फिरवल्यास आपल्याला असे दृष्टीस येईल की कादंबरी हा वाङःमय प्रकार इतर

वाङ:मयच्या तुलनेत अधिक सामाजिक अंगाने गेलेला दिसून येतो. तसाच वाचकांच्या हाताशी जवळीक साधणारा सर्वश्रूत हा वाङ:मय प्रकार आहे. लेखकाच्या एकूणच भावविश्वावर प्रभाव पाडून गेलेला एखादा घटक साहित्य निर्मिती विषयी बीजरोपण करण्यात यशस्वी ठरतो. भोवतालच्या प्रभावित घटकाने लेखकाला लिहिण्याची प्रेरणा मिळते.

सध्याच्या अस्वस्थ वर्तमानात कादंबरी सारखा वाङ:मय प्रकार त्याला मुक्त अवकाश निर्माण करुन देतो. अलिकडच्या काळात मात्र कादंबरीचा प्रवास हा वास्तववादी दिसून येतोय. खेडोपाडी देखिल अनेक लिहिते हात नव्याने समोर येताहेत. त्याच्याकडून चांगली कादंबरी लिहिली जात आहे. हे साहित्य वर्तुळाच्या सत्ताकेंद्री समूहाला आपसूक निर्माण झालेले एक नवे आव्हानच आहे. लेखकाला सतावणाऱ्या अनेक प्रश्नांच्या उत्तरासाठी तो नेहमीच धडपडत असून त्याला लेखनातून अभिव्यक्त झाल्याशिवाय पर्यायच उरत नाही. रवी राजमाने लिखित “वाळवाण” ही अलिकडची बहुचर्चित कादंबरी वंचितांच्या दुखऱ्या जाणीवां घेऊन वाचकांसमोर आली आहे. औरंगाबादच्या साकेत प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या आशयगर्भ कादंबरीचे मुखपृष्ठ सुप्रसिधद चित्रकार अन्वर हुसेन यांच्या सृजनशील कुचंल्यातून साकारलेले असून ते वाचकाला प्रथम दर्शनी अस्वस्थ् केल्याशिवाय राहत नाही. भोवतालच्या सामाजिक स्थितीचे अवलोकन करुन ज्वलंत प्रश्नाला वाचा फोडण्याचे महतकार्य लेखक वाळवाणच्या माध्यामातून करताहेत हे विशेषच.

लेखक रवी राजमाने हे मूळचे दुष्काळी पट्ट्यातील असल्याने वास्तवाच्या खऱ्याखुऱ्या झळा सोसून गाठीशी बांधलेले अनुभव त्यांच्या साहित्यात आपसूक येतात. ग्रामीण कष्टकरी वर्गातून आलेले राजमाने त्यांच्या साहित्यात मानवतेची आस असतेच शिवाय दर्जेदार लेखन हा त्यांचा मूळचा पिंड तसूभरही ढळलेला नाही. दुष्काळी पट्ट्यातील प्रकल्पग्रस्त अल्पभूधारक शेतकरी त्यांची झालेली कुंचबना, हक्कदार असूनही सरकार दरबारी होत असलेली विटंबना आणि नियतीने क्रुरपणे त्यांच्यावर केलेला आघात अशी संघर्षमय मराठीतील ही अस्सल कादंबरी चांगलीच लक्षवेधी ठरली आहे. शासन दरबारी असलेली दप्तर दिरंगाई त्यातच कोरड्या हाताने काम करताना कर्मचाऱ्यांना आलेली उदासिनता त्यामुळे व्यवस्थेची झालेली दयनीय अवस्था न पाहण्याजोगी आहे. परंतू त्यामध्ये रोजराज भरडला जाणारा माणूस मात्र सर्वसामान्यच आहे. पांढरपेशातील प्रस्थापित मातब्बर लोकशाहीच्या चौथ्या स्त्ंभाला देखील अगदी सहजतेने हात घालताना दिसताहेत. पितळ उघडे पडेल की काय या भितीपोटी अभिव्यक्ती स्वांतत्र्याचाही गळा दाबायला मागे पुढे पाहत नाहीत.

प्रकल्पाच्या विधायक कार्याने पाणलोट क्षेत्रातल्या खातेदारांचे उखळ पांढर झाल हे नक्कीच परंतु प्रकल्प बाधितांचा संसार उघडयावर पडला त्याच काय. हा गंभीर

प्रश्न व्यवस्थेला विचारणारी "वाळवाण" कादंबरी दखलपात्र वाटते. आपल्याच हितसंबंधाचे हात ओले करण्याचा आप्पलपोटा प्रयत्न कादंबरीत ठळकपणे निर्देशनास येतो. शेतकऱ्याच्या शेतातून जाणाऱ्या कॅनॉलने सारे शिवार सुजलाम सुफलाम होणार होते. ह्या आंनदाने अनेकांच्या चेहऱ्यावर चांगलीच उजाळी आली होती. परंतू बहुतांश अल्पभूधारक शेतकरी भूमीहीन होणार या धास्तीने दिवसरात्र संभ्रमावस्थेत जगत होते. असंख्य मोर्चे आंदोलने तसेच उपोषण व निदर्शने करून हैराण झालेल्या प्रकल्पग्रस्त बाधित शेतकऱ्यांच जगणं असाहाय्य झाले असताना सरकारने खोटी आश्वासने देऊन एकप्रकारे अमानुष छळ केल्याचे दिसते. शेवटी शेतकऱ्याने न्यायहक्कासाठी केलेला निकराचा प्रयत्न मात्र अयशस्वी ठरतो.

सामाजिक आशयाची "वाळवाण" ही कादंबरी वाचकाला अंतमुर्ख करणारी आहे. वाचकांच्या मनी वाचता वाचता सामाजिक बांधिलिकीचा भाव जागा व्हावा, इतका प्राजंळ हेतू लेखकाच्या अंत:करणात आहे. आपल्या अनुभवाशी इमान राखत विषय एक असला, तरी त्याच्याशी संबंधित अनेक समस्यांच्या धांडोळा घेतला आहे. काही ठिकाणी पात्रांचा संवाद उथळ अथवा वरवरचा वाटत असला, तरी कादंबरीचा आवाका लक्षात घेता तो कुठल्या कुठे विरून जातो हे तितकेच खरे आहे. सध्यस्थितीत वाळवाण कादंबरी आपलं अस्तित्व चांगल्याप्रकारे टिकवेल अशी खात्री वाटते. निश्चीतच प्रकल्पाच्या कामात होणारा भ्रष्टाचार, कामाचा निकृष्ट दर्जा व संबंधिताना कामाचा मिळालेला ठेका एकूणच व्यवस्थेविषयी मनात असलेली चीड शब्दात व्यक्त करताना लेखक डळमळलेला नाही. मौखीक आश्वासाने देऊन तोंडपूजेपणा करण्याचा शासकीय अधिकाऱ्यांच्या दांभीकपणा एखाद्याचा जिवघेणा ठरू शकतो याचे अशोक तुकाराम वीर हे उत्तम उदाहरण होय.

सामाजिक स्थितीच अवलोकन करण्यात लेखक पुर्णपणे सजग असून जाणिवांच्या पातळीवर जाऊन आकारास आलेली "वाळवाण" ही कादंबरी वर्तमानातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय या सर्व अंगी स्पर्श करुन जाते. प्रकल्प उदिष्ट साध्य करताना सरकारने दाखवलेला आततायीपणा वेळेप्रसंगी कागदी घोडे नाचवून वीर कुटुंबाची केलेली जाणीवपुर्वक फसवणूक जिव्हारी लागल्या वाचून राहत नाही. वीर कुटुंबाच उदध्वस्त भविष्य वाळवाणमध्ये शब्दबध्द करताना लेखकाच्या मनातली अस्वस्थता नक्कीच कारणीभूत ठरली असावी हे तितकेच खरे. कणा मोडून पडलेल्या, व्यवस्थेला बळी ठरलेल्या भूमीहीन वीर कुटुंबाची हदयद्रावक कथा, व्यथा वाळवाणमध्ये पहावयास मिळते. दुष्काळात जन्मलेल्या अशोक तुकाराम वीरच्या भावी आयुष्यात मात्र कायमचा दुष्काळच लिहिला होता. जन्माने सदृढ पण पोलिओ डोस अभावी आलेली अपंगत्व तरीही जिद्दीने पेटलेला हा उमदा तरूण शैक्षणिक टप्पे पुर्ण करून सरकारी नोकरीच्या शोधात दाहीदिशांचे दरवाजे ठोकत होता. परंतू दाही दिशा त्याच्या पदरी निराशाच

पडते.

अशोकच्या उण्यापुऱ्या आयुष्यात त्याच्या वाट्याला आलेली ससेहोलपट, सरकार दरबारी येरझाऱ्या घालून बेजार झालेल्या अशोकची जीवनयात्रा काळाच्या झडपेने अकालीच संपून जाते. पाय निकामी झालेल्या अशोकचा जीवघेणा संघर्ष परिस्थितीने गांजलेल्या अवस्थेत तुकाराम व त्याची पत्नी तारा मोठ्या जिद्दीने संसाराचा गाडा पुढे रेटत आपल्या मुलाचे सुखी स्वप्न त्याच्या डोळ्यात तरळत असायच. अशोक तुकाराम वीरची प्रकल्पाने झालेली झाडाझडती दोनवेळच्या जेवणाचीही भ्रांत आणि नियतीन केलेला क्रुर अत्याचार ह्या दोन्ही व्यवस्थेचा अशोक वीर बळी ठरतो. त्याच्या जाण्याने कुटुंबाचा कणा तर मोडलाच पण मरण यातना कायम तशाच राहिल्या हे दुर्दैव. त्याची पत्नी पदमिनी, आई ताराई व अंथरुणावर खिळून राहणारा बाप तुकाराम यांना मरणयातना भोगाव्या लागतात. ज्वलंत प्रश्न ऐरणीवर आणणारी ही सामाजिक आशयाची कादंबरी वंचित समूहाच प्रतिनिधत्व करते. कादंबरीतले घटना, प्रसंग, पात्रे, संघर्ष केंद्रे इ. बाबीमुळे तिचे वाङ:मयीन महत्व नक्कीच अधोरेखित होते.

वाळवाणमधील पाण्यासंबंधित असलेला कांदबरीचा मुख्य विषय असला तरी राजकीय हस्तक्षेपाने त्याला आलेले उग्ररुप व त्यात भरडलेल्या वीर कुटुंबाची व्यथा हेच कांदबरीचे मध्यवर्ती केंद्र आहे. कांदबरीचा आशय आणखी चांगल्याप्रकारे खुलवण्यासाठी लेखकास नक्कीच वाव होता. पात्राशी अनुरुप असलेला ओघवता संवाद तशी ग्रामीण बोली ठासून भरली आहे. लेखक शैक्षणिक व शेती क्षेत्रात उत्तम असतानाही साहित्य क्षेत्रात त्यांनी मारलेली मजल वाखाणण्याजोगी आहे. कादंबरीचा शेवट अतिशय क्लेशकारक आहे. कारण अशोक तुकाराम वीर सारख्या उच्चविद्याविभूषित तरूणाने निराशेच्या गर्तेत जाऊन आत्महत्यासारखा भयावह पाऊल उचलून स्वत:ची मुक्तता केल्याचे दिसते. परंतु कुटुंबावर मात्र एकप्रकारे अन्यायच झाल्याचे दिसते. प्रतिकूल परिस्थितीत अनुकूलता शोधण्यासाठी जीवाचं रान करणारा व्यवस्थेला टकरा देणारा कादंबरीचा अपंग नायक अशोक तुकाराम वीर शेवटी हताशपणे व्यवस्थेला शरण जाताना दिसतो.

कादंबरीचे नाव : वाळवाण
लेखकाचे नाव : रवी राजमाने
प्रकाशन संस्था: साकेत प्रकाशन औरंगाबाद
एकूण पृष्ठे : १६०
पुस्तकाचे मूल्य : १७५ रु

**- धनाजी घोरपडे, / बहादुरवाडी,**
**मो.- ९४२१३०३७०२**

# सुगी



आवंदा लई भिगी सुगी आली छान
हळद लेऊन डोललं जेवारीचं रान

हिरव्या पिवळ्या रानी भिरभिर
पाखरं
मकेच्या कडेवर डझन डझन लेकरं
पिवळ्या डुलात बाभळीचे नटले
कान
आवंदा लई भिगी सुगी आली छान

साळीला झोंबल्या जणू
सोनसाखळ्या
वरतूळाकार थांबल्या सुर्यफुलांच्या
पाकळ्या
रानीवनी छान रानपाकरांचं गाण
आवंदा लई भिगी सुगी आली छान

आलं पाणी हाताला विहरी अन्
आड ला
चिऊचिमण्यांनी बंगले टांगले रे
झाडाला
नाच थयथय मोराचा चालला
बेभान
आवंदा लई भिगी सुगी आली छान

चारा भारा-भारा
खाऊन ताजे लठ
ढोरं
काकड्या
शेंगाच्या फराळावर
गुराखी पोरं
मुबलक पिकपाणी समदं समाधान
आवंदा लई भिगी सुगी आली छान

कपाशीला फुटले शुभ्र चांदण्याचे
बोंडे
उजळले आनंदात घराबाराची तोंडे
म्हणली माय दिवाळीला
बहिणीला आण
आवंदा लई भिगी सुगी आली छान

उन पाऊस वारा सोसून दुक मोठं
समद या  दुनयेची कुणबी भरी
पोटं
तोच एक महान जणू भगवान
आवंदा लई भिगी सुगी आली
छान !

**- मुरहारी कराड / अहमदपूर**
**मो.- ७३९१९८७२९८**

# असेच तुज आता जगायचे आहे..



अंधार हा हरक्षण असणार
आहे अन् स्वाभिमानाला
ठेच तर पोहोचणार आहे
या अंधारात जायचे पुढे
तर स्वाभिमानाला काटे
बोचणार आहे

थांब जरासा आडोसा घे
काटा पायातला काढून
टाक सहानुभुती च्याअश्रूने
व ज्ञानाच्या  औषधाने ती
जखम धुवून टाक

थांब जरा विचार कर सुख
दु:खाचे चक्र तर सतत
चालूच राहणार एका
अंधारातला दिवा दुसऱ्या
अंधाराला कसा चालणार

प्रत्येक क्षणी मनाच्या
आतला दिवा पेटवावाच
लागणार आहे मागील दिवा
पुढे कसा उजेड आणणार
आहे

प्रत्येक क्षणी सुखात जास्त
हसायचे नाही दु:खात
स्वाभिमान विकायचा नाही
तर त्या वेळी जगण्याचा
समतोल साधायचा आहे
गत स्मृतींना व गतव्यक्तींना
बाय-बाय करून पुढचा मार्ग
चालायचा आहे

असेच तुज आता जगायचे
आहे...

**- किशोर मोगल-पाटील / औरंगाबाद**
**मो.- ८५५०९१५७८९**

# वेळ वाचवा, आयुष्य वाचवा!



वेळ ही एक प्रकारची संपत्तीच आहे! तुमचे आयुष्य हे तुम्ही तुमचा वेळ कसा घालवता यावर पूर्णपणे अवलंबून आहे. एकदा गेलेली वेळ पुन्हा कधीच येत नाही. म्हणूनच वेळेचा सदुपयोग करणे खूपच महत्त्वाचे आहे. वेळ वाया घालवणे म्हणजे आयुष्य वाया घालवणेच आहे!

हे विचार आहेत १६० पानाच्या एका छोटेखानी पुस्तकातले! हे पुस्तक वाचले आणि मी भारावून गेलो!

पुस्तकांमुळे माणसाचे आयुष्य बदलू शकते यावर माझा तरी ठाम विश्वास आहे. पण हे पुस्तक तर कुणाचेही आयुष्यच बदलून टाकेल, याचा मला भरवसा आहे. इतके सुंदर पुस्तक आहे हे! या पुस्तकाचे नाव आहे "हाऊ टू गेट कंट्रोल ऑफ युवर लाइफ अँड युवर टाईम" ! हे पुस्तक ॲलन लेकीयन या प्रसिद्ध टाईम मॅनेजमेंट तज्ञाने लिहिले आहे आणि अमेझॉन वर उपलब्ध आहे. हा माणूस साक्षात हार्वर्ड मधून एमबीए झाला आहे. त्याचे हे पुस्तक बेस्ट सेलर आहे. पण असे आहे तरी काय या पुस्तकात? त्याचा सारांश मी खाली देत आहे. तुम्ही तर हे पुस्तक अवश्य वाचाच, पण तुमच्या मित्रमंडळी आणि कुटुंबीयांना पण हे पुस्तक वाचायला सांगा.

वेळेचा सदुपयोग करा याचा अर्थ असा नाही की तुम्ही दिवस-रात्र कामच करत रहावे! आयुष्यातील प्रत्येक क्षण सत्कारणी लागला पाहिजे म्हणून, सतत घड्याळाकडे पाहत, डोळ्यात तेल घालून जागृत रहावे. असे आयुष्य जगण्यात काहीच अर्थ नाही! तुम्ही जर वेळेचे नियोजन योग्य प्रकारे केले तर तुम्हाला तुमच्या आवडत्या गोष्टी - मग ते चित्र काढणे असो, लेखन /वाचन असो किंवा खेळ असो, त्यासाठी भरपूर वेळ मिळायला हवा! तरच त्याला काही अर्थ आहे. पुलंनी म्हटलंच आहे की जगण्यासाठी पोटापाण्याचा व्यवसाय सचोटीने करा; पण त्याबरोबरच एखादी कला, एखादा छंद जोपासा. तो तुम्हाला आयुष्य कशासाठी जगायचे ते शिकवून जाईल!

आपण बरेचदा असे म्हणतो की अरे यार, मला इतके काम आहे की दुसरं काही करायला वेळच मिळत नाही! पण ॲलन ने एक गोष्ट ठामपणे मांडली आहे की वेळ नाही ही गोष्ट काही खरी नाही! आपल्याला प्रत्येक गोष्ट करायला भरपूर वेळ असतो, पण फक्त योग्य नियोजन न केल्यामुळे आपल्याला वेळ मिळत नाही !तुम्हाला जर वाटत असेल की आपण खूप बिझी आहोत, तर मग काही नाव आठवा जसे की नारायण मूर्ती, रतन टाटा, अमिताभ बच्चन किंवा नरेंद्र मोदी! या इतक्या मोठ्या लोकांना वेगवेगळ्या कार्यक्रमांना जाण्यासाठी, लेखन करण्यासाठी, लोकांना मदत करण्यासाठी जर वेळ

असेल तर मग आपण त्यांच्यापेक्षा तर बिझी नाही ना? या सगळ्या मोठ्या लोकांना आपल्यापेक्षा जास्त वेळ आहे असे नाही. त्यांच्याही दिवसात चोवीस तासच असतात. पण ते आपल्या वेळेचे नियोजन योग्य प्रकारे करू शकतात. आपल्या कठोर परिश्रमाने त्यांनी तेवढी स्वयंशिस्त निर्माण केलेली आहे. ॲलनचे म्हणणे असे आहे की ज्याप्रमाणे आपण ड्रायव्हिंग करायला प्रयत्नांनी शिकतो, त्याचप्रमाणे वेळेचा योग्य उपयोग करणे हे सुद्धा शिकू शकतो! तुम्ही वेळेचे गुलाम बनायचे नाही तर वेळेला तुमचा गुलाम बनवा आणि मग तुमचे आयुष्य तुमच्या नियंत्रणात येईल. आपल्या सगळ्यांच्या आयुष्यात दिवसाला चोवीस तासच असतात. त्यापेक्षा जास्त वेळ तर आपण निर्माण करू शकत नाही. पण या चोवीस तासाचा पुरेपूर उपयोग कसा करायचा ते मात्र आपण ठरवू शकतो. वेळेचे योग्य नियंत्रण केले तर तुम्हाला आश्चर्य वाटेल की तुमच्याजवळ जास्त मोकळा वेळ राहील, जो तुम्ही तुमचे कुटुंबीय, मित्रमंडळ, छंद, खेळ यांना देऊ शकाल! तुम्ही म्हणाल की नियोजन वगैरे ठीक आहे. आम्हालाही ते कळतं! हे सगळं बोलायला सोपं आहे पण नेमके काय करायचे?

तर तेच आता पण पुढे बघणार आहोत. पहिला महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कुठलेही नियोजन तुम्ही मनात करू शकत नाही ते तुम्हाला वहीवर, नोटबुक मध्ये लिहून काढायला पाहिजे. तुमच्यापैकी किती जण आपल्या कामाची यादी करतात? मोबाईलवर किंवा लॅपटॉपवर किंवा एखाद्या नोटपॅड वर! बर फक्त कामाची यादी तयार करून सुद्धा प्रश्न सुटत नाही, तर त्याचा अग्रक्रम करणे सुद्धा आवश्यक आहे! याची साधी "एबीसी" वर्गीकरण पध्दत आहे! सगळ्यात महत्त्वाचे काम "ए" असते, त्यापेक्षा कमी महत्त्वाचे "बी" काम आणि "सी" कामाला नगण्य महत्त्व असते. तुम्ही जितकी "ए" कामे करू शकाल आणि "सी" कामांकडे दुर्लक्ष कराल, तेवढे तुम्ही यशस्वी व्हाल ! याबाबत एक ८०:२० नियम पण आहे. "ए" कामांची यादी खूप मोठी नको, तर अगदी निवडक कामे असावीत. या २०% कामांना ८०% टक्के महत्त्व असते. तर उरलेल्या ८०% कामाचे फक्त २०% टक्के महत्त्व असते.

म्हणजे तुम्ही जर तुमच्या कामांची आठवड्यातून एकदा यादी केली आणि त्याचे महत्त्वानुसार "एबीसी" वर्गीकरण केले तरी तुम्ही अर्धी बाजी जिंकली असे म्हणायला हरकत नाही. तर आता ही "एबीसी" कामांची यादी कशी करायची हे सगळ्यात महत्वाचे आहे आणि त्यासाठीच ॲलन ने एक पध्दत शोधून काढली आहे, जी जगविख्यात झाली आहे.

एखाद्या रविवारी तुम्ही शांतपणे बसा आणि स्वतःला फक्त तीन प्रश्न विचारा -

१) तुमच्या आयुष्याचे ध्येय काय आहे?

२) पुढच्या तीन वर्षात तुम्हाला काय साध्य करायचे आहे?

३) जर तुम्हाला आज कळले की तुम्ही पुढील सहा महिन्यांत या जगाचा निरोप घेणार आहात, तर तुम्ही काय कराल?

आता पहिल्या प्रश्नाचा विचार करूया. तुमच्या आयुष्याचे ध्येय खूप श्रीमंत होणे, निरोगी राहणे, वजन कमी करणे, सुखी आयुष्य अशी असू शकतात. या सगळ्या गोष्टी तुम्ही एका कागदावर लिहून काढा. कुठल्याही विचाराला थांबवू नका.

मग स्वतःला दुसरा प्रश्न विचारा. पुढच्या तीन वर्षात तुम्हाला काय साध्य करायचे आहे? या प्रश्नाच्या उत्तरात फ्लॅट घेणे, कार घेणे, मुलांना चांगल्या शाळेत घेणे, एमबीए करणे, दुसरी चांगली नोकरी शोधणे अशी उत्तरे सुचतील. ती पण एका वेगळ्या कागदावर लिहून काढा. लक्षात ठेवा, कुठलेही उत्तर चुकीचे नाही. त्यामुळे मनात येतील ती सगळी उत्तरे लिहून काढा.

मग तिसरा प्रश्न विचारा- तुम्हाला जर कळले की तुम्ही सहा महिन्यात या जगाचा निरोप घेणार आहात तर तुम्ही काय कराल? या प्रश्नाची उत्तरे थोडी वेगळी असू शकतात. जसे सगळ्या जगात फिरणे, खूप सिनेमे बघणे, आवडीचे पदार्थ खाणे, कुटुंबीयांसोबत वेळ घालविणे अशी उत्तरे सुचतील. ती पण एका वेगळ्या कागदावर लिहून काढा.

आता तुमच्याजवळ तीन वेगवेगळी पाने आणि याद्या असतील. त्यातील पहिली यादी घेऊन त्यातून आयुष्यातील ध्येयाची तुम्हाला महत्त्वाची वाटत असतील अशी फक्त तीन ध्येये निवडा. तसेच दुसऱ्या तीन वर्षातील ध्येयातील तीन ध्येये निवडा. शेवटी सहा महिन्यांचा यादीतून तीन गोष्टी निवडा. अशाप्रकारे तुमच्याजवळ आता एकूण नऊ ध्येयाची यादी तयार झाली असेल. तुम्हाला आश्चर्य वाटेल की या तिन्ही याद्यांमध्ये एक समान सूत्र राहील. दुसऱ्या यादीतील गोष्टी पहिल्या यादीतील गोष्टींचीच पुढची आवृत्ती असेल आणि तिसऱ्या यादीत पण एक समान सूत्र दिसेल.

मग आता एक नवीन कोरा कागद घ्या आणि त्यावर लिहा माझ्या आयुष्यातील तीन सगळ्यात महत्त्वाची ध्येये आणि मग या नऊ ध्येयांमधून फक्त तीन ध्येये निवडा! यातून तुम्हाला तुमच्या आयुष्यातील तीन ध्येये मिळतील. तुम्हीं हा स्वाध्याय जरी व्यवस्थितपणे केलात तरी तुमची यशाच्या मार्गावर वाटचाल सुरु झाली आहे असे समजायला हरकत नाही. वर्षातून एकदातरी हा अभ्यास करायला हवा! आपल्या वाढदिवसाला किंवा नवीन वर्षाच्या सुरुवातीला!

तुम्ही तुमच्या आयुष्यातील सगळ्यात महत्त्वाच्या गोष्टींची यादी करून फार मोठे काम केले आहे. पण नुसते ध्येय असून उपयोगी नाही. ते साध्य करण्यासाठी कामही करावे लागेल. तुमची ध्येये प्रत्यक्षात आणण्यासाठी तुम्हाला काही गोष्टी, काही कामे करावी लागतील. आता त्याची यादी करावी लागेल! तुमच्याजवळ आता तीन ध्येये आहेत. हे प्रत्येक ध्येय साध्य करण्यासाठी कायकाय गोष्टी कराव्या लागतील याची यादी करावी. उदा. तुमचे ध्येय जर फ्लॅट घेणे असेल तर उपलब्ध फ्लॅट्सची माहिती काढणे, बँक लोनची माहिती काढणे ई. गोष्टी कराव्या लागतील. जर तुम्हाला एमबीए करायचे तर वेगवेगळ्या कोर्सेस ची माहिती काढणे, कोर्ससाठी रजिस्ट्रेशन करणे अशा अनेक गोष्टी कराव्या लागतील. या सगळ्या गोष्टी शांतपणे, विचार करून लिहून काढा.

अजिबात घाई करू नका. या सगळ्या नियोजनासाठी काही दिवस किंवा आठवडे लागले तरी चालेल, पण योग्य ती ध्येये आणि कामे ओळखता आली पाहिजेत.

अशाप्रकारे तिन्ही ध्येयांसाठी मिळून तुमच्याजवळ एक मोठी यादी तयार होईल, त्यात १५-२० गोष्टी तरी करायच्या असतील. मग या यादीतील बिनमहत्त्वाच्या गोष्टींवर सरळ काट मारा. उदा. फ्लॅट घ्यायच्या ध्येयासाठी तुम्ही जर एक काम ठरवले असेल की मित्राचा फ्लॅट पहाणे. पण जर तुम्हाला माहिती असेल की त्याचा फ्लॅट तेवढा चांगला नाही, तर सरळ या कामावर काट मारा. उगीच आपली शक्ती वाया घालवू नका.

अशाप्रकारे बिनमहत्त्वाची कामे यादीतून काढून टाकल्यानंतर तुमच्याजवळ १०-१२ कामांची यादी राहील. त्याचे आता "एबीसी" वर्गीकरण करा. "ए" कामे ही तुमचे ध्येय गाठण्यासाठी सगळ्यात महत्त्वाची! उदा. तब्येत चांगली राखणे या ध्येयासाठी जिम जॉईन करणे किंवा नियमित धावायला जाणे हे "ए" काम आहे.अश्याप्रकारे कामांची वर्गीकरण केल्यानंतर तुम्हाला लक्षात येईल की तुमच्या आयुष्यातील महत्त्वाची ध्येये गाठण्यासाठी काय करायला हवे. आता फक्त गरज आहे ती ही कामे न चुकता नियमितपणे करण्याची! तुमचे ध्येय गाठण्यासाठी तुम्हाला सतत या यादीतील "ए" कामे करीत राहणे आवश्यक आहे!

त्यादृष्टीने दर आठवड्यात शनिवार-रविवारी पुढच्या आठवड्याचा कार्यक्रम तयार करणे, झालेली कामे यादीतून वगळणे किंवा त्यावर टिकमार्क करणे, नवीन कामे त्यात अंतर्भूत करणे, त्यांचा अग्रक्रम ठरवणे हा उपक्रम करावा. त्यातल्या फक्त महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करा! इतर भाराभर गोष्टी करण्यापेक्षा फक्त २-३ "ए" कामे जरी तुम्ही केलीत, तरी तुम्ही ध्येयप्राप्तीच्या मार्गावर आहोत, असे समजा. तुम्ही या पध्दतीने तुमच्या आयुष्याचे नियोजन केले तर कमी श्रमात तुम्ही जास्तीजास्त ध्येये साध्य करू शकाल आणि आयुष्याचा उपभोगही घेऊ शकाल!

खरंतर ही सगळी माहिती करीयरच्या सुरुवातीला का मिळाली नाही याची मला खंत वाटते. हे सगळं जर आधीच माहिती असतं तर आज आयुष्य कदाचित वेगळेच राहिले असते. तुमचे वय काहीही असो, तुमचा व्यवसाय काहीही असो, तुम्ही कुठेही रहात असाल तरीही तुम्ही या तंत्राचा वापर करू शकता ! खरंतर या गोष्टी इतक्या महत्त्वाच्या आहेत की शाळा कॉलेजमध्ये मुलांना हे सगळं शिकवायला पाहिजे! इतर विषयांप्रमाणेच टाईम मॅनेजमेंट हा विषयपण शिकवायला पाहिजे, त्यामुळे त्यांचे आयुष्य बदलू शकते!

तर मग करा या तंत्राची अंमलबजावणी आणि सुरू करा यशाच्या दिशेने घोडदौड!

**- अविनाश चिंचवडकर / बंगलोर**
**मो.- 9986196940**

# विवाह संस्था



शोषणावरच स्त्रीच्या उभा आहे
विवाहसंस्थेचा पोलादी डोलारा...
बंद होता आवाज वर्षानुवर्षे तिचा
त्या अंधाऱ्या नि कोंदट भिंतींच्या
आत..

शोषून तिचे रक्त.. आणखीनच
मजबूत झाले आहेत..
तिथले ते दरवाजे, खिडक्या आणि
सज्जे

हजारों जणींचे टाहो गिळले आहेत,
पचवले आहेत त्या अजस्त्र राक्षसाने.

पुरुषाला कायम आपल्या
अंगाखांद्यावर जोजावत उभी आहे
लग्नसंस्था ..
स्त्रीच्या अस्तित्वाला चिकटलेल्या
जळवे सारखी...

जोपर्यंत नव्हती तिची तक्रार
शोषणाविरुद्ध स्वतःच्या...
तोपर्यंत आदर्श होती ती..

आता उठतोय
आवाज
तिच्याही आतून
लढतेय स्वतःच्या
अस्तित्वासाठी..
राहतेय उभी अन्यायाविरुद्ध
शोधू पाहतेय स्वतःचे स्वत्व..
तर लगेच..
विवाह संस्था मोडकळीला आली!!!!

तिचे रक्त मिळेनासे झाले तर तो
पोलादी डोलारा कोसळू लागला का?

स्वत्व शोधणाऱ्या मुलींच्या माथी
"पोरी जास्त शहाण्या झाल्यात
आज-काल म्हणून लग्न टिकेनात"
हा ठपका ठेवणाऱ्या पितृसंस्थेला
विचारावासा वाटतो एकच प्रश्न..
शेकडो वर्ष आम्ही पिचलो आहोत..
चार दोन पिढ्या तुम्ही पिचून पहा...
नि मोडकळीला आलेली विवाह
संस्था परत बहरून दाखवा..

**- माधुरी मरकड / अहमदनगर**
**मो.- ७७४१९३१२८४**

# शब्द



कधी कधी पंख होऊन
येतात शब्द
आणि सुरू होते
कल्पनांच्या आभाळी
भरारणे
तर कधी शब्द
होतात लाटा
आणि स्वार होऊन
त्या लाटांमध्ये
सुरू होते
मनसोक्त डुंबणे
कधीकधी शब्द येतात
विचार होऊन
आणि जागा होतो
माझ्यातील सुधारक
आणि सुरू होते
परिवर्तनाची लढाई
कधीकधी शब्द
विद्युत लतेप्रमाणे
बरसतात
आणि दुभंगून टाकता
सर्व सुख स्वप्ने
तर कधी
शब्दांनाच येते धार
आणि लढू लागतात
सत्याच्या आग्रहासाठी
स्वयंमदीप होऊन.

**- किशोर कासारे / मंडणगड**
**मो.- ८७६७४२९१८०**



# मी अनुभवलेला लॉकडाऊन



आपण सारे विचारी आहोत. विचार आचार आणि संचाराने आपले जीवन व्यापले आहे. 'व्यापक अर्थाने, क्षणोक्षणी घडे श्वासाचे अंतर, चाले निरंतर दिनचर्या' एकदमच श्वासाचे अंतर वाढले तर, धाप लागते. आम्ही धावत होतो. आम्ही सारा आसमंत काबीज केला होता. क्षणात हावेत उड्डाण व्हायची आमची. तर क्षणात जहाज, पानबुडीने पाण्यात ही प्रवास करायचो. आम्ही एकदमच गुपचीळी. "लॉकडाऊन" हा शब्द ऐकला. घरातल्या स्क्रीनवरून आम्ही पांढरं पेशी चाकरमानी मोलमजुरी करणारे. "हातावर हात धरून बसलो." "होमकोंडी" झाली आमची. आम्ही अस्वस्थ झालो. आमच्या जगण्याचा कोंडमारा झाला. कोंडवाडा झाला. आम्ही लॉक झालो. आम्ही मनाने वाटेल तिकडे उधळत होतो. खिदळत होतो. आम्हाला शिकवले, 'आपणच आपले रक्षक बना.' आपणच आपली दक्षता घ्या.

'लहानपणी आईने टाळू माखली.' शुभंकरोती शिकवली.हातपाय धुऊन ये.. 'देवाचे नमन कर'. जेवण करताना अन्नाची प्रार्थना कर.. अंगणात सडासारवण, रांगोळी, तुळसीवृन्दावन, का हावेत म्हणून आम्ही शिकलो. लग्नात हळद का लावली जाते? हळदपाणी पोटात गेली पाहिजे. आमची प्रतिकार शक्ती आज नष्ट होतं आहे. आम्ही ह्या लॉकडाऊनमध्ये शिकलो. 'स्वछ हात धूवा' रुमालाने नाक झाका. मास्क शब्द जवळचा झाला. घराच्या बाहेर पडू नका. लॉकडाऊन पाळा.भाऊ गर्दीत जाऊ नका. शेक हँड करु नका, वारंवार नाक डोळे तोंडाला हात लावू नका.

वेळोवेळी सॅनटाईजरचा वापर करा. कुणी ही विना मास्क फिरु नका. ऑफिसमध्ये सॅनटाईजर ठेवा. विनाकारण ह्या सृष्टीचा ऱ्हास थांबवा. क्षणाच्या सुखासाठी सुंदर आयुष्याची माती करायला निघालेला हा माणूस. केवळ मोठ्या हव्यासापोटी मरणाच्या गाठीभेटी घ्यायला निघालेला हा स्वतःला विज्ञानवादी तंत्रज्ञानी, म्हणणारा मात्र एका विषाणूमुळे मरणाच्या वेदना भोगीत आहे. एक अतिशूद्र विषाणू व्हायरस जो की, मृतस्वरूपी असलेला. या अवाढव्य जगाला हैराण करतो आहे. हे जगण्याचे महायुद्ध आहे. ते घरात, आपल्याच बिळात बसून लढायचे आहे. अन् कोरोनाला हारवायचे आहे. गर्दीत एखादा लागणधारी असला तरी हजार माणसं मारी असा हा आपल्या दमावर "दमकोंडी" करणारा.

नाक दाबलं की तोंड उघडंत. तसा ह्यो नाकावाटीचं घुसतो. "नाकतोड्या" मानसाच्या नाकात घुसून, घशातली लाळ खाऊन, फुफ्फूसरुपी जीवन वृधींनीलाच खलास करतो आहे. माणूस मरतो कसा हे लॉकडाऊन ने शिकवले आहे. मग ही कोरोनामीठी कशी


"व्यक्तिमत्व विकास" संपादक - मंगेश विठ्ठल कोळी, मो. 9028713820

आवळत गेली. हजारोचे आकडे वाचून, पाहून वेदना मरगळून गेल्या. मरणाची दहशत काय असते. माणूस आपले गाव शहर, रक्तामासाची नाती, आई, बायको, पोरं काय असतात? ही कोणत्या प्रेमावर जगत असतात. गाव मातीचा कनवाळू भाव ह्या कोरोना युद्धाच्या चिळकांडीने जगाला दाखवून दिला.पोटापाण्यासाठी परदेशी मजुरांची होणारी हेळसांड पाहून.

"बरा आपला गाव गड्या" इथचं मरू. इथचं पोट भरू. ही अस्वस्थ वेदना शिकवली. मरणाचे सावट कसे असते? "लोकांनी जमायचे नाही. मौतीला जायचे नाही. लग्न संमारभ फक्त नवरा, नवरी, सगळे कसे मास्कधारी. कोरोनाची लक्षण, सनसनुन, फनफनुन ताप, डोक्यात मरणाची आग, घशात कोरड, नुसती ढास. फुफ्फूस निकामी. श्वास घेण्यास त्रास. मनुष्य जीव खल्लास. "लॉकडाऊन" कायम मातीच्या उदरात. "उघड्या डोळ्यांनी पहावे मरणं, मरणाचे धरण फुटलेले" आम्ही घरात पण मरण दारात. पडले बाहेर की, कोरोना आहेर. नाही टाळली गर्दीत् कोरोनाची वर्दी. लॉकडाऊन लागलं देश देवळातले देव रस्त्यावर उतरून माणसाची सेवा करू लागले. खऱ्या माणसातल्या देवाचे दर्शन झाले.

डॉक्टर, रुग्ण सेविका, त्यांच्या अंतरिक सेवेचा अर्थ कळला. नतमस्तक होऊन त्यांच्या सृजनशील मानसिकतेला सलाम ठोकावा हे कळाले. काही नतद्रष्ट लोकांनी पोलीसांवर हात उगारले. काहींना जन्माची कोरोना आदल घडली. हातात बेडी पडली. गुंडाच्या झुंडीचे दहशती पंख कापले. घरातले सगळे व्यवहारी घोड्यावर बसणारे, जिव्हाळ्याने विचारना करू लागले. चाकरमान्यांचे चाक ब्रेक लावून घरातचं चक्रा मारू लागले. माय-बापाची विचारना करू लागले. बरेच लग्न खोळंबले. काहीनी साखर पुड्यात उरकून घेतले. लॉकडाऊनने हुंकार वेदनेचा दाखवला. गावाकडची ओढ, मरण झोड, जीवाची खोड. कायम मोडून टाकली. भाकरीच्या भुकेचा थांग लागला.

महाराष्ट्राच्या भुमीमध्ये पोटभरण्या करीता आलेले परराज्यातले मजुरांचा थांग लागला. हजारो किलोमीटर अंतर पायी जायचे आहे.पायीचं निघालेला जीवाचा तांडा, जिव्हाळा गावाचा मनात घेऊन ह्या मरणमाग्या लॉकडाऊनने एकदाचं सोळा जीवांच्या भाकरीचं रक्ताळून टाकल्या. घरात बसून हे सारं भयानक, विदारक, मानवी जगण्याचं न सुटणारं कोरोना कोडं कळत होत. रोजच्या मृत्यूचा आकडा, मनाला भोवळ आणत होता. "जिथे मती खुंटते तिथून दैवत्व सुरू होते." ह्या लॉकडाऊनने मानवाला काय शिकवले?

"अरेऽऽ मानवा तु प्रत्येक बाबतीत निसर्गाला धारेवर धरतोस. सृष्टीतल्या अनेक जीवाचा तू नायनाट केला. "अति तिथे माती" आज ही कोरोनाची ही महामारी थांबत नाही. पण एक मात्र नक्की खरे आहे, "शुद्ध हवा पाणी, झांडानी मोकळा श्वास घेतला." साऱ्याच नद्या नितळ वाहू लागल्या. या सृष्टीच्या नियंत्याला ओझं कमी करायचयं. म्हणून कालचं ऑझोनचा आत्म्याला ऊर्जा मिळाली. तो प्रफुल्लित झाला हे कळाल.

आत्मिक जिव्हाळा काय असतो ते कळालं भयान वागणारी माणस घरात थांबली. लेकराच्या खेळात रमू लागली.

काही व्यसनी कसे रांगेत उभी राहिली. "सोशल डिस्टसिंग" ह्या कृतीचा वास्तवाशी संबंध आला. माणूस म्हणून जगा. घरात घरपण आले. कित्येक दिवस, वर्ष कामासाठी रहायचं, खायचं, प्यायचं मौज करायची. आई-बाबांना, पहायचं नाही. आज कोरोनामुळ कळाले अनेक व्याधी घेऊन जगणारे आई, बाबा, मुलगा बिझी आहे. त्याला वेळ नसतो. असं सारं लपवतं आयुष्य लढणारी. मुलं हट्टाने "तैनाती फौजा" मम्मी हे कर, मम्मी ते कर. मुलानो अभ्यासला बसा. शाळा नाही. आयुष्यात जे सत्यात कधीच उतरले, नव्हते ते खरे झाले आहे. "परीक्षा रद्द झाल्या तर!!" आणि परीक्षा संपत आल्या होत्या. मुलांना उन्हाळं सुट्टीचे वेध लागले होते.

अचानक "भारत बंद, टाळेबंदी, संचारबदी, आणि "लॉकडाऊन" हा शब्द आला. कोरोनानी कहर केला. घर, घरातील माणसे, ताणतणाव, रोजचे धावणे बांधले. "पायखूटी" तोंडपट्टी हातभर अंतर, सॅनटाईजर, जगायचं तंतर" मनाने कोरोनासाठी घालून घेतले. मुलांसाठी, घराकरीता "राबणारी माता, घरातल्या तैनाती फौजा" यांच्या बरोबर लढताना ती खरी रंणरागीनी आहे. घरातल्या संपूर्ण विविधतेने नटलेल्या पात्रांचा तिला अभिनय करावा लागतो आहे. पण तो खराखुरा तिच्या भावनेचा, तिच्या श्रमाचा विचार या लॉकडाऊनमध्ये कळाला. घराच्या बाहेर पडू नका. कोरोना राक्षस तुम्हाला मारून खाईल. तो फक्त मानसालाच मारतो. तो दिसायला "काटेरी बोंडाचा, पारशा एरंडीच्या बोंडा सारखा. ह्याचा माणसं माणूस मारायचा अवाका काय आहे.

गुणाकारीय पध्दतीने हा मुडदे पाडतो. खूप वेदना शब्दांच्या पलीकडे की, कोरोना कलेवर, मुडदा प्रेत, नातेवाईकाला देत नाहीत. कुठल्याचं मृत्यूचा कोणताचं विधी नाही. अंतविधी शासन करते. आपण भरल्या डोळ्यांनी लांबून पाहयचे. लॉकडाऊनमध्ये चोर घाबरले, त्याची ही उपास मार झाली. लोकं घरात कोरोना दारात, कशी येईल चोराची वरात. घानेरडे प्रकार, विनयभंग, बलात्कार, चोरी चपाटीला आळा बसला. घरात घरपण नांदू लागलं. खटके उडाले काही घरात. हाताचे काम गेले, रोजच्या जगण्याचे खाण्याचे वांधे झाले. लोकं तर्राट उपाशी राहू लागले.

घडीघडीतून "घडी" बदलली. नव्या पिढीला दिशा मिळाली. लॉकडाऊन काय असते? जगण्याची आणि मरण्याची हमी नसते. संयमाने आणि धाडसाने सामाजिक भान ठेवून वागले जगले तर, ह्या सृष्टीचे नियम पाळले तर मानवी जीवाला धोका नाही. झाडे लावा.पर्यावरणाचा समतोल राखा. पाण्याचा योग्य वापर करा. आम्ही सगळे ह्या सृष्टीला मारायलाचं निघालो होतो. ती नष्ट होणार नाही. कारण आपण खूप लहान कृमी आहोत तिच्यासमोर ती केव्हा ही कुचलून टाकू शकते मानवाला. ही शिकवन मिळाली. सागर आज अंथाग नितळ होत गेला. सृष्टीच्या सृजनशीलतेलाच माणसाने खूडून टाकले होते. आज रानावनातली भयभित जनावर मानसाच्या सिमेंटी जंगलात

येऊन पाहता आहेत. माणूस गेला कुठे?

"मोर, नाचू लागला. वाघ, सिंह वस्तीतून गस्ती घालून गेले. पक्षांचा किलबिलाट, चिमण्याचा चिवचिवाट सुरु झाला. परदेशी पक्षीही रेंगाळले. धरणावर थव्याथव्याने ओथंबले. शहराचे सुनसान सुसाट रस्ते भयाण वाटू लागले. गल्ली वस्तीतल्या माणसाला समजावने कठीण झाले. त्याला काहीच कळेना! मरणाचा कोरोना आजगरी विळखा सरपटत बकाल वस्तीत घुसला. पटाट माणसं "पॉझिटिव्ह" होऊन येऊ लागली. "निगेटीव्ह" होऊन पळू लागली. ही शब्दावली नव्यानं आली.

"लॉकडाऊनने शिकविले जगण्याचे नवे तत्व. महामारी, उपासमारी, उखळपांढरं, गावखेडयाची बिघडलेली घडी, प्रचंड बेरोजगारी. बेकारांचे भयावह जथ्थे. एकदमचं कारखाने बंद, सारे आणि सगळेचं ठप्प. होमकोंडी होऊन जगणे झाले गप्प. माणूस मेला, त्याचा सूर्य कायमचा बुडाला. या सृष्टीमध्ये विधात्याने माणूष्य निर्माण केला. माणसाला माणसाचे महत्व कळाले पाहिजे. घरात घरपण राहिले नव्हते. माणूस बाहेरच्या जगाचा विचार करत होता. माणूस म्हणून तू तुझ्या घरापासून दुरावला होता. घर एक मंदिर है! माणसाने निर्माण केलेली मंदिरं ही टाळाबंद झाली. खऱ्या देवाचे दर्शन झाले. हे सारे एका "सोशल डिस्टसिंग" ने केले.

मायबापाचे दर्शन घेऊन आशिर्वाद फुकटात घ्या. साष्टांग दंडवत घातल्याने डोक्यात रक्ताभिसरणासाठी चांगले असते. जुन्या रिती-भाती आठवल्या, पाहूणे आले की, तोंड हातपाय धुऊन, त्याना बैठकीत बसवले जायचे. गुळ शेंगदाणे द्यायचे. हळद पाणी, गुळ आणि वेलची पूड घालून चहा केल्या जायचा. आज आम्ही अस्वस्थ का होत गेलो हे कळाले. आम्ही आमचे रस्ते चूकलो. माय-बहिण, नाते-गोते, निसर्ग यांच्याशीच नाळ तोडली. नात की नाळ ह्याचे भान सुटले. घरात बसून जागण्याची सत्यता कळाली की, या सृष्टीच्या सौंदर्याचा नाश करणाऱ्या माणसा, शंभर वर्षात तूझी अति झालेली असते. हा कचरा झाडून काढलाच पाहिजे. लॉकडाऊन केलाचं पाहिजे. बघा बघा, ही सृष्टी कशी फुलून, खूलून आली आहे. ती आज भकास, उदास वाटत नाही. तिचा सृष्टीचा नियम ती मोडत नाही.

माणूस जास्तच शेफारला होतां. माणूस हौस्या, नवस्या, गवस्या म्हणून तो डिंगारला होता. आज त्याची खूरमुंढीचं केली. चारही मुंढ्या चित्त.

"टांगा पलटी घोडे फरार" जन्माची फाटली इजार, आयुष्यभर व्हय बेजार" लॉकडाऊन पुढे त्याला समजल की, पैसा, प्रतिष्ठा, पत, इजत सब झुट है. ऐका क्षणात माणूस अछूत झाला. त्याचा गर्वाचा इमला ढासळून गेला. आला तसा गेला मातीमोल झाला. कोरोना झाला तर, घरी नाही आला तिकडेचं तुझा दफणविधी केला. मेल्यावर ही पाणी अश्रू नाही तुला. या लॉकडाऊनमध्ये अनेक जवळची नातेवाईक वारले. त्यांनी खरे आप्तस्वकीयाना तारले. अंतयात्रेला नाही जाता आले. हजारोने लोकं मौतका मातम, मौतका सोहळा, जनाजा हे सारं थांबलं. माणूस सृजनशील भाऊक, पण तो घाऊक

होऊन बैखूदीने वागतो आहे. आज त्याची दमकोंडी झाल्यामुळे "जीव झाला येडा पिसा रात रात, जागूनी" व्यसनी भैसूर दिसू लागले. अर्धे वेडे पिसे झाले. सॅनटाईजरचा वास "वाईन" सारखा येतो. त्यात काही प्रमाणात ते असते. मेले काही महाभाग.मरणाला कारण नसते. विनाकारण मरण ओढते.

शहरातल्या अजस्त्र खुराड्यात लोकं मरणं भयाने. लॉकडाऊन झाले. कारण हा कोरोना हातावर, कपड्यात, पायातील पादत्रण्यात, कोरोना महाभंयर चिटूक आहे. गर्दीचा तो मरणमाग्या दर्दी आहे. शिंक, खाशी, ढास, खोकला, थुंकी आणि गर्दीतली उबट दमकोंडी हवा. शत्रू एवढा बलाढ्य की, सक्षम, सूक्ष्म मुरदाड विषाणू. डोळ्यात घुसला तरी दिसत नाही. म्हणून घरात लपून छपून असले, नसले साबण, नेहमी हात धुऊन मारून टाकायचे आहेत. "जो राहिलं घरात दक्ष, जीवदान मिळले हो मोक्ष" आपणच आपले रक्षक आहोत.

घरात रहा, सुरक्षित रहा. लॉकडाऊनने आम्हाला काय शिकवले, आम्ही ऋषीमुनीच्या योग साधनेनं प्राण साधना कमविली. आजही ती साधना साध्य केली जाते. तप साधना गुफेत केल्या जात होती. आपल्याच घरात बसून कंटाळलो आहे, म्हणून ज्ञान साधनेसाठी, पुस्तक घडवतात मस्तकं. विचारांची मिळते दस्तकं. छत्रपती शिवाजी महाराजानी शत्रूशी लढताना जी नीती वापरली होती. शत्रू हैराण होईल. त्याला मारक औषध तयार करणे चालू आहे.

"आले किती गेले किती संपले भरारा. भारत ह्या नावाचा कायमचं दरारा" समुळ नष्ट तेची लस शोधून काढली. असे मी आत्मिक भाष्य करतो आहे. हेच आत्मिक बळ माझा देश मला देतो आहे. सारे देश कोरोना मुक्त करण्याची ताकद माझ्या देशात आहे. माझा भारतीयांना प्रतिकार शक्तिची देणं आहे. आम्ही रडणार नाही, आम्ही लढणार आहोत. कोरोना बरा होतो. आम्हाला आत्मविश्वास निर्माण करायचा आहे आणि खरोखरच हजारो कोरोनाग्रस्त "निगेटिव्ह" होऊन घरी गेले आहे. लॉकडाऊनने आम्हाला लढण्याचे शिकवले आहे. माणूस गर्दीचा हिसा झाली होती. या सिमेंटी रस्त्यावर मोकळा श्वास घेता येत नव्हता. जणू ह्या सृष्टीचा आम्ही आत्माचं काढून घेतला होता. आज पहाटे पहाटे किती शुद्ध हवा मिळते आहे.

पण सोशलडिस्टसिंगमुळे नाही फिरता येत. सुरूवातीला खूप "उठाबशा" काढल्या. आता गच्चीवर, अंगणात फिरतो आहे. मुलंही बाहेर खेळायला जात नाही. घरातचं "मोबाईल"वर असंख्य गोष्टी खेळताहेत. त्याना पुस्तक वाचने आवडत नाही. पास नापासाची चिंता नाही. एखाद यंत्रचं लॉकडाऊन व्हाव. दिशाहीन भरकटाव अशी घरात बसून बसून शहरी निमशहरी तरूणांची अवस्था झाली आहे. लॉकडाऊन हाटत नाही.

कोरोनाचा कहर थांबत नाही. शहरात कामासाठी गेलेले आप आपल्या गावात परतत आहे. साखळी खंडता खंडत नाही. कॉरनटाईन झालेले. संसर्गजन्य फिरल्यामुळे आतां गावखेडे "कोरोनाने" व्हरमाडून, घोरमाडून काढले आहे. पण मनाचा अदम्य

विश्वास आहे. उद्याचा सूर्य हा उज्वल भविष्य घेऊन येणारा आहे. आम्ही हारलो नाही, हादरलो, तरी घाबरलो नाही. अनेक युद्धाचा तोंडवळा आम्ही पाहिला पण ह्यो कोरूण्या आम्हाला आरूण्या वनात लपायला लावतो आहे.

**"कुण्या अरूण्या वनात, कोरोन्या बसला ग"**
**जहर पिरथमीला झालं, मानसाला डसला ग"**

या जगाला वेठीस धरलं. लॉकडाऊन झालं पण हा सूर्य कधीचं झाकाळून आला नाही. धूळीचे लोट नाही. आभाळच्या डोळ्यात कारखान्याचा धूर नाही. ऑझोनचा वायूचा थर कमी झाला होता तो भरून निघाला. नद्याचे पाणी, नितळ झाले डोंगराच्या मुकूटावर नवी झळाळी आली आहे. झाडांच्या नाका तोंडात धुर्रकट धूवा आता घुसून बसत नाही. धुळीचे प्रचंड प्रमाण होते. सारा आसमंत धूळीने माखून जायचा. कारखान्याची काजळी सर्व जीवांची नाकं काजळून टाकायची. आज झाडं झुडपं, वनराईचं रूप पालटले आहे. हे लॉकडाऊनने शिकवले. उघड्या डोळ्यांनी पहा. निसर्गावर दया करा.

"बिबट्या घरात घुसला" तो तहानेने व्याकुळ होता. त्याच्याचं तोंडचं पाणी माणसाने सिमेंटच्या जंगलासाठी घरे बांधायला वापरले. खोल विहिरीत पडला तो तहानेसाठी आज कळाले माणसाने वटवाघळाना ही सोडले नाही. काय खावं? काय ल्यावं हे आपल्या पुर्वजानी सांगितले आहे. माणूस अ विचारी होत चालला. दबा धरून बसलेल्या विषाणू सावजाला आम्ही हारवणारचं आहोत. कारण हा "महाभारत" आहे. लॉकडाऊनमुळे कळाले की, जेव्हा जेव्हा या पृथ्वीला राक्षसाने अघोरी कृत्य केले, त्या दैत्यांचा नाश झालाचं पाहिजे. रोज वर्तमानपत्राच्या कपाळावर छापून येयचे. अल्प वयीन मुलीवर, चार नराधमांनी आळीपाळीने हे कोरोना, हे लॉकडाऊना आता निशब्द वेदना आहे.

"निर्णभया ते कोपर्डी" सारे कळाले या मायभूमीवर ज्यांनी अधम केला, रक्त सांडले त्याला नंतर अश्रू ही नशीब आले नाही. या लॉकडाऊन काळात सारे जाऊन बसले बिळात. गर्दीत जाल तर फसाल कोरोनाच्या गाळात. घरात बसून कंटाळला होता असं नाही. पण माणूस कळाला. "अघोरी" भंयकर, विषारी होऊन दंश करणारा. त्याला भाकरीचे मोल जेव्हा कळेल तेव्हा नवी पहाट झालेली असेल. या मातीचे खूप मोठे ऋण आहे. जिणे अनेक महान रत्नाला जन्म दिला. या सृष्टीचे मारेकरी होणारेच महामारीचा विचार सोडून लॉकडाऊन का वाढवल्या जात आहे. म्हणून रस्त्यावर उतरत आहेत. ह्या सर्वांचा विचार करणारा निराकार पाहत आहे. ज्या अध:पतनाचे आपण साक्षीदार आहोत. लॉकडाऊन थांबेल पण उभा महाराष्ट्र टँकर मुक्त झाला नाही. वृक्षांची तोड थांबली नाही की, वाळू उपसा थांबला नाही.

बारोमास खळखळणाऱ्या नद्या जीव तोडताना दिसतं आहे. हा विचार मनात येऊन जातो की, कोरोना नंतर सुख समृद्धी नांदवायची असेल तर, नद्या जोड प्रकल्प

राबवायलाच पाहिजे. झाडांची झाडं संख्या, लोक संख्येच्या प्रमाणात वाढली पाहिजे. एका माणसाला चार झांडाचा ऑक्सीजन लागतो. आज माणसं तडफडून मरतील इतकी उष्मा वाढली आहे. घरात बसून हे विचार मनात डोकावून आले. आता आमची जीवन शैली बदलली पाहिजे. प्रदिर्घ लॉकडाऊनने शिकवले की, तु आता खंबीरपणे ठाम उभा उभा राहिला पाहिजे हे छूपे युद्ध आहे. आता बेसावध वागून चालणार नाही. मास्क, सॅनटाईजर, हातभर अंतर, शेकहँड, गळाभेट, कुठे ही थुंकणे, प्रचंड गर्दी करणे. नको तिथे जाऊन उघड्या वरचे खाणे, आम्हाला ताळतंत्रच राहिले नव्हते. कोरोनाने ताळ्यावर आणले. ही साखळी न संपणारी आहे. ती तोडलीच पाहिजे. मी माझे घर, मी सुरक्षित, माझा माणूस सुरक्षित. मीच माझा रक्षक. कोरोनाला नाही होऊ देणारं भक्षक. कपडे झटकून काढावेत असे या कोरोना व्हायरसने या समकालीन "मनुष्य" उंदराला तोंडात धरून हिंजाडून काढले आहे.

मांजर तोंडात धरून उंदराला जीवदान देते. "ज्या बेटे आईस कर." बाहेर आला की, मुडदाचं. लॉकडाऊनमध्ये जे अतिशहाणे होते ते सुजूनचं जन्माचे "कॉरनटाईन" झाले. खूप शिकवले ह्या कोरोना युद्धाने. एका दगडात, एका फटक्यात हजारो प्रश्नांचे पक्षी जायबंदी केले.लग्न समारंभ, विविध पार्ट्या, जल्लोष, धांगड, धिंगाणा, पाण्यासारखा पैसा खर्च करणे. अन्नाची नासधूस. सोशल डिस्टसिंगमुळे आळा बसेल. सभा संमेलने, शाळा, महाविद्यालये, दवाखाने, बसस्टॉप, रेल्वे जंक्शन, एकून वाहतुकीची कोंडी होत होती त्याला खिळ बसली पाहिजे. आम्ही पाहिले रोज अपघाती मरताना लोकं तर पाण्यावाचून मुक्या प्राण्यांना तडफडताना. हा साराचं जीवघेणा खेळ थांबलाय. आता माणसंच लागणं झाली की, गुमाणं मरताहेत. पुर्वी कोंबड्याना लागणं व्हायची. आता ह्यो जीवघेणा कोरोना. म्हणून खूप शिकवले रे माणुसं होमकोंडी झाला. त्याला स्व अस्तित्वाची जाणीव झाली. हा सारा मायेचा पसारा आहे. जवळचे आपल्याला जवळ करीत नाही. आपल्या प्रेतावर रडायला, स्मशानात न्यायला ही सरकारी देवदूत. हे लॉकडाऊन ने पाहायला शिकवले. घरातील जी छोटी मोठी कामे असतात 'अंगण झाडून घेणे, रांगोळी टाकणे, कपडे धूणे, फरशी पुसणे, सकाळीच उठून घरकामाला लागणे या साऱ्या गोष्टी करीता आपल्या मायमाऊलीच्या श्रमाचा विचार कळाला. रांधा वाढा, उष्टी काढा याचे मोल कळाले लॉकडाऊनमुळे. म्हणून

"झाली माणसाची "होमकोंडी, जीव अनुकूचीदार झाला.
जिभाळल्या या मनाला, कसा "कोरोना" कळाला.
"जीव घेण्या कोरोना चे, झाले भेसूर थयमान
आता तरी नीट वागा, नको भूमीला बेईमान"...

**- डॉ. प्रभाकर शेळके / जालना**
**मो.- ९९७८१३७३३७**

# संस्काराची शाळा



गाव टुमदार माझे
जसे स्वप्नांचे नगर
बाल संस्कारांची शाळा
वाटे देवाचे मंदिर ॥१॥

मंदिरात गुरु माझा
शोभे देवता सुंदर
सुगंधती मुले -फुले
धूप-दीपात कर्पूर ॥२॥

गावा लगतच माझ्या
ओढा वाहे झर झर
ज्ञानियेचा वाहे पूर
गाव विद्येचे माहेर ॥३॥

सासू सुना माय लेकी
जसा भेटला आहेर
दिर माझा भाऊराया
प्रेम ओसांडे बाहेर ॥४॥



- मोहन सोनवणे / पिंपळनेर
मो.- ९४२३२८७८३५.

# || मन ||



दोन हाताचा देह
त्यात सुंदर मन
प्रत्येकाने जपावे
सुंदर हे जीवन

क्षणभन्गुर आयुष्य
कुठेही रामभरोसे
चार दिवस जीवनात
जोडावे चार माणसे


सकारात्मक विचार
असावे सोबतीला
करावे मनाने व्यवहार
धरावे माणूसकीला

प्रेम लुटावे जीवनात
प्रेमची मिळेल सदैव
दुःख सुख कमी
अधिक आहे मानव

मानसाच मन प्रेम
कळेल वळेल
प्राणीमात्रावर दया
तेव्हाच समजेल

एकाठाई ना वसे
मनास भटकंती
वृद्ध तरुण
सारखीच सर्वा गती

**- राजेश वऱ्हाडे / कसुरा**
**मो.- ९९२११२८२३९**



# फिटनेसचा फंडा !



"गुडमॉर्निंग पंत !"

"नमस्कार, पण आज तुझा आवाज एकदम रडवेला का आणि खांदा कशाला चोळतोयस तुझा?"

"काठी लागली पंत, डोक्याच खांद्यावर निभावलं, तुमच्याकडे आयोडेक्स असेल तर द्या जरा."

"देतो देतो, पण सकाळी सकाळी बायको बरोबर भांडण.."

"नाही हो पंत, जोशी काकूंची काठी लागली."

"जोशी काकूंची काठी तुला कशी काय लागली ?"

"अहो हा सगळा त्या केळकर काकांचा फिटनेस फ़ंडयाचा प्रताप."

"आता यात केळकर कुठून आला ?"

"सांगतो सांगतो. तुम्हाला माहितच आहे सध्या सगळ्या जिम वगैरे बंद आहेत आणि सगळेच आपापल्या घरी अडकल्यामुळे..."

"तू मूळ मुद्यावर ये आधी, उगाच पाल्हाळ नकोस."

"हां, तर घर बसल्या आणि चाळीत फिरून करायचे काही व्यायाम प्रकार केळकर काकांनी काही लोकांना शिकवले."

"बर, पण त्यात जोशीणीचा काय संबंध?"

"पंत केळकरांनी जोशी काकूंना शाळेत जसे काठीचे हात फिरवायला शिकवतात तसे काही प्रकार शिकवले."

"पण तिच्या काठीचा आणि तुझ्या खांद्याचा..."

"अहो पंत त्याच काय झालं, आता जोशी काकू चाळभर, धुण्याची काठी घेऊन दोन्ही हाताने फिरवत फिरत असतात."

"काय सांगतोस काय, अख्ख्या चाळभर ?"

"हो ना आणि त्यांच्या काठीचा प्रसाद माझ्या प्रमाणेच अनेकांना बसून चाळीत भांडणांचे जंगी सामने सुरु झालेत."

"अरे बापरे !"

"इतकंच नाही काकूंच्या काठीने चाळीतले सार्वजनिक दिवे पण फुटले ते वेगळेच."

"काय बोलतोयस काय ? सगळे सार्वजनिक दिवे..."

"फुटले आणि त्यावरून होणारी चाळकऱ्यांची भांडणं सोडवता सोडवता, माझ डोक फुटायची पाळी आल्ये."

"बर बर, मी असं करतो तुला आयोडेक्स बरोबर अमृतांजन पण देतो मग तर झालं?"

"पंत इथे माझी काय हालत झाल्ये आणि तुम्हाला विनोद सुचतायत !"

"यात कसला विनोद, तुझ्या दुखऱ्या खांद्यासाठी आयोडेक्स मागायला तूच आला होतास आणि आता तुझ लोकांच्या भांडणामुळे डोक फुटायची वेळ आल्ये म्हणालास म्हणून मी तुला आपणहून अमृतांजन.."

"खरच आहे ते, अमृतांजन पण लागेलच मला, कारण तुम्हाला अजून बर्वे काका आणि साने काकांच्या भांडणा बद्दल..."

"आता ते दोघे कशाला भांडले एकमेकाशी ?"

"इथे पण केळकर काकांचा फिटनेस फ़ंडाच कारण झाला."

"तो कसा काय?"

"पंत त्यांच्या फिटनेस फ़ंडयात दोरीच्या उड्या पण होत्या."

"हो, तो पण एक चांगला घरगुती व्यायाम प्रकार आहे खरा."

"पंत, सानेकाका त्यांच्या घरात दोरीच्या उड्या मारत होते आणि त्याच वेळेस खालच्या मजल्यावरचे बर्वे काका जेवत होते !"

"म्हणजे दोघेही आपापल्या घरीच होते ना, मग भांडणाचा संबंध आला कुठे?"

"अहो पंत साने उड्या मारायला लागले की खाली बर्व्यांच्या ताटात त्यांच्या सिलिंगची माती पडायची !"

"अरे चाळीस वर्षात चाळ खिळखिळी झाल्यावर सिलिंग मधून माती नाहीतर काय सोन पडणार आहे? तूच विचार कर म्हणजे झालं."

"हो बरोबरच आहे पण त्यामुळे बर्वे काकू आल्या माझ्याकडे तणतणत. मी काकूंना म्हटलं, बर्वे काकांना ताट घेऊन दुसरीकडे बसून जेवायला सांगा."

"बरोबर आहे तुझ, मग ?"

"त्यावर बर्वे काकू मला म्हणतात कशा 'ती ह्यांची जेवायला बसायची रोजची जागा आहे, दुसरीकडे बसून जेवलं तर त्यांना जेवण जात नाही' आता बोला ?"

"अरे बापरे, असं म्हणाली बरवीण ?"

"हो ना, वर मला सांगायला लागल्या 'तूच सान्याला सांग उडया मारायची त्यांची जागा बदलायला' आणि गेल्या तरातरा निघून घरी."

"मग तू काय केलंस ?"

"काय करणार, गेलो साने काकांकडे, झाला प्रकार सांगून त्यांना म्हटलं, तुम्ही प्लीज जरा तुमची दोरीच्या उड्या मारायची जागा बदलता का ?"

"मग काय म्हणाला सान्या?"

"साने काका म्हणाले 'मी माझ्या घरात कुठ उड्या मारायच्या आणि कुठे नाही हे मला सांगायचा कुणाला अधिकार नाही. तूच बर्व्याला त्याची जेवायची जागा बदलायला सांग.' असं म्हणून माझ्या तोंडावर धाडकन दार लावले त्यांनी."

"फारच पंचाईत झाली असेल ना तुझी त्या वेळेस."

“हो ना, दोघेही वयाने मोठे आणि हट्टाला पेटलेले.”

“मग कसा काय मार्ग काढलास त्यातून तू ?”

“मार्ग कसला काढतोय, घरी येवून मस्त ताणून दिली. पण पाच मिनिट आडवा पडतोय न पडतोय, तोच दाराची कडी वाजली.”

“उगाच तुझी झोप मोड झाली ना, पण दारात कोण आलं होत तुझी झोप मोडायला?”

“अहो दार उघडून बघतोय तर काय, पहिल्या मजल्यावर जिन्याशेजारी राहणारे राणे काका, रागाने लालबुंद होऊन दारात उभे.”

“आता राण्याला राग यायच काय कारण?”

“मी विचारलं राणे काकांना, तर मला म्हणाले वरच्या कोकणे काकांनी त्यांची झोप मोड चालवली आहे, जिन्याने सारखं वर खाली जाऊन येवून.”

“जाऊन येवून म्हणजे, मी नाही समजलो.”

“पंत हा पण केळकर काकांचा फिटनेस फ़ंडा.”

“म्हणजे त्यांचे भांडण पण केळकराच्या फिटनेस फ़ंडया मुळे झाले की काय?”

“हो पंत, केळकर काकांनी कोकणे काकांना घरी बसून बसून त्यांचे वजन वाढल्यामुळे आणि घुडघे दुखत असल्यामुळे, जिने चढण्या उतरण्याचा व्यायाम सांगितला होता करायला.”

“बरोबरच आहे केळकराच आणि तुला दुसरा एक उपाय सांगतो गुडघे दुखीवर.”

“पंत इथे मी कशाला आलोय आणि तुम्ही मला....”

“अरे ऐकून तर घे, गुडघे दुखत असतील तर कमरे एव्हढया पाण्यात रोज अर्धा तास चालायचं, घुडघे दुखी कुठच्या कुठे पळून जाईल बघ तुझी.”

“आता मीच पळतो पंत, तुमचं बोलण ऐकून माझ डोक खरच फुटेल की काय अस वाटायला लागलं आहे.”

“सॉरी सॉरी, पण कोकण्याच्या जिन्याने खालीवर जाण्याने, राण्याची कशी काय बुवा झोप मोडायची, ते नाही समजलं !”

“अहो कोकणे काकांचा अजस्त्र देह जिन्याने खाली वर करु लागला की आपल्या चाळीचे आधीच जीर्ण शीर्ण झालेले लाकडी जिने...”

“दाण दाण आवाज करायचे आणि राण्याची खोली जिन्याजवळ असल्यामुळे त्याच्या झोपेचं खोबरं व्हायच, बरोबर ?”

“बरोबर पंत, त्यामुळे त्या दोघांचे पण कडाक्याचं भांडण झालं आणि दोघेही माझ्याकडे एक मेकांची तक्रार घेऊन आले आणि....”

“तू नेहमी प्रमाणे माझ्याकडे यावर उपाय सुचवा म्हणून, काय खरं ना?”

“हो पंत, तुम्हीच चाळीत सगळ्यात जुने जाणते आणि अनुभवी....”

“नेहमीची मस्काबाजी पुरे ! आता मला आधी सांग, आपल्या चाळीतले योगा शिकवणारे गोरे गुरुजी सध्या चाळीत.....”

"नाहीत ना, ते मध्यतंरी गावाला गेले आणि सध्याच्या परिस्थितीमुळे गावालाच अडकलेत."

"बर बर आणि योगासन पण कुणाच्या तरी देखरेखी खाली केलेली बरी, नाहीतर उगाच कोणाला तरी त्याचा त्रास पण होऊ शकतो."

"मग कसं करायच आता पंत."

"अरे मी असतांना कशाला घाबरतोस. उद्याच्या उद्या एक पत्रक काढ, चाळ कमिटीचा अध्यक्ष म्हणून."

"बर, पण त्या पत्रकातून काय सांगायचं लोकांना?"

"लोकांना सांगायचं की कोणीही केळकराचा फिटनेस फ़ंडा वापरायचा नाही."

"मग पंत लोकांनी फिट राहण्यासाठी काय करायच?"

"माझा फिटनेस फ़ंडा वापरायचा !"

"तुमचा फिटनेस फ़ंडा, म्हणजे काय पंत?"

"काही नाही, ज्या लोकांना या लॉकडाऊनमध्ये फिट रहायच आहे त्यांनी आपापल्या घरात रोज सकाळी फक्त बारा सूर्य नमस्कार घालायचे, बस्स."

"त्यानं लोक खरंच फिट राहतील पंत?"

"यात तुला शंका घ्यायच कारणच नाही."

"ते कसं काय पंत?"

"अरे शास्त्र शुद्ध पद्धतीने घातलेल्या प्रत्येक सूर्य नमस्कारात सगळी योगासन समाविष्ट असतात, हे माहित्ये का तुला?"

"नाही पंत, पण लोकांना शास्त्र शुद्ध पद्धतीने सूर्य नमस्कार घालायला...."

"मी शिकवणार आणि प्रत्येकला सांग, की घरात राहून ज्यांना ज्यांना फिट रहायच त्यांनी...."

"पंतांना भेटून शास्त्र शुद्ध सूर्य नमस्कार कसे घालायचे ते लवकरात लवकर शिकून घ्या आणि...."

"केळकराच्या फिटनेस फ़ंडयामुळे होणारी चाळीतली भांडणे टाळा."

"धन्य आहे तुमची पंत !"

**– प्रमोद वर्तक / सिंगापूर**
**मो.– 9892561086**
**+6594708959**

# मैदा बर्फी



## साहित्य -

1) १ वाटी मैदा .
२) १/२ वाटी पिठीसाखर.
3) चिमुटभर खाण्याचा हिरवा रंग.
4) १/२ चमचा वेलची पूड.
5) १/२ वाटी तूप.
6) १ चमचा ड्राय फ्रुटस.

## कृती -

1) प्रथम ऐका पॅनमध्ये अर्धा वाटी तूप घालून मैदा १/५ मिनिटापर्यंत मंद आचेवर परतून घ्या. आता तूप बऱ्याच प्रमाणात वर आलेले दिसेल. आता गॅस बंद करा.

2) भाजलेला मैदा थोडा कोमट झाला की, त्यात वेलची पूड आणि पिठीसाखर घालून छान मिक्स करा त्यापैकी अर्ध्या मैद्याच्या मिश्रणात १ चमचा भिजलेला हिरवा रंग घाला व परत ते मिश्रण १ मिनिटापर्यंत शिजवून घ्या.

3) आता एका टीन वर बटर पेपर ठेवा.बटर पेपर नसल्यास ऐका चौकोनी भांड्याला तूप लावून घ्या. आता त्यावर थोडे ड्राय फुट्स पसरून घ्या व आधी मैद्याच्या मिश्रणाची ऐक लेअर व परत दुसरी हिरव्या रंगाची लेअर घाला.

4) परत वरती थोडे ड्राय फुट्स घालून बर्फी अर्धा तास रूम टेंपरेचरवर सेट होऊ द्या.

5) अर्ध्या तासानंतर सुरीच्या सहाय्याने मनासारख्या आकारात बर्फी कट करा. अतिशय कमी साहित्यात बनणारी उत्कृष्ठ चवीची मैदा बर्फी तयार.

**- अश्विनी मरकड / कासार पिंपळगाव**
**मो.- ९८७९१०४८९९**



# राहू शकतात



कितीही विचार
डोक्यात राहू शकतात
कितीही स्वप्नं
डोळ्यात राहू शकतात

कितीही श्वास
नाकात राहू शकतात
कितीही शब्द
तोंडात राहू शकतात

कितीही स्वर
कानात राहू शकतात
कितीही प्रयत्न
हातात राहू शकतात

कितीही सुख, दुःख
मनात राहू शकतात

कितीही वेदना, गोष्टी
पोटात राहू शकतात

कितीही मार्ग
पायात राहू शकतात
कितीही गुण, अवगुण
माणसात राहू शकतात

कितीही चुका, अश्रू
रागात राहू शकतात
कितीही आठवणी, क्षमा
प्रेमात राहू शकतात

कितीही संघर्ष, आनंद
जीवनात राहू शकतात
कितीही संकटं, संधी
निसर्गात राहू शकतात

**- नरेंद्र वाकोडे / जळगांव जामोद**
**मो.- ९४२१४६५८५४**

# एक बार पंखावरूनी फिरो तुझा हात



एकदा तरी खिडकीमधून
दिसो तुझे हसरे मुख
शेवटचे गाऱ्हाणे माझे तुझ्या
पुढ्यात

वेड्यापरी उगी वागलो
भोळ्या शंकराशी भजलो
कधी वनामध्ये फिरलो कधी
रमलो बागेत

सारी गायराने अन भुई
नाही नाही ते चाललो पायी
तुझ्याविना नव्हते कोणी
माझ्या मनात ||१||

पुलावरून अनोळखी कुणी
माझ्या समोरुनी जाई
घाईघाई
तुझ्या ललाटी असेल कोण
श्रीमंत ||२||

एक भाव भोळा मी आगळा
येईल का तुला कळवळा
सादाविना कसा येऊ तुझ्या
सहवासात ||३||

- दादासाहेब सादोळकर / बीड
मो.- ९५४५९१६८१५

# गरुड पुराण



ही कथा आहे मैतीची. ज्या गोष्टीला हिंदू संस्कृतीत खूप महत्त्व आहे. ही गोष्ट आपलं महत्त्व हरवतेय. मानवी आत्म्याला आपल्या कर्माच्या जोरावर स्वर्ग किंवा नर्क येथे जागा मिळते असे मानले जाते. पण या नर्काच्या यातना कमी व्हाव्यात म्हणून मैती नंतरही काही विधी करावे लागतात असे मानले जाते. पण आता हे विधी जणू पोरखेळ बनले आहेत. शहरात आता स्मशानभूमीत एक माणूस असतो जो पैसे घेऊन मैत विधी करुन घेतो.

अशाच एका अमरधामात राहणार हे कुटुंब आहे. धर्मा आणि सावित्री या दाम्पत्याला किरण हा एकुलता एक मुलगा. धर्मा मैतीचे सर्व काम करऊन घेत असतो. याकामात बायको सावित्री व मुलगा किरण जमेल तेवढी मदत करत असतात. मुलाला हे काम काही पटत नाही. त्याला नेहमी प्रश्न पडतो की, 'कुणी विचारल कि तुझा बाप काय काम करतो?' तर काय सांगायचं. की "आपला बाप रोज नवीन सरन रचतो आणि ते विझेपर्यंत तिथे उभा राहतो."

अशीच एक सकाळ. एका मैताचा विधी सुरु होतो. मयत व्यक्तीचा मुलगा शिकलेला होता. त्याची बायकोही आजच्या मॉडर्न समाजातली मुलगी. मयत व्यक्तीची वयस्कर बायको, ही साधी संस्कृती, रुढी, परंपरा मानणारी असते. तेथेच पाच-दहा बायांचा घोळका जोर-जोरात रडत असतो. मयताची बायको मात्र हुंदका देउन रडत असते. तेथे मयताच्या मुलाच्या आणि सुनेच्या डोळ्यात थोडे सुद्धा पाणी दिसत नाही. मुलगा फक्त परंपराप्रमाणे रीत पाळायची म्हणून विधी करत असतो. धर्मा हा विधी त्याच्याकडून करवून घेत असतो. धर्माचा मुलगा किरण कोपऱ्यात उभा राहून हे सगळं बघत असतो. सावित्री घरातून शिजलेला भात घेऊन येते. तिथे तिला किरण दिसतो आणि ती त्याला म्हणते की, 'काय कोपऱ्यात उभा राहतोय, चल म्होरं उद्या तुलाच करायचय हे समद.' सावित्री किरणला समोर नेऊन बसवते. तेवढ्यात मयताच्या नात्यातील एक बाई सावित्री जवळ येते आणि म्हणते, "अग... हा भात तर बाहेर सीजवावा लागतो, घरातला चालत नाही." सावित्री तिला हळू अवाजात उत्तर देते. "अग बाई... यांना काय कळतंय? शिकलेली भुत ही. आपण सांगू ते करतील. त्यांना काय? भाताचे गोळे दिसले की, काम झालं. मग ते कुठूनही येवो, त्याचा काही फरक पडत नाही." सावित्री समोर जाऊन त्या भाताचे गोळे करुन पंडिताला देते. विधी पुढे सुरु होतो. धर्मापूर्ण विधि करवून घेतो. विधी झाल्यानंतर, मयताचा मुलगा पाकीटातून काही पैसे काढून धर्माच्या हातावर टेकवतो आणि लगेच सगळे निघून जातात. सर्वांना कामावर जायची घाई झालेली असते. सगळे गेल्यानंतर धर्मा त्या रडणाऱ्या पाच-दहा बायांना

त्याच्या रोजंदारीचे पैसे देतो. तेंव्हा तेथे सावित्री येते आणि त्या बायांना म्हणते की, “आजचे काम म्हनाव एवढ चांगल झाल नाही. आजच्या सारख्या रोज रडत राहिल्या तर तुमचा धंदा पण बंद पडायचा. तुमचे खायचे वांदे होतील आणि हे काय? आज दोन जनी कमी आल्या. सगळ्या येत जा. नाहीतर आम्हाला दुसरी गँग शोधावी लागेल.” अस दरडावल्यावर त्या गँगची प्रमुख असलेल्या बाईने कबुली दिली व पुढच्या वेळेस सर्वचजणी हजर राहतील याची शास्वती दिली. बिदागी घेऊन ती निघून गेली. सावित्री मुलाला घेऊन घरात गेली. धर्मा मात्र जळत्या प्रेताजवळ उभा राहीला होता.

दुसऱ्या दिवशी सावित्री घरात एकटी बसलेली होती. ती ग्रंथ वाचत असते. तेवढ्यात किरण तेथे आला. त्याच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्हाचे भाव होते. जराशी नाराजीही होती. त्याने आईकडे बघीतले आणि आईला विचारले, “काय वाचतेस ग आई.” आई म्हणते “गीता वाचते बाळा.” तेव्हा किरण म्हणतो “काय जेव्हा तेव्हा असलेच ग्रंथ वाचत असतीस. तुला काय भेटतय यातून? यावर आई त्याला म्हणते, “उत्तर”. तो विचारतो “कसलं?” तर आई म्हणते, “संमद्या प्रश्नांचं. जे माणसांना पडतात.” तो म्हणतो “होय का?” आई म्हणते, “होय.” तेव्हा जरा वेळ शांत बसून किरण आईला विचारतो, “आई आपण हे काम केव्हापासून करतोय ग?” आई म्हणते, “कसलं काम”? तो म्हणतो “हे सरन रचायचं ग.” आई सांगते, “आरं तुझा बा, आजोबा, म्हणजे मी जेव्हापासून ह्या घरात आले ना तव्हापासून सगळे हेच काम करतात. कारं? आदेश म्हणतो “काय नाही” परत जरा वेळ शांत बसून आदेश आवेशाणे म्हणतो, “आई मी नाही हे काम करणार बघ.” आई म्हणते, “कारं”. तेंव्हा किरण म्हणतो की, “मला लाज वाटते या कामाची. शाळेत पोरांना प्रश्न विचारले की तुमचा बाप काय काम करतो म्हणून. सगळी पोरं उत्तर सांगतात, “माझे बाबा डाक्टर आहेत, माझे बाबा शिक्षक आहेत, पण मला काय सांगता येत नाही, की माझे बाबा काय करतात ते. काय सांगू? मी नाही करणार हे काम मोठे झाल्यावर.” तेव्हा आई त्याला सांगते, “तुला काय वाटत? तुझा बाप काय छोट काम करतोय? आर तुझा बाप काही लहान माणूस नाही.” यावर किरण विचारतो, “कसं काय लहान माणूस नाही, कोणत उदारतेच काम करतोय?” तेव्हा आई त्याला एक गोष्ट सांगते, “ऐक बाळा, हरिश्चंद्र नावाचा एक राजा होता. तो सत्यवचनी राजा होता. तो कधीच कर्माला मागे हटला नाही. कधी खोटं बोलला नाही. सगळ्या अडचणींना सामोरं गेला. कधी वळून माग बघीतलं नाही. एकदा ऋषींन त्याची परीक्षा घ्यायचं ठरवलं. याला हरवायचं. राजाच्या आयुष्यात अडचणी आणायला सुरुवात केली. राजा भिकारी झाला. जंगलात गेला. काय काम नाही मिळाल म्हणून सरन रचायचं काम केलं. एक दिवस असा आला की, त्याच्याच पोटच्या पोराची मौत त्याच्या डोळ्यासमोर त्याच्याच हातान पुर्ण करता आली नाही. आन तरी राजा रडला नाही. शेवटी ऋषी वरमला, त्याने राजाला नमन केलं.” हे ऐकुन किरण हेटाळणिच्या स्वरात म्हणाला, “म्हणजे माझा बा बी राजा हरिश्चंद्र आहे व्हय.”

आई त्याच्यावर रागावली किरणचा कान धरला.

दुपारी किरण घरात काही शोधत असताना त्याला एका संदूकावर पडलेला एक ग्रंथ दिसतो. तो त्याचं नाव वाचतो, "गरुड पुराण" त्यावर त्याला विष्णू आणि गरुडाचे चित्र होतं. त्याची उत्सुकता वाढली. त्याने आईला विचारले , "व्हय ग आई... काय आहे हे"? तेव्हा आई विचारते, "आता काय सापडलय तुला, हे व्हय? हे गरुड पुराण आहे." तेव्हा किरण आईला म्हणतो, "भारी दिसतय ग मी वाचू..." आई त्याला म्हणते, "नाही तू नको वाचू, हे फक्त घरात कोणी वारलं ना... की मग त्या दहा दिवसातच वाचत असतात, आणि हे वाचण्याचा सर्वांना अधिकार नाहीये. हे घरात पण ठेवत नाहीत. पण ते पंडित विसरले काल. तुझ्या बाबांसोबत उद्या परत द्यायचय ते." तर किरण आईला प्रश्न करतो, "पण यात नेमक काय आहे ग?" आई सांगते, "एकदा गरुड विष्णूला प्रश्न करतो की, "प्रभू मला नरकाबद्दल ऐकायचय. मला सांगा नरक कस आहे? एक माणूस नरकात कसा जातो? त्याला काय यातना होतात? तेव्हा विष्णू गरुडाला सांगतात आणि हे समदं या ग्रंथात लिहिलेलं आहे." किरणला गरुडपूराण वाचायचा मोह झाला. तो आईला म्हणाला, "एकदा वाचू दे ना मला. असं काय होणार आहे लगेच ग्रंथ वाचल्याने." आईने त्याच्या हातातून ग्रंथ हिसकावून घेतला आणि त्याला म्हणाली, "एकदा नाही म्हटलं की नाही बस.. डोक्याला कल्हई करु नकोस. आधीच लय काम आहेत मला. जा तुझ्या बापाला लाकडं फोडू लाग जा ..." किरण नकार देत निघून जातांना म्हणाला, "मी नाही करणार म्हटलं ना हे काम तुम्हीच करा..." तेव्हा बाहेर जाणाऱ्या किरणला ओरडत आई म्हणते.. "हो खायला नाय भेटल ना.... की म्हसणातली राख खावा लागन मग...."

दुसऱ्या दिवशी राख सावरण्याचा विधी असतो आणि मयताताचा परिवार नदीवर राख घेऊन येणार होता. सावित्री नदीकाठी एकटी बसलेली असते. सावित्री विचारात मग्न असते तेवढ्याच धर्मा तेथे येतो.. "तू अजून इकडेच हायेस व्हय. ती लोक येतीलच आता राख घेऊन. अशी एकटी का बसलीस ? अन व्हय, काय विचार करायलीस. असल काय आभाळ कोसळून पडल म्हणायचं? तेव्हा सावित्री उत्तर देते, "आभाळ कोसळल्यापरीच दडपण हाय मनावर.. आपलं पोर म्हणतय, महा बाप काय काम करतो हे सांगायची मला लाज वाटते, मी पुढे हे काम करणार नाही दुसरे काही बी काम करीन.." धर्मा म्हणाला, "त्याला शाळात घालूनच चूक केली मी, पोर शिकलीना की, आशी आई-बापाच्या कामाची ईज्जत राहत नाही. तुलाच लई पुळका होता. तुच म्हणायची जाऊद्या, दहावी-बारावी पोरग शिकलेल असलं ना, तर मग बर म्हणत." तेव्हा सावित्री म्हणाली, "मला कुठ वाटलं शिकला की तो अस करेल म्हणून. त्यावर धर्मा समजूतीच्या स्वरात म्हणतो, "त्याला अजून नाही कळत की आपलं काम किती महत्वाचा आहे ते, आपण जर नसलो ना कि ही प्रेत जाळून नाही सडून झूरतील. संमदीकडे प्रेतांचा डोंगर लागेल. झाडाझुडपांच्या जागेवर हाडांचे सापळे

उभे राहतील. नदीच्या काठाला दगड नाही माणसांची मुंडकी राहतील. जित्यापणीच नरकात आल्यासारखं वाटेल. त्याला आता नाही ग कळणार. ज्या दिवशी त्याच्या बापाच सरन रचायला कोण नाही ना सापडणार त्या दिवशी अक्कल येईल त्या कारट्याला." तेव्हा सावित्री धर्माला रागावत म्हणते, "असं आपशकूणी बोलू नका. तुम्हाला तर कायच कळत नाही". धर्मा थोडा शांत होतो. आण् त्याला आठवते की, राख पाण्यात सोडायला मयताच्या घरचे येतील. तो लगेच सावित्रीला म्हणतो, "बर ते जाऊदे ते लोक येतील लगेच. चल लवकर, नाहीतर आपल्या हाताला कायबी लागायचं नाही." मयताचा मुलगा आणि त्याची बायको, आई राख वहायला तिथे येतात. नदीवर कोणीतरी राख पाण्यात सोडायला आलेले पाहून तेथे लगेच ठराविक लोकांची गर्दी होते. सगळे ओरडतच येतात. "हे चला... माल आला रे..." लगेच काही जण समोर येतात, "या... चला तिकडे चांगलं वाहतंय पाणी..." आणि त्यांना आडवत दुसरे काही जण म्हणतात, "नाही...तिकडे मागच्याच महिन्यात एकजण घसरुन पडला होता. बिचाऱ्याच्या पायाच हाडूक मोडल वो. इकडे या... तिकडे पाणी जरा हळू वाहते." तेवढ्यात एकजण म्हणतो, "पाणी तुला इचारुनच वाहतय नव्ह. बघ मी हळूहळू चाललोय." पहिला त्याला उत्तर देतो. "ए... किचकीच करु नको आ... डोक्याला." धर्मा तिथे येतो आणि सगळ्यांना म्हणतो, "चला निघा ईथून, ते माझ्यासोबत आलेत..." धर्मा सोबतची माणसे तिथे थांबतात. बाकीचे निघून जातात. "चला रे... हा काय जित्ता हाय तव्हर आपल्याला धंदा करुन देत नाही." सगळेजण थोडं लांब जाऊन थांबतात. धर्मा त्या मयताच्या मुलाला म्हणतो, "चला दादा... या पुढ... सगळेजण पाण्याच्या कमी प्रवाह असणाऱ्या जागेवर जातात. धर्माची माणसं पोत नदीत घेतात. राख पाण्यात सोडायला सुरुवात करतात. त्या राखेत काही चिल्लर सापडते. तर एकाच्या हाताला सोन्याची अंगठी लागते. तो ती पटकन तोंडात टाकतो पण हे सगाळ मयताच्या सुनेच्या ध्यानात येतं ती आपल्या नवऱ्याला म्हणते, "काय हो आंघोळ घालतानाच म्हटलं होतं ना अंगठी काढून घ्या म्हणून." तर तो मुलगा म्हणतो, "जाऊ दे ना आपल्याला काय कमी आहे? गेली तर गेली अंगठी." ती म्हणते, "काय कमी आहे....?"

एकीकडे राख पाण्यात सोडायचं काम सुरु असतं. धर्मा त्या मयताच्या परिवाराला तीळ वाहून, हातपाय धुऊन यायला सांगतो. सगळे आटोपतात... आणि मायताची बायको मयताच्या जुन्या कपड्यांची पिशवी काढते. तेव्हा मात्र शांत झालेली गर्दी अचानक उचंबळते, दहा बारा जणांना लोट त्यांच्यावर येतो. सगळे कपडे मागत असतात. त्यात एक म्हतारी म्हणते, "म्या एक सुवासिनी हाय, मला काय तरी द्या. लय उपकार होतील माझ्यावर. आण तूम्हालाबी सुवासिनीचे आशीर्वाद मिळतील." या म्हातारीचा नवरा मरून दहा वर्षे झाले तेव्हापासून पोटासाठी ही म्हातारी स्वतःला सुवासिन म्हणत होती. त्यात एक लहान मुलगाही होता. जो जोरात हातवारे करत

ओरडत होता. “माझ्या बापाला काय तर द्या..... काय तर द्या.....” तेव्हा ती म्हातारी म्हणते, “द्या वो... लेकराला काय तरी....” मयताचा परिवार सगळ्यांना काही ना काही तरी देत होता. तेव्हड्यात ते लहान पोरग पिशवी हिसकावून घेऊन पळून गेलं. कोणाला काय म्हणावं हे कुणालाच काही कळत नव्हतं. ते पोरग लांब जाऊन उभा राहत. मयताची बायको दहा रुपये त्या म्हातारीला देते आणि पुढे निघते. सगळे थोडं समोर येतात आणि मयताचा मुलगा धर्माला विचारतो, “आता पुढे काय विधी आहे?” धर्मा म्हणाला, “आता आधी कडू घास काढा.” तेव्हा तो मुलगा विचारतो, “ते काय असतय?” धर्मा सांगतो, “थोडं..थोडं.. काहीतरी खाऊन घ्या.” तेव्हा तो मुलगा नकार देतो. म्हणतो की, “असल्या ठिकाणी मी काही खाऊ शकत नाही. अजून थोडा वेळ मी येथे थांबलो तर मला उलटी होईल.” त्याची आई म्हणते, “अरे थोडं तर खावाच लागत रे.” तो आईकडे रागाने बघतो आणि तिच्या हातातून भाकरीचा छोटा तुकडा घेतो तोंडात टाकतो. लगेच त्याची बायको म्हणते. “हँव अ लिटील बाईट हणी.. उगाच काहीतरी होईल.” धर्मा त्यांना सांगतो. “आता या दहा दिवसात घरात गरुड पुराणाच वाचन करा.” मुलगा म्हणतो “गरजेच आहे का हे करणे ?” तर धर्मा सांगतो, “गरजेचं नाही, चांगल असतं. त्यात पाप आणि पुण्य काय आहे हे दिलय. पापी माणसाला नरक यातना कशा भोगाव्या लागतात हे सांगितलंय.” तर तो मुलगा म्हणतो “आय डोन्ट बिलीव इन आल धिस बुलशीट”. तर धर्मा त्याला सांगतो. “निदान या कारणाने पंडित घरी येतील आणि दहावा आणि तेराव्याच्या तारखी पण काढून देतील. थोड पुण्य पदरी पडल”. यावर म्हतारी म्हणते, “धर्मा मी बसते पंडिता समोर आणि घरात गरुड पुराणाच वाचन घडवते. यांना आरे वेळ नाहीये बसायला.” तो मुलगा लगेच आईच्या हातात पैसे टेकवतो आणि बाजूला जाऊन ऊभा राहतो आपल्या बायकोसोबत. तर त्याची बायको त्या मुलाला आणि आजीला बघत असते. जे कपडे आणि पैशासाठी भांडत असतात. ते दिसतांना विरुध्द पार्टीचे वाटतात पण ते नंतर कपडे आणि पैसे वाटून घेत असतात. आजी सगळं एका कापडात गुंडाळून ठेवत असते. तर तो मुलगा रडत असतो. मला दहा रुपये तरी देना म्हणून.

इकडे मयताची बायको फार विवश होते आणि धर्माला म्हणते, “बघ इकडे बाप गेलाय... पण या मुलाला कामाच आणि पैशाच पडलय. बर तरी मौतीला आला नाही तर याचा बाप बिना मोक्षाचा राहिला असता. कळत नाही आपल्या मुलांना सुसंस्कारी बनवायचं की सुशिक्षित. कारण, मुलं शिकली की ती आई-बापाची आशी किंमत करतात रे. लहान होता तर बापाशिवाय रहावत नव्हत त्याला पण आज तोच बाप इतका दूर निघून गेलाय तरी काही फरक पडत नाही त्याला. पाप-पुण्याचा मेळच विसरून गेलीत रे ही हल्लीची पोरं. यांचा बेत फक्त पैसा. यांना पैसा म्हणजेच सगळं काही वाटतं रे. पण नाती, माणुसकी, कर्म हे सगळे त्यांच्यासाठी केवळ कवडीमोल आहे. यांना तो देव नरकात तरी कशी जागा देईल रे... “ लगेच धर्माची बायको म्हणते

"असं नका बोलू काकी." ती बाई म्हणते. "काय बोलते ग मी? माझे तर शब्दच कैद केलेत यांनी. बोलता येत असून मुकं असल्यासारखं वाटतंय. कसं निभायचं माझं म्हातारपण देव जाणे. बर जाऊदे तू पंडितांना तरी घरी पाठव धर्मा. मी घरी गरुड पुराणाच वाचन करते आणि याला पण बसवते. निदान थोडेतरी पाप कमी होतील याचे." तेवढ्यात धर्माच्या छातीत दुखू लागतं. त्याची बायको त्याला सावरते आण छातीवर चोळते. "तुम्हाला परत त्रास होतोय का? तुम्ही परत एकदा दवाखान्यात जा बरं. हे अस कव्हार ठेवता." ध म्हणतो, "मी ठीक आहे." तेवढ्या तिकडे मुलगा आणि बायको आईला आवाज देतात. "आता तिकडेच थांबणार आहेस का? आई धर्माच्या हातात पैसे देते." आण घाई घाईने निघते. तेथुन जातांना धर्माची बायको त्या म्हातारी आणि मुलाला म्हणते, "नीट वाटून घ्या बरं नाहीतर घरी जाऊन भांडणं होतील उगाच. यावर ते सर्वच हसतात.

इकडे धर्माच्या घरी कोणीच नसते. धर्माचा मुलगा किरण बाहेरून घरात येतो. बघतो तर घरात कोणीच नाही. बाहेर जाऊन आईला आवाज देतो. "आई कुठे आहेस ग ?" पण उत्तर येत नाही. तो आतल्या खोलीत जातो. बरणितले शेंगदाणे घेतो. खिशात भरतो. एकेक काढून खात असतो. अचानक त्याची नजर एका लाल कापडावर पडते आणि तो ते खाली उतरवतो. खोलतो तर त्यात काही ग्रंथ असतात. त्यात गरुड पुराण असतं. तो ते न्याहाळतो आणि त्याचा मोह आवरत नाही आणि तो ते चाळतो. "च्यायला केवढ पुस्तक आहे राव, आणि चित्र पण भारी आहे रे ." वाचावचं म्हणतो, "गरुड विष्णू भगवानांना विचारतो, "प्रभु मला सांगा नरकात जाणाऱ्याचा मार्ग कसा आहे...? मला नरका बद्दल जाणून घ्यायचंय...

किरण गरुडपुराण वाचण्यात मग्न असतो. तेव्हा अचानक धापा टाकत त्याची आई घरात येते. "अरे... बघ रे... तुझ्या बापाला काय होतंय. अंगणातच पडलाय रे तुझा बाप..." किरण आणि सावित्री धावतच आंगनात येतात. दोघेपण धर्माच्या छातीवर चोळतात. पाठीवर चोळतात. पण धर्माला काहीच बरं वाटत नाही. ते त्याला दवाखान्यात नेण्यासाठी उठवतात. तर धर्मा तेथेच प्राण सोडतो. श्वास बंद झालेला बघून सावित्री मोठ्याने हंबरडा फोडते. किरण पण मोठ्याने रडायला लागतो. "बाबा... उठाना बाबा... बघना माझ्याकडे जरा एकदा बघा ना.... एकदा उठाना....." पण धर्मा काही हलचाल करत नव्हता.

धर्माच्या ओळखीचा छोटा जमाव तिथे जमा होतो. अंत्यविधीची तयारी होते. किरण आपल्या आईला म्हणतो, "मला हे काम नाही जमत आई. आता कोण करणार हे काम." आई त्याच्या तोंडावर हात फिरवत म्हणते. "आता हे तुलाच करायचा आहे बाळा." तो जमावातल्या काही माणसांना विचारतो. या अपेक्षेने की कुणाला तरी हे काम जमत असेल. पण प्रत्येकाचा नकार येतो. शेवटी किरणला कळतं की, 'या समाजात आपल काय महत्त्व आहे?' तो केविलवाण्या नजरेने आपल्या मयत बापाकडे


बघतो आणि पडलेली लाकडे रचायला सुरुवात करतो.

सरण रचून किरण आपल्या बाबांचा अंत्यविधी आपल्याच हाताने करतो. अग्नी देताच जमलेल्या सगळा जमाव एका क्षणाचाही विलंब न करता जागा सोडतो आणि सगळी जागा रिकामी होते.

उरतात ते जळणाऱ्या प्रेताजवळ उभा असलेला किरण आणि मागे एकटी बसलेली त्याची आई.

तेव्हा किरणला मघाशी वाचलेले गरुड पुरानातले शब्द आठवत होते..... "हे माणसा तू एकटाच आहेस. तू फक्त एक निर्जीव मातीचा ठोकळा आहेस. तुला अर्थ माझ्यामुळे आहे. जरी तुझ्या शरीरात मी अंगठ्या ईतका असलो तरी तू माणूस असण्याची साक्ष फक्त मी आहे. हो मी आत्मा. आज तुला सोडून परदेहात प्रवेश करताना तू मागे काय सोडलंय हे बघतोय कमवलेला पैसा तुला पुरला नाही, ना कमवलेली संपत्ती. सोबत तू काहीच नेऊ शकला नाहीस. तू मागे ठेवलेस ते फक्त तुझं पुण्य. तुला पुढे तारणार असेल तेही फक्त पुण्य आणि जर तू पुण्य कमावलं नाहीस तर हे आयुष्य निष्फळ आहे. तुझे संचित, कर्माचे फळ तुला मरणानंतरही भोगावे लागतील. पुण्य कर म्हणजे स्वर्गाचे दरवाजे उघडतील. नाहीतर नरकाच्या यातना सोसाव्या लागतील. दिसतोस तू पण बोलणार मीच आहे. चालतोस तू पण चालवणारा मीच आहे. तुझ्या शरीराचा ईश्वर जो सदैव नश्वर आहे. शास्वत आहे तो फक्त मीच आहे. होय.....मी आहे आत्मा... मी आहे आत्मा....

**- प्रा. डॉ. राजकुमार घुले / पाथर्डी**
**मो.- ७९७२८२१९६३**



# बालगीत



ग ग गणपतीचा
चला वंदन करू गणपतीला
बाप्पा बाप्पा मला ज्ञान दे
बाप्पा बाप्पा मला खाऊ दे

ग ग गवताचा
हिरवे हिरवे गवत छान
सशाला आवडते गवत
वाऱ्यावर डुले हिरवेगार गवत

ग ग गवार
गवार आहे फळभाजी
लागते छान
चटकदार मस्त

ग ग गजरचा
घड्याळाचा वाजतो गजर
आईबाबा लावतात गजर
गजर त्यावर वेळेची नजर

ग ग गणपतीचा
वंदन करूया गणपतीला
चला करूया
श्रीगणेशा अभ्यासाचा...

**- सौ. ऋतुजा गवस / नवी-मुंबई**
**मो.- ८६५२४३३२२३**



# पाऊस

हृदयात आठवांचा, पाऊस दाटलेला
झरतो कधी उरातुन, पाऊस
गोठलेला...

होती मिठीत माझ्या, ती गारठून गेली
अंगास गार तेव्हा, पाऊस
झोंबलेला!...

चिडलीस पावसावर, टळणार भेट
म्हणुनी होता तुझ्याचसाठी, पाऊस
थांबलेला!...

दाटून ढग स्मृतींचे, दिसताच 'तो',
बरसती आहे नभी उराच्या, पाऊस
कोंडलेला....

ती भेट शेवटाची, भिजवून चिंब गेली
तेव्हा मनास होता, पाऊस
बोचलेला....

नाही कुठे जराशी, जागा बसावयाला
आहे घरात माझ्या, पाऊस
नाचलेला!....

उखळात मान देऊन, शेती कशी
करावी?
सालात या
बघाना, पाऊस
लांबलेला!....



मातीत पीक गेले, जळले कधी
बियाणे
आहे बळीस इतका, पाऊस
बांधलेला....

कळतो लगेच आता, अंदाज
पावसाचा
नाही मनुष्य, पण मी पाऊस
वाचलेला....

कळतो लगेच त्याचा, लहरीपणा
मलाही
समजून ऐवढा मी, पाऊस
घेतलेला!......

संसार थाटलेला, गेला पुरात माझा
इतका नसेल कोणी, पाऊस
सोसलेला....

**- आर. के. आठवले (अकोलेकर)**
**/ सिल्लोड मो.- ९०११८९६९१७**

# जगप्रसिद्ध लोणार सरोवर



महाराष्ट्रातल्या बुलढाणा जिल्ह्यात लोणार हे तालुक्याचे ठिकाण असून येथे प्रसिद्ध खाऱ्या पाण्याचे सरोवर असून या गावाची लोकसंख्या ११,४८६ (१९८१) इतकी आहे. मेहेकर शहराच्या दक्षिणेस २० किलोमीटर अंतरावर असलेले लोणार हे विदर्भातील सर्वांत प्राचीन गावांपैकी एक आहे.

कृतयुगात या गावाची स्थापना झाली, अशी दंतकथा आहे. त्याचे जुने नाव 'विरजक्षेत्र' असे होते. स्कंदपुराणात वर्णिलेल्या लोणासुराची (लवणासुराची) कथा याच ठिकाणाशी निगडित असावी. विरजमाहात्म्यात याचा तीर्थ म्हणून उल्लेख आहे. लोणार गावाजवळच खाऱ्या पाण्याचे जगप्रसिद्ध लोणार सरोवर आहे. शास्त्रज्ञांच्या मते दहा लाख वर्षांपूर्वी ६९ मीटर रुंदीच्या व वीस लक्ष टन वजनाच्या अशनी पडल्याने १,९०० मीटर व्यासाचे व १९० मीटर खोलीचे विवर निर्माण होऊन तेथेच या गोलाकार सरोवराची निर्मिती झालेली असावी. या सरोवराचा बाह्य परिघ ६ किलोमीटर; अंतर्परिघ ३.५ किलोमीटर व खोली ९० ते १९० मीटर आहे.

सरोवराच्या कडा १३० मीटरपर्यंत उंचावलेल्या आहेत. कडांवर काचेच्या छोट्या कणांपासून १० ते १५ सेंटीमीटरपर्यंत आकाराचे काचेचे तुकडे पडलेले आढळतात. सरोवराचे पाणी अत्यंत खारट व मचूळ आहे. मात्र काठावरील व आजूबाजूच्या विहिरींमधील पाणी गोड आहे. सरोवराच्या पाण्यात आढळणारे क्षार, मीठ आणि अन्य पदार्थ अन्यत्र कोठेही न सापडणाऱ्या प्रकारचे आहेत. काहींच्या मते चुनखडीयुक्त विवराचे प्रचंड छत कोसळून तेथे या सरोवराची निर्मिती झाली असावी; तर दख्खनच्या पठारावरील ज्वालामुखी उद्रेकाच्या वेळी जोराच्या वायुरूप स्फोटामुळे ज्वालामुखीच्या खोलगट भागात हे सरोवर निर्माण झाले असावे, असेही काहींचे मत होते. परंतु अलीकडील काळात केलेल्या संशोधनावरून उल्कापातामुळेच हे सरोवर तयार झाले असावे, असे शास्त्रज्ञांचे निश्चित मत बनले आहे. बेसॉल्ट खडकरचना असलेल्या प्रदेशातील अशा स्वरूपाचे हे जगातील एकमेव



विवर आहे. जगातील उल्कापाषाण पतनामळे निर्माण झालेल्यांमध्ये हे तिसऱ्या क्रमांकाचे मोठे विवर आहे. या विवरात दडला गेलेला उल्कापाषाण साधारण ६०० मीटर खोलीवर रुतून बसला असावा, असा अंदाज आहे.

सत्ययुगात लोणार सरोवर वैरज तीर्थ (वैरज तीर्थ) या नावाने ओळखले जात असे. लोणासुराच्या कथेनुसार विष्णूने लोणासुराचा वध केला व या सरोवराच्या खोलगट भागात त्याचे दफन करण्यात आले. त्याच्या रक्तापासून सरोवरातील पाणी तयार झाले, अशी आख्यायिका आहे. सरोवराच्या एका बाजूस स्वच्छ पाण्याची अखंड वाहणारी धार (झरा) असून त्या धारेचा उगम गंगेपासून झाल्याचे भाविक मानतात; तर दुसऱ्या बाजूस देवीचे मंदिर आहे. याशिवाय येथे सीताना हिनी व रामगया असे दोन झरे आहेत.

लोणार सरोवराभोवती अनेक मंदिरे असून ती बव्हंशी मोडकळीस आलेली आहेत. लोणार गावाच्या मध्यभागी विष्णूने ज्या ठिकाणी लोणासुरावर विजय मिळविला असे मानले जाते, तेथे दैत्य-सूदन हे सुंदर व प्राचीन मंदिर आहे. हे मंदिर म्हणजे यादवकालीन हेमाडपंथी वास्तु-शिल्पाचा एक उत्कृष्ट नमुना आहे. याशिवाय नरसिंह, गणपती, रेणुकादेवी, कुमारेश्वर व मारुती यांची अन्य उल्लेखनीय मंदिरे आहेत. लोणार सरोवर व त्याच्या परिसराच्या नयनरम्य सृष्टिसौंदर्यामुळे लोणार हे जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ बनले आहे.

चिलीमध्ये सापडलेल्या सूक्ष्मजीवांमुळे पाण्याचा रंग लालसर झाला होता. त्या पाण्यात अर्सेनिकचे प्रमाणही प्रचंड होते. तसेच ऑक्सिजनचे प्रमाण त्यात अजिबात नव्हते. अशा स्थितीतही ते सूक्ष्मजीव अस्तित्व टिकवून होते. इतकेच नव्हे, तर त्यांची वाढही होत होती. ऑक्सिजनच्या ऐवजी ते अर्सेनिकचा वापर करत होते. या सर्व अभ्यासातून पृथ्वीच्या सुरवातीच्या काळातील सजीवसृष्टी कशी असावी याची कल्पना करता येऊ शकते. महाराष्ट्रातही उल्कावर्षावामुळे तयार झालेल्या लोणारच्या तळ्यामध्ये अशाच प्रकारचे सूक्ष्मजीव आढळले आहेत. या जीवांमुळे पाण्याचा रंग जांभळट लालसर झाल्याचे दिसून आले आहे. या सूक्ष्मजीवांचा संबंध थेट पृथ्वीच्या उत्पत्तीच्या काळाशी किंवा जीवसृष्टीच्या अगदी सुरुवातीच्या काळाशी जोडला जात असल्याने त्याचा सखोल अभ्यास सुरु आहे.

**- डॉ. सुनील पाटील / जयसिंगपूर**
**मो.- ९९७५८७३५६९**
**(- लेखक, व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंकाचे कार्यकारी संपादक आहेत.)**

# गीत गुंफिलं सोन्याचं



गीत ऐकलं कधी मी
बालपणी अंगाईचं
चिऊ काऊचं माऊचं
गोठ्या मधल्या
गायीचं॥धृ॥

गीत ऐकता स्फुरलं
मनी माझिया मनाचं
माझं स्वतःचं स्वतःचं
गीत माझ्या जीवनाचं॥१॥

मोतियाच्या अक्षराचं
गीत माझं रेशमाचं
भाव भोळ्या भावनांचं
गीत आणखी श्रमाचं॥२॥

अनाचार भ्रष्टाचार
गीत त्याच्या विरोधाचं
आतंकाचं वादळाचं
गीत वाद-विवादाचं॥३॥

पर्यावरण रक्षण
गीत लिहिलंही त्याचं
गीत लिहिता लिहिलं
मीही समाज हिताचं॥४॥

गीत नव्याचं जुन्याचं
गीत मराठी बाण्याचं
बोली माझी अहिरानी
तिच्या खान्देशी पणाचं॥५॥

नाही चांदीचं रुप्याचं
नाही रुपया नाण्याचं
नीत नव्याने गाण्याचं
गीत गुंफिलं सोन्याचं॥६॥

**- सौ. मंगला रोकडे / देवपूर**
**मो.- ९३७१९०२३०३**

# दैवगती यमदूत



अरे मानवा तुला घेईला येतोय रे
तु घरच्यांना त्रासून सोडतोय रे
खूप जीवापाड जीव लावला होता रे
माझ्यापासून आताच दूर करतोय रे

तुझ्या आयुष्यात काय बदल होतेय
तुला कळून न कळल्यासारखं
वागतोय रे
तू सगळ्या नातेवाईकांना बोलवतोय रे
असं का म्हणतोय रे.....!

जगण्याची इच्छा आहे रे
तुला अजून खूप करायचं आहे रे
तुझ्या मनांत भरपूर स्वप्न होती रे
तूला हे जग पाहवयाच आहे रे

अरे मानवा तुझ संगळ मान्य करतोय
रे
तुझं आयुष्य विधीलिखित आहे रे
तू म्हणशील अजून थांबायच आहे रे

तुझ्या
सांगण्यावरून
कोण ऐकत रे

अरे मानवा तुझा करार झाला रे
तुला कुणाला भेटायचं होत रे
तू घरच्यांना सांगितले आहे रे
तू बाहेर सांगून आला आहे रे

अरे मानवा काळ आला आहे रे
तूला कुठून ही उचलून नेतील रे
तुला कारण बोलून घेऊन जातील रे
कुणालाचं चुकला नाही रे

दैवगती अचानक येती रे
नियती पुढे काही नाही रे
मृत्यू हा अटळ आहे रे
यमदूतला हे काम आहे रे

**- उमेश साळुंके / पिपरी चिंचवड**
**मो.- ९६९७७९७६१९**

# कृतघ्न



शरद ऋतुचं आगमन झालं आणि सृष्टीनं नुरुच पालटला श्रावण सरीनं सगळीकडे पाणीच पाणी झालं झऱ्यानां उगूळ फुटलं. डोंगर, पठारावरून पाण्याचे धबधबे वायूगतीनं वाहू लागले. कड्याकपाऱ्यात, दरीखोऱ्यात, डोंगर माथ्यावर रानवेली फुलल्या. शिवारात भातपीक ताठ मान करून उभं राहिलं गारवाऱ्यासोबत रानवेलीवर उमटलेली फुलं मनमुराद झोका घेऊ लागली. पायवाटा चिखलानं माखून गेल्या. सारी सृष्टी हिरवा शालू पांघरल्यासारखी भासू लागली. कधी कधी सतत कोसणाऱ्या श्रावण मध्येच थांबत त्यामुळे उघडीप मिळे त्यावेळी आकाशात सूर्यदेव आपल्या किरणांचा पिसारा फुलवून वसंधुरेला हळूवार गोंजारी. सायंकाळच्या वेळी आकाशाच्या पडद्यावर इंद्रधनुष्याचे आगमन होई. त्याचे सप्तरंग पाहून डोळ्यांना तृप्तता मिळे.

सगळं कसं भव्य दिव्य मनाला आल्हादकारक गारवा देणारं सृष्टीचं विविध रंगानी भरलेलं हे चित्र पाहून माझ्यासारख्या निसर्ग वेड्या माणसाला समाधान मिळणार नाही असं कसं होईल? खरंच सृष्टीचं अनोख रूप पाहून भारावून गेलो होतो. नुकताच गौरी गणपतीचा उत्साह संपला होता. पण त्या सणाच्या वेळी घडून गेलेल्या अनेक गोष्टी माझ्या मेंदूच्या पटलावर रेंगाळत होत्या. मनाला गोड गुदगल्या करीत होत्या.

गणपतीच्या सणानंतर पुन्हा कॉलेज सुरु झालं होतं. माझं मन पुन्हा अकरावी-बारावीच्या अभ्यासक्रमात गुंतलं गेलं. विद्यार्थ्यांच्या सहवासात एक-एक दिवस जाऊ लागला.

बघता बघता भाद्रपद मध्यावर आला. या काळात पावसाचा जोर कमी झाला होता. पण पिकांना चांगलीच उभारी आली होती. मी सुट्टीच्या काळात शेतातून फेरफटका मारून येत असे. आज शनिवार असल्याने दुपारी १२ ते ४ असे कॉलेज सुटल्यानंतर मी घरी आलो आणि विश्रांती न घेता शेतात गेलो. मुसळधार पावसाने बांधाना पडलेले खड्डे (खागी) भरण्याचं काम करायचं ठरविलं सायंकाळी ७ वाजता घरी पोहचलो.

दोन तीन तास शेतात काम केल्यानं अंग चांगलच शिणलं होत. हातावर उठलेल्या फोडाप्रमाणं ते ठसठसत होतं. त्या रात्री अंथरुणावर पडल्या पडल्या मला झोप लागली. झोपण्यापूर्वी मिसेस व मुलीला कल्पना दिली की उद्या रविवार असल्याने मी लवकर उठणार नाही. उशिरापर्यंत मी झोपेन. त्यांनीही काही हरकत घेतली नाही. खरंच रात्रभर अगदी गाढ झोप लागली. परंतु सकाळी ७ च्या सुमारास घरातील लोकल फोनच्या रिंगच्या आवाजाने माझ्या निद्रेत व्यत्यय आणला. त्या आवाजाने मला जाग आली. आजूबाजूला पाहिलं. सारेजण गाढ निद्रेत होते. वाटलं यांना जागं

करण्यापेक्षा स्वत:च उठून फोन रीसिव्ह करावा. डोळे चोळतच, अगदी नाखुशीने फोन जवळ पोहचलो. हलक्याच हाताने रीसिव्हर उचलून कानाला लावला. आळसातच म्हणालो हॅलो, कोण बोलतय? पलीकडून गंभीर स्वरूपात आवाज आला.

'एस.आर सर मी मुसळे सर बोलतोय.' मी म्हणालो, 'काय हो सर आज रविवारचं तर आम्हाला सुखानं झोपू द्या.' 'सॉरी, सर माझ्यामुळे तुमची झोप मोड झाली; पण काय करणार बातमीच तशी आहे. राहवलं नाही म्हणून तुम्हाला फोन केला.' 'कसली बातमी? काय झालं?' 'अहो, आजच्या सर्व वर्तमान पत्रांमधून एक बातमी छापून आली आहे. आजचा पेपर वाचला नाही का तुम्ही?' नाही, मी आताच उठलो आहे. तुम्हीच सांगा काय झालं. 'अहो, एस.आर.सर तुमच्या लाडक्या विद्यार्थ्याला दिसताक्षणी अटक करण्याचे आदेश राज्याच्या गृहमंत्र्यानी दिले आहेत.' मुसळे सर, कोणाबद्दल बोलताय तुम्ही? उंबरवाडीच्या अनिल सावंत विषयी. अनिल सावंत? काय केलं त्यानं? शेकडो तरुणांना कोट्यावधी रूपयांना गंडा घालून आपला हा लाडका विद्यार्थी फरार झाला आहे. गृहमंत्र्यांनी त्याच्या नावाचे पकड वॉरंट काढण्याचे आदेश सर्व पोलीस स्टेशनला दिले आहेत. मुसळे सर, उगाच माझ्या जखंमावर मीठ चोळू नका. खरे म्हणजे अनिल विषयी बातमी ऐकून मलाच धक्का बसला आहे. ठीक आहे, सर फोन ठेवतो तुम्ही स्वत:च बातमी वाचा. मी रीसिव्हर खाली ठेवला. अनिलची बातमी ऐकून मेंदूला तेलमुंग्या लागल्यासारखे झाले.लटपटत्या पावलांनी दरवाजापाशी आलो. हलक्याच हाताने दरवाजा उघडून थरथरत्या हातानी पेपर उचलून नाकासमोर धरला आणि अनिल सावंत बाबतची बातमी वाचून चक्रावून गेलो. मुसळे सरांनी सांगितलेली बातमी सत्यात उतरली होती.

अनिल सावंतने शेकडो तरूणांना गंडा घातला होता. लाखो रूपयांचा त्यांने फ्रॉड केला होता. आर्मीमध्ये भरती करतो असे सांगून त्यांने अनेकांना लुटले होते. आपण कोणालाही अगदी सहज नोकरी लावू शकतो असे त्यांने सांगितले होते. वास्तवात असे काही नव्हते. उलट त्यांला नोकरीतून काढून टाकले होते.

खरे सांगायचे झाले तर त्याचा आणि माझा गेल्या आठ दहा वर्षात संपर्क आला नव्हता. सध्या तो कुठे आहे, काय करतो याची मला पुसटसीही कल्पना नव्हती. पण मुसळे सरांनी तो माझा लाडका विद्यार्थी आहे असे जे म्हटले होते ते सत्य होते. ज्यावेळी तो माझ्याकडे शिकत होता त्यावेळी तो त्याच्या बॅचमधील माझा सर्वात लाडका विद्यार्थी बनला होता. त्याच्या आठवणीनी मी कासावीस झालो. माझं मन भूतकाळाची पानं पलटू लागंल आणि क्षणात आठवला तो त्याच्या व माझ्या भेटीचा पहिला प्रसंग.

त्यावेळी मी गावातच राहायला होतो. परंतु मिसेस डिलेव्हरीसाठी माहेरी गेल्यामुळे घरी जेवण करणे किंवा इतर कामे करण्याची जबाबदारी माझ्यावरच होती. कॉलेज कडून घरी येताच मी जेवणाच्या तयारीला लागलो. एवढ्यात एक गोड आवाज माझ्या

कानावर आला. मी हातातील काम बाजूला ठेवून बाहेर डोकावून पाहिलं. दारात अनिल सावंत उभा होता. त्याचं व्यक्तिमत्व नजरेत भरण्यासारख होतं जवळ जवळ साडेपाच ते पावणे सहा फूट त्यांची उंची होती. शरीर पिळदार होतं, रंग गोरा होता. मी काही बोलण्याच्या आत तो आला आणि माझ्या पायाला हात लावून नमस्कार करीत म्हणाला, 'सर, मी अनिल सावंत. तुमचा विद्यार्थी इयत्ता अकरावीत आहे. तुमची भेट घेण्यासाठी घरी आलो आहे.' 'काही काम होतं का माझ्याकडे?' 'होय सर, गेले दोन तीन महिने मी आपल्या तासाला बसतो. आपण खूप छान शिकवता.

आपलं टीचिंग पाहून मी भारावून गेलो आहे. भविष्यात मला ही तुमच्याप्रमाणे चांगले शिक्षक व्हायचे आहे. पण सर माझी परिस्थिती खूपच बेताची आहे. माझी आई वडीलांच्यापासून विभक्त राहते. उंबरवाडीला मामांच्या घरात; पण आम्ही स्वतंत्र राहतो. सर मला तुमचे सहकार्य हवे.' मी मान हालवून होकार दिला. चेहऱ्यावर समाधान घेऊन तो निघून गेला. मी माझ्या कामात गुंतलो. दुसऱ्या दिवशी सकाळी साडे सहा वाजता दारावर केलेली टकटक ऐकून मला जाग आली. डोळे चोळतच मी दरवाजा उघडण्यासाठी गेलो हलक्याच हाताने मी दरवाजा उघडला. पाहतो तर काय, बाहेर अनिल सावंत उभा होता. कॉलेजचा जाण्याच्या तयारीने तो आला होता. माझ्याकडे पाहत तो म्हणाला, 'गुड मार्निंग सर, आज मी कॉलेजला तुमच्यासोबत जाण्यासाठी आलो आहे.' 'अरे पण कॉलेज तर आठ वाजता आहे. एवढ्या लवकर जाऊन तिथे मी काय करणार? दुसरे म्हणजे माझे उरकले नाही.' 'सर, मला कल्पना आहे. पण यापुढे तुमचा अधिक सहवास मिळावा यासाठीच मी आलो आहे.'

मी काळी बोलण्याआधीच तो आतमध्ये येऊन बसला. मग पुढे रोजच असे होऊ लागले. तो रोज सकाळी साडे सहा वाजता आमच्या घरी येई. माझे उरकेपर्यंत आमच्या घरात थांबे आणि माझ्यासोबतच कॉलेजला येई दरम्यानच्या काळात पहिली टेस्ट व ट्युटोरिअल झाली. यामध्ये तो मी शिकवत असलेल्या राज्यशास्त्र व इतिहास या दोन विषयात दोन तुकड्यांमध्ये प्रथम आला. पुढे झालेल्या सहामाही परीक्षेतही त्यांने प्रथम क्रमांक मिळवला. त्यामुळे साहजिकच त्याच्या व माझ्यामध्ये जवळीकता निर्माण झाली.

एके दिवशी अनिल मला म्हणाला की, 'सर तुम्ही एक दिवस आमच्या घरी आईला भेटण्यासाठी यायला हवे.'

मी त्याच्या आईला भेटण्याचे मान्य केले. सायंकाळी पाच वाजता मी उंबरवाडीला गेलो. गावच्या सीमेवर चातकाने पावसाची वाट पहावी तशी तो माझी वाट पाहत होता. मला पाहून त्याचा चेहरा प्राजक्त फुलासारखा फुलला. तेथून मला तो आपल्या घरी घेऊन गेला. पाच दहा मिनीटांनी आम्ही त्याच्या घरी पोहचलो. नऊवारी कासटा घातलेल्या, खेडूत, अशिक्षित अशा त्यांच्या आईने माझे स्वागत केलं. चहापाण्याची औपचारिकता पूर्ण केल्यानंतर त्या माझ्यासमोर बसल्या. अनिलच्या लहानपणीच

नवऱ्याने आपल्याशी कसा व्यवहार केला, त्यांने कसे टाकलं किंवा आपल्याला लहान मुलांसह कसं घर सोडण्याची वेळ आली याची कहाणी त्यांनी मला ऐकवली. त्यामुळे माझ्या संवेदनशील हृदयालाच खिंडारच पडलं. जीव गहिवरून आला. अनिल आता त्यांच्या जीवनाची कशी आधारशीला बनला होता हे ही समजलं. मी त्यांना म्हणालो, 'तुमचा मुलगा खूप गुणी, हुशार, कर्तृत्ववान आहे. भविष्यात तो तुम्हाला चांगलं सुख देईल.'

दिवस पाखरासारखं भरकन निघून जात होते. बघता बघता अकरावीची परीक्षा झाली. निकाल ही लागला. अनिल पहिल्या तीन क्रमांकात आला होता. राज्यशास्त्र व इतिहास या दोन विषयात त्यांने प्रथम क्रमांक मिळवला होता. त्याच्या प्रगतीमुळे माझ्या मनावर समाधानाचे पीस फिरवल्याचा भास झाला.

दरम्यानच्या काळात बारावीचं वर्ष सुरु झालं. आताही अनिल माझ्याकडे साडे सहा वाजता घरी येत होता. पण तो येताना सुजीत मोरे व मुकुंद पाटील या मित्रांना घेऊन येई. हे रोज तिघे आमच्या घरी येत आणि माझ्यासोबतच कॉलेजला जात असत. इतरांच्या दृष्टीने ही गोष्ट कुचेष्टेची बनली होती. पण मी त्याकडे दुर्लक्ष केले. कारण माझा अनिलवर खूप विश्वास होता. परंतु एके दिवशी या विश्वासाला तडा गेला, कॉलेज सुटल्यानंतर घरी चालत येत असताना, रस्त्याच्या कडेला जे स्टेशनरी दुकानाचे मालक होते अरविंद ते माझ्या समोर येत म्हणाले, 'देसाई सर, आपला एक विद्यार्थी जो उंबरवाडीचा आहे. त्यानं आमच्या दुकानातुन ४ महिन्यापुर्वी काही वस्तु नेल्या आहेत त्याचे बील अद्यापही त्यांने दिले नाही.' मी म्हणालो, 'तुम्हाला त्याचे नाव माहीत आहे का?' 'नाही. पण मी त्याचे वर्णन तुम्हाला सांगतो.' त्यांनी वर्णन केले. जे अनिलच्या वर्णनाशी जुळत होते. एवढ्यात पाठोपाठ अनिल आपल्या मित्रांसोबत आला. अरविंद त्याच्याकडे बोट दाखवत म्हणाले, 'देसाई सर, हाच तो विद्यार्थी.'

मी अनिलला आमच्याजवळ बोलवले अरविंदनी त्याच्याकडे पैशाची मागणी केली. परंतु तो आपण साहित्याची खरेदी केल्याचे मान्य करीत नव्हता. आपण कधी यांच्या दुकानात गेलोच नव्हतो, आज मी यांना प्रथम पाहत आहे असे तो पुन्हा पुन्हा सांगत होता. खूप वेळ वाद रंगला. कोण खरे बोलत होते हेच समजत नव्हते. शेवटी मीच पैसे देण्याचे मान्य केले. खरे सांगायचे झाले तर मला त्यावेळी रुपयाही पगार नव्हता, पण तरीही दुकानदाराचे पैसे मान्य केले. अजूनही अनिलवर माझा पूर्ण विश्वास होता. तो कोणाला फसवू शकेल असे मला वाटत नव्हते.

या घटनेनंतर मात्र तो थोडासा माझ्यापासून लांबच राहू लागला. पुढे तर त्यांने माझ्याकडे येणे बंद केले. १२ वी नंतर त्यांने डी.एड ला अॅडमिशन घेतल्याचे मला दुसऱ्याकडून समजले. त्यानंतर तो दीड वर्षाने मला पुन्हा भेटायला आला. त्यावेळी तो मला म्हणाला की, सर मी डी.एड अर्धवट सोडून आर्मीमध्ये भरती झालो आहे. घरच्या आर्थिक चणचणीमुळे मला हा नाइलाजास्तव निर्णय घ्यावा लागला.' त्याला डी.एड

अर्धवट सोडावे लागले हे ऐकून मला कमालीचे दु:ख वाटले. परंतु त्याला आर्मीत चांगल्या पगाराची नोकरी मिळाली हे ऐकून समाधान ही वाटले. मी त्याची समजूत घातली. नेमके याच वेळी माझे दोन नंबरचे आर्मीमध्ये असणारे मेहणे प्रवीण आम्हाला भेटण्यासाठी आले होते. अनिल व माझ्यात चालू असलेल्या चर्चा त्यांनी ऐकली होती. ते बाहेर आले मी त्या दोघांची एकमेकाना ओळख करून दिली. मग त्या दोघांची चर्चा रंगली. शेवटी तासाभराने तो माझा निरोप घेऊन निघून गेला.

पुन्हा सहा महिन्यांनी तो मला भेटायला आला. येताना तो मिठाईचा बॉक्स घेऊन आला होता. त्यांने आम्हाला सांगितले की, माझे मेहुणे व त्याची आर्मी कॅपमध्ये भेट झाली त्यांनीच तो मिठाईचा बॉक्स दिला आहे. रात्री दहा वाजता माझ्या मेहुण्यांचा फोन आमच्या मिसेसना आला. त्यांनी विचारले की ‘अनिलकडून दिलेले मिठाईचे पाच बॉक्स मिळाले का?’ मिसेस म्हणाल्या, ‘तो केवळ एकच बॉक्स घेऊन आला होता.’

मी काय ओळखायचे ते ओळखले. अनिलने इथेच फ्रॉड केले होते. परंतु खाण्याची वस्तू आहे. त्याच्या घरी कोणी तरी खाल्ले असेल असे समजून त्या विषयावर पडदा टाकला. अर्थात अनिलच्या फसव्या, खोटारड्या स्वभावाची मला थोडीसी कल्पना आली. यापुढे त्यांच्यापासून थोडे दूरच राहयचे असे मी ठरविले. खरे सांगायचे तर मी त्याला विसरून गेलो. पण आज मुसळे सरांनी सांगितलेल्या बातमीमुळे तो काय पात्रतेचा आहे हे माझ्या लक्षात आले. ज्याला मी गरीब समजत होतो तो मोठा फ्रॉड करणारा निघाला होता. मी खात्री करण्यासाठी उंबरवाडीत असणारे माझे मित्र पी.के. कदम सर यांना फोन लावला. त्यांनी वृत्तपत्रातील बातमी १०० टक्के खरी असल्याचा दुजोरा दिला. त्यांनी मला अनिल विषयी खूप ऐकवले ते ऐकून मी चक्रावून गेलो. त्याचे प्रेम प्रकरण, त्याला नोकरीतून सस्पेंड का केले, त्याचे लग्न कसे झाले, तो आईशी कृतघ्न कसा बनला, गोरगरीब मुलांच्याकडून त्यांने कसे पैसे मिळवले या बद्दल त्यांनी सविस्तर माहिती सांगितली.

ज्याला मी गुणी, सभ्य, सज्जन समजत होतो तो चक्क फ्रॉड निघाला होता. वडिलांनी टाकलेल्या आपल्या आईच्या दुधाला तो जागला नव्हता. त्याची ती कृतघ्नता पाहून मी कमालीचा हैरान झालो. त्यांने गोरगरीबांची तर फसवणूक केली होती, पण असहाय्य निराधार असलेल्या आईचीही फसवणुक केली. चांगल्या पगाराची नोकरी असतानाही त्यांने फार मोठा गुन्हा केला होता. जो क्षम्य मुळीच नव्हता. विद्यार्थी कसा असायला हवा ज्याला पाहून शिक्षकाची मान उंचावली पाहिजे.

अनिलसारखे लोक कधीच कोणाचे नसतात. त्यांना नात्याचा अर्थ कळत नाही. दुसऱ्याच्या भावना कळत नाहीत, आपल्यावर केलेल्या उपकारांची त्यांना जाणीव नसते, ते सदैव ‘कृतघ्न’ राहतात. आता फक्त एकच अपेक्षा आहे. ती म्हणजे, अनिलने केलेल्या अयोग्य कृत्याची त्याला स्वत:लाच जाणीव व्हायला हवी, आपल्या अयोग्य

कृत्याचा त्याला पश्चाताप व्हायला हवा आणि त्यांने आपल्या मातेचे पाय धरून माफी मागून तिच्या वृद्धापकाळाचा सहारा बनायला हवे. त्याच्यावर असलेल्या कृतघ्नतेचा डाग पुसून त्याच्या शीरावर ‘कृतज्ञ’ असल्याचा मुकट नव्याने बसायला हवा. असे जर झाले तर मला त्याचा गुरु झाल्याचे समाधान होईल. येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना मी त्याच्याबद्दल अभिमानाने सांगू शकेन ! शेवटी सकारात्मक दृष्टीकोनातून पाहायला काय हारकत आहे. “वाल्हयाचा वाल्मिकी होतोच ना?”

**– सुनील देसाई / मिणचे खुर्द**
**– मो. ९८४८०९३८१३**



# वाटचाल ही



कितीक योजने चालुन झाले अंतर सारे
परी आणिक आहे करणे वाटचाल पुढची

उगवती हर एक नवी पहाट ही रोजची
भरते उमेद नवविश्वासाच्या वाटचालीची

थकल्या भागल्या जीवा आधार देण्यास
शितल चांदणे देती तारे सारे आकाशाची

बदलो कितीदाही दुनिया नजरे समोरची
ईच्छा कणखर वाट पूर्ण करण्याची!

# जीवन सुंदर आहे

नजरेला जे दिसते
सारेच जग सुंदर आहे
मनाने अनुभवता वाटे
जीवन सुंदर आहे.

पक्षी, प्राणी सखे सोयरे
सोबत आपल्या आहे
लळा लावता यांना वाटे
जीवन सुंदर आहे

दुःख, वेदना यावरती
फुंकर जरूर घालावी
हसू पहावे यांचे, वाटे
जीवन सुंदर आहे

- अरुण देशपांडे / पुणे
मो.- ९८५०१७७३४२

# जग हे भासे कोडे सुंदर



सूर्य असो वा चंद्र तारका
निसर्ग सृष्टी रंग मनोहर,
वैविध्याचे अथांग दर्शन
जग हे भासे कोडे सुंदर

रुजते फळते फुलते सजते
कुठून येतो बिजास अंकुर,
दूरदूरवर नाही उत्तर
जग हे भासे कोडे सुंदर

प्रणयाची का ओढ लागते ?
सहजीवीही मिलना आतुर,
अविरत चाले असे चिरंतन
जग हे भासे कोडे सुंदर

नसानसातुन रक्त धावते
बाळासाठी माय गरोदर,
चमत्कार हा असे खरोखर
जग हे भासे कोडे सुंदर

ढगातील हे पाउस पाणी
नदीस घेई कवेत सागर,
वाफ तयाची परतुनि जाते
जग हे भासे कोडे सुंदर

जन्मानंतर मृत्यू येतो
निसर्गातला नियम दृगोचर,
जे जे निर्मित ते ते नश्वर
जग हे भासे कोडे सुंदर

निराकार तू निर्विकार तू
चरोचरी या वसे निरंतर,
अगाध लीला तू विश्वंभर
जग हे भासे कोडे सुंदर

**– विजय जोशी / डोंबिवली**
**मो.– ९८९२७५२२४२**

# बहादूर अक्की



5 वर्षीच्या मुलीने आईचा जीव वाचवला. आश्चर्य वाटायला लागलं मला, ही गोष्ट तिच्या वडिलांनी सांगितली.

सकाळची वेळ 8.30 वाजले होते. मी स्वयंपाकघरात ब्रेकफास्ट करत होते. घरातच शाळा असल्यामुळे खिडकीतून कोण आले, कोण गेले हे दिसायचे. मुलांच हसरे चेहरे बघून मन प्रफुल्लित व्हायचं.

अशीच बाहेर बघत काम आवरत होते. तोपर्यंत डॉ. पाटील आकाशाला शाळेत सोडायला आले होते, ते मी बघीतलं. ते मुलीचा हात धरून आत आले. यरवी त्यांची इतकी गडबड असायची बोलायला वेळ मिळत नव्हता. कारण क्लिनिकला जायचं असायचं. त्यांची पळापळ सुरु असायची. आज आत सरळ आमच्या ड्रॉईंग रूममध्ये मॅडम मॅडम करत पोहचले, मी पण आतुनच आलेच डॉक्टर मी बसा म्हटलं आणि हात धुवून बाहेर आले. डॉक्टरकडे बघत आज कसा काय वेळ मिळाला? म्हणत त्याना बसायला सांगत मी खुर्ची वर बसले. तोपर्यंत डोळ्यांत पाणी आलेल बघून जरा आश्यर्य वाटले. जरा घाबरले पण काय झाले असेल म्हणून असा विचार करत होते. तोपर्यंत त्यांनी खाली वाकून नमस्कार केला.

मी म्हटले बसा डॉक्टर काय झाले सांगा. असे काय करता काय झाले तुमच्या डोळ्यांत पाणी आलं. डॉक्टरांचा आवाज भारी झाला होता. गहिवरल्या सुरात ते म्हणाले मॅडम आज आमच्या अक्किने माझ्या आईचे प्राण वाचवले. ती जर घरी नसती तर आज माझी आई जिवंत नसती.

तुमची लाडकी विद्यार्थिनी म्हणून मी आज मुद्दाम तुमच्याशी बोलायच आणि घडला प्रसंग सांगायचा म्हणून अक्किला सोडायला आलो. आज तिला बसने नाही पाठविले, मग खाली बसत म्हणाले काल अक्की घरात आजी बरोबर होती. मी इस्लामपूरला कामासाठी जाणार होतो. मग क्लिनिकमध्ये कोण तरी पाहिजेच असत. मी किंवा माझी डॉक्टर बायको फक्त नर्सवर सोडून चालत नाही. म्हणून मी माझ्या बायकोला म्हणालो, ‘अग तु पण आवर मी तुला जाता जाता क्लिनिकमध्ये सोडतो.’ क्लिनिकमध्ये कुणीतरी पाहिजे मला यायला उशिर होईल. तु आवर लवकर. ती म्हणाली, ‘अहो घरी कुणी नाही आज बाई पण येणार नाही. ती आजारी आहे. आईजवळ कोण नाही म्हणून मी आज घरी रहायचं म्हणत होते. हे आमचे संभाषण अक्की आणि आई ऐकत होते. आई म्हणाली, ‘तुम्ही काही काळजी करू नका. मला काही झाले नाही मी ठिक आहे.’ तु आवर आणि त्याच्याबरोबर जा. मी अक्किला पण बघीन तिला आज सुट्टी आहे ना. बरे झाले मला वेळ जाईल. आई म्हणाली म्हणून आम्ही दोघे बाहेर पडलो.

कदाचीत 12 ते 1 च्या दरम्यान आईचा बी.पी. कमी होत असेल. पण ती सांगणार कुणाला? आता अक्की लहान आणि एकटीच घरात ती पण लहान. तिला काय सांगायचे असे तिला वाटलं. ताप चढत होता चक्कर येत होती. ती स्वत:ला सावरायचा प्रयत्न करत बाथरूमला जाऊन आली. हे सगळं अक्की टी.व्ही. बघत बघत होती.असे आईने सांगितले.

आज सकाळी आम्हाला साधारण आई म्हणते, 'एक दिडच्या दरम्यान परत ती लघविला जाण्यासाठी उठत होती. तिला उठता येईना हे अक्किने पहिले आणि पळत तिच्या जवळ गेली. आई तुला काय पाहिजे? सांग मी आणुन देते. तु उठू नकोस. तुला त्रास होतोय. तु जोप असे म्हणत तिच्या डोक्यावर हात ठेवला आणि म्हणाली अग आई तुला ताप आला आहे. तु उठू नकोस मी पप्पांना फोन करते. तु मला नंबर सांग. आईला धड बोलता येत नव्हतं. पण कसे तरी करून नंबर सांगितला. त्याप्रमाणं अक्की नंबर लावला आणि मला लकीली फोन लागला, मी घरातून फोन म्हणून लगेच घेतला आणि हॅलो आई.. हॅलो आई.. करत होती. तोपर्यंत अक्की म्हणली, 'मी अक्की बोलते पप्पा आईला खुप ताप आलाय तुम्ही लवकर या.. मी पुढे काही बोलणार तोपर्यंत धडाम असा आवाज ऐकू आला. मी हॅलो म्हणालो तोपर्यंत अक्की फोन तसाच ठेवुन आईकडे गेली. हे मला जाणवले. मी जाम घाबरलो. कसे बसे करून गाडी सुरु केली आणि भान हरपून गाडी चालवत होतो. एक दीड तास लागला. मला घरी पोचेपर्यंत मी तडक खोली गाठली बघतो तर अक्की आईचे डोक मांडीजवळ डोक्यावर थंड पाणी लावत होती. जवळच साखरेच पाणी पण ठेवले होती. पण तिला आईच तोडात घालता आले नाही वाटते. मी आईच्या डोक्यावर हात ठेवला. तर तिच डोके तापल होत. ताप खुपच होता मी थर्मामीटर लावला तर ताप 4 ते 5 दाखवल आई बेशुध्दच झाली होती. मी क्लिनिकमध्ये फोन करून नर्स आणि वार्ड बॉयला बोलवून घेतले. आईला उचलून गाडी घेऊन क्लिनिकमध्ये पोचलो. पटकन सलाईन लावून घेतली आणि त्यातून दूसरी औषधं सुरु केल्यावर लगेच फरक दिसून आले. एवढे करूपर्यंत संध्याकाळचे 7 वाजले होते आणि आईची हालचाल जरा सुरु झाल्यासारखे वाटले. पापण्या हालल्या डोळे उघडून बंद केली. ताप थोडा उतरला आणि मग मला जरा हायस वाटले. आम्ही एकमेकांनकडे आनंदाने बघीतलं. मी सुस्कारा सोडला नंतर लगेच मी दुसऱ्या दोन डॉक्टरांना बोलावले.

त्यांनी पण तपासले व म्हणले धोका टळला आहे. आता काळजी करायचं कारण नाही. अगदी योग्य वेळी उपचार झाले त्याचा हा परिणाम असंही ते म्हणाले. मी म्हणलो ह्याच सगळं श्रेय माझ्या अक्किला दिल पाहिजे. डॉक्टर माझ्याकडे बघून म्हणाले ते कसे काय? मग मी त्यांना अक्की आज घरी नसती तर आई आज परत दिसली नसती. आज अक्किला सुट्टी होती. ती घरी होती. आम्ही दोघे बाहेर. तिने वेळेवर फोन केला म्हणून मी वेळेवर घरी पोहचलो. 5 वर्षीच्या चिमुर्डीने हे धाडसाचे

काम केले आहे. डॉक्टर पण थक्क झाले. हे सगळ होईपर्यंत 9 वाजले होते. मला एकदम अक्किची आठवण झाली. मी बायकोला म्हणालो अरे 9 वाजले. अक्की एकटीच घरी तु जा आता मी येथे थांबतो आता धोका पण टळला आहे. आता काळजी नाही. ती म्हणाली मला सोडून याल का? अंधार झालाय. मी हो म्हणालो, नर्सला सुचना देऊन बायकोला सोडायला घरी गेलो.

रस्त्यात अक्कीबद्दल बोलत घरी पोहचलो. मी घरात अक्किला भेटून जावे म्हणत होतो. तोपर्यंत गाडीचा आवाज ऐकून ती पळत बाहेर आली. आई कूट आहे. रडत विचारु लागली. तुम्ही तिला कुठे सोडून आला. रडून तिचे डोळे लाल झाले होते. आम्हा दोघांना काय करावे तेच कळेना. मी तिला उचलून घेतले. अक्की.. अक्की.. तु होतीस म्हणून आज आई वाचली. तुला एवढी माहिती कशी झाली. तु तर आज धाडसाचे काम केले आहेस. धैर्याचे काम केली आहेस. असे म्हणतच आलो. तसाच गाडीत बसलो आणि आईकडे घेऊन गेलो. अक्की आईजवळ जाऊन हळूच आई म्हणत तिच्या डोक्यावर हात ठेवली. आईने डोळे उघडले आणि माझी अक्की म्हणाली. तिला जवळ घेतली. माझ्याकडे बघत होती. म्हणाली, 'किती भाग्यवान आहेस रे.' तुझ्या अक्कीमुळे मी वाचले आहे.

मी हे सगळ मंत्र मुग्ध होऊन ऐकत होते. लगेच मी तिला जवळ घेऊन शाबासकीची थाप देत म्हणाले, 'बहादूर आहे आमची अक्की' ती मोठी होऊन काही तरी वेगळेच करून दाखवेल ह्यात शंका नाही. आम्ही सगळेच म्हणतो ही मुलगी वेगळीच आहे. तिची बहादुरी तिच्या डोळ्यांत दिसतेच. तिच प्रत्येक काम मी बघते खेळताना, वर्गात उत्तर देताना, अगदी सहजतेन काम करते ती. ती सगळी कामे अगदी मन:पूर्वक करते. मग ते कुठलेही असेल. मन:पूर्वक ऐकणे, दुसऱ्याना मदत करणे, लक्ष देणे, स्वतंत्रपणे काम करणे हे गुण मुळातच तिच्याकडे आहेत. ती कुणाचे अनुकरण करत नाही. ही एक चांगली गोष्ट तिच्यामध्ये आहे. ज़्यावेळी माझ्या स्वयंपाकघरात बसुन माझ्याबरोबर गप्पा मारायची त्याच वेळी मी ओळखले होते. आनखी एक गोष्ट नजरेत आली ती तुम्हांला मी सांगते नंतर आता तिला कसे प्रोत्साहन ध्यायचे. ते आपणाला बघायचं तिला फ्री संधी ध्यायचे. ती काय करते. हे बघत रहायचं. आज खरोखर आपण तिच कौतुक करायलाच हवे. त्याशिवाय आता 15 ऑगस्टला सर्व पालकांसमोर ही गोष्ट सांगायच आहे. तुम्ही सर्व पालकांना आणि मुलांनासुध्दा एक धडा शिकण्यासारखा आहे. अशी ही आमची बहादूर अक्की. अक्कीचे वडिल परत एकदा गहिवरले.

**– विजया पाटील / जयसिंगपूर**
**मो.– ९९२२०८५१६९**

# अभंग



पंढरीचा राणा || विठ्ठल सावळा ||
भरला सोहळा || आषाढीचा

वैष्णव जनाचा || जमला सागर ||
भक्तीचे आगर || पंढरीही

कर कटेवरी || ठेवुनीया उभा ||
पंढरीची शोभा || पांडूरंग

झाले आत्मज्ञान || होवूनी लहान ||
भागली तहान || दर्शनाची

झालो धन्य धन्य || तुझ्या पायी येता ||
जगाचा तू त्राता || माय बापा



- जयराम मोरे / सोनगीर
मो.- ७७०९६६९९६७

# || आई ||



देवाची उपमा | साक्षात आईला |
तिच्या सावलीला |
जन्म माझा || १ ||

कशाला हवय | कुठले अत्तर
आईचा पदर | सुगंधीत || २ ||

माझ्या हृदयात | स्थान तुझे आई
तूच विठाबाई | पंढरीची || ३ ||

काळीज तुकडा | आईचा एकटा
पोटाला चिमटा | सदा तिच्या || ४ ||

राबूनी रानात | मावळतो दिस |
काम किती मास | अविरत || ५ ||

जीवनाचं झाड | आहे माझी माय |
मायेची ती साय | सदोदित || ६ ||

हजारो दुःख तू | सहन करते |
काही न बोलते | माझ्यासाठी || ७ ||

प्रेमळ मायेचा | हात पाठीवर |
असेल जोवर | काय भिती || ८ ||

दारामध्ये उभी | माय जागतसे |
वाट पाहतसे | दिनरात || ९ ||

आठवण तुझी | रोजच मनात |
पाऊस डोळ्यात | साठलेला || १० ||




**- राजन पोळ / नवी-मुंबई**
**मो.- ८८७९६०४४०६**

# स्पर्श



गुरूजींनी पंधरा ऑगस्ट निमित्ताने दोन नोटीस काढले. एक शाळा व्यवस्थापन समितीसाठी आणि दुसरे शिक्षकांसाठी. शाळेत दोघेच शिक्षक असल्यामुळे लगेच एका नोटीसबुकवर सहकारी शिक्षकाची सही झाली. पण समितीच्या लोकांच्या सह्या घरोघरी जावून घेणे आवश्यक होते. कागदी घोडे नाचवण्या पुरते तरी काही गोष्टी व्यवस्थापनाचा भाग म्हणून कराव्या लागतात. नाही तर घरोघरी जावून सह्या घेतल्या नंतरही लोकं शाळेत येतातच असे नाही. याबाबत अजून तरी कोलामगुडा जागृत झाला नव्हता. पण सह्या नाही घेतल्या तर"आपूनले सांगला नाय रे गुर्जी. नायतो आपून आला अस्ता की !" म्हणत तक्रार करायला मोकळे असतात. उगाच नावे ठेवायला जागा नको म्हणून रामराव गुरूजींनी अध्यक्षांचे घर गाठले.

"भिम पाटील.... इदेवर्रे." म्हणत गुरूजींनी अध्यक्षांना आवाज दिला.

"तानुंगे गुर्जी?" जेवण आटोपून धोतराला हात पुसत पाटील बाहेर आले. तिखट भाजीचा स्वाद जिभेवर अजूनही नाचत होता.

"तानाय तोद पाटील. आम सई लिपतांडे वरेंग. उद्या पंधरा ऑगस्टचा कार्यक्रम आहे शाळेत. या झेंडा वंदनाला." गुरूजींना एवढीच कामापुरती कोलामी भाषा येत असल्याने बाकीचा वार्तालाप त्यांनी मराठीत सुरु केला.

खूप दिवसांनी गुरूजी घरी आल्यामुळे पाटलांनी खाटेवर ब्लांकिट अंथरलं. गुरूजींना बसायला सांगितलं. स्वतःही गुरूजीं शेजारी बसत अगदी स्पष्ट बोलले.

"आपून घरी रायला तो येते रे गुर्जी. नायतो येईना."

"घरी रायला तो नाही. तुम्ही अध्यक्ष आहात. तुम्हाला उपस्थित राहिलंच पाहिजे."

गुरूजींनी त्यांना जबाबदारीची जाणीव करून दिली.

"सांग, कोठ मारासा सई?"

"इथे करा. ह्या आडव्या रेषेवर." गुरूजींनी अंगुलीनिर्देश केला.

गुरूजींनी आखून दिलेल्या रेषेवर पाटलांनी कसेबसे स्वतःचे नाव लिहीले. तिच त्यांची स्वाक्षरी. भिम पाटील रात्रीच्या शाळेत जाऊन"भि म रा व आत्र म" एवढंच लिहायला आणि वाचायला शिकले. त्यामुळे त्यांना साक्षर म्हणायचे नाहीतर बाकी अक्षरांचा आणि त्यांचा फारसा परिचय झालेला नव्हता. किंवा इतर अक्षरांचा त्यांना काहीही उपयोग नसावा म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले असेल. रात्रीच्या शाळेने इतकेच कोलामगुड्याला नावापूरते का होईना साक्षर केले होते. आता गावागावात, तांड्यात, गुड्यात शाळा झाल्यामुळे नवी पिढी पुस्तकची पुस्तक वाचायला शिकत आहे.

सहीच्या पुढची अक्षरं गिरवायला शिकत आहेत.

"येतोस की रे आपून हरबारीले. आता बी येईलस की !" भिम पाटील हसत हसत नोटीस बुक गुरूजींकडे सोपवत बोलले. त्याचं समाधान गुरूजींच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होतं. ते नकळत उद्गारले,"आत्ता कसं ! या मंग." क्षणभर गुरूजी नोटीस बुकवरची नावे वाचत राहिले.

"बरं ते झाडू पाटील, येला पाटील, लिंगीबाई आपले सदस्य भेटतील का घरी?" गुरूजींनी विचारणा केली.

"असल की आज गरीच. वावरात बी काय काम नाय. पाणीस येते. निंदन नाय, डवरा नाय. तांब की येतीस बोलवू समद्यायले."

"ओ लच्छी इद वर्रे बाई.

लगेच त्यांनी स्वयंपाक खोलीत असलेल्या पोरीला आवाज दिला. ती लाजत लाजत बाहेर आली.

"झाडू, येल्ला, लिंगी न् कुकसात. शेरे बाई. गुर्जीन् कुकसात ईन. सुले..जल्दी वा इने बाई." अध्यक्षांनी सदस्यांची नावे सांगितली. ती आठवीत शिकत होती. नाव शाळेत दाखल असले तरी ती रोज शाळेत जात नाही एवढच. आश्रमशाळेत शिकणारी गावातील मुले हेच करतात. शाळेला भेट द्यायला कोणी येणार असल्याची माहिती मिळाली की त्यांचे शिक्षक येतात गावात. त्यांना शाळेत यायला सांगतात. तेव्हा गावातील मुले शाळेत जातात. बाकी वेळ शेतातील आणि घरातील कामात मदत करतात. काही चार दोन मुलेच नियमित शाळेत जातात.

गावातील शाळेत मुले रोज येतात. शिक्षकांची वाट बघत राहतात. देव, जत्रा आले की मात्र शाळा ओस पडते. काही मुलांना लहान मुले सांभाळावी लागतात. बकऱ्या चारायला जावं लागते. एखाद्या वेळी पावसात गावातील मुलांसोबत मासे, खेकडे पकडायला जावे लागते. अशा रितीने गावातील मुले सुद्धा दांडी मारण्याची संधी शोधत असतातच.

कोणाकोणाला बोलवायचं हे अध्यक्षांनी तिला पुन्हा कोलामी भाषेतूनच सांगितले.

"शाळा व्यवस्थापन समितीचे अजून कोणी सदस्य असतील त्यांनाही आवाज दे." गुरूजीं धावत जाणाऱ्या लच्छीला सांगत होते.

अगदी काही क्षणातच लिंगीबाई, झाडू पाटील अध्यक्षांच्या घरी आले. त्यांनी सह्या केल्या. त्यांनाही गुरूजींनी पंधरा आगस्टच्या कार्यक्रमाविषयी माहिती दिली. उपस्थितांच्या स्वाक्षऱ्या घेऊन गुरूजी जायला निघाले तेव्हा भिम पाटलांनी त्यांना आग्रह केला.

"तांब की ये गुर्जी. चा पेऊन जा की !"

"चहा आता नको. पंधरा ऑगस्टला माझ्याकडूनच घ्या शाळेत." गुरूजी हसत हसत बोलले.

"फक्त चाहास की, मोटा कायतरी कर की गुर्जी." झाडू पाटील डाव्या हातावर उजवा हात आडवा फिरवत म्हणाले.

"ते करना ये. लय चेंगट हाय गुर्जी. आश्रम शाळेत बग की मस्त नुक्तीचा जेवन रायते हरसाल. ते बी पुऱ्या गावाले."

लिंगीबाईने गुरूजींची फिरकी घेतली.

"ती मोठी शाळा. शिवाय आश्रमशाळेला मुलांच्या जेवणासाठी अनुदान मिळते. आपली ईनमिन सव्वीस मुलं. शिवाय जेवनासाठी वेगळं अनुदान येत नाही." गुरूजींनी आपली बाजू मांडली.

"तुले पगार बेट्टे की येवळा मोटा. एकांदी पगार लावला तो का ओते? दोगंबी गुर्जी लावा की जरजरा." भिम पाटलांनी डोळे मिचकावत चिमटा काढला.

"ठिक आहे. तुम्हाला जेवण पाहिजे का माझ्याकडून? एक मेला करू. शाळेच्या निकालाच्या दिवशी ! पाऊसही राहत नाही." गुरूजी त्यांचे समाधानासाठी बोलले.

"एक कट्टा तांदूर रायला की गे गाल, समद्या गावले पुरते." झाडू पाटील तांदूळ किती लागेल यावर लगेच चर्चा करायला लागले. पहाता पहाता जेवणाच्या नियोजनालाच सुरवात झाली म्हणा की,

"नुक्ती किती लागेल?" गुरूजींचा प्रश्न..

"पास किलो पिट रायला तो लगीत ओते. तू साकूर, तेल आणून दे. आमी बगतो की रे गुर्जी समदा." अध्यक्षांनी गुर्जींच्या खांद्यावर हात ठेवत धीर दिला. तोपर्यंत मुत्तेबाई, भिम पाटलाची बायको स्टिलच्या कपातून चहा घेऊन आली. काळा चहा गाळलेला नव्हता. कपाला पत्ती लागलेली होती. गुरूजींनी चहा फुंकून प्यायला सुरवात केली. गरम कप ओठांना चटके देत होता. सर्वांनी चहा संपवला तरी गुरूजींच्या फुंका मारणं चालूच होतं. चहा पिऊन झाल्यानंतर भिम पाटलांनी खिशातून झिल्ली काढली. त्यातील खर्रा गुरूजीं समोर धरला. त्यांनी तो नाकारला. झाडू पाटलांनी पाचही बोटे खर्ऱ्याच्या पन्नीत घातले. खर्रा तोंडात भरला आणि तळहाताला लागलेली कणं दोन्ही तळ हात एकमेकांना घासत त्यातील पदार्थ झटकून घेतला. लिंगीबाईनेही खर्ऱ्याचा बकना तोंडात भरला. तोच गुरूजींना शिंका यायला सुरवात झाली. ते तंबाखूजन्य पदार्थाचे कण हवेतून गुरूजींच्या नाकात घुसले असणार हे निश्चित होतं.

"खा की रे गुर्जी. तू नोको चारू लगेतो." झाडू पाटलाच्या खोचक बोलण्याने गुरूजी जरा वरमलेच. ते तंबाखूचे दुष्परिणाम सांगायला लागले.

"हे बघा. तंबाखू खाणं आरोग्याला धोकादायक आहे. कॅन्सरसारख्या बिमाऱ्या होतात."

"काय बी होईनाये, सामदा लबाड आये. कोणाले कॅन्सर झाला गावात? कोनालेच नाई. का रे जराजरा मेला तो का गेऊन जाणार आये माणूस?" झाडू पाटलांनी आपले मत ठामपणे मांडले.

"तुम्हीही खाऊ नका आणि  मुलांनाही खायला देऊ नका. आम्ही शाळेत मुलांना खावू नका म्हणून सांगतो. मुले शाळेत खात नाही पण घरी मात्र खातात. हे चांगले नाही." उपदेश करत काढता पाय घेतला गुरूजींनी. निघायला लागले. तथापि,

"या बरं उद्या शाळेत, सर्वांनी !" हे आवर्जून सांगायला विसरले नाही. उरलेल्या सह्यांसाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या घराकडे गेले. त्यांच्या सह्या घेतल्या. गावातील काही प्रतिष्ठितांच्या सह्या घेतल्या आणि शाळेत गेले. बाकीचे सदस्य शाळेतच भेटले. एक शिक्षक, दोन विद्यार्थी प्रतिनिधी, एक अंगणवाडी ताई, दुसरी खिचडीवाली बाई. तोपर्यंत लालू गुरूजींनी मुलांच्या मदतीने तोरण तयार करून ठेवले होते. मैदान सफाई झाली. रामराव गुरूजींनी झेंड्याच्या ओट्याला चुना मारला. राष्ट्रगीत बँडच्या ठेक्यात बसवले. सर्व तयारी झाली एकदाची.

दुसऱ्या दिवशी झेंडावंदन पार पडले. नेहमीप्रमाणे दोन सदस्य गैरहजर होतेच. गावातील महिला पुरुष जेमतेमच होते. सर्वांना पोह्यांचा प्रसाद, चाकलेट, बिस्किट वाटप केले गेले. बाकी गावकरी निघून गेले. खिचडीवाल्या बाईने चहा बनवला. सर्व सदस्यांना दिला.

बसल्या बसल्या झाडू पाटलांनी पुन्हा जेवनाचा विषय काढला.

"गुर्जी, आस्रमसाळेवानी जेवाय देणार हाय. समद्या गावाले."

"देल्यावानीच आहे." अंगणवाडी ताईने नाक मुरडलं. गुरूजी एवढं महान कार्य करतील असे तिला स्वप्नातही वाटले नव्हते.

"देईना तं काय ये माय. मयापाशी बोल्ले की गुरूजी. व्हय की गुरूजी?" खिचडीवाल्या बाईने चहा देतांना गोड गोड बोलली.

"शाळेच्या शेवटच्या दिवशी करूया जेवण. हो की नाही सर?" रामराव गुरूजींनी लालू गुरूजींना चाचपलं.

"जमते. भात, भाजी, चपात्या आणि नुक्ती !" लालू गुरूजी हो भरले.

"सयपाक कोण करणार? मच्छी गुड्यातील लोकं दुसऱ्या कोणाच्याच हातचं खात नाहीत. त्यांचं कसं करायचं?"

रामराव गुरूजींनी शंका उपस्थित केली.

"त्यांची मुलं शाळेतील खिचडी खात नाही तर ते लोकं एकत्र जेवणार कसे?" लालू गुरूजींनी वास्तव कथन केले.

खरं तर हे स्वातंत्र्याच्या सत्तरी नंतरचं हे जळजळीत वास्तव होतं. कोलामगुड्यात चाळीसएक घरं कोलामांची, पाच घरं हटकरांची, दहा घरं मच्छी लोकांची, अंगणवाडी ताईचे एक घर बौद्ध समाजाचे, एक घर बंजाराचे. त्यात पंधरा  कोलाम, तीन हटकरांची आणि सात मच्छीजमातीची, एक बौद्ध समाजाचे असे एकूण सव्वीस विद्यार्थी.

सर्व शालेय पोषण आहाराचे लाभार्थी. पण खिचडीवाल्या बाई हटकर जमातीच्या असल्याने मच्छी गुड्यातील विद्यार्थी तिने शिजवलेली खिचडी खात नव्हते. बाकीचे

विद्यार्थी मात्र खात होते. यांना म्हणे दुसऱ्यांच्या हातचं पाणी सुद्धा जमत नाही, तसा कुळाचार आहे. हा कुळाचार मोडायला कोणीही तयार नाहीत.

एकदा हा मुद्दा शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी शाळेत व्हिजीट दिल्यानंतर उपस्थित केला.

"ते मुलं खिचडी खात नाही मग तुम्ही काय व्यवस्था केली?"

"मी बरेचदा त्यांना सांगितलं सर, पण ते ऐकायला तयार नाहीत. त्यांना स्पर्शाने विटाळ होत नाही. स्पृस्यास्पृष्य असं काही नसते हे बाबासाहेबांच्या विचारांतून पटवून दिलं. एकदा शाळेत बाबासाहेबांचा सिनेमासुद्धा दाखवला सर." साहेबांच्या प्रश्नाला रामराव गुरूजींनी उदाहरणासहित स्पष्टीकरण दिलं.

"त्याच्याने काही फरक पडला का?"

"नाही, जाती जातीतील ही अस्पृष्यता निर्मुलन व्हायला बराच काळ लागेल सर."

"किती काळ लागेल?...तेवढा वेळ आपण वाट पाहणार आहात का? काय लालू सर?"

"तुम्ही आमचे मार्गदर्शक आहात सर. आपण सांगा आणखी काय केलं पाहिजे?" लालू सरांनी मार्गदर्शनाची अपेक्षा केली.

"मला काय विचारता? त्यांना खिचडीपासून वंचित ठेवायचे का? त्यासाठी तुम्ही काय प्रयत्न करता?"

हे साहेब लोकं नुसतेच प्रश्न विचारायच्या कामाचे का? यांनी काही उपाय सुचवायला नको का? प्रयत्न काय शिक्षकांनीच करायचे? असे मनात म्हणत ते उत्तरले.

"सर, त्यांचे वाट्याला येणारे तांदूळ आम्ही घरी शिजवायला देतो."

"यामुळे काय साध्य होणार? त्यांच्यातील भेद संपेल काय? तसं जमत नाही. त्यांनी शाळेतच खिचडी खायला पाहिजे." अधिकाऱ्यांनी अधिकारवाणीनं बजावलं.

"सर, यावर एक उपाय आम्ही ठरवला. पटसंख्या सव्वीस आहे. त्यामुळे दुसरी एक मदतनिस ठेवता येते. एक मच्छी गुड्यातील बाई तयार आहे खिचडी करायला. लवकरच ठराव घेणार आहोत."

रामराव गुरूजींनी सांगितलं. साहेब व्हिजीट लिहून निघून गेले. पण त्यांनी उपाय सुचविला नाही. शेवटी ज्याचं त्यालाच निस्तरायचं असतं. पण ही काय घरगुती समस्या नव्हती. शाळेच्या अधिकाऱ्यांनी काहीतरी उपाय सुचवायला हवा होता. एक-दोनदा रामराव गुरूजी खिचडी मदतनिस कार्य करण्यासाठी तयार असलेल्या पारूबाईच्या घरी जेवले खरे. पण अंतर ठेवून तिचा नवरा रामू एका टोकाला तर गुरूजी दुसऱ्या टोकाला. एकदा तर"तू आंदी जेवरे गुर्जी. मंग मी जेवतो." म्हणत गुरूजींचे जेवण आधीच आटोपून घेतले.

ही विषमता दूर करायला बराच प्रयत्न करावा लागणार होता हे खरे.

एक मात्र विशेष बाब. त्यांना तेलात तळलेले पदार्थ कोणाच्याही हातचे जमतात.

फक्त पाण्यात शिजलेले जमत नाहीत. पाणी भरतांना हापस्याजवळ इतर कोणीही असायला नको. जेवतांना त्यांचे जवळ त्यांच्याच जातीची लोकं चालतात. बाकीची वर्ज्य. दस्तुरखुद्द ब्राम्हण देखील.

"नाहीतर मागच्या वेळे सारखं व्हायला नको. नुसते केळे खायला दिली तरी बोकोळाची आई धमकी देत शाळेत आली होती. ये गुर्जी आपल्या लेक्राले असा काई खावाले देवासा नाई." त्या दिवशी घडलेला प्रसंग रामराव गुरूजींच्या डोळ्यासमोर नाचायला लागला.

खिचडी सोबत पुरक आहार म्हणून अंडे, बिस्किट किंवा केळे वाटप करणे आवश्यक होते. बरेचदा बिस्किट वाटप केल्या जात होते. त्याला कारणही तसेच होते. गावातील किराणा दुकानात तेच उपलब्ध असायचे. शिवाय खिचडीवाल्या बाईचे त्या दुकानात उधारी खाते. त्यामुळे बरेचदा बिस्किटेच वाटप करण्यात येत होते.

एक दिवस रामराव गुरूजी जरा वैतागलेच."किती वेळ सांगायचं तुम्हाला सुलाबाई, कधीतरी केळे, अंडेही वाटप करत जा म्हणून. पण तुम्ही ऐकाल तर शपथ !"

"सुलाबाई, अंडे ही स्वस्तच आहेत. केळेही बिस्किटच्याच भावात भेटतात. देत जा पोरांना. पुण्य लागते." लालू गुरूजींचा हा आग्रहाचा सूर तिला पटला नाही. तिने नेहमीप्रमाणे जरा खडसावतच गाऱ्हाणी मांडली.

"तुमी मास्तरं लय पुण्य करालाव ये. पुण्य कराय काय भेटालय इथे. एवढूशा लेक्रात. रोजीबी निंगना. कयाचे आंडे नं केळे देयाचे.  बिस्किट द्यालावच की."

"तुम्हाला परवडत नाही हे कळते आम्हाला. पण शासन सांगते मिरची, लसूण, टमाटर, मसाले टाका. ते पण तुम्ही देत नाही. हप्त्याला एकदा पुरक आहार द्यायचा असतो पण तुम्ही पंधरा दिवसाला देता. आम्ही म्हणतो का काही?" लालू गुरूजींनी उत्तर दिलं पण ती ऐकेल तर शपथ.

"कळलं का तुम्हाला. सर्वच एका वेळी दे म्हणत नाही आम्ही. कधी बिस्किट द्या, कधी अंडे तर कधी केळे. पैसे सारखेच लागतात. पाच रूपयाला बिस्किट, पाच रूपयाला अंडं केळे तर त्याही पेक्षा स्वस्त येतील. रविवारला बाजारातून आणून ठेवा. सोमवारी द्या, सव्वीस मुलांना सव्वीस केळं. एक दोन जास्तीची आणा. आम्हाला द्याल." म्हणतांना रामराव गुरूजी लालू गुरूजींकडे डोळे मिचकावत हसले. तशी खिचडीवाल्या बाई चिडल्या.

"तुम्हाला का भेटना व्हय खायला. तुम्हाला देईना एकबी."

"राहीलं. नका देऊ आम्हाला. पण लेकरांना तरी द्या." लालू गुरूजींनी माघार घेतली. तेवढ्यात अंगणवाडी ताई आकाशातून देवदूत अवतराव्या तशा अवतरल्या. त्यांनी जणू वरदानच दिलं.

"सारखच पडालय की सुलाबाई. आण की केळी. का व्हालय?" लगेच सुलाबाई हो भरल्या." आईतवारी बापूचा बाप जाणाराये बाजारला. त्यायला सांगताव केळं

आणाय. गुर्जी लयच किरकिर लावालेत."

"आम्ही किरकिर लावत नाही, त्या दिवशी केंद्र प्रमुखांनी तुम्हाला बिस्किट वाटप करतांना बघीतलं. त्यांनी मुलांना विचारलं तेव्हा मुलेच नाही का बोलली. रोजी बिस्कूटच देते म्हणून. तेव्हा तेच बोलले ना वेगवेगळा पुरक आहार देत जा म्हणून. व्हिजीटवर तसं लिहिलं सुद्धा."

"त्या बुवाला काय जातय सांगाय. ईर चाल्लाय इथं हाताला खळकू लागना झालाय. सासा मैनं पगारी भेटना झालीय. तेला दे मनाव सामान घेयाला पैसं, नस्ता त्याला कर मनाव खिचडी." बोलतांना सुलाबाई तापलेल्या भगोन्यातील खिचडी सारखी चटाचट लासत होती.

"ते खिचडी करतय. मंग केंद्र प्रमुख तू होणार हाईस व्हय." अंगणवाडी ताईच्या या बोलण्यावर दोन्हीही गुरूजी हसले.

"हसाय काय झालं? नस्ता तुमी करा की खिचडी." सुलाबाई गुरूजींवर भडकली.

"गुरूजी खिचडी बनवते. अन् तू शिकवते का पोरायले?" अंगणवाडी ताई चिडल्या.

"शिकीना तं काय ये?" ती तोऱ्यात बोलली.

"जा बरं जा. शिकवून दाखव. सोताचं नाव लिवाय येईना पर गोष्टी डोंगरावरच्या करायली. ज्याचं काम त्याला हाय सुलाबाई. आसं येड्यावानी बोलू नाय माणसानं." अंगणवाडी ताईच्या बोलण्याने ती नरम झाली अगदी मऊसूद लोण्यासारखी. तोपर्यंत मधली सुट्टी संपून पोरं शिकण्यासाठी वर्गात गेली आणि शिकवण्यासाठी गुरूजी.

पंधरा दिवसानंतरचा सोमवार. दुपारची सुट्टी झाली. पोरांनी खिचडी खाल्ली. आज खिचडीवाल्या बाईने केळे आणलेली. सर्व मुले रांगेत बसली. आज बावीसच मुले शाळेत आलेली. सुलाबाई एकेकांना एकेक केळ वाटप करत होत्या. सर्वांनी केळे घेतली. मच्छी गुड्यातील भिमा आणि येरोळाने घेतली. पण बोकोळा घेत नव्हता. रामराव गुरूजींनी त्याला केळ घेण्यासाठी दम दिला." घे नबे. केळच तर आहे. काय होणार आहे. शिवाय चांगली आहेत केळं."

गुरूजी रागवल्यामुळे बोकोळाने केळ घेतली खरी. परंतु त्याच्या मनात मात्र चलबिचल चालली होती. सर्व मुले केळी घेऊन मैदानावर पांगली. सुलाबाईने उरलेल्या चार केळींपैकी गुरूजींना आणून दिल्या परंतु रामराव गुरूजींनी तो प्रस्ताव नकारला.

"नको मला."

"घ्या की ये गुर्जी. रागावला होय?" लालू गुरूजींकडे केळ देत खिचडीवाल्या बाई बोलल्या. लालू गुरूजींनीही नकार दिला. तेवढ्यात अंगणवाडी ताई टपकल्याच." घ्या की गुर्जी, एवढ्या प्रेमानं द्यायली. खा की."

"घे ये ताई तू दे गुर्जीला. लय भाव खालेत. एक तुलाबी घे."

तिने तिन केळी अंगणवाडी ताईकडे दिल्या. त्यांनी त्या केळी दोन गुरूजींना आणि

एक स्वतः घेतले.

“सुलाबाई तू बी घे की ये.” केळे सोलतांना अंगणवाडी ताई म्हणाल्या. सर्वांनीच केळे खाल्ले. केळे खाऊन साऱ्यांची तोंड गोड झाली होती.”आता पुढच्या वेळी आंडे आण सुलाबाई.” केळीचे सालपट फेकतांना अंगणवाडीताई बोलल्या. तसे गुरूजी खळखळून हसले.

शेवटी मुलांना पुरक आहारात केळे मिळाले. याचे समाधान व्यक्त करत रामराव गुरूजींनी पोषण आहार नोंदवहीत नोंद केली.

दुसऱ्या दिवशी शाळेचा दरवाजाचा खोलताच सर्व मुले आत गेली. बेल वाजवली. साफसफाईला लागली. गुरूजींनी हजेरी पुस्तकांत स्वाक्षरी केली आणि बोकोळाची माय शाळेत धडकली. तिने रागारागात गुरूजीला जाब विचारला.

“का देलास गुर्जी तू आमच्या पोराले कावाले.”

“काहीच नाही..केळे आणि खिचडी.”

“कोण सांगला तुले, ते नाई मनत ओता तरी जबरदस्तीनं देवाले?”

“केळेच तर दिले. मग काय झालं एवढं ओरडायला.”

“याच्या पुळा देवाचा नाय. माज्या बोकोळाले काय ओवू तर दे. मगा पाय तुले दावतो की मजा.”

“काय झालं कलू बाई? सगळ्याच पोरांना दिली केळं. त्यात काय झालं?”लालू गुरूजींनी मध्यस्ती केली.

“तू बी का, समदे पोरं कावू दे. पर आमचे पोराले देवासा नाई.” कलूबाईने हाग्यादम भरला. गलका ऐकून आजूबाजूचे लोकं जमा झाले. पोलिसपाटलांनी दोघांचंही म्हणणं ऐकून घेतलं.

“आमचे तोडसामले, जैनूलूले जमते रे पोलिस पाटील, पर ये गुंडेलूले काय की जमत नाई केळ. त्यायसे देवात केळ नाय. ते कायकी कात बी नाय. तेले सिवत बी नाय.” येलूबाई जैनेलू इतिहास सांगायला लागली.

“आमचे लोकायले जमना ये. आमचे बोकोळाचा बाप. मालकाचे गराचा कचरा फेकला. तेचे टोपल्यात काय की केळीचा साल ओती. ते निस्ता डोस्कीवर गेतला तरी मैनाबर बेमार पळून रायला. लय देव केले. पर मांगून बरा जाला. आता येले काय ओवू दे. आपून गुर्जीले सोडना की,” कलूबाईने घडलेली हकीकत बया केली. गुरूजींच्या मनात धस्स झालं तरी उसनं अवसान आणून रामराव गुरूजींनी प्रत्युत्तर दिलं.

“वाट्टेल ती शिक्षा करा. मी भोगायला तयार आहे.”

“तुया पोरानं केळी खाल्ली की?” पाटलांनी तिला विचारलं,

“बायेर येऊन येरोळाले देल्ली काना. काल्ली नाय, पर आती दरलीस की.” ती उत्तरली.

"मंग कायबी होईना."पाटील मिस्किल हसले.

"काय जाला तो बग की गुर्जीला सोळना मी."

तळतळाट निघाली ती.

"काही झालं तर मी दवाखान्यात घेऊन जाईन, काय वाट्टेल तो खर्च येऊ दे. मी देईन." रामराव गुरूजी निर्धाराने बोलले. तोपर्यंत सारी गर्दी पांगली.

गुरूजी, अंगणवाडी ताई, खिचडीवाल्या बाई, पोलिसपाटील तेवढे राहिले.

"काई होईना गुरूजीं, उगं टेंशन घेऊ नका." पोलिसपाटलांनी धीर दिला.

"तरी गुर्जीला सांगत होताव. पर आयकनाच झाल्ते. आता खा मनाव केळी" खिचडीवाल्या बाई तिरसट बोलत होत्या.

"खर आहे तुमचं म्हणणं. केळे आणायला सांगितले नसते तर हे महाभारत घडलच नसतं. जाऊद्या सुलाबाई बिस्किटेच वाटत जा, अंडे आणले तर उद्या माळकरी लोक माझ्या नावाने परिषद भरवायचे. केळे प्रकरण आधीच माहीत असतं तर आणायलाच लावले नसते किंवा बोकोळाला जबरदस्तीनं घ्यायला तरी लावले नसते." तथापि फळं सुद्धा एखाद्या जाती-जमातीला, कुटुंबाला, घराण्याला वर्ज्य असतात याचा शोध नव्यानेच गुरूजींना लागला होता.

दोन दिवस बोकोळा शाळेत आला नाही पण तिसऱ्या दिवशी पासून तो येत होता. गुरूजींनी त्याला ' हे बघ तुला काहीही होणार नाही.' म्हणत धीर दिला होता.

पुढचे चार पाच दिवस गुरूजींचे चित्त थाऱ्यावर नव्हते. बोकोळाला काही झालं तर नसेल? होणार तर नसेल? याची सारखी रुखरुख त्यांना लागली होती. पंधरा दिवसानंतरही बोकोळा ठणठणीत असल्याने गुरूजींना हायसं वाटलं, त्यांच्या जीवात जिव आला.

गुरूजींनी ह्या घडलेल्या प्रसंगाची पुन्हा एकदा आठवण करून दिली.

"बाहेर गेल्यावर ते का उपाशीच रायते की? ते बुच्च्या बेमार होता. सरकारी दवाखान्यात आठ रोज भर्ती होता. तेव्हा तेथलाच खाना खाल्ला की!" अंगणवाडी ताईने सत्य उजेडात आणलं.

"पर गावात आल्यावर पंचायत बसली. देव केला, बकरा देला की. तवा कोटी त्येले गावात गेतला. तू बकऱ्याचा पैसा देत असल तो आपून बी जेवते." रस्त्याने जाणाऱ्या येलूबाईने मध्येच नाक खुपसलं. तेव्हा अंगणवाडी ताईने प्रत्युत्तर दिले." मी कयाला देऊ? माझं काय लगिन हाय होय. गुरूजी देत बसल."

"तुजा लगन नाय,तो काय गुर्जीचा लगन हाय का? तेच्यापेक्सा त्येसा सिदा त्येले देवासा की. आपण आपला इकडे बनवासा." भिम पाटलांनी मधला मार्ग काढला. त्याला अंगणवाडी ताई आणि एक दोन लोकांनीही दुजोरा दिला.

"पण ते सामुहीक भोजन कसे होणार? काही झालं तरी जेवण एकत्रित झाले पाहिजे. त्यामुळे खर्चही कमी येईल.,." रामराव गुरूजींनी अट घातली." खर्साले

का भेवते रे गुर्जी. एकस बार देणार हाय की जेवण, रोजीरोजी देणार हाय का?" भिमपाटील जरा प्रेशर टाकून बोलले.

"त्यापेक्षा असं करु सर. मच्छी गुड्यातील लोकांना स्वयंपाक करायला सांगू. त्यांच्या हातचे जेवण सगळ्यांनाच जमते." लालू गुरूजी लाखात एक बोलले.

""बढीया ! त्यांना स्वयंपाक करायला सांगायचं."हा मार्ग सर्वांना पसंत पडला. आणि शंभर टक्के जेवण करायचे ठरले. मिटींग पांगली.

पुढे हा जेवणाचा विषय, सतरा सप्टेंबर "मराठवाडा मुक्ती संग्राम दिन", सव्वीस जानेवारी" गणराज्य दिनाच्या" दिवशीही चर्चीला गेला. जैत्या सव्वीस जानेवारीला गुरूजींची मजा घ्यायला लागला." आजच देला तो का ओते. नायतो, देतो देतो मनशीन ना. पार फुसकवशीन तुजा काय बरोसा नाय रे गुर्जी."

"तसं होत नाही रे जैतू. एवढ्याशा साठी माघार घेणार नाही सर. तू जा एक मेची वाट बघत बस." लालू गुरूजींनी जैत्याला गप्प बसवलं.

एप्रिल महिण्यात मुलांच्या परीक्षा आटोपल्या. निकाल तयार झाले. शाळेची बऱ्या पैकी कामे आटोटली. दोन्हीही शिक्षक निवांत झाले.. एक मेला निकाल घोषित करायचा आणि जेवणाचाही प्रश्न निकाली काढायचा म्हणून त्यांनी अध्यक्ष, अंगणवाडी ताई, दोन शिक्षक, पोलिस पाटील यांची मिटिंग घेतली.

जेवणासाठी लागणारा भाजीपाला, मसाला आणि नुक्तीसाठी लागणारा खर्च रामराव गुरूजी करायला तयार होते. तांदूळ शाळेतीलच होते. ते साफ करायला सांगीतले. दोनतीन बायांनी दिड कट्टा तांदूळ साफ केला. भिमराव आणि सिन्नोळा स्वयंपाक करायला तयार झाले. डाळ, भात, भाजी आणि नुक्ती असा जेवणाचा बेत ठरला.

अखेर महाराष्ट्र दिनाचा दिवस उजाडला.

ध्वजारोहण पार पडले. विद्यार्थ्यांचा निकाल घोषित करण्यात आला. एक तासात सगळा शालेय कार्यक्रम आटोपता घेतला. नंतर जेवणाच्या तयारीला लागले. कोलामगुड्यातील स्वयंपाकासाठी लागणारे भगोने आणि इतर साहित्य आणण्यात आले. भिमराव, सिन्नोळा आले. त्यांनी माती खोदून चूल तयार केली. जाळ पेटवला. तोपर्यंत दोन्ही शिक्षकांनी दोन गाड्यांवर दोन माणसं घेऊन शेजारच्या गावातील बाजारातून भाजीपाला, मसाले, नुक्ती आणि इतर सामान आणले आणले. काही बायका पोरींनी लसूण छिलले. अद्रक, मसाल्याची पेस्ट तयार केली. शाळेत आनंदाचे वातावरण तयार झाले. एखाद्याचे लग्न, बारसे किंवा गावातील देवाचे जेवण आहे असेच वाटत होते. कोलामगुड्याच्या बायांनी चपात्या बनवल्या. काही चपात्या मच्छी गुड्यातील बायांनी. गाव सहकार्य करत होते. पोरांनी आलू, वांगे, टमाटर, मिरची, सांबार, कोबी, पालक कापून दिले.

भात शिजत आला. डाळीचे अंदाण आले. तुरीची डाळ उकळू लागली. भाताचे

भगोने उतरले की भाजीला फोडणी घालायचे ठरले होते. स्वयंपाक वगैरे मच्छी लोक करत असल्यामुळे इतरांना तेवढे काही टेंशन नव्हते. ते बघत होते. बाहेरून पाठींबा दिल्यासारखे बाहेरील कामांना सहकार्य करत होते. स्वयंपाकासाठी लागणारे पाणी वगैरे मच्छी गुड्यातील बायका, पोरी पुरवत होत्या.

भाताचे भगोने उतरले. भाजी फोडणी घालण्यासाठी भाजीचे भगोने चुलीवर ठेवले गेले. भाजीपाला, मसाले सगळे तैयार ठेवण्यात आले. अध्यक्ष, अंगणवाडी ताई, खिचडीवाल्या बाई खुर्च्या लावून शाळेच्या आवारातील झाडाखाली बसले होते. दोघेही शिक्षक सुद्धा इकडे तिकडे फिरून व्यवस्था पाहत होते. भिमरावने फोडणी घातली. कांदे लसूण पेस्ट,  मिरची, खोबरे, मसाले टाकले. मसाल्यांचा सुगंध परिसरात दरवळला.

“एक नंबर जमली भाजी भिमराव, आज तुझ्या हातची भाजी खायला मजा येणार!” म्हणत लालू गुरुजी चुल्ह्यापाशी आले. भिमराव मसाला जळू नये म्हणून जाळ कमी करण्यासाठी खाली वाकला. गुरुजींनी मसाला फिरवायची लोखंडी दांडी हातात घेतली आणि मसाला फिरवायला लागले. सिन्नोळाने भगोन्यात वांगे, आलूच्या फोडी घातल्या. रामराव गुरुजींनी हा प्रकार बघताच कपाळाला हात लावला.

“आता गेलं वाया ! या माणसाला मधेच शहाणपणा करायला कोणी सांगितलं असणार? कशाला मधे मधे मी आणि ढेकलाचं बी करायला पाहिजे. आता काय होणार कुणास ठाऊक?” त्यांनी लालू गुरुजींना आवाज दिला. हात हलवून बोलावलं. लहान लेकरा सारखे ते धावतच जवळ आले.” गुरुजी तुम्ही कशाला तिथे गेले? सगळं बिघडलं आता !”

“काय झालं सर?”

“काय झालं म्हणून काय विचारता? ते स्वयंपाक करतांना तुम्ही कशाला गेले ती मसाला फिरवायची काठी हलवायला? आता जर त्यांनी ती भाजी  खाल्ली नाही तर?”

घडलेला प्रकार लक्षात आल्यानंतर गुरुजी खजिल झाले. अपराधीपणाची भावना त्यांच्या मनात दाटून आली.

“सारी सर, माझ्या लक्षातच आलं नाही. मी सहज गेलो आणि भाजी फिरवायला लागलो.” ते दोघेही कोणाला लक्षात येऊ नये अशा रितीने बोलत असतांनाच अंगणवाडी ताई दबक्या आवाजात रागावल्याच.” तुम्ही  कयाला गेलताव  शानपना करायला. गेले आपला मसाला हालवायला.”

तिघांनीही स्वयंपाकाकडे कटाक्ष टाकला. सिन्नोळा आणि भिमराव निर्विकार चेहऱ्याने स्वयंपाक करण्यात गुंतले होते. काहीच घडलं नाही असं त्यांनी भासवत तर नसणार की लालू गुरुजींनी जे काही केलं ते दोघांनाही दिसलं नसणार?

“त्यायले कायबी माहित नाही आसं मला वाटालय.” अंगणवाडी ताईंनी तर्क लावला.

"मला तसं नाही वाटत. ते ही भाजी खाणारच नाही. एवढा प्रकार ते खपवून घेणार असं मला नाही वाटत." रामराव गुरूजी विचारांती म्हणाले.

"बरं जाऊ द्या. जे होईल ते बघू." लालू गुरूजी निश्चयानं बोलले. आता काय करणार होते. घटना घडून गेली होती. बंदूकीतून सुटलेली गोळी परत घेता येत नाही तसं. बोललेला अपशब्द माघारी घेता येत नाही. अगदी तसंच झालं होतं. लालू गुरूजींनी भगोन्यातील भाजी फिरवून स्पर्श केला होता. स्पर्शाने भाजी बाटली होती. बोलणे होताच. तिघेही तिथून पांगले. अगदी काही वेळात भाजी शिजली. वरण फोडणी घालून शिजवण्यात आले.

भिमरावने चुलीतील जाळ कमी केला. रामराव गुरूजींना आवाज दिला.

"ये गुर्जी, इटरा."

"का म्हणता भिमा, झाला का स्वयंपाक?"

"जाला की !"

"बढीया ! मग चला जेवणाची पगंत वाढा, तयारी करा."

"आमाले दुसरी भाजी साटी दार दे. नायतो कायतरी दे." सिन्नोळा म्हणाला.

"का बरं? ही भाजी पुरणार नाही सगळ्यांना ?" गुरूजींचा प्रश्न.

"पुरते की,पर ते आमी काईना !" भिमरावने स्पष्ट नकार दर्शविला.

"तुम्ही बनवलेली भाजी, तुम्हीच खाणार नाही म्हणजे काय?"

"पर ते लालू गुर्जी मदी हात लावला की !"

"केव्हा? कुठे?"

रामराव गुरूजींनी साडसूदपणाचा आव आणला.

"तवा, फिरोतानी आमी बगलाव की. आमच्या बाया बी बगल्या. आमी खाईना रे ते बाजी. आमचा आमाला दुसरा दे. नस्ता आमी येईना जेवाला. तुमचा तुमी जेवा नसता कयबी करा." म्हणत भिमराव घराकडे जायला वळला. त्याचे पाठोपाठ सिन्नोळाने रस्ता धरला. मालकाच्या मागोमाग मुकाट चाललेल्या मेंढरासारखं.

अंगणवाडी ताई, भिमपाटलांनी, लालू आणि रामराव गुरूजींनी खूप प्रयत्न केले पण त्यांनी ऐकायला तयार झाले नाही. त्यांच्या बायांनीही या बाबीचा कडकडून विरोध केला.

शेवटी रामराव गुरूजींनी गाडी काढली. बाजारातून पुन्हा चार किलो वांगे, एक किलो आलू, एक किलो कोबी, टमाटर, मिरची, साबार सारं सारं आणून दिलं. तेव्हा कुठे वातावरण शांत झालं. ते शिजवण्यात आलं. शिजल्यानंतर पहिल्यांदा मच्छी गुड्यातील लोकांची पंगत बसली. त्या सगळ्यांना मच्छी गुड्यातील मुला मुलींनी जेवण वाढले. नंतर मात्र कोलामगुडा, हटकर गुड्यातील सर्व लोकांनी जेवण केले. जेवण झाल्यानंतर भाजी भरपूर उरली होती. ती कोलामगुड्यातील लोकांना वाटप करण्यात आली. लोकं पोटावरून हात फिरवत समाधानाची ढेकर देत होते.

"गुर्जींना जेवण देला बा !"

"मस्तो जाला रे गुर्जी जेवण !"

"पयल्यांदी गावात तू जेवन देल्ला. तुजा नाव राईल की !"

"जरशाना ते गुर्जींना काम बिगळवला. नायतो एवळा बाजी उरणार नोयता."भिम पाटलांनी नाराजी व्यक्त केली.

रामराव गुरूजींना ही सामाजिक विषमता छळत होती. स्पर्शाने होणारा विंटाळ यातून हा समाज केव्हा मुक्त होईल? याचा विचार करत गुरूजीं घराकडे निघाले.

**- रोशनकुमार पिलेवान / पिंपळगाव भोसले**
**मो.- ७७९८८०९८१६**

---

● **'व्यक्तिमत्व विकास'** हे नियतकालिक मुद्रक, मालक, संपादक आणि प्रकाशक मंगेश विठ्ठल कोळी यांनी कवितासागर प्रिंटींग सर्व्हिसेस, जयसिंगपूर येथे छापून 'व्यक्तिमत्व विकास' कार्यालय, सुदर्शन, प्लॉट १६, पद्मावती सोसायटी, बायपास रोड, नांदणी नाक्याजवळ, जयसिंगपूर - ४१६१०१, तालुका - शिरोळ, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र, भारत येथून प्रसिद्ध केले.

● फोन - ०२३२२ - २२५५०० भ्रमणध्वनी - ०९०२८७१३८२०

● ईमेल - mangeshvkoli@gmail.com

● संपादक - श्री. मंगेश विठ्ठल कोळी.

● कार्यकारी संपादक - डॉ. सुनिल दादा पाटील

● वादविवाद जयसिंगपूर न्यायालयाच्या कक्षेत.

● या अंकामध्ये प्रकाशित झालेल्या मजकुराशी मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही.

● पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी मंगेश विठ्ठल कोळी यांच्यावर आहे.

● व्यक्तिमत्व विकास या नियतकालिका मधून प्रसिद्ध झालेल्या कथा, कविता, लेख व अन्य साहित्यांचे सर्व हक्क राखून ठेवलेले आहेत.

● **वार्षिक वर्गणी** - ४९९/-

● प्रकाशनाचा वार - प्रत्येक आठवड्याचा शनिवार

● वितरणाचा वार - प्रत्येक महिन्याचा शेवटचा शनिवार

# || करू ||



अरे, चल बसलास काय! चल आज
पुन्हा एक बलात्कार करू,
आधी स्टेटस ठेवू, दोन शिव्या घालून
आई-भगिनींचे नाव साकार करू.

हे बघ आधी हातात मेणबत्ती घेऊ,
मग मोठसे आंदोलन करून tv वर
येऊ,
नंतर आरोपींना तारखा दिल्या रे
दिल्या, की देणाऱ्यांचे सत्कार करू.

हा आता ते दिलेले बदले तर पाहिजे,
पण मोठ्या माणसांची ती देणगी,
तसे ते बदलणारे आहेत, पण ते
म्हणतात दोन वजा दोन चार करू.

अरे असं कुठं असतं का? सांगा दोन
वजा दोन चार होतं का?
ऐका आता थोडं अधिक करू, चला
एकजुटीचा उभा उमेदवार करू.

ना सरकारच्या, ना कायद्याच्या, ना
देशाच्या विरोधात जाऊ.
मात्र न्याय न मिळाल्यास,
चांगल्यासाठी भ्रष्टाचार करू.

आता अंत होऊ लागला आहे
संयमाचा, चला काहीतरी करू.
नाही थांबा! न्याय म्हणून मिळणाऱ्या
न्यायाचाच बलात्कार करू.

**- ऋषिकेश अंकुशराव / किरबेट**
**मो.- ७३०३९८०६८८**

# || नातं जपलं ||



नातं जपलं, टिकून राहतं अस्तित्व
भरून सजलं जातं अन् न
जपणाऱ्यांना, त्याचं महत्त्व कुठं तरी
कळतं ।।१।।

पण, नाती न जपणाऱ्याना संकट
आल्या नंतर नाती म्हणजे काय
सगळं कळतं असतं ।।२।।

म्हणूनच, म्हणावसं वाटतं नात्यांत
असतो गोडवा एकदा अनुभवून तर
बघ.. नातं काय असतं...।।३।।

स्वार्थ साधण्यासाठी जपू.. नकोस
नाती, कधीही.. माणसातलं
माणूसपण जपण्यासाठी
माणूस बनून बघ एकदा..।।४।।

त्यातूनच मिळते वेगळं समाधान,
आणि मनःशांती अनुभवून बघ एकदा
समजेल तुला अनुभवांती ।।५।।

निदान, आता तरी विचार कर
माणसा...आयुष्यात काय
कमवायचंय कमावलेले रहाणारं
इथच आहे शाश्वत...फक्त नातीच
असतातं..।।६।।

मरणानंतर फक्त केलेल्या सत्कर्माच
व जपलेलं नातंच अजरामर असतं
नावच रहातं आठवणींच्या रुपात
कोण तरी होता, जिवात्मा..।।७।।

आठवणींच्या श्रृंखला गुंफत जातात
त्या सदैव स्मरणात राहतात यातच
सर्व सुख दुःख सामावते म्हणूनच,
माणसा नाती जपत रहा..।।८।।

**- शामराव सुतार / नेरुळ, नवीमुंबई**
**मो.- ९९२००६१९९१**

# पुणे ते टेंभुर्णी



घरी न जाण्याचा खूप संकल्प केलता पण पसरत्या आजाराला थांबविण्यासाठी सरकारकडे काही औषध नव्हतं. आजार होता covid-19 (कोरोना वायरस). हा आजार चिनवरती मात करून त्याने दुसऱ्या देशांकडे झेप घेतलेली. त्यातलाच भारत एक आणि त्या भारतातलं पुणं विद्येचे माहेरघर. विद्यार्थ्यांचा सोशल मीडियावर हाहाकार पसरलेला. त्यांची धावपळ चालू होती. काही जणांनी स्वप्ने तुटलेली. कोणाच्याही मनाध्यानातही नव्हतं की एका आजाराने ह्या विश्वाचं इतकं नुकसान होईल. खूप जणांनी घवघवीत यश मिळेपर्यंत घरी न जाण्याचा संकल्प केलता त्यातलाच मी पण एक. पण घ्या आजारापुढे नतमस्तक व्हावं लागलं.

आदल्या दिवशी काय झोपच आली नाही घरी जायचं म्हटल्यावर. अभ्यासाचही नियोजन करत होतो. सकाळी उठण्याचा आळस खूप होता पण नाईलाज लवकर उठलो, पीएमटी पण कमालीचे मध्येच बंद पडली सर्वजण खाली उतरल्यानंतर मिनिटा-दोन मिनिटातच चालू झाली. स्वारगेटला आल्यानंतर एक आगळं वेगळं दृश्य होतं. जिकडे बघेल तिकडे तोंडालाच बांधलेले प्रत्येक इसमाने. जो तो आजाराचाच विषय काढायचा. विद्यार्थीही जड पावलांनी बस स्थानकावरती होते.

बस स्थानकावर पोहोचल्यानंतर बसची वाट पाहत बसलेलो. तेवढ्यात माझे लक्ष एका म्हातार्या, वयस्कर आजीकडे गेलं. तिला दिसत नव्हतं. ती आजी आंधळी होती. तिला कोणाचीतरी मदत हवी होती. सर्व तरुण, सुशिक्षित मंडळी होती पण कोणाचे हात मदतीला धावत नव्हते. ती आजी म्हणायची 'कोणीतरी चहा आणि बिस्कीट आणून द्या माझ्याकडून पैसे घेऊन जा' पण आजकालचा माणूसकी सोडून पैशाच्या मागे धावत आहे. गोष्ट होती फक्त दहा ते वीस रुपयांची, प्रत्येकजण त्या आजीचं ऐकायचा आणि दुर्लक्ष करून निघून जायचा. हिच आहे का आपली माणुसकी? काही वेळानंतर एका तरुण मुलाने त्या आजीला न पैसे घेता सर्व उपलब्ध करून दिलं. खरच आजी खूप खुश झालेली. खरचं युवकांची आपल्या देशाला, समाजाला गरज आहे.

प्रवास चालू झाला. गर्दी तशी बऱ्यापैकी होती आणि वायरसमुळे रेल्वे बंद करण्यात आल्या होत्या. प्रत्येकजण आपाआपली काळजी घेत होता. तोंडाला रुमाल किंवा मास्क बांधत होता. माझ्याजवळ एक मोठी बॅग होती पण बस पूर्ण भरल्यामुळे एका वयस्कर आजीला जागा करून देण्यासाठी मी ती वर ठेवली. आज सर्वांकडे आजारात जाळं पसरलेलं पण काहीजण चेष्टा-मस्करी वरतीच घेत

होते. एका गोष्टीचं नवल वाटायचं की ते म्हणजे मास्क वरती ही लिहिलेलं "AAP-ANA TIME AAYEGA" खरच आज ती वेळ आलेली. ही वेळ आपल्यासाठी लवकरात-लवकर आजारावर औषध काढण्यासाठीची. प्रयत्न चालूच होता पण यश मिळत नव्हतं.

रात्रीच्या जागरणानं डोकं जरा जास्तच फणफणत होतं. झोप लागलेली पण निसर्ग काही झोपू देत नव्हता. तो मला बारीक लक्ष देऊन निरीक्षण करायला सांगायचा. खरं आहे निसर्ग सदैवच आपल्याला साथ देत आलेला आहे. माणूस कितीही चुकीचं वागला तरी त्याला निसर्ग साथ देतीच. कोरोना वायरस हा जास्त तापमानात जगू शकत नाही असे वैद्य म्हणतात, त्याचप्रकारे निसर्गाने उनाड माळासारखे स्वतःचा अवतार करून तो कोरोनाला पळवण्यासाठी मागे लागलाय हे म्हणायला हरकत नाही.

आज एका वायरसमुळे सर्व जवळपास रेल्वे प्रवासही बंद झाल्यामुळे बसमध्ये गर्दी वाढत होतीच. खूप वर्षानंतर आज आजीबाईंचेही आजीपण बसमध्ये आढळून आलतं पण कलियुगात आज त्याच आजीची गरज भासते. जागतिकरणामुळे आजीला आपण विसरून न्यूक्लिअर फॅमिली " NUCLEAR FAMILY " असा वेगळा नियम प्रत्येकजण लागूच करत आहे. प्रवासामध्ये मी एका आजीला माझ्याजवळचा फरसाणा खाण्यासाठी दिला. ति आजीपण खूप खूश झाली. ती भाकर आणि भेंडी खात होती. ती नको-नको म्हटली पण मीच थोडा आग्रह केला. तिला शेवटी-शेवटी मी त्यांच्याच कुटुंबातला वाटू लागलो.

प्रवास म्हणजे खरंतर बसचे धक्केच असतात. पण प्रवासात मन तल्लीन होऊन वेगळ्या विचारातच ते मग्न असतं. वेगवेगळेपण शोधत असतं कारण दररोजच्या जीवनाला कंटाळलेलं असतं त्यालाही ताजेतवानं होण्याची गरज असते. ते प्रवासात विरंगळून जातं. प्रवास आपल्याला आपल्या DESTINATION काही वेड लागलेलं असतं. आपण पुढचाही आपोआप विचार करत असतो. आपल्या आठवणी त्याच विचारात पुन्हा ताजातवाण्या होतात, आणि त्यांना वास्तविकरूपही मिळते.

आता गाडी टेम्भूर्णीमध्ये आलेली. बसमधून कधी उतरेल असे झालतं पण मोठ्या बॅगा असल्यामुळे उतरण्यासाठी उशीर लागला पण खालून बसमध्ये चढणार्या काही माणसांमध्ये माणुसकी असल्यामुळे त्यांनी मला बाहेर निघण्यासाठी थोडक्यात मदतच केली. खरच मी त्यांचाही आभारी आहे. आता ओढ लागेलेली बघण्याची. खूप दिवस झालं, घरी आलोच नव्हतो. त्यांना आनंदी बघण्याची इच्छा होती.

बसमधून खाली उतरलो. गाव तसा वेगळाच दिसत होता. जागतिकरण आणि प्रगतीचे एक जिवंत उदाहरण पाहत होतो. पप्पांना फोन लावणार तेवढ्यात मला काही अंतरावरून ते निदर्शनात आल्यामुळे मी त्यांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला.

गेल्या आठवड्यापासून खूप टेन्शनमध्ये होते पण मला कधी कळूच दिले नाही. पप्पा घरी निघण्याच्या मार्गावर होतेच. तेवढ्यात मी त्यांच्या पुढे उभा राहिलो. त्यांना आनंदाचा धक्काच बसला. मला बघितल्यानंतर त्यांच सर्वच टेंशन नाहीसं झालं. ही गोष्ट आमच्या घरी कामाला असणार्या रोजगारांनाही त्यांनी सांगितली. एका मुलासाठी आपल्या वडिलांकडून काय अपेक्षा असते अजून? तो क्षण माझ्यासाठीचा अविस्मरणीय होता. तो क्षण मी विसरूच शकत नाही.

अशा प्रकारे माझा आजचा प्रवास कधी संपला समजलेच नाही......

**- संग्राम सलगर / टेंभुर्णी**
**मो.- ७७५६८४४१६९**



# सैनिकी परंपरेचं गाव



लेखक हा सैनिक टाकळीचा
अभिमान त्याला आपल्या गावाचा

या गावाचे सगळेच लोक आहेत भारी
मग असो नर की नारी

देशाच्या संरक्षणासाठी जवानांना पाठविण्याची परंपरा
कित्येक वर्षांपासून जपतोय गाव सारा

कित्येकांनी दिली देशासाठी प्राणाची आहुती
मनोहर भोसले यांनी वर्णली त्यांची महती

वंदन माझे त्या वीरांना ज्यांनी देशासाठी सांडिले रक्त
वंदन माझे त्या साहित्यिकाला ज्याने त्यांची कहाणी केली व्यक्त.

- राज धुदाट /जयसिंगपूर
मो.- ८४८५८७७२३२



# कळीची होतील फुले..



उमलावी जशी सुंदर कळी
गालावर आली नाजूक खळी
कुणास ठाऊक.! कधी पाहिले नाही जग
दुष्कृत्याच्या भीतीने गाळण उडते मग ।
जन्मास यावं की नको? ही वाटत राहते खंत
कधी होईल स्त्री-बलात्कार दुष्कृत्यांचा अंत
लहान कळ्यांची कसलीच राहिली नाही लाज
उमलण्याआधीच खुडून नेली नराधमांनी आज
काय होता त्या कळीचा दोष....?
जो ओढावला तिच्यावर नराधमांच्या रोष
कळीची छानशी फुले फुलतील का..?
बळकट वेलींवर मस्त डुलतील का..?
सांगणं एकच..! नका करू तिची दशा
तिला मिळेल का जगण्याची चांगली दिशा..?

**सारांश-** वयाचे कसलेच भान न ठेवता लहान तसेच मोठ्या मुलीवर बलात्कार केला जातो....! ही २१व्या शतकातली सत्य घटना आहे. आमचे आदर्श छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात अशा नराधमांना थारा नव्हता. त्यांचे हातपाय कलम केले जायचे..! अशी ती शिवशाही....! मग आत्ताची लोकशाहीत अशा नराधमांना शिक्षेस विलंब का..? वास्तविक भयाण आहे याचा विचार प्रत्येकाने केला तर अशा घटनांना आळा बसेल अशी अपेक्षा आहे.

**- पुष्पा गिड्डे-कदम /मुंबई**
**मो.- ८४९२०६८९९८**

# करोणाने टाकले "जहर"



कोरोनाने मानवजातीच्या धर्माला व संस्कृतीला लावले "ग्रहण". परंतु यातुनही बाहेर निघण्याचे धाडस मानवसमाजाने दाखविले पाहिजे. आज प्रत्येक धर्माचा व्यक्ती आपल्या लोकप्रिय सनांपासुन दुरावल्या गेला आहे. कोणतेही शुभ-अशुभ कार्य करतांना कोरोणा महामारीचा दहावेळा विचार करावा लागतो. मृतपावलेल्या व्यक्तीचा अंत्यसंस्कार किंवा कोणताही वीधी करता येत नाही. साक्षगंद, लग्न समारंभ यावर जनुकाय बॅन आला की काय असे वाटत आहे. आज कोरोणा संक्रमनामुळे संपूर्ण जगाचे जनजीवन विस्कळित झाले आहे. गार्डन, धार्मिकस्थळे व पर्यटनाला टाळे लागले आहे. म्हणजेच आज एकट्या चीनने संपूर्ण जगाला वुहानच्या कोरोणा व्हायरसने हालवून सोडले आहे.

आज कोरोणामुळे जगाची अर्थव्यवस्था ढासळलेलीच आहे. त्याचबरोबर मानवजातीला सुख देणारे पर्यटनाला सुध्दा ग्रहण लागल्याचे दिसून येते. देशासह जगात लोक भुकेने तडफड आहे. यामुळे कुपोषण व भुकमरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. परंतु यापेक्षाही भयानक परिस्थिती जगापुढे ओढावली आहे. जेव्हापासून पृथ्वी तलावर कोरोणा व्हायरसचा प्रवेष झाला तेव्हापासून मानव, जीवजंतू, जंगल संपदा, स्थल, जल, वायु, आकार-पाताळ, समुद्र संपूर्ण भयभीत झाले आहे. कारण कोरोणा संक्रमन सुरूच आहे. परंतु दुसरीकडे संपूर्ण जगावर "तिसऱ्या महायुद्धाचे बादल मंडरावतांना" दिसत आहे.



एकीकडेजगमानवजातीला वाचवीण्यासाठी व्हॅक्सीनचा शोध लावत आहे तर दुसरीकडे चीनच्या विस्तारवादी धोरणामुळे संपूर्ण जग युध्दाच्या मैदानात उतरल्याचे दिसून येते. म्हणजेच ज्याप्रमाणे व्हॅक्सीनसाठी संपूर्ण जग प्रयत्न करीत आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक देश

अत्याधुनिक हतीयार, मिसाईल, अनुबॉम्ब व घातक हतीयार खरीदण्याच्या तयारीत आहे. आज जगातील पुर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण मधील संपूर्ण देश एकमेकावर तोफा तानुन आहे. आजच्या घडीला जगातील दारूगोळा, बारूद, मीसाईल, अनुबॉम्ब, अत्याधुनिक शस्त्र-अस्त्र याची तुलना जर केली तर पृथ्वीवर समुद्रातील पाण्यापेक्षा कितीतरी पटीने विनाशकारी हतीयार पृथ्वीवर आहे. म्हणजेच आज संपूर्ण पृथ्वी सह विश्र्व विनाशाकडे वाटचाल करतांना दिसत आहे. याला मानवजातीने कोठेतरी रोखलेच पाहिजे.

देशासह जगात वाढती लोकसंख्या, वाढते प्रदुषण, ढासळते पर्यावरण यापासून सध्याच्या परिस्थितीत संपूर्ण जग भयभीत आहे. सध्याची युध्दजन्य परिस्थिती पहाता आता हे सांगणे कठीण आहे की कोणता देश केव्हा युद्ध करेल हे सांगता येत नाही. जगात केव्हाही-कधीही युद्ध छेडले जावू शकते. याला नाकारता येत नाही. कारण सध्याच्या परिस्थितीत "आर्मेनिया विरूद्ध अझरबैजान" यांचे युद्ध सुरु आहे. ही लढाई मुस्लिम देश विरूद्ध इसाई देश अशी होण्याची शक्यता जास्त आहे. असे जर झाले तर यात जर अमेरिका-रशिया यांनी उडी घेतली तर तिसऱ्या महायुद्धाला कोणीच रोखू शकणार नाही.

दुसरीकडे जगात चीनने कोरोणा व्हायरस पसरवून युद्धजन्य परिस्थिती निर्माण केली आहे. त्यामुळे आज संपूर्ण जग "बारुदच्या ढीगाऱ्यावर" बसल्याचे दिसून येते. चीनची "विनाशकारी विपरीत बुध्दी" जगाला कोणत्या स्तरावर नेईल हे सांगणे कठीण आहे. जगात मानवजातीसाठी खुशालीचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु "चायनीज महामारीने"जगाला मरण्याच्या खाईत लोटुन युद्धजन्य परिस्थिती निर्माण केली आहे. त्यामुळे जनुकाय, भारतीय संस्कृतीवर ग्रहण आले की, काय असे वाटत आहे. असेही वाटत आहे की, कलयुगातील हा शेवटचा एपीसोड (अंक) आहे की काय असे दिसून येते. कारण निसर्ग सुध्दा मानवजातीवर नाराज आहेत.

जंगलसंपदा मोठ्या प्रमाणात नष्ट होत आहे. समुद्राच्या पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. पृथ्वीचा भुभाग कमी होत आहे. जगात अनेक जंगलामध्ये मोठ्या प्रमाणात वनवा लागत आहे. ग्लेशीअर वितळत आहे. मानवजातीच्या अतिरेकामुळे जंगल संपदा नष्ट होवून जंगलातील वन्यप्राणी शहराकडे धाव घेतांना दिसत आहे. तिसऱ्या महायुद्धाची आहाट ऐकू येत आहे. यावरून स्पष्ट होते की, पृथ्वीतलावरील मानव, जीवजंतू, वन्यप्राणी यांचा अंत सध्याच्या ओढावलेल्या परिस्थितीमुळे होवू शकते याला नाकारता येत नाही. परंतु मानवजाती या कठीण परिस्थितीतून सुध्दा जगाला सुखद मार्गावर नेवू शकते.

जगात एकीकडे "खाई तर दुसरीकडे डोह" अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यातून शांततेचा मार्ग कोणाला तरी काढावाच लागेल. मानवजातीची उत्पत्ती शांती प्रस्थापित करुन पृथ्वीचे संरक्षण करण्यासाठी झाली आहे. परंतु मानवजातीने निसर्गावर

अत्याचार केल्यामुळे आज ही भयावह परिस्थिती दिसून येते. जगाला विनाशापासुन कोठेतरी रोखलेच पाहिजे. याकरीता युवकांनी पुढाकार घ्यावा लागेल. जगात भारत “शांतीचे आधारस्तंभ” आहे. त्यापध्दतीने भारत शांती प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. हीबाब संपूर्ण जगाला ग्यात आहे. तरीही चीन भारताविरुद्ध शडयंत्र रचण्याचे काम करीत आहे. चीन पाकिस्तान-नेपाळसारख्या शेजारी देशांना लालसा दाखवत आहे.

भारताविरुद्ध घृनीत कारवाई करीत आहे. भारत-नेपाळ सोबत रोटी-बेटीचे नाते आहे. परंतु चीनने यातही जहर टाकले आहे. तरीही भारताने शांततेचा मार्ग सोडलेला नाही. पृथ्वीवरील विनाशकारी परीस्थितीमूळे उन, पाऊस, हिवाळा यांचीसुध्दा दीनचर्या बदलल्याचे दिसून येते. जगात सुनामी, महाप्रलय, भुकंप, भुस्खनन, वनवा लागणे या घटनेला आज संपूर्णपने मानवच दोषी आहे. आज जगात महामारी व युद्धजन्य परिस्थिती मानवानेच निर्माण केली आहे. याचा अंत होणे आवश्यक आहे व मानवजातीच्या उद्धारासाठी व कल्याणासाठी संपूर्ण जगाने एकत्र येण्याची गरज आहे.

या दीवाळी अंकाच्या माध्यमातून हेच सांगू इच्छितो की, कोरोणा महामारी पहाता आपले संपूर्ण सन साजरे करतांना सर्वांनीच सावधगिरी बाळगली पाहिजे व आपल्या घरातच दीवाळी साजरी केली पाहिजे. दीवाळीचा आनंद सर्वांनीच घ्यावा चांगले पक्वान्न बनवावे व पनतीच्या जोतात व लायटींगच्या प्रवाहात दीवाळी साजरी करावी. फटाके फोडतांना प्रदुषणाची व लहान मुलांची काळजी घेणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे फटाक्यांच्या आवाजाचा आतंकवादी गैर फायदा घेणार नाही याचीही काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे.

दीवाळीच्या सनाचे औचित्य साधून मी जनतेला आग्रह करतो की, आपल्या घरासमोर एक तरी झाड लावले पाहिजे जागा नसेल तर एखाद्या कुंडलीमध्ये झाड लावून पर्यावरणाला वाचवण्याचा “संकल्प” सर्वांनीच केला पाहिजे. यामुळे एकाच दिवशी लाखो झाडे लावली जातील व पर्यावरणाच्या दृष्टीनेसुध्दा दीवाळीला महत्त्व येईल. यामुळे गुरांना चारा व मानवाला शुध्द हवा आणि आल्हाददायक वातावरण निर्माण होण्यास मोठी मदत होईल.

**- रमेश लांजेवार / नागपूर**
**मो. - ९३२५१०५७७९**

# परिचारिका



खरे तर,
नसतेच ती साधारण स्त्री...
ती असते,
आश्वासक भयमुक्तीचा साक्षात्कार
आणि रुग्णालयातील संचार
वेदनेवरील शामकता सोबत घेऊन
वेदनाळल्या मनांवर घातलेली
फुंकर

ती थोपटते आई होऊन
आश्वासक असते सखीसारखी
आणि होते आधार
रुग्णशय्येवर विसावल्या
गलितगात्रांचा

तीच तर असते उभी मध्यभागी
जीवनमृत्यूच्या,
घेऊन हाती जीवनकलश
संजीवनीचा
औषधांच्या
रुपात...

आणि
असतेही ती
दुखऱ्या मनाच्या पट्ट्या बदलताना
'बरे होण्याचे' आश्वासन देत
पुन्हा सुटू शकणाऱ्या 'बँडेज'ची
खुणगाठही...

पण,
विज्ञानाला मानवतेच्या बाळंत्यात
गुंडाळताना
अंगावर चढवलेल्या कवचातूनही
पत्करावेच लागतात तिला
धोके संसर्गाचे कधीकधी
कारण ती निभावत असते कर्तव्य
विसरून अस्तित्व स्वतःचे...

- रावसाहेब जाधव /चांदवड
मो.- ९४२२३२१९९६

# आपले जगणे...!



आयुष्यभर सोबत असून,
एकत्र कधीही बसत नाही.
एकाच घरात राहून कोणीही,
एकमेकास दिसत नाही.

हरवला तो आपापसातला ,
जिव्हाळ्याचा संवाद.
एकमेकास दोष देऊन,
नित्य चाले वाद-विवाद.

धाव-धाव धावतो आहे,
दिशा मात्र कळत नाही.
हृदयाचे पाऊल कधीही,
हृदयाकडे वळत नाही.

इतके जगून झाले पण,
जगायलाच वेळ नाही.
जगतो आहे कशासाठी,
काहीच कसला मेळ नाही.

एक क्षण असा येईल,
घेऊन जाईल हा श्वास.
अर्ध्यावरच थांबलेला,
असेल हा जीवन प्रवास.

अजुनही वेळ आहे,
थोडे तरी जगून घ्यावे.
सुंदर अशा जगण्याला,
डोळे भरून बघून घ्यावे...!

- अय्युब पठाण /लोहगांव
मो.- ९७६४३८०३७४

# ऋण



"ए आये दे की खायाला कायतरी". सकाळी उठल्यापासून बाळ्या आईच्या मागे लागला होता. गरीब रुक्मी हतबल झाली होती. आज घरात अन्नाचा कणही शिल्लक नव्हता. काल रात्री मालकीण बाईंच्या हातापाया पडून पन्नास रुपये मागितले पण, "रुक्मे तुझे कामापेक्षा नखरेच जास्त असतात. किती उधाऱ्या बाकी आहेत. उसने म्हणून नेतेस नि परत देण्याचे नावही नाही". अ से बोलून मालकीणबाईंनी हात झटकला होता.रुक्मी काकुळतीला येऊन बोलत होती, "बाईसाहेब, समदे रुपये परत करीन. तुम्ही सांगाल ते काम करीन. पण दोन लेकरं भूकेली आहेत. घरात अन्नाचा कणही नाही".

पोटात अन्नाचा कण नसल्याने रुक्मिला ग्लानी येत होती. पण मालकीणबाई काहीतरी मदत करतील या आशेने ती काम करत होती. मात्र दगडाच्या काळजाच्या मालकिणीला पाझर फुटला नाही. घरात विकण्यासारखे काहीच शिल्लक ठेवले नव्हते. दारूपायी आता बायकोच विकायला उरली होती. बाकी सगळेच विकले होते. रुक्मिला लेकरांची उपासमार बघवत नव्हती. त्यात छोटा संतोष तापानंही फणफणला होता. बाळू रडत तरी होता पण संतोष डोळेही उघडू शकत नव्हता. आता रुक्मी थोडी चिडलीच पण कोणावर चिडायचे हेच तिला कळत नव्हते. दारुड्या नवऱ्यावर.... उसने पैसे न देणाऱ्या मालकीणीवर... दैवावर की स्वत:वर?

शेवटी मनाचा निर्धार करून ती उठलीच. संतोषला कडेवर घेतले. बाळूच्या हाताला धरले आणि तडक चालू पडली. बाळूला कळत नव्हते की आई आपल्याला घेऊन कुठे चाललीय? तो ओढत असलेल्या आईच्या मागून पळत होता. शेवटी रुक्मि एका ठिकाणी थांबली. तिथं अनेक वाहने जात होती. आता ती प्रत्येक गाडीजवळ जाऊन हात पसरु लागली. गाडीत बसलेल्यां श्रीमंतांना त्यांचे दुःख कसे कळणार? ते तिला दूर हटवत होते आणि गाडी पळवत होते. एखादा गाडीवाला थोडीशी काच उघडून रुपया, दोन रुपये हातावर टेकवत होता.

इतक्यात एक गाडी त्यांच्या जवळ येऊन थांबली. क्षणभर ती घाबरली. गाडीवाल्याचा थोडा रागही आला. कारण गाडी थोडी पुढे आली असती तर तिघेही गाडीखाली चिरडून मेले असते असे तिला वाटले. काळ्या काचांचा गॉगल घातलेली एक भारदस्त व्यक्ती गाडीतून उतरली आणि रुक्मिणीजवळ चालत आली. मोठ्या अदबीने तो मनुष्य रुक्मिशी बोलू लागला. "ए रुक्मि, तू रुक्मिच ना? मी उस्मानभाई गेल्या वर्षी तू माझ्या घरी काम करत होतीस, पण अचानक आम्ही दुबईला शिफ्ट झालो नि तुझा

संपर्क सुटला. गेल्याच महिन्यात मी पुन्हा परत आलो. तेव्हापासून तुला शोधतो आहे. तू कुठे राहतेस?"आता रुक्मिला या सगळ्या गोष्टींचा उलगडा झाला. गेल्यावर्षी मालदार उस्मानभाई यांच्या बंगल्यात ती काम करत होती.

अचानक त्यांचा मुलगा तापाने फणफणला. घरी कोणीच नव्हते. रुक्मिने प्रसंगावधान राखून आपले डोरले देऊन पैसे आणले आणि त्या मुलाला डॉक्टरांकडे नेले. घरी आल्यावर उस्मानभाईंना हा प्रकार कळला. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की आज रुक्मि नसती तर त्यांचा मुलगा वाचला नसता असे त्यांच्या मनाला चाटून गेले. परंतू त्यांना अचानक दुबईला जावे लागल्याने ते तिच्यासाठी काहीच करु शकले नव्हते.

या वर्षी ते परत आल्यापासून ते वेड्यासारखे तिला शोधत होते. आता ती त्यांना दिसली होती. त्यांनी तिला आणि तिच्या मुलांना गाडीत घातले आणि एका शानदार हॉटेलात घेऊन गेले. तिघांना पोट भरून जेवू घातले. एका तासापूर्वी एक-दोन रुपयांसाठी तोंड पसरणारी रुक्मि आता शानदार हॉटेलात पंचपक्वान खात होती. जेवल्यावर उस्मानभाई त्यांना घेऊन कपड्यांच्या दुकानात गेले. कपड्यांचे दोन दोन जोड घेऊन ते त्यांना सरळ आपल्या घरी घेऊन निघाले. तिचा आपल्या डोळ्यावर विश्वासच बसत नव्हता. ती पुन्हा पुन्हा स्वतःला चिमटा काढून बघत होती. तृप्तीचा ढेकर देताच उस्मानभाईंनी तिची सारी व्यथा विचारपूस करून जाणून घेतली.

तिघांना तसेच गाडीत घालून ते आपल्या घराकडे आले. एका आलिशान बंगल्यासमोर गाडी उभी राहताच भाई स्वतः गाडीचे दार उघडायला आले. सुलतानाभाभी सर्वांना बघून दाराकडे धावली आणि त्यांनी रुक्मिणीच्या पायावर चक्क लोटांगण घातले. अश्रूंनी तिच्या पावलावर अभिषेक केला. तिला घेऊन त्या घरात आल्या आणि नवीन सुंदर साडी नेसायला दिली.

मुलांना नवे कपडे घालायला सांगितले. संतोषला जेवण मिळाल्याने त्याचा तापही उतरला होता. बाळ्या मात्र काहीच न समजून कुतूहलाने इकडे तिकडे पहात होता. रुक्मि सैरभैर झाली होती. काय होतंय हे तिच्या आकलनक्षमतेच्या बाहेरचे होते. तिचे डोळे मात्र पाझरताना थांबतच नव्हते.

**सौ. भारती सावंत / खारघर, नवी मुंबई.**
**मो.- ९६५३४४५८३६**

# ॥ तांका ॥

गोतावळ्यात
फास स्वीकारतात
जीव अनाथ
कुणी नाही म्हणून
झुरत असतात
* * *

पुस्तके जुनी
पडली धूळ खात
श्रीमंत भास
नजर अधू झाली
हात गोंजारतात
* * *

बाहेर आले
वादळ मनातले
नुस्ता धुरळा
जीवघेण्या उठल्या
नसानसात कळा
* * *

भोवऱ्यात मी
दूर दूर सोबती
भय भोवती
माझ्या जीवाची आता
माझ्या कर्माने गती
* * *

दुखवू कसे
जन्माच्या गरिबीला
लागला लळा
येतील सोबतीला
अंतापर्यंत कळा
* * *

इमारतीला
शेतमळ्याचा बळी
लाखो कमाई
पान फुले झाडाची
कृत्रिम रोषणाई
* * *

देव भेटला
भेटला खचितच
प्राण वाचला
इतकी रहदारी
जो तो जागी थांबला
* * *



निर्जीव
वस्तू
सखीस्पर्श झालेल्या
जीवंत झाल्या
तिच्या गैरहजेरी
मला बोलू लागल्या
* * *

कुठे बासरी
सूर कुठे उरले
रान शिणले
इवल्या पाखरांचे
चिवचिवणे गेले
* * *

दोनच घास
आईने भरवले
ऋण जन्माचे
शिळेपाके तुकडे
जीवा लाख मोलाचे
* * *

**- तुकाराम खिल्लारे / परभणी**
**मो.- ८८३०५९९६७८**

# क्षणचित्रे



दिवसाला
निरोप देत
रात राणी
माहेराला...!

अखेर
संवेदनांची
माळ
विस्मृतीच्या
गळ्याला...!

तळपेवातील
अंधारकाया
बावरली
मोहमाया...!

सोबतीला
सावली बेजार
पिताना हा
नग्न अंधार...!

भोवताल
दिशाहीन
जळालेली
काजळरात...!

स्वप्नात
वर हात
छाताडावर
घणाघात...!

रात्रीने पांघरावी
एकांताची
काळी शाल
आकाशात
चांदण्यांची
वस्ती विशाल..!

कोलाहलात
बुडालेल्या
घनगर्द एकांतात
जपावित
क्षणचित्रे
मनाच्या
कप्प्यात...!!

- लवकुमार मुळे / शेगाव
मो.- ९८२३४७९८८५

# कट्टा



कोल्हापूरातील गंगावेशमध्ये अकडी दुधाचा कट्टा, पुणे येथील शनि मंदीरजवळ शनि पारकट्टा दगडू शेठ गणपतीमंदिर शेजारी आहे. दररोज सकाळी चहाचा कट्टा, प्रत्येक खेड्यात, शहरात पाहण्यास मिळत असतो. ज्या ठिकाणी बालपण गेले असा दुधाचा कट्टा, शाहूपुरी तिसरी गल्ली, बी. टी. कॉलेज जवळ होता. आता आहे की नाही हे माहीत नाही. आता का असू शकणार नाही. याचे सरळ उत्तर आहे. निसर्गाचा, सृष्टीचा नियम आहे परिवर्तन. हा काय या कट्टयाला नियम लागू होऊ शकणार नाही...!

सकाळी-सकाळी स्वच्छ सूर्योदयाचे दर्शन घ्यावे हे शुभ असते. हे किती लोकांना माहित आहे? हे मला माहित नाही पण मला मात्र सूर्याचे दर्शन अवश्य घ्यावे असे मनोमन वाटते आणि सूर्याचे दर्शन झाल्यानंतर...

'संध्यानंद'चे दर्शन घ्यावे असे वाटते. 'संध्यानंद'चा कट्टा मात्र शोधून-शोधून सापडेना. अखेर पुणे ए. बी. चौकाच्या पुढे एक चहाचा कट्टा मात्र सापडला. शेवटी 'संध्यानंद'चा कट्टा सापडेलच...! कारण 'शोधलं की सापडतचं' खरं आहे ना? सकाळी-सकाळी कोवळ्या सूर्याचे दर्शन घेणे आणि लगेच 'संध्यानंद'चे दर्शन करणे अशक्य आहे. हां एका शब्दाचे अनेक अर्थ असू शकतात. तसेच सध्यानंद'चे अनेक अर्थ असू शकतात. हेसुद्धा तितकेच सत्य आहे.

संध्या + आनंद संध्याकाळच्या गणपतीपुळे येथील सूर्यास्ताचा, दर्शनाचा आनंद आणि 'संध्यानंद' सकाळी-सकाळी वर्तमानपत्र वाचल्यानंतर मिळणारा आनंद यामध्ये खूप-खूप फरक आहे, हे समजू शकतो. 'संध्यानंद' वर्तमानपत्रातील मिळणारा आनंद जीवनामध्ये खूप काही सकारात्मक बदल घडवू शकतो. समुपदेशन घडवून आणतो. पण सायंकाळचा सूर्यास्त पाहण्याचा आनंद मात्र क्षणभंगुर असतो. त्याचा फोटो कायम स्वरुपी घेता येतो. तो आनंद आठवणीने फोटोचे दर्शन घेऊन परत-परत घेता येतो. वर्तमानपत्रातील मिळणारा सुविचाराचा आनंद 'संध्यानंद'चा आनंद जीवनात कायापालट करु शकतो हे निर्विवाद सत्य आहे.

आज मंगळवार १०/१०/२०१७ सकाळी-सकाळी ए. बी. चौकाजवळ पुढे चहाच्या कट्ट्यावर चहाचा घोट घेता-घेता डोक्यात विचार मंथन चालू होते. पण लिहिण्यासाठी कागद नव्हते. थोड्याच वेळात ज्योतिष कार्यालय सुरु झाले आणि कागद मागून घेतला आणि ८९ च्या स्पीडने लेखणी सुरु झाली. शेवटी मर्यादा ही आहेच. 'वाचन कट्टा' एक वेळ सापडतो, पण 'लेखन कट्टा' मात्र सापडणे फारच दुर्मिळ आहे. त्याला स्वत:चे असे आसन व्यवस्था, खोली अवश्य पाहिजे.

समुद्राच्या पाण्याची, नदीच्या पाण्याची खोली, खळखळणारा ओढा त्यांच्या पाण्याची खोली, लेखन करण्यासाठी बुद्धिला डोक्याची खोली, ज्ञानाची खोली. याला गणेशाच्या दर्शनाने सुरुवात केली तर गणधर यांची बुद्धि ८० नव्हे तर १०० च्या स्पीडने पळू लागेल यात काही शंका नाही.

**- ब्राम्हविलास पाटील / जयसिंगपूर**
**मो.- ९८८१९८२४४१**

# संघर्ष



**शोध नवासा, गंध नवासा,**
**सारे काही क्षणिक।**
**तरीही का भासी मनी,**
**लोभ धनाचा मज हवासा।**

'सर्वांचाच आयुष्यभर संघर्ष हा चालूच असतो.' जीवनाला योग्य दिशा देण्याच्या प्रयत्नात प्रत्येक व्यक्ती ही कोणता ना कोणता संघर्ष करतच असते. कधी कोणी एकवेळच्या भाकरीसाठी, तर कोणी घराची जबाबदारी पार पाडण्यात संघर्ष करत असतो. कोणी शिक्षण, नोकरी, व्यवसाय तर कोणी देशाच्या संरक्षणार्थ कठीण संघर्ष करत असतात.

या जीवनी प्रत्येक व्यक्ती ही आपल्या जीवनाशी संघर्ष करीत असते. आपण जर मागील इतिहास पाहिला असता त्यातून नक्कीच संघर्षमय जीवनातून पुढे येऊन सर्वांचेच जीवन सुखद झालेले दिसून येतेच.

जशी संघर्षाला कोणत्यातरी मार्गाची गरज असते. तसेच शुन्यातून विश्व निर्माण करताना संघर्ष हा करावाच लागणार.

संपूर्ण जीवन भर राबराब राबून कुठेतरी अखेरचा संघर्ष संपतो त्यातूनच काही लोक खूप संघर्षातून सुखकर जीवन जगत आलेले असतात.

काही व्यक्तींकडे धाडस, प्रेरणा, आत्मविश्वास मार्गदर्शन तर असतेच पण जबाबदारीचं ओझं त्यांच्या अंगावर असल्यामुळं त्यांच्या स्वप्नांपर्यंत पोहोचू शकत नाहीत. पण कुठंतरी  समाधानी जीवन नक्कीच अनुभवायला मिळतं.

'परिस्थिती कोणतीही असो संघर्ष करत राहा.'

आपल्यात असणाऱ्या हिम्मतीनं शेवटच्या टप्प्याकडं पाहत राहा. गोष्ट कोणतीही असो ती करताना माघार न घेता समोर भले मोठे भयंकर संकट असेल तरीही त्यावर मात करत संघर्ष करा. त्यातून मार्ग हा मिळणारचं.

**- श्रावणी पवार / विटा**
**मो.- ७४९८७९८८३१**

# वसुधैव कुटुंबकम



समाज माझा असा हवाय
जिथे जात-पात नसेल
सर्वांची जात मात्र
भारतीय असेल

मानवतेचा धर्म
साऱ्या धर्मा हुनी श्रेष्ठ
वसुधैव कुटुंबकम
संदेश आहे हा जेष्ठ

समतेची भावना ठेवू
जात-पात धर्म संप्रदाय छान
प्रभूची लेकरे आम्ही
सर्वांचा पिता ईश्वर आहे महान

संतांची ही भूमी
एकता बंधुतेचा संदेश देऊ
हिंदू-मुस्लीम भेदभाव विसरून
वसुधैव कुटुंबकम भावना मनी
ठेवू

उच्च निच्च कोणी नाही
माणुसकी ठेऊ मनी
सर्वधर्म समभावाची भावना
विकासाची गंगा ध्यानी

हे विश्वची माझे घर
ऋषिमुनींनी दिली शिक्षा
धरतीच्या चरणी
एकजुटीची घेवू दीक्षा


**- सौ.भारती तिडके / गोंदिया**
**मो.- ८००७६६४०३९**

# अबोली



अबोली दिसायला सुंदर गोंडस सालस होती. आई-वडिलांची एकुलती एक मुलगी अंगणात तिच्याच वयाच्या मुलींशी लपाछपी खेळत होती. चार-पाच वर्षाच्या अबोली तिच्या नंतर घरात कोणी अपत्य नव्हते. 'ही मुलगी म्हणजे घरच्यांचा जीव की प्राण' ! घरच्याचा खुप लळा लागलेला. तिचा आजूबाजूचे शेजारीसुद्धा एखादा गोड पदार्थ केला तर, तिला सोडून कोणी खात नव्हते. अशी सर्वांच्या आवडीची अबोली. नावाप्रमाणेच बोलणेही कमीच पण जे बोलणार ते नेमकं बोलत असे, अभ्यासाप्रमाणे कलागुणा यामध्ये ती हिरीरीने भाग घेत व नंबर मिळवीत असे. मग अशी मुलगी कोणाला आवडणार नाही. 'वर्गात सर्व शिक्षक गुणी मुलगी म्हणून तिला ओळखत'. अभ्यासात हुशार पण ती कधी गर्व करीत नसे. इतरांना अभ्यासात, कामात मदत करणे हा तिचा स्वभाव. इतरांमध्ये लगेच मिक्स होत असे.

अबोली सातवीत होती. तेव्हा तिच्या शेजारी एक आजोबा राहत होते. ते खूप म्हातारे झालेले त्यांची पत्नी त्यांना सोडून देवा घरी गेली होती. त्यांना एक मुलगा एक मुलगी होते. कोणीच त्यांच्याजवळ नव्हते. आजोबा स्वतःची कामे स्वतः करीत. एके दिवशी अंगणात अभ्यास करत असताना तिला समोर आजोबा कपडे धुताना दिसले ते बघवेना खूप दया येत होती. अभ्यास तिथेच सोडून आजोबांना मदत करण्यासाठी गेली आणि विचारले "आजोबा मदत करू का?" आजोबा नको, म्हणत असताना सुद्धा कपडे धुण्यासाठी मदत केली.



'चिमुकल्या हाताने येईल तशी आजोबांना मदत केली' आणि कपडे सुकायला घातले. आजोबांच्या चेहऱ्यावर एक विलक्षण असे समाधान दिसत होते. झालेला सारा प्रसंग मुलीने

आई-बाबा नवीन सांगितला. तेव्हा त्यांना खूप समाधान वाटले. अबोलीला जवळ घेऊन मायेने कुरवाळले अशा या संस्कारात अबोली वाढत होती. अबोलीची वार्षिक परीक्षा जवळ आली असताना तिची एक मैत्रीण स्नेहा खूप आजारी होती. शाळेमधील गैरहजेरीचे प्रमाण वाढले होते.

अबोलीच्या बरोबरीने हुशार असलेली स्नेहा आता अभ्यासात मागे राहू लागली. परीक्षा जवळ आलेली परीक्षेत नाही बसली तरी तिला पुढच्या वर्गात प्रवेश मिळणार नाही. या काळजीने अबोली शाळा सुटली की, रोज स्नेहाच्या घरी जाऊन रोजचा अभ्यास सांगायची त्यामुळे स्नेहाला ही खूप समाधान वाटायचे. अबोली ने दिलेला अभ्यास रोज स्नेहा करायची यामध्येच वार्षिक परीक्षा कधी आली समजले नाही.

स्नेहाची परीक्षाही पार पडली रिझल्ट लागला होता. अबोलीला खूप आनंद झाला होता की, तिची मैत्रीण चांगल्या मार्कांने पास झाली होती. अशा या अबोलीच्या निस्वार्थी प्रेमाचे सर्व जण तोंड भरुन कौतुक करत असे. त्यामुळे अबोलीची जागा कोणीच घेऊ शकत नव्हते.

अबोलीच्या आयुष्यातील प्रसंग अबोली आता कॉलेजमध्ये प्रदार्पण झालेलं. पण स्वभाव मात्र तोच यामध्ये काहीच बदल झालेला नव्हता. अबोली अभ्यासात हुशार आणि प्रामाणिक ही तिची ओळख असल्यामुळे अनेक मुलींसाठी त्यांचा आधार बनले होती. गावापासून 15 किलोमीटर अंतरावर कॉलेज त्यामुळे रोजचा प्रवास असायचा तिच्याबरोबर गावातील मुलींचा ग्रुप असायचा त्यामुळे एकमेकींची सोबत होती. घरातील सर्व मंडळी समधानी होते. मुलींचे कॉलेज ते घर असा प्रवास नियमित चालू होता. मुली  बाहेर जाऊन शिक्षण घेतात. हे बघून गावातील मंडळींनाही खूप बरं वाटायचं..

अबोली हुशार आणि धाडसी कोणतीही अडचण असली की, ती न घाबरता सोडवायची याच स्वभावामुळे कॉलेजमध्ये सी.आर. म्हणून तिची निवड करण्यात आली. प्रत्येक कार्यक्रमात हिरीरीने सहभाग घेत असे. पण कॉलेजमध्ये अबोली नावारूपास येत होती. हे काहींच्या डोळ्यांमध्ये खुपत होते. तिच्या खोड्या काढण्यास अप्रत्यक्षपणे सुरुवात झाली. त्यामध्ये काही मुली पण होत्या. मात्र त्याकडे दुर्लक्ष करुन अबोलीने आपल्या अभ्यासात पूर्णपणे लक्ष केंद्रित केले. पण तिच्या छोट्या-मोठ्या कुरापती काढणे चालू होते.

आता मात्र तिने गप्प न बसता प्राचार्यांच्या केबिनमध्ये धाव घेतली. कारण.. आता जर आपण गप्प बसून यांचा अन्याय सहन केला. तर इतर मुलींनाही त्रास देतील झाला सर्व प्रकार तिने प्राचार्यांकडे रितसर लेखी स्वरुपात दिला. गावाकडील सर्व मैत्रिणींच्या सह्या पण घेतल्या. हे मात्र कोणाच्याही लक्षात येऊ दिले नाही. प्राचार्यांनी पूर्णपणे अबोलीची बाजू ऐकून घेऊन तिला कोणताही त्रास होणार नाही असे आश्वासन दिले. कारण अबोली अभ्यासात हुशार विद्यार्थिनी होती.

उद्या कॉलेजचे नाव गाजवील याची शाश्वती प्राचार्यांना होती. आता अबोली निर्धास्त होती. तिची परीक्षा जवळ आली होती तिने पूर्णपणे अभ्यासाकडे लक्ष केंद्रित केले. पण अबोली वर जळणारे काही कमी नव्हते. जाता-येता अबोलीवर टोमणे मारणे, तिच्यावरून कोणालातरी उद्देशून बोलणे, असे काही विद्यार्थी होते. त्याच्याकडे प्राचार्यांनी बारकाईने लक्ष ठेवले होते. कालांतराने प्राचार्यांच्या ही असे लक्षात आले की, असे मुले म्हणजे आपल्या कॉलेजचे नाव खराब होण्याची लक्षण हे गांभीर्य लक्षात घेऊन अशा मुलांना प्राचार्य केबिनमध्ये बोलावून त्यांच्या पालकांसह बोलावून घेतले आणि त्यांना समज दिली.

या घटनेपासून इतरही मुले वचकुन राहु लागले. कॉलेजमध्ये शिस्तीचे वातावरण निर्माण झाले. त्यावर्षी कॉलेजचा निकाल शंभर टक्के लागला. त्याही वर्षी कॉलेजमध्ये अबोली प्रथम क्रमांक पटकावला.

आज ती या कॉलेजची गोल्डन गर्ल झाली होती. याच मुलीमुळे कॉलेजमध्ये असंख्य विद्यार्थ्यांनी कोणतीही भीती न बाळगता शिक्षण घेत होत्या. अनेक जणींच्या शिक्षणाची दारे बंद झालेली उघडली. त्याच निमित्त होतं अबोली लहान मोठ्यांच्या विश्वासाची अबोली होती. तिचं नाव सुद्धा मोठ्या अदबीने सर्व जण घेतात. अबोली कॉलेजचा आदर्श होती. कॉलेजच्या पाठीवर तिचं नाव 'सुवर्णाक्षरांनी' कोरले होते. आज प्राचार्यांनी अबोलीला केबिनमध्ये बोलावले. प्राचार्यांना अबोली बद्दल मनोमन अभिमान वाटत होता.

अबोली कोणाचेही अन्याय सहन करत नव्हती. योग्य वेळी योग्य ते निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये होती. त्याच अबोलीला प्राचार्य म्हणाले, "अबोली तूच या कॉलजची आदर्श आहेस." विद्यार्थी असावेत तर, तुझ्यासारखे,...." अबोल पण आपल्या कर्तृत्वाने बोलणारे....!!

**- सौ. रेश्मा गुंगे / मंगळवेढा.**
**मो.- ९११२०३८००१**

# नातं



नातं तोडण्याआधी..।
ते जपायला शिका...।।

जरी खुप असतील
तुमच्या नात्यात चुका
नातं खुप सुंदर दिसेल
एकदा झुकुन तर बघा...
नातं तोडण्याआधी...।
ते जपायला शिका...।।



अनोळखी विचारांचा ताळमेळ
नको जायला एका टोका...
नातं तोडण्याआधी...।
ते जपायला शिका...।।

नात्यातील विश्वास टिकुन ठेवणे आहे
एक अनमोल मौका ...
नातं तोडण्याआधी.. ।
ते जपायला शिका ... ।।

- रसिका वाकोड़े /जळगांव जामोद
मो.- ९४२१४६५८५४

# स्वार्थ



दिवस मावळायला आला होता. डोंगराकडंच्या बाजूला आभाळात सूर्याच्या लाल कडा दिसायला लागल्या होत्या. आभाळाकडं बघत नामाम्हाताऱ्यानं काठी टेकत टेकत गावाकडंची वाट धरली होती. काय करावं जमीनीचं? रघुला जमीन वाटणी तर द्यायची हाय.... आपल्याकडं आता चांगली जमीन हाय पर गावचा सरपंच तर म्हणत होता.... तुमच्या रानाच्या वरच्या बाजूला तळं होणार हाय.... ही जमीन सगळी तळ्याखाली जायाची तवा आपून ही जमीन रघुला देऊन टाकायची.... असं मनाशीच म्हणत नामाम्हातारं चाललं होतं. गावापासनं मळयातलं रान तसं दीड मैल लांब होतं. दुसरं दोन एकर रान गावाशेजारीच होतं. पण ते रानं मुरमाटाचं होतं. तिथं पिक चांगलं येत नव्हतं.... पण सगळी जमीन तळ्याखाली जाण्यापरास हे गावाजवळचं रान घेतलेलं बरं असा पक्का निर्धार त्यानं मनाशी केला होता. ईचाराच्या तंत्रीत नामाम्हातारं गावाजवळच्या पांदीत येऊन पोहचलं. पांदीतनं जाताना तिथल्या उग्र वासामुळं मन पार उचमळून जायचं.... म्हातारं लगबगीनं पाय उचलत गावात येऊन पोहचलं....

येळीव गाव तसं डोंगर भागात वसलेलं एक छोटसं खेडं.... गावात अजून तळं झाल्यालं नव्हतं. गावातल्या सरपंचानं तळयासाठीचा प्रस्ताव तालुक्याला पाठविलेला होता. लवकरच त्याला मंजुरी मिळंल असं वाटायला लागलं होतं. पण याबद्दल गावात कुणालाच जास्त माहीती झाल्याली नव्हती. नामाम्हातारं हे सरपंचाच्या उठण्या-बसण्यातलं असल्यामुळं त्याला या गोष्टीची कुणकुण लवकरच लागली होती. इकडं त्याचा भाऊ रघु मात्र भोळा गडी होता. त्यो आपल्याच कामात असायचा त्याचं कुणाजवळ जास्त बसणं-उठणं नसायचं. त्यात त्याला पाच पोरं होती. कसंबसं त्यांचं पोट भरायचं चाललं होतं....

नामाम्हातारं घराकडं येऊस्तवर संध्याकाळ झाली होती. अंधार पडायला लागला होता. ओट्याच्या पायऱ्या चढत त्यानं काठी बाजूला असणाऱ्या खांबाला टेकवून उभी केली. चपला काढून बाजूला सारल्या.... धोतराचा सोगा सरळ करत त्यानं ओट्यातल्या बाजावर बसकन मारली. तवर रघु रानातनं आला.... "आरं रघुबा.... जरा हिकडं ये वाईस...."

"काय गा दादा...." असं म्हणत रघु पायऱ्या चढून वर आला....

"आरं वाईस च्या पिऊन जा की...."

रघुनं गुमानं येऊन बाजावर बुड टेकलं.... कायतरी काम काढलं असंल दादानं असं त्याला वाटायला लागलं.... कारण एरवी कधी न बोलावणारा दादा आज कसा च्या

प्यायला ये म्हणतूय.... रघुला काय आदमास लागंना....

तवर नामाम्हाताऱ्यानं सूनला हाळी दिली.... “आगं सगुणा.... जरा चहा टाक दोन कप....”

जरा वेळ कोणच कुणाशी बोललं न्हाय.... मग नामाम्हाताऱ्यानं विषय काढला.... “आरं ती आपली शेताची वाटणी करायची तशीच राह्यली व्हती.... पुना आपल्या माघारी पोरांची भांडणं होण्यापरास आत्ताच वाटणी केल्याली बरी....”

“व्हय तेबी खरंच हाय.... पण तुझ्याकडं मळ्यातली जमीन हाय की....”

“आरं ती मळ्यातली चांगली जमीन हाय, ती तुलाच घे की....तुला पोरंबी जास्त हाईत ....”नामाम्हातारं म्हणालं....

“मला कुठली बी जमीन दे.... तुझा शब्द मी काय मोडणार न्हाय ....”

“ठिक हाय मग.... उद्या जमनीचा कागूद करायला तालुक्याला जाऊया....”

“व्हय .... पण येरवाळीच गेलं पाईजेल....”असं म्हणत रघु उठला आणि चपला घालून त्यानं घराची वाट धरली.... तसं त्याचं घर समोरच होतं. घराची वाटणी झाली तवा त्याला जुनं घर दिल्यालं होतं.... रघु कशीतरी त्या घराची डागडूजी करुन तो कसतरी त्यात दिवस काढत होता. यावेळेलाही नामाम्हाताऱ्यानं चलाखी दावली होती.

दुसऱ्या दिवशी दोघं भाऊ जाऊन जमनीचं कागद करुन आलं. जाताना रघुनं कुणाला ईचारलं न्हाय.... का कुणाला याबद्दल बोलला न्हाय. सगळी कागदं तयार करुन आणली होती पण हा गडी तसा अडाणीच होता.

नामाम्हाताऱ्याच्या मनात आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. कारण त्यानं आपला स्वार्थ साधला होता, पण इकडं रघुला मात्र कशाचीच खबर नव्हती.... त्याला चांगली जमीन मिळाल्याचा कोणताच आनंद नव्हता....

घरात आल्यावर त्यानं ही गोष्ट आपल्या बायकोला सांगीतली.... “जमीन नावावर करुन घेतली....” असं ऐकताच तिला बरं वाटलं....

ती म्हणाली.... “बरं झालं बाई....! भाऊजीनं आपल्याला घर जुनंच दिलं होतं.... आता मळ्यातली चांगली जमीन मिळाली ते बेस झालं....”

पण तिच्या या आनंदावर काही दिवसातच विरजन पडलं.... तळ्यासाठी जागा मोजणीसाठी अधिकारी आलं होतं. रघुच्या रानाचीही मापं घेणं चालू होतं. रघु मात्र ईचारात पडला.... आता कसं व्हायचं आपलं.... पाच पोरं हाईत आपणाला त्यांच्या पोटापाण्याचं कसं व्हायचं.... रघुची बायको सुमा तर डोकं धरुनच बसली....

काही दिवसातच तळ्याचं काम चालू झालं. रघुला शासनाकडून जमीनीचं थोडंफार पैसं मिळालं. ती कवडीमोल किंमत घेऊन रघुला गप्पच बसावं लागलं. महिनाभर हे काम चाललं. रघु आणि सुमा लाचारीनं तळ्याच्या कामावर जात होती. काम करताना डोळ्यातून टिपं गळत होती. आपलं रान गेल्याचं डोंगराएवढं दु:ख घेऊन ती दोघं काम

करत होती. त्यांच्या डोळ्यापुढं आपली लेकरं दिसत होती. रघुला आपल्या धाकल्या पोराची हणमंताची लई काळजी वाटायची. हणमंता अजून लहान होता.... बाकीची पोरं शाळंला जायाची. हणमंता अजून शाळंला जात नव्हता. कामावरनं दोघं आली की हणमंता जाऊन बापाला बिलगायचा.... रघु मात्र स्वत:च दु:ख कुणाला सांगू शकत नव्हता. काही दिवसातच तळ्याचं काम पूर्ण झालं. तळ्यामध्ये रघुची जवळपास सगळीच जमीन गेली होती. फकस्त आठ गुंठं जमीन नावालाच राहीली होती. रघु तर काय करणार होता तेवढया जमीनीत....

दिवसांमागून दिवस जात होतं. काम तर रघु आणि सुमाच्या पाचवीलाच पुजलं होतं. गावात कुठलंही काम असो रघु तिथं जायाचा. कुणाच्यात ऊस फोडायला, कुणाच्यात खत घालायला, कधी माती उकरायला अशी अनेक कामं करून कसाबसा तो आपल्या पोरास्नी जगवत होता. सुमाही त्याला साथ देत होती. पोरं शाळंला जात होती. हणमंताही आता शाळंला जायाला लागला होता. काही वरसं अशीच निघून गेली. रघुचा मोठा पोरगा श्रीरंग आता नोकरीसाठी वणवण फिरत होता. बऱ्याच प्रयत्नानंतर काही दिवसातच त्याला एस. आर. पी. मध्ये नोकरी लागली.

मग रघुनं त्याच्या लग्नाची घाई केली. लग्न झाल्यावर त्यो लगेच बायकोला घेऊन पुण्याला रहायला गेला.

इकडं हणमंतालाही वाटायला लागलं आपणही नोकरीला लागावं.... त्यानं आठवीतनंच शाळा सोडली होती. कुठंतरी भर्ती व्हावं.... म्हणून त्यानं व्यायाम सुरु केला आणि एक दिवस त्याच्या बापाला रघुला म्हणाला.... "दादा.... मी तात्याकडं पुण्याला जाऊ का...."?

"हणमंता आपल्या बापाला दादा म्हणूनच बोलायचा आणि मोठ्या भावाला तात्या म्हणायचा."

"तिकडं कशाला जातूयस...." रघु म्हणाला.

"म्या बी तात्यासारखं भर्ती व्हावं म्हणतूय...."

"बघ बाबा.... तुला कसं जमतय तसं...."

दुसऱ्या दिवशी हणमंता सकाळी लवकर उठला होता. सकाळची सगळी कामं आवरुन त्यानं पुण्याला जाण्याची तयारी केली. तयारी तर काय होती. अंगावरचा एक सदरा आणि लेंगा.... बाकी हातात एक मोकळी वायरची पिशवी घेतली. दादाच्या पाया पडून त्यानं घरातून पाय काढला. हणमंताला निरोप देताना रघुच्या डोळ्याच्या कडा पाणावल्या....

हणमंता याआधी कधीच घर सोडून राहिला नव्हता.... त्यामुळं रघुला त्याची काळजी वाटत होती. हणमंताच्या पाठमोऱ्या आकृतीकडं बघत रघु तसाच उभा राहिला होता. हणमंता दिसायचा बंद झाल्यावर रघु घरात आला.

हणमंता आज पुण्याला येऊन पोहचला होता. एसटीनं आल्यामुळं प्रवासानं

सारं अंग मोडून आलं होतं. स्टँडवर उतरल्याबरोबर त्यानं सदऱ्याचा खिसा चापचून बघीतला....  खिशात धा रुपय होतं.... तात्याकडं पहिल्यांदाच चाललूय कायतरी खायला घ्यावं म्हणून त्यानं सभोवार नजर टाकली तर समोर केळाचा गाडा दिसला. त्या धा रुपयची त्यानं  केळं घेतली अणि तात्याचा पत्ता हुडकत लोकांस्नी ईचारत त्यो कसातरी त्याच्या घराजवळ जाऊन पोहचला. पुण्यातली गर्दी त्यो पहिल्यांदाच बघत होता. याआधी तालुक्याशिवाय कुठंही गेलेला नव्हता. पण आज नोकरीच्या वडीमुळं त्यो पुण्यात येऊन दाखल झाला होता.

दारात हणमंताला बघताच श्रीरंगाला आनंद झाला. “आरं हणमंता.... काय सांगावा न्हाय.... काय न्हाय.... आणि असा अचानक कसा आलास रं....”

“आलूय तुझ्याकडंच....”

श्रीरंगाला हणमंताच्या बोलण्याचा अंदाज येत नव्हता. तवर हणमंतानं हातातली पिशवी खाली ठेवली. समोरच खॉटवर जाऊन दोघं भाऊ बसलं.

“तात्या म्याबी तुझ्यागत नोकरी करायची म्हणतूय....” हणमंतानं विषय काढला....

“आरं हणमा.... नोकरीचं एवढं सोपं असतंय का....?”

“म्या नोकरीला लागल्याशिवाय गावाकडं जाणार न्हाय....” हणमंता ठामपणानं बोलला.

“बरं बाबा....!”

मग गावाकडंच्या गप्पा झाल्या. दोघं बराचवेळ बोलत बसली होती. तवर श्रीरंगाच्या बायकोनं चहा आणला. हणमंतानं चहाचा घोट घेतला. श्रीरंगालाही ड्युटीवर जायाचं होतं. त्यामुळं त्याची गडबड चालू झाली. आवराआवर करुन वर्दी घालून त्यो ड्युटीसाठी निघाला.

हणमंताला जाताना सांगितलं.... “आलो मी ड्युटीवरनं.... बस तवर निवांत.... आन् कुठं फिरायला जाऊन यायचं असलं तर जाऊन ये....”

दिवसामागून दिवस जात होतं. हणमंता पुण्यातनं फिरुन येत होता. पण कुठं भर्ती निघंना झाली होती. रोजचा प्रत्येक दिवस त्याच्यासाठी  निराशा घेऊन येत होता. नोकरीसाठीची त्याची वणवण काय अजून थांबली नव्हती. एक दिवस हणमंता असाच घरात सोप्यात बसला होता. त्यावेळी श्रीरंगा आतल्या खोलीतनं आला आणि हणमंताला म्हणाला.... “हणमंता.... असं कर आता गावाकडं जा.... तुझ्यानं काय भर्तीचं जमायचं न्हाय.... तवा आपलं गावाकडंच कायतरी कामधंदा बघ....”

तात्याचं हे शब्द हणमंताच्या जिव्हारी लागलं.... त्याला पुन्हा पुन्हा तेच शब्द तापलेलं तेल ओतल्यागत कानावर आदळत  होते....

“हणमंता आता गावाकडं जा.... तुझ्यानं भर्तीचं जमायचं न्हाय....”

मनात हुंदका दाटून आला होता. हणमंतानं सगळ्या ऊफाळून आलेल्या भावना

मनात दाबून ठेवल्या.

त्यानं कधी कल्पनाही केली नव्हती की आपला तात्या आपणाला असं बोलंल.... 'आज आपल्या सख्या भावालाही आपून जड झालू.... काय म्हाईत त्याच्या बायकोनं त्याला काय शिकवलं.... का त्याच्या मनानं त्यो आपल्याला असं बोलायचा न्हाय....'

अशा अनेक ईचारांचं काहूर त्याच्या मनात दाटलं होतं. पायाखालची जमीन सरकल्यासारखं त्याला वाटायला लागलं होतं. हताश मनानं हणमंतानं समोर खिळ्याला अडकवलेली मोकळी पिशवी काढली. काही न बोलताच त्यानं पायात चपला अडकवल्या.

श्रीरंगा दारात उभा राहून त्याला म्हणाला.... "गावाकडं जा बरं का...."

यावर हणमंता काही न बोलताच तरातरा निघून गेला. आजपर्यंत असा अपमान त्याचा कधीच झालेला नव्हता. स्वत:च्या भावानं आपणाला असं बोलावं.... ईचार करत तो रस्त्यानं चालला होता. आपून जर असं गावाकडं गेलो तर दादा काय म्हणंल....? गाव काय म्हणंल? असं त्याला वाटायला लागलं. त्यानं मनात एक ठरवून टाकलं.... 'काय व्हायचंय ते हूदे पण नोकरी लागल्याबिगर गावात पाय ठेवायचा न्हाय....'

दिवसभर त्यो वणवण भटकत राहिला. आजपासून आपल्याला राहायला घरही नाही आणि खायला भाकरीही नाही हे त्याला माहीत होतं. त्यामुळं कुठतरी काम मिळवं म्हणून त्याची भटकंती चालली होती. दुपार टळून गेली होती. दिवसभरात सकाळच्या चहाशिवाय पोटात कायंच नव्हतं. चेहरा पार सुकून गेला होता. तवर समोर किर्लोस्कर कंपनी दिसली. तिथं बाहेर फाटकावर कामगार पाहीजे म्हणून पाटी लावलेली होती. ती पाटी बघताच हणमंताच्या जीवात जीव आला. त्यानं जवळच गेटवर असलेल्या वॉचमनला ईचारलं.... "मला काम मिळंल का...."

यावर वॉचमननं त्याला आत जायला सांगितलं... आणि साहेबाच्या केबीनकडं बोट दाखवलं व "तिथं जाऊन साहेबाला भेट...." म्हणून सांगितलं....

तसा तो काहीशा उत्साहानं साहेबाच्या केबीनजवळ गेला. त्याला बाहेर उभा राहिलेलं बघताच साहेबानं त्याला आत बोलावून घेतलं. हणमंता अदबीनं तिथं साहेबाच्या समोर उभा राहिला. "मला काम पाईजेल...." दोन्ही हात जोडत हणमंता बोलला.

"काय काम येतं...." साहेब खुर्चीवर रेलून बसत बोललं.

"साहेब मला कुठलंबी काम द्या.... मी करतो...."

"ठीक हाय...." म्हणून त्यानं तिथल्या एका कामगाराला हाक मारली.... "आरं गणा.... जरा इकडं ये...."

गणा लगबगीनं आला.... "याला काम समजाऊन सांग.... खुर्च्यास्नी कसं

घासायचं ते त्यला दाखीव आणि पॉलीश कसं मारायचं तेबी शिकीव त्यला...."

हणमंता गणाच्या मागोमाग गेला. गणानं त्याला कामाबद्दल समजावून सांगितलं आणि एक खुर्ची घासून पालीश करायला एक रुपया मिळंल म्हणून बजाऊन ठेवलं. हणमंता गुमानं उभा राहिला होता. उद्यापास्न कामावर ये म्हणून सांगितलं होतं. हणमंता मनातनं आनंदला होता. काम तर मिळालं होतं. आता दुसरी चिंता होती ती राहण्याची.... कुठं राहायचं? खिशात एक पैसाही नव्हता. पुन्हा त्यानं खिशात हात घालून बघितलं पण खिसा मोकळाच होता.

समोरच एक लहानसं हॉटेल दिसत होतं. हॉटेलकडं बघताना त्याला भूक चांगलीच जाणवायला लागली. पण आजची रात त्याला उपाशीच काढावी लागणार होती. अंधार पडायला लागला होता. दिवस नुकताच मावळला होता. रस्त्याकडंचं लाईटचं दिवं लागलं होतं. बराचवेळ ईचार करत हणमंता तिथं हॉटेलाच्या म्होरं उभा राहिला.

हॉटेल बंद झाल्यावर तिथं बाहेरच्या बाकड्यावर झोपावं असा त्यानं मनाशीच विचार केला आणि जवळच असलेल्या सिमेंटच्या कट्ट्यावर त्यानं बुड टेकलं. ईचाराच्या तंद्रीत असताना वेळ कसा गेला त्याला कळलंच नाही. आता रात्रीचं दहा वाजून गेलं होतं. सगळीकडं गल्लोगल्लीत सामसूम झाली होती.

येणाऱ्या-जाणाऱ्याची गर्दीही आता बरीच कमी झाली होती. काही वेळातच समोर दिसणारं हॉटेल बंद झालं त्याचं दार लावून पोरं कुलुप घालून निघून गेली. हणमंता लगबगीनं तिथं हॉटेलजवळ गेला. इकडं तिकडं नजर मारली आणि हातातली पिशवी उशाला घेऊन त्यानं लाकडाच्या बाकड्यावर अंग टाकलं. आज दिवसभर त्याचा उपवासच घडला होता. दिवसभराच्या थकव्यामुळं कधी झोप लागली त्याला कळलंच नाही.

सकाळी हॉटेलवालं पोरगं लवकरच आलं होतं. हणमंताला झोपलेलं बघताच त्यानं त्याला हाक मारली.... पण तो काय उठायचा दिसंना म्हटल्यावर त्यानं पाण्याचा जगातलं पाणी हणमंताच्या तोंडावर मारलं.... "आरं.... काय घर समजूच झोपलास की...."

त्यावर हणमंता हडबडून जागा झाला. त्याला ओशाळवानं वाटू लागलं. काय बोलावं म्हणून तो गप्पच उभा राहिला. यावर ते पोरगंच त्याला म्हणालं.... "तुला घर न्हाय वाटतं...." हणमंतानं मान हालवून होकार दिला....

"आरं हिथं झोपत जा पण सकाळी लवकर उठायचं...."

असं म्हणताच हणमंताला बरं वाटलं.... त्यादिसापासनं हणमंता दिवसभर खुर्च्या घासायचं व पालीश मारायचं काम करायचा व त्यातनं मिळणाऱ्या पैशात आपलं पोट भरायचा आणि समोरच्या हॉटेलात जेवायला जायचा.... रातचं त्या हॉटेलाच्या बाकड्यावर झोपायचा हा त्याचा नित्यक्रमच झाला होता. तिथलं पोरगं राम्या आता त्याचा जोडीदार झाला होता. त्याच्याबर गप्पा मारत त्यो तासनतास बसायचा.

हणमंता कामाला लागून आता तीन महीनं उलटलं होतं. एक दिवस असंच त्याला तळेगावला सी. आर. पी. ची भर्ती निघाल्या म्हणून समजलं.... भर्तीच्या आदल्या दिवशीपासनंच हणमंतानं मालकाला सांगून सुट्टी काढली होती. दुसऱ्या दिवशी हणमंता भर्तीसाठी तळेगावच्या मैदानावर जाऊन सकाळी लवकरच दाखल झाला. पन्नास-साठ पोरं भर्तीला आली होती. आठ वाजायच्या सुमाराला साहेब लोकं आली तशी त्यांच्याबरोबर केंद्रीय राखीव पोलीसांचा ताफा होताच. आलेल्या साहेबानं भर्तीला आलेल्या सगळ्या तरुणास्नी खाली बसण्याचा इशारा केला. तवर बाकीच्या पोलीसांनी खाली बसलेल्या तरुणांच्या भोवतालनं जाळं टाकलं. जाळं बघितल्याबरोबर त्यातली काही पोरं उड्या मारुन पळून गेली. राहिलेल्या पोरांच्यात हणमंता गप बसून होता. मग सगळ्यांच्याकडंनं फार्म भरुन घेतलं आणि दोन दिवसातच सगळ्यांना चेन्नईला ट्रेनिंगसाठी रवाना केलं. हणमंता आता मात्र खुश झाला होता. चेन्नईला गेल्यावर सगळ्या पोरांची डाक्टरी तपासणी करण्यात आली. त्यातली काही पोरं त्या तपासणीमध्ये नापास झाली. कोणाच्या डोळ्यात दोष होता तर कोणाच्या हाता-पायात दोष होता.

मग साहेबानं त्यांना बोलावून घेतलं.... "तुमाला भर्ती करुन घेता येत न्हाय.... तवा तुमी आपल्या गावाकडं जावा...."

असं साहेबाचं बोलणं ऐकताच पोरं पार नाराज झाली. त्यातली काहींजण म्हणायला लागली.... "आमाला घ्याचं नव्हतं तर हिकडं कशाला आणलं...."

पोरांची उदास झाल्याली तोंडं बघून साहेबाला दया आली. त्यानं सगळ्या पोरास्नी नोकरीवर ठेवून घेतलं. डाक्टरी तपासणीत नापास झालेल्या पोरास्नी.... कुणाला स्वयपाक्याची, नोकरी तर कुणाला हजामाची, तर कुणाला सफाईची नोकरी दिली. मग सगळ्या पोरांचं प्रशिक्षण सुरु झालं.... हणमंता भर्ती झाल्यामुळं चांगलाच खुश होता. शिपायाची नोकरीही त्याला आता फार मोठी वाटायला लागली होती.

प्रशिक्षण पूर्ण करुन हणमंता आता पुन्हा पुण्याला आला होता. हणमंता आता केंद्रीय राखीव पोलीस झाला होता. तवर इकडं हणमंता भर्ती झाल्याची बातमी सगळ्या गावात पसरली होती. त्याचा भाऊ श्रीरंगा हणमंताला भेटायला तळेगावला कॅम्पजवळ आला होता. येताना त्यानं हणमंतासाठी सफरचंद, केळं, डाळींब अशी फळांची पिशवी घेऊन आला होता. तळेगावचा कॅंप मोठ्ठा असल्यामुळं तिथल्या प्रवेश दरवाज्यासमोर तो येऊन थांबला होता. तिथल्या पोलीसाला त्यानं सांगितलं.... "आत माझा भाऊ हाय.... त्याला भेटायचं हाय...."

असं म्हटल्यावर त्यो पोलीस शिपाई हणमंताला निरोप द्यायला आत आला. त्यानं तात्या आल्याची बातमी हणमंताला येऊन सांगीतली. हणमंताला हे समजताच त्यानं त्याच्याजवळ.... "मला कुणाला भेटायचं न्हाय असं सांगितलं...."

त्यावर त्या पोलीसानं.... "त्यो तुमाला भेटायचं न्हाय...." असं म्हणतोय म्हणून

सांगितलं....

श्रीरंगाला मात्र तोंडात मारल्यावानी झालं होतं. आपून हणमंताला घरातनं बाहीर काढलं.... आपलं चुकलंच असं त्याला मनात वाटायला लागलं. त्यानं जरावेळ ईचार केला आणि तिथल्या पोलीसाला माईकवरनं पुकारायला सांगितलं....

यावर पोलीसानं माईकवरनं पुकारलं.... "हणमंत रघु जगताप लवकरात लवकर प्रवेश दरवाज्यावळ यावं तुमचा भाऊ आलेला आहे...."

हे पुकारलेलं हणमंता कान देऊन ऐकत होता. पण त्याची तात्याला भेटायला जायची इच्छा होत नव्हती. त्याला मागचं दिवस आठवत होतं.... "ज्यायेळंला आपल्याकडं काय नव्हतं त्यायेळंला आपल्याला घरातनं बाहीर काढलं आन् आता भेटायला आलाय...." हणमंता मनाशीच म्हणत होता.

तवर पुन्हा माईकवरनं पुकारलं.... पण हणमंता जायला तयार नव्हता....मग श्रीरंगानं तिथल्या साहेबाची भेट घेतली आणि त्याला सांगितलं की, हणमंताला सांगा की.... "तू इकडं नाही आलास की तुला नोकरीवरनं काढण्यात येईल...."

मग तसं पुकारण्यात आलं.... मग मात्र हणमंताचा नाईलाज झाला. जड पावलानं त्यो प्रवेश दरवाज्याजवळ आला तर तात्या त्याच्यासाठी फळं घेऊन आला होता. हणमंता आल्याबरोबर त्यानं हातातली पिशवी हणमंताच्या पुढं केली. घ्यायची इच्छा नसताना त्यानं ती पिशवी हातात घेतली. "आरं सांगचील का न्हाय.... आमी म्हणलं हणमंता कुठं गेला....!"

यावर हणमंता काहीच बोलला न्हाय.... श्रीरंगाच जाताना त्याला म्हणाला.... "घराकडं ये सुट्टी असल्यावर...."

हणमंता फकस्त "हं...." म्हणाला आणि मागं वळून न बघता कॅम्पकडं चालू लागला. त्यानंतर कधीच तो तात्याकडं जाणार नव्हता.... खिन्न मनानं ईचार करतच तो कॅम्पात येऊन दाखल झाला.

या सगळ्या गोष्टीला आता ३३ वरसं झाली. सध्या हणमंता रिटायर झालाय. पण आजही त्याच्या मनात भावानं तसं बोललेला राग आहे.

"तू काय भर्ती होणार न्हायस...."

त्या रागापोटीच त्यानं आपल्या पोराला दत्तालाही पोलीसमध्येच भर्ती केलं. स्वत:च्या जीवावर त्यानं दोन एकर जमीन विकत घेतली. पुण्यात एक प्लॅट खरेदी केला. चार पोरींची थाटात लग्न केली. सुखानं पेन्शन खात तो बसलाय....

पहिलं दिवस आठवत.... पण आजही गावातली नवीन पोरं त्यांच्याकडं पोलीसभर्तीसाठी मार्गदर्शन घ्यायला येत्यात....

**– आनंदा बरगुले / मोराळे (पेड)**
**मो.– ८४८३९७५०३३**

# मुलगा मुलगी भेद नसे



बहिण लाडकी दोन भावांची
लाडाकोडाची शान मी
आई बाबांच्या मायेची
संस्कारांची खाण मी
माहेरी मी लाडकी असे
मुलगा मुलगी भेद नसे.....

भावजय मी नंणदांची
एकुलती एक वहिनी मी
सासू सासरे यांच्या प्रेमाची
अशी सून गुणी मी
सासरची मी लाडकी असे
मुलगा सून असा भेदभाव नसे

मय मी लेकरांची
शिस्तबद्ध आई मी
मुलगा मुलगी भेद करण्याची
वेळ येथे येतच नाही
मुलगा मुलगी समान असे
भेदभाव जराही नसे

माहेरच्या संस्कारांची
सासरी जपते नवलाई मी
रायबासंगे अंकीता दिव्यानीची
कौतुकाने करते सरबराई मी
मुलगा वंशाचा दिवा, हे सार्थ असे
मुली म्हणजे पणती तेवणारे तेज असे

- डॉ  शीतल मालूसरे / महाड
मो.- ९८५०९६३१८१



# शिक्षणवारी



अंगणात ठेवता याच्या जवा माझं
पाय। तवा मले तिच्यामदी दिसती
माझी माय।। १।।
जन्मापासन आलया सुख माझ्या
दारी
जशी सुरु झालिया संसाराची वारी
वारीमदी वारीमदी वारीमदी माझा
विठू मला भेटणार हाय तवा मले
विठू मदी दिसती माझी माय।।2।।
बालपणी झाली सखा संगे अन
सोबती।
खेळायला मिळाली आम्हासरे मा
ती।
मातीतून आता आम्ही आकार घेणार
हाय।
तवा मले मूर्तीमदी दिसती माझी
माय।। 3।।
ग म भ न शिकता शिकता
शिकवली ही रीत।
अडचणीच्या डोंगरावरी
केलिया हो
मात।
डोंगरावरीचढून शान
शिखर गाठणार हाय।
तवा मले शिखरामदी दिसती माझी
माय।।4।।
आकडेमोडीची ही फेरी झाली आता
सोपी।
माय मराठीन आम्हा कळल्या
सगळ्या नाती।
साडेसाती साडेसाती साडेसाती
मास्तरमूळ दूर होणार हाय।।5।।
म्हणून म्हणतो आनंदान घ्याव
शिक्षण साऱ्यांनी।
ल्योक माझा बनल साहिब वाट
आईच्या मनी।
शाळच्या त्या देवापुढ माथा टेकणार
हाय। तवा मला मास्तरमंदी दिसती
शिक्षणाची माय ।।6।।

- संजय तकडे /जयसिंगपूर
मो.- ७८७५१६७७९८

# तर्पण



मालती मंदिराच्या आवारात ऊभी होती. सायली, तिची मुलगी, तिला घ्यायला येणार होती. अचानक कुठून कसा एक वेडा धावून आला. तो ओरडला “दार बंद कर, दार बंद कर, ऐकू येत नाही का तुला”! असा ओरडत तो तिच्या अंगावर धावून आला. मालती घाबरली,जागच्या जागीच थिजली. तिच्या अंगाचा थरकाप उडाला. वीस वर्षांनी तिने तो आवाज परत ऐकला होता. तीच जरब, तोच आवेश, हो तिला सुतराम शंका नव्हती, तो आवाज तिच्या नवऱ्याचाच होता. तिने समोर पाहिले, एक काळा कभिन्न भयावह चेहरा, वाढलेली दाढी, विस्कटलेले केस, अंगावर लटकणारी लक्तरे. ती मागे सरकायला गेली, ती पडणारच होती तेवढ्यात तिची मुलगी सायली तिथे पोहोचली. तिने तिला मागुन आधार दिला, तिला हात धरून मंदिराच्या बाहेर आणल. दोघीं घरी आल्या. मालती अजून ही सावरली नव्हती.

तिच्या डोळ्या समोरुन भूतकाळाचा सारीपाट सरकत होता. मालतीचे वडील जिल्हा परिषदेच्या शाळे शिक्षक होते. तिचा भाऊ तिच्यापेक्षा दोन वर्षांनी छोटा होता. मालती अतिशय देखणी होती, गोरापान रंग, चाफेकळी नाक, लांब सडक केस. ती चांगल्या मार्कांनी बरावी झाली. गावात पुढच्या शिक्षणाचा सोय नव्हती. तेव्हा तिने शिवणकाम, भरतकाम आणि विणकाम शिकायचे ठरवले, त्यात ही ती तरबेज झाली.

विसाव्या वर्षीच आकोल्याच्या इंजिनिअर मुलाशी मालतीचे लग्न झाले. लग्न झाल्यावर चवथ्या दिवशीच तो ऑफिसमधून आला तेव्हा त्यांचा फ्लॅटचे दार ऊघडे होते “दार का उघडे होते? मी तुला दार बंद ठेवायला सांगितले होते ना.” तो तिच्या वर ओरडला, अहो रमाकाकू आल्या होत्या मालती ने सांगायचा प्रयत्न केला. त्याने तिचे काहीच ऐकून घेतले नाही. दुसऱ्या दिवशी ऑफिसला जाताना तो दाराला बाहेरून कुलुप लावून गेला. जवळ जवळ आठ ते दहा तास ती अशी एकटी भुतासारखी घरात असायची.

दोन आठवड्यांनी कुलदेवीच्या दर्शनाला जायचा प्रोग्राम ठरला. मालतीला आनंद झाला चला थोडा बदल. बसमध्ये बसले. आजुबाजुचा निसर्ग बघून मालती आनंदी झाली.तिचा आनंद तिच्या चेहऱ्यावरुन ओसंडत होता. मानेवर एक रट्टा बसला, ती कळवळली.” तिकडे कुठे बघत होतीस? कोणा कडे बघत होतीस?” तिचा नवरा ओरडला. “सरळ बघ.” मालती हिरमुसली आणि सरळ बघत बसली. तिची मान अवघडली, दुखायला लागली, त्यावर त्याने तिला परत दरडावले “नखरे करु नकोस, बाईला दुःख सहन करता आले पाहिजे. मुर्ख कुठली.” मालतीला रडू कोसळले,

त्यावर त्याने तिचा हात जोरात पिरगळला, आणि म्हणाला तमाशा करु नकोस, लोक बघत आहेत. तो कधी कधी अतिशय चांगला वागे तर कधी हिंस्रपणे तिला मारझोड करायचा. त्याच्या मानगुटीवर बसलेले संशयपिशाच त्याचा पिच्छा सोडत नव्हते आणि मालतीची ससेहोलपट काही थांबत नव्हती.

अशातच मालतीला दिवस गेले. तिने सासुबाईना बोलावून घेतले. दोघीजणीं आनंदात होत्या. जेवणात शिरा केला, सासुबाईने मुलाला गोड बातमी दिली, समजवून सांगितले अरे आता तू बाप होणार आहेस, तुझी जबाबदारी वाढणार आहे. तुला मालतीला जास्तच जपायला हवे. झाले! तो जोरात कडाडला, काय! तुला कोणी सांगितले? मालतीनेच मला सांगितले, सासुबाई म्हणाल्या.

एखाद्या हिंस्रश्वापदासारखा तो तिच्या अंगावर धावून गेला. लाथा बुक्क्यांनी तो तिला तुडवत होता. बोल कुठे शेण खाल्ले? कोणाचे पाप माझ्या माथी मारती आहेस? मालती अगदी स्तब्ध झाली, तिचा जणू दगड झाला होता. त्याने हात धरून दाराच्या बाहेर ढकलून दिले, एवढ्या आवाजामुळे शेजारी गोळा झाले होते. रमाकाकू अगदी पुढे आल्या, तिचा हात धरून ओढत ओढत स्वतःच्या घरी घेऊन गेल्या. तिला पाणी दिले. दोन घास भरवले, मालती रमाकाकूंच्या खांद्यावर डोके ठेवून ओक्साबोक्शी रडायला लागली, माझे काय चुकले हो? रमाकाकू तिला थोपटत राहिल्या. सकाळी सकाळी मालतीला घ्यायला तिच्या सासुबाई आल्या. एव्हाना मालती सावरली होती. तिने घरी जायला सपशेल नकार दिला. आजवर मी सगळे सहन केले, पण माझ्या चारित्र्यावर त्यानी जे लांछन लावले ते मी कदापि सहन करणार नाही. आता मी त्या घरात पाऊलही ठेवणार नाही, ती ठामपणे म्हणाली.

ती माहेरी गेली. भावाने साथ दिली, भरतकाम, शिवणकाम, विणकाम, करून ती तिचा चरितार्थ चालवत होती. तिची कलाकुसर इतकी सुबक आणि नाजूक असायची की सगळ्यांना आवडायची. हळूहळू तिला रुखवताच्या, बाळंतविड्याच्या, ऑर्डरी मिळू लागल्या. तिची कमाई बरीच वाढली. बाबा निवृत्त झाले होते. त्यांची पेन्शन घर चालविण्यात संपत होती. महेशच्या शिक्षणाचा खर्च मालती करत होती. आजी आजोबांच्या प्रेमळ आणि संस्कारी सावलीत सायली मोठी होत होती. महेशचे  शिक्षण संपले आणि गावातच नवीन उघडलेल्या कॉलेजमध्ये त्याला नोकरी मिळाली. मालतीच्या कलाकुसरीचे नाव आजुबाजुच्या परीसरात झाले होते. त्यामुळे आजूबाजूच्या गावातून ऑर्डर्स मिळत होत्या. रमाकाकूंचा जीव तिच्या वर जडला होता, त्या अधूनमधून तिची चौकशी करायच्या पण अशोक बद्दल अवाक्षर ही नाही बोलायच्या. त्या सुद्धा मालतीला भरपूर ऑर्डर्स मिळवून द्यायच्या. मालती आता आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर झाली होती.

आई-बाबा म्हातारे झाले होते. एक दिवस दोघा भावा बहिणींना त्यांनी बोलावले. बाबा म्हणाले “आता आम्ही पिकलं पान; आमचा काही भरवसा नाही, म्हणून मालती

करिता काय सोय करता येईल त्याचा विषयी चर्चा करायला तुम्हा दोघांनाही मी बोलावले आहे."

मालती अगदी रडवेली झाली, "बाबा अशी निर्वाणीची भाषा का करता." तिचा भाऊ महेश सुद्धा भावूक झाला. बाबा म्हणाले

"महेश मालती करिता काहीतरी कायमस्वरुपी सोय करायला पाहिजे"

महेशनी बाबांना विचारले

"तुम्हाला काय करावेसे वाटते ते तुम्ही मोकळेपणाने सांगा आपण सगळेच मिळून ऊत्तम मार्ग शोधून काढू" आणि विचारविमर्शानंतर बाजुलाच मालती करिता दोन बॅडरुमचे घर बांधले. मालती बाजूलाच रहायला गेली. घरे जरी दोन होती, तरी ते एकत्रच राहत होते.

सायलीच्य ओरडण्याच्या आवाजाने ती भानावर आली. 'अग हे काय? अजून जेवली नाहीस'? मग तिनेच पानं घेतली. तिच्या लक्षात आले की आईचे काहीतरी बिनसले आहे. मालतीने सायलीला मामाला फोन करुन बोलवायला सांगितले. मालतीने महेशला सकाळचा प्रकार सांगितला, पुढे म्हणाली तो अशोक होता. मालती ठाम होती. महेश म्हणाला उद्या आपण याची खात्री करुन घेऊ. दुसऱ्या दिवशी सकाळी तो मंदिराच्या आवारात गेला तेव्हा तिथे खूप गर्दी होती. चौकशी केल्यावर कळले कालचा तो वेडा बस अपघातात ठार झाला. पोलिसांना पंचनाम्यात त्याचे ओळखपत्र सापडले. तो अशोकच होता. पोलीसांनी खात्री करुन घ्यावी म्हणून, त्याचे डी. एन. ए. सायलीच्या डी. एन. ए. शी मॅच करुन घेतले. तो अशोकच होता.

मालतीच्या रडण्याचा आणि सायलीच्या ओरडण्याचा आवाज ऐकू येत होता. आज मी तुझे अजिबात ऐकणार नाही, सायली चिडून म्हणाली. "अग बेटा असे काय करते? तो तुझा जन्मदाता आहे. बापाला असे बेवारस सोडू नको", मालती अगदी हुंदके देत म्हणाली. तावातावाने सायली म्हणाली "शेजारच्या रमाकाकूनी तुला आसरा दिला नसता, तर आपण दोघी जिवंत तरी राहिलो असतो का"? मालतीने रमाकाकूना फोन करुन सगळी परिस्थिती कळवली. रमाकाकू लगेच यायला निघाली. तेवढ्यात मालतीचा भाऊ पण आला. त्याने सांगितलेली माहिती अजूनच धक्कादायक होती. अशोकच्या कागद पत्रात मनोरुग्णालयाचे कार्ड होते, त्यानुसार त्याला "पॅरानोइड स्किझोफ्रेनिया" नावाचा मानसिक आजार होता आणि त्याचा आजार खूपच वाढलेला होता.

तेवढ्यात रमाकाकूं आल्या, रमाकाकू म्हणाल्या अशोक 20 वर्षाचा असतांनाच समुपदेशकाने त्याला मनोविकारतज्ञाकडे पाठवले होते. पण अशोकचे बाबा खूप चिडले, माझा मुलगा काय वेडा आहे का? अशोकच्या रोगाचे निदान झालेच नाही, त्यामुळे औषधोपचार पण झाला नाही. जोपर्यंत आई जिवंत होती ती त्याची काळजी घ्यायची. आई गेली, अशोकचा आजार बळावला, तो नोकरी वर पण जायचा नाही.

दिवसेनदिवस घरात पडून राहायचा. कधी बाहेर गेला तर त्याचा यायचा पत्ता नसे. घरी खाऊ घालयला कोणी नाही. भूकेला असताना ऊकीरड्यावरुन वेचून खातानां मी पाहिले. मग मी रोज दोन पोळ्या करुन त्याच्या दाराशी ठेवायची.

शेवटी शेवटी त्याचा आजार खूपच वाढला. तो खूप आरडा-ओरडा करायचा, व्हायलंट व्हायचा. सोसायटीच्या सदस्यांनी मग त्याला मेंटल हॉस्पीटलमध्ये दाखल केले. तिथे त्याची तब्बेत सुधारली. पण आठवड्यापूर्वी तो तिथून पळाला असे कळले. आज काय तर तो ह्या जगातच नाही. अतिशय दुर्दैवी जीव होता तो. वेळेवर उपचार झाले असते तर तो कदाचित बरा ही झाला असता.

आता सायलीचा राग सुद्धा निवळला. तिच्या लक्षात आले की तिच्या बाबाला नियतीनेच  छळले होते. ती त्याला मुखाग्नि द्यायला तयार झाली. स्मशानात मुखाग्नि देताना तिला आठवले, लहानपणी ती बाबाला भेटायचा किती हट्ट करायची, तिला बाबा भेटला पण कुठे? तर अगदी सरणावर, आणि तिला हुंदका आवरला नाही.

अशोक सरकारी नोकरीत होता त्याच्या फंडाचे सगळे पैसे मालतीला मिळाले. ते पैसे आणि अशोकचा फ्लॅट विकून भरपुर रक्कम आली. मालती आणि सायलीने त्याचा “वरदान” नावाचा ट्रस्ट केला. सायली सायकोलोजिस्ट झाली. तिचा नवरा सचिनही होता. भरकटलेल्या मनोरुग्णांना घेऊन यायचे, ते दोघे त्यांच्यावर औषधोपचार करायचे. ते बरे होइस्तो वर त्यांना संभाळायचे आणि बरे झाले की त्यांच्या नातेवाईकांना कळवायचे. त्यांची भेट घडवून आणायचे आणि त्यांच्या नातेवाईकांना सुपुर्द करायचे. ही सर्व कामे ‘वरदान ट्रस्ट’ करायचे. वरदान मनोरुग्णांसाठी एक ‘वरदानच’ होते.

सायली स्टेजवर उभी होती तिच्या सेवाभावी कार्याचा गौरव झाला होता. तिच्या वरदान संस्थेला सर्वोत्तम सेवाभावी संस्था म्हणून गौरविण्यात आले होते. सचिन तिच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला तुझ्या बाबाच्या आत्म्याला आज शांती मिळाली असेल. तू तुझ्या बाबांच्या “वेदनांचे वरदानात रुपांतर केले.” रस्त्यावर भटकणाऱ्या असंख्य मनोरुग्णानां बरे करुन माणसात आणले. त्यांची नातेवाईकांशी भेट घालून दिली आणि त्यांना त्यांचे घर परत मिळवून दिले. तू आज खऱ्या अर्थाने तुझ्या बाबांचे “तर्पण” केले आहेस.

**- डॉ. वर्षा सगदेव / नागपूर**
**मो.- ९४२२१०५७९६**

# पर्यावरण



कुऱ्हाड जशी चालत आहे
प्रदूषण ही मग वाढत आहे

सिमेंटचे मनोरे उभारतांना
जंगलांची कत्तल होत आहे

आधुनिकीकरणच्या नावाने
पर्यावरण दूषित होत आहे

निसर्ग सौंदर्याचे कौतूक फार
रक्षण करण्यास कोण आहे

झाड कधीच तू लावलं नाही
सावली मात्र तुला हवी आहे

कळेल कधी रे माणसा तुला
झाडांमुळे तुझ्यात श्वास आहे

'राम' दुसरं काही सांगत नाही
झाडे लावं हे दान मागत आहे



**- रामकृष्ण पाटील / विखरण**
**मो.- ९४०८८८९७७९**

# ओंजळ!



रिती कधीच नव्हती माझी ओंजळ
कधी वेचली फुले ओंजळीत

कधी पकडून ठेवले क्षण अनामिक
सद्विचारांनी आहे भरली माझी
ओंजळ

दानधर्म झाले याच ओंजळीतून

ज्येष्ठांच्या सेवेचे पुण्यं मिळवले
याच ओंजळीतून

धान्यं पेरले शेतात याच ओंजळीतून
भिक्षुकांना भिक्षा दिली याच
ओंजळीतून

नावीन्याची चमत्कृती दाखवणारी
माझी ओंजळ

वाहीले कधीच नाही पाण्याचे
ओगळ
पोकळ नव्हती कधीच माझी ओंजळ

कुणासमोर कधी उघडली नाही
मुलायम ओंजळ

ओंजळीचे वर्णन सकृतदर्शनी भासते
ढोबळ

वास्तवात मोत्यांची माळ दोन हाती
वेचते ओंजळ!

ओंजळीचे महत्त्व जाणते सोज्वळ

भुलवते तथाकथित आभासी
भोंगळ!

**- सौ स्नेहा साळुंके/ठाणे**
**मो.- ९३२३६५४५७६**

# सरकारी नोकरीवाला जावई



महाराष्ट्रात सुशिक्षित बेरोजगार युवकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे का? वाढत आहे, आपण काय केलं पाहिजे आणि त्यावर उपाय काय आहेत? हे आपण लक्षात घेतलं पाहिजे? स्वतः कुठेतरी कमी पडतो का? याचं आत्मपरीक्षण करून घेणं हे तुमचं मूळ कारण असू शकेल. मुला-मुलींच्या आई-वडिलांना मुलगा सरकारी नोकरदार जावई हवा असतो. का? हवा आहे याचं कारण अजून स्पष्ट झालेलं नाही. सरकारी नोकरदार मुलगा माझ्या मुलीला सुखात ठेवले या आशेने आपण तोच घट्ट धरून बसतो आणि लग्नानंतर चार सहा महिन्यात आशेची गैरआशा होऊन जाते.

मग अशा घटनेला कोण जबाबदार आहे. तर मला आवर्जून सांगावसं वाटतं सरकारी नोकरदार जावईशोध योग्य नाही कारण खाजगी नोकरदार उत्तम रित्या भूमिका बदलू शकतात. हे मात्र तुम्हाला लवकर कळून येत नाही जेव्हा मुलींची हेळसांड त्रास आणि कोर्ट कचेरी इत्यादी घटनेला तोंड द्यावे लागेल. तेव्हा ह्या काळात ही बाब त्यांना कळेल तोच सुखाचा वारसदार ठरू शकेल. मुलाला शेती नसेल तर सरकारी नोकरी असावी असं मत मांडणारे पाहूणे असतात. यामध्ये 'पण' घालणारे जे असतात ना तेच जास्त नुकसान करत असतात.

शेतकरी नवरा हवा आहे असं मत मांडणारे आई-वडील आणि मुली बोटावर मोजण्याइतकेच आहेत आणि हेच खरे सुखात आहेत. हे आजचं वास्तव आहे सरकारी नोकरीवाले वाईट विचाराचे असतात, हे मी पाहिलं आहे. त्यापेक्षा खाजगी नोकरदार दुपटीने बरा असतो. हेच सत्य काळाला न पुसता येणारं सत्य आहे. मग मुलीच्या आई-वडिलांना वाटतं की, करून खाणाऱ्याला मुलगी दिली असती तर बरं झालं असतं असा पश्चाताप करून काय उपयोग? पहिल्यांदा सरकारी नोकरदारांचं खुळ डोक्यातून काढून टाका तेव्हाच सुखाच्या नात्याला सुरुवात होते. तुम्ही सुखाच्या नादाला लागलो तर दुःखच वाट्याला येईल.

भारतामध्ये जेवढे वृद्धाश्रम आहेत तेवढ्या वृद्धाश्रमात सरकारी नोकरदारांचे आई-वडील आहेत, मला सांगा सरकारी नोकरदार जावई कशाला पाहिजे? हाच वारसा पुढे चालवायचा का? भारतातल्या वृद्धाश्रमाची वाढ आणि त्यांचे आई-वडील सरकारी नोकरदार वाल्यांनी त्यांची लायकी सिद्ध करून दाखवलं आहे. हाच पुरावा तुमच्या आमच्या समोर आहे. म्हणून जे सुशिक्षित बेरोजगार आहेत त्यांना कमवून खाण्याची खूपच सुंदर कला अवगत असते. तेच मरेपर्यंत कायम जगण्याची हिंमत त्यांच्यातच असते. नोकरी वाल्यांना यातलं काहीच करता येत नाही. फरक पहा सरकारी

नोकरदारांचे काय असत की काम कमी आणि पैसे जास्त ही भावना असते म्हणून हे लोक स्वतःच्या घराला आणि देशाला बरबाद करून टाकणारे खरे योद्धे आहेत. यात तिळमात्र शंका नाही. आता खाजगी नोकरदार जसं काम तसं दाम आणि त्यांच्याच घरात लक्ष्मीचा वास असतो. हे प्रथम लक्षात घ्या. की घरातल्या सदस्याचं छत्र इतकं टणक असतं की, त्याला तोडच असू शकत नाही.

मी काही ठिकाणी असं पाहिलं की, सरकारी नोकरदार मुलगा असला तर आणि मुलगी देऊ नसेल तर देत नाही. पण मला असं वाटतं की मुलीची इच्छा आहे त्याच्या पलीकडे आपण जाऊ शकत नाही. खाजगी किंवा सरकारी नोकरदार युवकांशी लग्न करायला काही हरकत नाही सरकारी नोकरदार चांगले नसतात असं मत नसून आतापर्यंतच्या काळात त्यांची जी कामगिरी आहे, त्याला अनुसरून खाजगी नोकरी असलेले केव्हाही श्रेष्ठच आहेत. का तर त्यांचे गुण, मन, सक्षम, दान, आणि त्यांची शान केव्हाही या जगात कायम ताठ असते. मात्र सरकारी नोकरीवाल्याचं असं असूच शकत नाही, कारण सरकारी नोकरीची घमेंड असते.

मन तर निर्मळ असू शकत नाही असणारे फक्त दोन टक्केच आहेत. जोपर्यंत सरकारी नोकरदारांना मुलगी देणं बंद होत नाही, तोपर्यंत कोर्टकचेरी भांडण आणि शिवीगाळ हा कार्यक्रम कायम चालूच राहील कारण वृद्धाश्रमात आई वडिलांनी दिलेला तो शाप आहे. खाजगी नोकरी करणारा दिवसभर कष्ट करून जे पैसे कमवलेले असतात त्या मार्गातून आनंद आई-वडिलांचा आशीर्वाद मुलाबाळांच्या चेहऱ्यावरचे समाधान त्याला आशीर्वाद मिळवलेला असतो आणि ते कधीच वाया जाऊ शकत नाही. खाजगी शाळेत शिकून नोकरी लागलेला जावई चालतो मात्र खाजगी काम करणारा जावई का चालत नाही? हीच या देशाची शोकांतिका आहे. ज्या दिवशी सर्वसामान्य माणसाला न्याय मिळेल तो दिवस इतिहासात नोंद करून घेणारा ठरेल.

खाजगी नोकरदार आणि सरकारी नोकर दार याच भूमीत जन्म घेतलेले असतात, सरकारी नोकरी वाले अमेरिकेत जन्म घेतलेले नसतात या दोघात आपणच फरक करून विनाकारण वाईट प्रसंगातून काढलेला मार्ग आहे. कोणाला कोणत्या मार्गावरून जायचं आहे ज्याचं त्यांनीच ठरवावं, म्हणून सरकारी नोकरदार जावई शोधणं फार महागात पडू शकतं. एक गोष्ट लक्षात घ्या की जे चांगलं असतं ते लवकर स्वीकारणं कठीण असतं, आणि जे वाईट आहे त्याला तात्काळ स्वीकार करण्याची या जगाची रीत आहे. चहू बाजूने विचार करून नातं जोडावं असं माझं वैयक्तिक मत आहे. या नोकरी वाल्यांना पाहण्याचा आपला दृष्टिकोन निष्फळ ठरवत आहेत. कारण अहंकार त्याचा जबाबदार आहे. आयत्या पिठावर रेघोट्या मारणाऱ्या लोकांना कष्टाची किंमत काय कळणार आहे.

नोकरी न मिळालेल्या युवकांनी काय करायचं त्याला माया, ममता, जिव्हाळा, प्रेम, त्याग आणि निस्वार्थ प्रेम त्यांच्या रक्तात ठासून भरलेलं असतं. जर मुलींच्या

घरच्या माणसांनी हा अट्टहास लावला तर या महाराष्ट्रातील युवकांचे जीवन उध्वस्त होण्यास वेळ लागणार नाही. कारण की लग्न लवकर होत नाही आणि वय पण वाढत जातं त्यामुळे तुम्हीच जबाबदार आहात यात तिळमात्र शंका नाही माझ्या काव्यातून मी आपणास सांगत आहे

सरकारी नोकरीनं फुगवलं पोट,
पडली महागात त्याचीच नोट

तेंव्हाच कळे खाजगी महापर्वत,
इमानदारीने पेटवली मीच मंद वात

सरकारी जावाई जणू विषाचा,
पेला नको त्या विषयाला फुटली वाचा

सरकारी जावई  पाहिजे सर्वांना
बेरोजगार तरुणांना मात्र...कुणीच हो म्हणेना..?

एवढा मोठा परिणाम सरकारी नोकरी वाला जावई शोधताना इतर तरुणावर होत आहे. दिलेल्या काव्यातून स्पष्ट होताना दिसत आहे. नोकरी म्हणता-म्हणता बेकारी तुम्हीच वाढवली. सर्वांनाच नोकरी दिली तर इतर कामे कोणी करायचं हा खरा प्रश्न तुमच्या लक्षात आलं की, लग्न न होऊ शकलेल्या तरुणांसाठी पुष्कळ आहे. पण त्यासाठी आपण पण तेवढेच समजूतदार नागरिक असावं लागतं.

नोकरदार मुलगा शोधताना तो चांगला असेलच कशावरून त्याची हमी घेता? आणि तुमच्याच मुलाला जर नोकरी नसेल तर आताच्या काळात ह्या युवकांची जी हाल होत होते ना तुम्हाला पाहू वाटल का? म्हणून जे आहे त्यात समाधान मानून घ्यायला शिका नाहीतर अपेक्षाभंग पावताना उघड्या डोळ्यांनी तुम्हालाच पाहावं लागेल छोटीशी चूक किती नुकसान करते हे लक्षात आल्याशिवाय राहत नाही. नोकरदारापेक्षा खाजगी काम करणारे सुंदर जीवन जगण्याचे जादूगार आहेत. त्याचा गंध समाज लवकर स्वीकारून घेतो. आलेल्या संकटावर मात करणारा तोच खरा मावळा असतो...!

**- श्री. सुरज अंगुले / जळकोट**
**मो.- ७७१९८७६३१३**

# खरी जात..



कोरोनाने सर्वांची
केलीयं वाताहात
एक मात्र शिकवले
स्वच्छ असावे हात

दूर जरीही शरीराने
मने असो एकसाथ
नमन संस्कार पूर्ण
जोडावे दोन्ही हात

स्वच्छ हो अंतर्बाह्य
तेव्हाचं देशीलं मात
अति सूक्ष्म कुणीही
सहजचं करी घात



करोनाची शिकवण
रहा नीत नियमात
जादू असे रुमालात
जीभेवर हवा हात

माणूस हा लढवय्या
चाणाक्ष जन्म जात
नका करू जातपात
मानवता खरी जात

- हेमंत मुसरीफ / पुणे
मो.- ९७३०३०६९९६

# बीज अंकुरे अंकुरे



माझा शेतकरी राजा
आहे जगाचा पोशिंदा
सदा राबतो शेतात
काढी मातीत कशिदा

त्याच्या राबत्या हाताने
सेवा मातीची करतो
माती होते सुवाशिण
ओटी मातीची भरतो

होता पेरणी शेतात
आल्या पावसाच्या सरी
बीज अंकुरे अंकुरे
कोंब येई मातीवरी

येता मृगाचा पाऊस
गर्जे आभाळ वरती
धारा कोसळता चिंब
झाली सुवासिक माती

माय माती जगासाठी
बीज अंकुर पोसते
धान लागता तासाला
पीक भजन करते



– दत्ता वालेकर / घाटनांदूर
मो.– ९४२१४४०९२२

# कोकण बघायचं ?



पाऊस ...पाऊस... पाऊस.... , प्रत्येकाचा पाऊस वेगळा असतो. त्याचे रंग आणि रूपं वेगवेगळी असतात. पावसाच्या विविध छटा अनुभवायास मिळतात. पावसाची अनेक रूपं आपण बघत असतो, अनुभवत असतो, सोसतही असतो. त्याचा कधी आनंद उपभोगतो तर कधी अनेक अडचणी, संकटांची वादळे. ज्या वयात आपण पाऊस खेळतो, तो पाऊस त्याच वयाचा असतो. ज्या प्रसंगात पाऊस पाहतो तो पाऊस त्या प्रसंगाचाच भाग बनून जातो. ज्या मुडमध्ये आपण पाऊस आपण पाहतो, झेंलतो, तो तितकाच जड किंवा हलका भासतो. कधी आनंदलहरी निर्माण करणारा... तर कधी पाऊस बोचणारा असतो. असा हा पाऊस... बालपणीचा पाऊस... आठवणीतला पाऊस... हिरदातला पाऊस... मनातला पाऊस... नयनातला पाऊस... शब्दातला पाऊस... चित्रातला पाऊस... जीवनातला पाऊस... कवितेतला पाऊस... कथेतला पाऊस... पाऊस चंदेरी, गुलाबी, हिरवा गार पाऊस..! बालपणीचा पाऊस... प्रेमाचा पाऊस... आयुष्याचा भोगलेला पाऊस... सोसलेला पाऊस... असा विविधांगी पाऊस आपण जगत असतो आणि विविध नात्यात त्याला बघत असतो..!

पावसाळा आणि हिवाळा माझे आवडते ऋतू. 'पाऊस' असा शब्द जरी उच्चारला तरी तो मन चिंबचिंब करून जातो. भाव तरल व्हायला लागतात. हिरदाची हिरवाई बहरत जाते. अन सारं भावविश्व ओलाचिंब होऊन जातं. बालपणीचा पाऊस मित्र-मैत्रिणी सारखा आनंददायी, खेळकर, खोडकर, लपाछपी खेळणारा, वाकुल्या दावणारा, गट्टी-फू करणारा, निष्पाप बालका सारखा लगेच हसणारा तर कधी रुसणारा. यौवनातला पाऊस प्रेयसी सारखा आतूर



होणारा, आतुरता वाढविणारा, सदा समर्पित, तर कधी हट्टी, हेकेखोर, वचनबद्ध, तर कधी फसवा. विरह देणारा तर कधी विराणीत बसणारा. पापणीत साचणारा... हिरदात अंकुरणारा ! वृद्धापकाळी तोही अडगळ, वृद्धत्व ही अडगळ ! निकडीचा असूनही नकोसा झालेला ?

जगणं बहाल करणारा असल्यावरही दुर्लक्षित? असो.

आज कागद आभाळ झालंय ! शब्दांच्या विजा चकाकताहेत. विचारांचं वादळ उठलंय. भावविश्व कोलमडाला होतय. हिरडात मेघ दाटताहेत. लेखणीतून हळुवारपणे वाहताहेत. अन पाऊसधारा कोसळताहेत. थेंबाथेंबांनी मृदगंध पसरलाय. हृदयाच्या आसमंतात धुकं दाटलंय... शंकांचं... भीतीचं... असं की, सारं वाहून तर येणार नाही ना ? असा हा पाऊस कधी कुठे बहर आणतो, तर कधी सारं आयुष्य वाहून नेतो. कधी जीवन देतो तर कधी मरण. असा हा बहुरूपी पाऊस, आनंददायी पाऊस, अवखळ पाऊस, फसवा पाऊस, खट्याळ पाऊस, चकवा देणारा पाऊस, ऊन सावलीचा खेळ खेळता खेळता मध्येच राज्य देणारा, तर कधी डाव जिंकणारा पाऊस !

असे अनेक पाऊस आपण अनुभवतो. आपल्या मनात साठवतो. पावसाळ्यातला पहिला पाऊस, मनीचा सुगंध घेऊन येणारा पाऊस, बालपणीची गढूळ पाण्याची डबकी, त्यात फटकन मारलेल्या उड्या, तो चिखल, हातात थप थप करताना वाटणारी मजा, आपण चिखलाचे भरतो म्हणून आपल्या आईने दिलेली सजा... सारं कसं हवंहवंसं वाटणारं. पावसाचं झोडणं आणि आईचं बदडणं, सारखंच गोड ! विजांचा ढोल, ढगांची गाणी, पावसाचे बालगीत गाणाऱ्या अवखळ सरी, नाचत बागडत बालकासवे बालक होतात. अन बालकच होतात मग पाऊस !

असंच अनेकदा मी स्वतः पाऊस झाले. तो आठवणीतला बालपणीचा एक प्रसंग. मी साधारणतः इयत्ता पाचवीत असावी. म्हणजे दहा-अकरा वर्षे वय. पाच बहिणी व तीन भाऊ अशा आठ भावंडातलं मी शेंडेफळ. तेही फारच उशिरातलं. वडिलांची खूप खूप खूप लाडकी. पाचवी पर्यंत वडिलांनी खांद्यावर -कडेवर फिरवलं. अशा लाडाच्या काळातील एक प्रसंग..

मोठ्या बहिणीच्या, म्हणजे आक्काच्या मुलीला, रत्नाला, माझ्याबरोबर शाळेत शिकायला टाकले होते . मध्येच सुट्टीत ईकडे कामानिमित्त आले असता रत्ना बापूजींच्या मागे लागली. लहानच तीही आईची आठवण येत असावी. रत्नासोबत जाण्याचा मीही हट्ट केला. आम्ही दोघी त्यांच्यासोबत भुर्रर जायला निघालो. जाण्यासाठी भरकन तयार झालो. साधारणपणे पावसाळ्याचे दिवस असावेत नक्की.

दोंडाईचा ते पिंपळनेर , पिंपळनेर ते वार्सा फाटा असा बसणे प्रवास केला. तेथून पुढे मात्र "जंगलातून नदी-नाल्यातून, डोंगरावरुन, पायी जावे लागेल" असे

मेहुण्यांनी म्हणताच, भीती, आश्चर्य, गोंधळ चेहऱ्यावर नाचू लागले. कारण घर सोडून फारतर आईसोबत कुठेतरी गावाला जाणे, एवढेच बाहेरचे जग पाहिलेले. दिवाळीच्या सुटीत आईसोबत, मोठ्या बहिणींसोबत शेतात सहज शेंगा तोडायला, खरेतर मजा म्हणून जात असे.

असो, तर त्यातच मेव्हणे, म्हणजे 'बापूजी', आम्हाला म्हणाले की मैलाच्या अंतरावर छोटे छोटे पाडे, म्हणजे घरांचे समूह आहेत, पायी जाता जाता रात्र होईल. जायचे ना ? की येथेच सोडून जाऊ? लहान, लाडकी साली म्हणून चेष्टा केली असावी, हे आता कळतं. तेव्हा मात्र गंगा यमुना डोळ्यातून वाहू लागल्या. पण जायला निघालो, जावे लागेल, म्हणून रत्ना व मी बापूजींच्या मागे मागे चालू लागलो.

फुलाफुलांचा गुलाबी फ्रॉक, लाल रिबीनींची फुले बांधून कानावर अडकवलेल्या दोन वेण्या, पायात स्लीपर, हातात प्लास्टिकच्या बांगड्या, गावाला जायचं म्हणून, मेहंदीची पानं तोडून, दगडाच्या पाट्यावर काथा टाकून, वाटून हातावर मेहंदी लावलेली. आतासारखे डिझाईन तेव्हा काढत नव्हते. सरळ स्लॅब ओतायचा. नखांना दहा पैशाची नख पॉलिश लावलेली पोर, म्हणजे 'छोटी' (बालपणीचे टोपण नाव) नटत, मुरडत हौसेने गावाला जायला निघाली होती. तिच्यासाठी ती वर्ल्ड टूर होती. चालता चालता स्लीपरची फटफट करीत, रस्त्यावरची कोकणी लाल माती उचलून हातात न्याहाळत, धावत-पळत, ठेचाळत, रत्ना सोबत, बापूजींच्या मागे मागे पळत होती. मध्येच नदीतले पाणी कापत, खडकावर, दगडात अडखळत, शेवाळावरून निसटत, सावरत, वाट शोधत होतो. पाडे पाडे पार करत होतो. खांद्यावर, लाडात, ऐटीत गल्लीत फिरणारी पोर, गावाला जाण्याच्या उत्साहात होणारा त्रास विसरून गावाला जाण्याची हौस पूर्ण करत होती. छोटीला कधी एकदा आक्काचं घर येतं, असं झालं होतं. प्रवास आपल्या पावलाएवढाच असतो अशी बालमनाची कल्पना !

विजा कडकडायला सुरुवात झाली. मोकळ्या रानात वादळवारा सु सु करीत कानात शिरत होता. रात्रीची काळोखी वेळ. आभाळासोबत मनाचं आभाळही भरून आलं. विजेच्या कडकडाटाबरोबर डोळे, कान, गच्च बंद केले. अन भीतीने अश्रूंना वाट मोकळी करून दिली. पण त्यांचाही पाऊस झाला. नदी, पाऊस आणि डोळे नेमके कोणते हा प्रश्न पडावा असे झाले. गावाला जायची हौस भागवत वार्सा फाटा, धुपापाडा, पिंपळपाडा, कवडीपाडा, महूपाडा, चावडीपाडा म्हणजे शेनवड येऊन पोहचलो.

येता येता नदी-नाले, खडकं, डोंगर, टेकड्या ओलांडत कृष्णरातीच्या ढगाळल्या वादळी वेळा... विजाळ प्रसंग मनातल्या गाभाऱ्यात भीतीसवे साठत होते. त्याचवेळी मन अन पाय आक्काचं घर आतुरतेने शोधत होते. साधं बाजारात, दळण दळायला,

किराणा दुकानावर काही आणायला सांगितल्यावर तणातणा पाय आपटत तोफांड करणाऱ्या छोटीला बापानं पटकन उचलून कडेवर उचलून घ्यावं, ती छोटी आज मोठ्ठा प्रवास करत तब्बल 3/4 तास पायी चालली होती.

बापुंजी सारखं - पळा, पळा.. करीत होते. रत्नाही थकली होती. एकमेकांचा हात धरून अन पावसाचे बोट धरून पळत होतो. अंधारलाटांनी जोर करताच विजाळलाटा त्यांना तात्पुरते वाहून नेत होत्या. त्याचक्षणी नजरेच्या कॅमेऱ्यात कुडाच्या काड्यांच्या झोपड्या, कौलाची छते, टेकड्यांवरच्या झोपड्यातले मिणमिणते दिवे पाहून मनात थोडी उभारी भरत असे. चुडेल भुतांच्या गोष्टी ऐकून अंधरल्यावेळी आईच्या, बहिणीच्या आधाराशिवाय, लाईटाच्या गावातल्या घरातून घराबाहेर न येणारी छोटी आज काळोखाच्या प्रवासाला पावसाच्या गाडीवर निघाली होती. जंगल, झाडं-झुडुपे, वेली, काटेरी बाभळी रस्त्याचा चढउतार, खड्डे पायाने पांघरत गावाला चालली होती.

मधेच दिसणारे दिवे, झोपड्या, कोकणी माणसांच्या कोकणी आकृत्या, अन नवा...

पहिला... दीर्घ पाऊसप्रवास....चंदेरी विजा...

अन चांदणवारा..अंगावर झेलत 'घर आता जवळ आलं..' ऐकताच पाय आशेने नवा जोर धरत होते.

मध्यरात्र उलटली होती. रातकिड्यांची किरकीर उगाच मनात भीती पेरत होती. पायाची, मनाची गावाला जायची हौस पुरती भागली होती. म्हणून "बापूजी थोडे बसू का ?" म्हणताच -

"अरे, चल चल, आले बघ आपलं घर" म्हणत, अंधारातच शिरून कुठेतरी टकटक केले. दार उघडलयावर आक्काला समोर पाहताच माझ्या चेहऱ्यावर हास्याची एक रेघ उमटली. पण अंधारात अस्पष्ट झाली. आक्काचा स्पर्श बोलू लागला. दोघींना आक्काने जवळ घेतले. टॉवेलने आमचे ओले अंग, केस पुसले. पटकन कपडे बदलून दिले. अंगावर गोधडी दिली. काहीतरी खावं म्हणून ताटात वाढलेलं पोटात ढकलत ढकलत झोपेने डोळे भरले. केव्हा डोळ्यांचं दार बंद झालं मनाला कळलं देखील नाही.

सकाळी मात्र पाऊस नाकात, डोक्यात घर करून होता हे शिंकांवरून कळले. गरम पेज, तापाची गोळी घेत त्यांना पळवले. रात्रीचं अंधारातले अस्पष्ट गाव, नव्या सूर्याच्या नव्या किरणांनी तेजाळलं, प्रकाशलं. नवा उत्साह, नवी उमेद, नव्या आनंदलहरी ऊर्जा निर्माण करीत होते. अंतरा-अंतरावर कुडाची, कौलं ठेवलेली शेणमातीने सारवलेली घरं पाहून अचंबा वाटला. एकाच साडीचे दोन भाग करून कमरेवर, अंगावर घेतलेल्या, सावळ्या रेखीव, आकर्षक स्त्रीया न्याहाळत होती. वेगवेगळे दागिने, वेगळा पेहराव पाहून त्यांच्यावरची नजर हटत नव्हती. त्यांच्यापेक्षा

त्यांच्याभागात मी वेगळी, म्हणून त्या माझ्याकडे बघत होत्या. मी हसले की त्याही गोड हसून भेट देत होत्या. तीच आमची अंतरीची भाषा होती. जवळच विहिरीवर पाणी शेंदायला आलेल्या कोकणी रूपातल्या मोहक बायकांचे तांब्या पितळाचे, मोठाले चकचकीत घासलेले हंडे, कळश्या, घागरी, तसेच विणलेल्या वेगळ्या धाटणीच्या चुंबळी मन वेधून घेत होत्या. मध्येच पावसाच्या सरी स्पर्शून जात होत्या. पेरूची, आंब्यांची, आवळ्याची घराजवळच झाडं पाहून आनंद होत होता. कोकणी पोरं-पोरी सरसर झाडावर चढत होते. रानातली पोरं रणासारखीच रंगरूप, तरतरी, काटकपणा घेऊन जन्मलेली होती.

जवळ जवळ आठवडा सरत आला होता. पाऊसही आमच्यासारखा मुक्कामी पाहुणा होता. डोंगर माथ्यावरून उगवणारे सुर्य, रात्रीची चंद्राची चंदेरी चमक, मोकळे आवार, छोटे छोटे पाड्यांचं गाव, जे अर्ध्या एका तासात पाहून फिरून संपावं असं. पण दिवसभराचं समाधान मिळावं इतकं सुंदर ! झोपड्यांभोवतीची भाजीपाला लागवड, गोल लाल भोपळा, ज्याला चक्की म्हणतात. भुसकाकडी जी कापल्यावर मधला गर भुसभुशीत, जिभेवर विरघळणारा, चविष्ट लागावा.

प्रत्येकाच्या घरी कोंबड्या. त्यांना कोंडण्याची गरज नाही. लाकडाच्या तिपाईवर त्यांचे घर. स्वतः कोंबड्यांनीच सवयीने त्यात जाऊन बसावे. कोकणी, धान्य दळण्याचं जातं वेगळंच. चार माणसांना हलवता येणार नाही एवढं मोठं. पण त्याला अशी कळ बसवलेली की, पीठ जाड, बारीक, हवं असेल तसं करता यावं. मक्याच्या, नागलीच्या भाकरी, खुरचाणीची चटणी, उडीद भाजून पापडपिठे, अळूच्या कंदाचं पिठलं ह्या आहारातील जिनसा वाचूनच तोंडाला पाणी सुटावं. तसेच रानभाज्यात- पेराची भाजी, फांगची भाजी, उलुशीची भाजी, डोंबळीची भाजी ही नावं ऐकूनच नवल वाटे. त्या चाखून पाहण्यात अन बोटं चाटून खाण्यात वेगळीच मजा वाट. घराजवळ पाहिलेली उंबर, करवंद, पायर ही फळझाडे पाहून दिवसभर त्यांच्या अवतीभोवती मजेत उड्या मारायचो. तांदळात-चिमणसाळ, सुकवेल, भवाड्या, खुशबू, कोलम या जाती पहिल्यांदाच ऐकल्या.

ज्या नव्या मैत्रिणी मिळाल्या, त्या मुलींची नावं- कस्तुरी, उमी, ठुमी, गोतमा, ढेमा, यमुना, जसुदी, कोमाबाई, झिंगी, कलूबाई, उलीबाई, नागीबाई, नबीबाई, झिपरीबाई इत्यादी गावगंध सांगत होती. रानगंध देणारी माणसांची नावं- जन्या, हाड्या, काळघ्या, वलांजू, जंगलू, टकाराम, मकाराम, छगण्या, मगण्या, लेंडाड्या, टेटाड्या, गटल्या, सोमा, भामा, इत्यादी ऐकून नवल वाटत होते .

कोकणी पाड्यावरचे कोंकणीसंवाद, त्यांची मधुर, प्रेमळ, आपुलकीने केलेली चौकशी अजूनही कानात गुंजते. जसे- “आयावाया, रत्ना ई गयी?” - (“अगबाई, रत्ना आली? “)

“हाई पोरी कोण हं?”

--- “बाईनी बहीण हं?”
(ही पोरगी कोण आहे? बाईची बहीण आहे?”)
“आमना गाव आवडं तुला? गमं का नई?”
(“आमचं गाव आवडलं तुला? करमतं की नाही?”
“आमनी घर बी येजस” (आमच्या घरीपण ये)
“कुकडी आवडं खावाला?” (कोंबडी आवडते खायला?)
“कंग गयेल?” (कुठे गेली होतीस?)
“कवं येशील?” (केव्हा येशील?)

असे थोडे थोडके लक्षात राहिलेत, पावसासवे...! दरवर्षीचा पाऊस त्या पावसाची आठवण करून देतो.

असे हे ओलेचिंब... पाझरणारे, झिरपणारे सुट्टीचे दिवस, डोंगरमाथ्यावरच्या लालमातीत कसे रंगीत होऊन गेले कळलेच नाही. पावसाचे दिवस असल्याने थोड्या-थोड्या वेळानंतर थंडवारा, पावसाच्या शितल धारांचा अभिषेक होणं, पुन्हा पावसात भिजणं... अशा ओल्या कोरड्या भिजपावसाची मजा मनसोक्त लुटली.

साधारणतः ते 1977/78 साल असावं. एवढ्या वर्षांपूर्वीचा रानपाऊस जसाच्या तसा मन:पटलावर कोरला गेलाय. असा हा पहिला पाऊस ....न्याराच पाऊस... नद्या ओहोळातून खळखळणारा ...आभाळातून येणारा, मनात विसवणारा ...हृदयात पेरलेला पाऊस ...

आज अंकुरलाय.....तोही कोवळाकंच...
अगदी माझ्या बालपणासारखाच !

**- लतिका चौधरी / दोंडाईचा**
**मो.- ९३२६६५६०५९**

# या भारत देशा..



पाहा माझी ही भूमी
कशी आहे नवरत्नांची खाण
माझी ही भूमी
भारत देशा कणखर देशा ||

कशी आहे पुण्यवान
ही भूमी हा भारत माझा
कसा उभा आहे सन्मानाने
देशास दिशा देई ||

कित्येक पावन लोक झाले
माझ्या भारत देशात
येथे जन्मले भगतसिंग आणि
आण्णाभाऊ क्रांतिकारी थोर ||

यांनी साहित्यातून दुःख
उपेक्षितांचे मांडले
अशी नवरत्नांची ही खाण
भारत भूमी ठरली महान ||

- शुभम येरुणकर / चिंचवड, पुणे
मो.- ९८९०६८००९३

# बांधिलकी



जन्मलो माणूस म्हणून तेव्हा
समाजाचं काही देणं लागतं,
दिलं-घेतलं, मिळवलं
इथेच ठेऊन जावं लागतं।

आता खरी वेळ आहे
माणसाने-माणसाशी,
माणसासम वागण्याची
एकनिष्ठ होऊन कर्तव्याशी।

दुष्काळ, वेदनांच्या किंचाळ्या
जगात गुंजत आहेत,
वाट सापडेना घराची
माणसं बेघर झाली आहेत।

जपून समाज बांधिलकी
द्यावा हात मदतीचा,
होऊन सोबती, सारथी
पाळावा धर्म माणुसकीचा।

हृदयात बांधले ज्याने
मानवता, आपुलकीचे घरद्वार,
जगी तोची धनवान दाता
करतो दिन-दुबळ्यांचा उद्धार।

जपून बांधिलकी सदा-सर्वदा
करावी संकट, दुःख निवारना,
निःस्वार्थ सेवा करावी मनोभावे
सार्थ करण्या या मानव जन्मा।

**- मंदा पडवेकर / चंद्रपूर**
**मो.- ९८३४८९५२३८**

# विडंबन



स्नेहहीन ज्योतिपरी
मंद झाला शुक्रतारा
नेहमीच्या कामासाठी
चल सखे कर त्वरा ।।

आगगाडी एक एक
खचाखच भरलेली
स्टेशनात येई जाई
कर्मभूमी हीच सखे ।।

काढ त्याच्या खिशातील
तुझे सराईत हात
सावजाच्या पलिकडे
खाकी कपड्यात भूत ।।

पकडले जरी तुला
घोळक्यानं जमावात
कांगावा तू करायचा
अंगचटी येतो मेला ।।

'धक्का मला मारला हो '
ओरडावे खोटे खोटे
जरी नसे अश्रू नेत्री
रुमालाने पूस डोळे ।।

अभिनय रडण्याचा
खराखुरा वाटताच
सावजाच्या पाठीपोटी
बसतील लाथा बुक्के ।।

अनुभवी बोल माझे
स्मरणात राख नित्य
पैशावर दुसऱ्यांच्या
सफाईनं मार हात ।।

पोलिसाच्या पावलांची
चाहूल ये कानावर
खाड खाड पदरव
काळजाचं पाणी पाणी

गर्दीविना लोकलच्या
डब्यामधे चढू नको.
पकडले जाऊ तिथे
आणि ठरू खिसेकापू ।।

काढ त्याच्या खिशातील
तुझे सराईत हात
सावजाच्या पलिकडे
खाकी कपड्यात भूत ।।

**- शरद पुराणिक / नाशिक**
**मो.- ९८९०३८६६६२**

# कपबशीच्या कळा



त्यावेळी मी कंधार तालुक्यातील सोनखेड येथील मा.आ.भाई केशवराव धोंडगे यांच्या श्री शिवाजी विद्यालयात माध्यमिक शिक्षक होतो. श्री बी.एल.भगत आमचे मुख्याध्यापक. त्यावेळी सोनखेड पंचक्रोशीत आमची एकमेव माध्यमिक विद्यालय असल्यामुळे आजुबाजूच्या जानापूरी, बामणी, दगडगाव, बेटसांगवी, हरवळ, दापशेड, पिपरणवाडी, शेलगाव, भेंडेगाव, पिंपळगाव इत्यादी सारख्या जवळपास पंधरा-वीस गावाहून विद्यार्थी दोन-दोन, तीन-तीन मैल ते सात-आठ मैल दुरून पायपीट करीत आमच्या शाळेत यायचे. हे सर्व पाहून आमच्या शिक्षकांना आनंदही व्हायचा आणि वाईटही वाटायचे. आनंद यासाठी की, आता सर्वसामान्य बहुजनांनाही शिक्षणाचे महत्त्व पटून त्यांनी शाळेची वाट धरली आणि वाईट यासाठी वाटायचे की, एवढ्या लांबून ही मुलं पावसाळ्यात पाणी-पाऊस आणि वीज-वाऱ्यांचा मारा सहन करून छत्री-रेनकोट वगैरे शिवाय चिखल तुडवित आणि उन्हाळ्यात उन्हाचे चटके सोसित अक्षरशः अनवाणी पायांनी चुलीवरील तापलेल्या तव्यासारख्या फुपूवरून 'लाड खेळत' शिक्षणासाठी शाळेत येत होती. त्यामुळे त्यांचे कौतुकही वाटायचे.

परंतु यामधील काही मुलं मात्र शाळेस अधुनमधून दांड्याही मारायचे आणि दुसरे दिवशी वर्ग शिक्षकांनी किंवा विषय शिक्षकांनी शाळेत न येण्याचे कारण विचारल्यानंतर ते 'वडीलाने शेताला पाठविले' किंवा 'आईनेच काहीतरी काम सांगितले' म्हणून सांगायचे. अर्थात त्यांची ही कारणं कधी कधी खरी असायची तर कधी कधी आम्हा शिक्षकांना विद्यार्थी खोटं बोलत असल्याचे जाणवायचे. म्हणून शाळेच्या मासिक बैठकीत विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीचा विषय निघाला की, ह्यावर हमखास चर्चा व्हायची. मग यावर उपाय म्हणून आमच्या मुख्याध्यापक साहेबांनी रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी पाच-सहा शिक्षकांना एका रविवारी मडकी, दापशेड तर दुसऱ्या रविवारी वाडी, शेलगाव, भेंडेगाव, तर तिसऱ्या रविवारी बोरगाव, दगडगाव असे ठरवून त्याप्रमाणे ह्या गावांना सकाळी विद्यार्थ्यांचे पालक शेतावर जाण्यापूर्वी भेटी द्यायच्या असे ठरले.

आमच्या या पदयात्रेमुळे दोन महत्त्वाच्या गोष्टी साध्य व्हायच्या. पहिली गोष्ट म्हणजे मुख्याध्यापक शिक्षकांच्या अश्या भेटीमुळे विद्यार्थ्यांना आपले शिक्षक आपल्या गैरहजेरीविषयी व आपल्या एकूणच शैक्षणिक प्रगतीविषयी आपल्या आई-वडीलांना सांगतील म्हणून ते पुन्हा पुढे चालून शिक्षकांशी खोटे बोलणे तर टाळायचे शिवाय त्यांचा अभ्यास सुधारण्याचाही प्रयत्न करायचे.

दुसरी गोष्ट म्हणजे अश्या भेटीमुळे शिक्षक-पालक विद्यार्थी ह्या त्रिकोणात जिव्हाळ्याचे नाते निर्माण होऊन ह्याचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीही हातभार लागायचा आणि अश्या रितीने रविवार म्हणजे सुट्टीचा दिवसही सत्कारणी लागायचा.

आमची ही मोहीम म्हणा, शैक्षणिक सहल म्हणा किंवा दिंडी बहुधा दिवाळीच्या सुट्यानंतर निघायची. त्यासाठी आम्ही शिक्षकांनी अदल्या दिवशी शनिवारीच विद्यार्थ्यांना ह्या गोष्टीची कल्पना दिलेली असल्यामुळे विद्यार्थीही मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने आमचे स्वागत करायचे. तसेच विद्यार्थ्यांच्या आई-वडीलांनाही प्रचंड अग्रुप वाटायचे. मुलं तर आम्ही गावात पोहोचतो न पोहोचतो तो 'सर, आधी माझ्या घरी चला'... 'नाही बे, आधी माझ्या घरी' म्हणू म्हणू आग्रह करायचे. मग कोणाच्या घरी चहा, कोणाच्या घरी दुध तर कोठे पोहे वगैरेही व्हायचे आणि हे सर्व होताना विद्यार्थ्यांच्या उपस्थिती आणि अभ्यासाबरोबरच पीक-पाणी, शेतीभाती आणि कौटुंबिक बाबीविषयीही आस्थेने विचारपूस व्हायची. थोडक्यात आमची ही शाळा बाह्य शाळा सर्वांनाच एका आगळ्याच आनंदी विश्वात घेऊन जायची.

परंतु ह्या आगळ्या वेगळ्या आनंदाबरोबरच क्वचित प्रसंगी एखादा दुसरा प्रसंग ह्या आनंदात विरजन पाडणाराही अनुभवायला मिळायचा हेही नाकबूल करून चालणार नाही. तसा मी कधीही विसरू न शकणारा एक प्रसंग -

गाव- महादेव पिंपळगाव, त्या असामीचे नाव मात्र आता आठवत नाही. परंतु गृहस्थ माळकरी. घर चांगलं पूर्वीच्या पद्धतीने म्हणजे चुना दळून विटांत बांधलेले. भली मोठी बैठक. बैठकीमागे मोठे अंगण, अंगणात तुळसी वृंदावन त्या मागे ओसरी आणि ओसरीमागे पुन्हा घरमालकाचे मुख्य घर. बैठक दोन समान भागात विभागलेली. मधोमध पूर्वमुखी मुख्य प्रवेशद्वार. दुसरे दार उत्तरेकडून. बैठकीत भिंतीत असलेल्या खुंटीस टाळ, विणा, मृदंग वगैरे साहित्य. आम्ही बैठकीत पदार्पण करताच विद्यार्थ्याच्या पालकाने 'रामराम, रामराम, या या' म्हणून तोंडभरून स्वागत केले. आम्ही सर्व स्थानापन्न झाल्यावर पूर्वीप्रमाणेच विद्यार्थ्याच्या अभ्यासाविषयी, त्याच्या इतर बहिण भावांच्या शिक्षणाविषयी विचारपूस इत्यादी विषयी चर्चा चालू असताना माझी नजर आपसुकच बैठकीच्या नाटींवर लिहिलेल्या सुविचार म्हणींवरून फिरू लागली.

"रामराम, या बसा."

"नाही निर्मळ मन। काय करील साबण।"

"हरीमुखे म्हणा हरी मुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी"

"नामे होय बृह्मज्ञान। भक्ति मुक्ति नामे जाण।।"

"विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद धर्म अमंगळ।।" इत्यादी...

त्याचवेळी घरच्या आठव्या वर्गात शिकत असलेला एक विद्यार्थी उजव्या हातात चहाची कॅटली आणि डाव्या हातात कपबशी घेऊन आला. आमच्याच शाळेत त्याच विद्यार्थ्याच्या वर्गात शिकत असलेल्या दुसऱ्या विद्यार्थ्याने पाण्याचा एक जग आणि ग्लास आणला. पाणीवाल्या विद्यार्थ्याने अगोदर आम्हा सर्वांसमोर पाण्याचा ग्लास धरून पाणी पिण्याबद्दल चौकशी केली. परंतु ह्या पूर्वी अगोदरचे सर्वांचे दोन तीन ठिकाणी चहापाणी झाल्यामुळे पाणी कोणीही घेतले नाही. म्हणून चहावाल्या मुलाने आणलेल्या कपबशीत चहा ओतला आणि तो आमच्या मुख्याध्यापक साहेबांच्या समोर धरला. परंतु अगोदर दोन तीन ठिकाणी चहा झाल्यामुळे मुख्याध्यापक साहेबांनी कपातील थोडासा चहा बशीत ओतून उरलेल्या

चहाचा कप दुसऱ्या सहकारी शिक्षकासमोर धरला. त्या दोघांचा चहा संपताच दुसऱ्या मुलाने ती बशी आणि कप घेऊन त्याच्या जवळील पाण्याने धुवून त्याच कपबशीत चहा ओतून ती कपबशी माझ्यासमोर धरली. मग मीही साहेबांचे अनुकरण केले आणि बशीत थोडासा चहा ओतून तो कप माझ्या दुसऱ्या सहकारी शिक्षकास दिला. आमचा चहा झाल्यानंतर त्या मुलांनी ती कपबशी धुतली आणि परत त्याच कपबशीत चहा ओतला. ते पाहून यावेळी मात्र माझ्या डोळ्यात वेगळाच किडा वळवळू लागला. 'घर मालक तर चांगले सधन दिसतात, परंतु कपबशी मात्र एकच? तीही सोसोच? कसे काय? बरे, ग्लासही एकच? एक वेळ कपबशी असेल एकच, परंतु अश्या घरी ग्लास तर डझनावारी स्टीलचे वेगळे, पितळेचे पिवळेजर्द वेगळे. एका पंगतीस एका वेळी एकाच प्रकारचे आणि आकाराचे तर दुसऱ्या वेळी दुसरे वेगळ्या प्रकारचे असतात. मग हे काय गौडबंगाल असेल म्हणावे?'

......हंऽ!' लगेच तोच किडा पुन्हा हुंकारला- 'बाऽट! बाटाबाटी!!' म्हणून कपबशी. न जाणो आमच्यात कोणी अस्पृश्यच असेल काय भरोसा? मग प्या एकाच कपबशीने! शिवाय आमचे चहापाणी झाले की ती कपबशी पुन्हा जाऊन बसणार घराच्या भिंतीतल्या एका ठराविक देवळीत, आणि पुन्हा अवतीर्ण होणार अश्याच - दुसऱ्या प्रसंगी!'

'हो. हेच खरे गौडबंगाल!' माझ्या मनातील किडा पुन्हा वळवळला.

*****

दुसराही असाच एक मन विषन्न करणारा प्रसंग. मागच्याच आठवड्यात घडलेला-

त्या दिवशी नांदेडच्या अंबिका मंगल कार्यालयात माझ्या एका विद्यार्थ्यांचे लग्न होते. लग्न समारंभ आटोपल्यानंतर जेवणासाठी प्लेटा उचलण्यासाठी 'तुला-मला'ची गर्दी थोडीसी कमी होऊ द्यावी आणि नंतर आपण तिकडे जावे असा विचार करून थोडावेळ मी लग्न लावलेल्या ठिकाणीच खुर्चीतल्या खुर्चीत तेथेच बसून राहिलो. तोपर्यंत इकडे स्टेजवरील गर्दीही कमी होणार होती. म्हणजे प्रथम नवरदेव विद्यार्थ्यास आशिर्वाद द्यावेत आणि मगच जेवण करणे अधिक चांगले. असाही एक विचार होता. म्हणून तोपर्यंत कधी समोरील नवरी-नवरदेवाकडे तर कधी आजू-बाजूस कोणी ओळखीचे दिसते का म्हणून उगीचच नजर फिरवित होतो, त्याच वेळी देविदास काळे नावाचा माझा कॉलेजचा एक मित्र माझ्याकडेच टक लावून पहात असलेला दिसला आणि दोघांची नजरानजर होताच तो बसलेल्या खुर्चीमधून उठून माझ्याजवळ येत म्हणाला

'आपण आनंद कदम न?'

'आणि आपण देविदास काळे? करेक्ट?'

'अगदी करेक्ट! कित्ती वर्षांनी भेटतोय रे कदम आपण?' असे म्हणत म्हणत मग दोघेही एकमेकांना कडकडून भेटलो. नंतर लगेच 'आपण' वरून 'तू', 'आरे तुरे' आणि 'आबे-तुबे' वर येत कॉलेजच्या मित्रमैत्रीणी, चेष्टा-मस्करी करण्यात किती वेळ गेला ते काही कळालेच नाही.

देविदास नवरदेवाच्या वडीलांच्या समाज कल्याण कार्यालयात असल्यामुळे तो परभणीवरून नांदेडला आला होता आणि लग्न समारंभ झाल्यानंतर त्याला परत परभणीला

जायचे होते. म्हणून तो म्हणाला, 'बरं, चल जेवण करू, कितीही गप्पा मारल्या तरी ते दिवस काही परत येणार नाहीत, की पोट्ट्यांची आठवण करून त्याही भेटणार नाहीत, होय ना?'

'खरय, चल,' म्हणून आम्ही दोघे जेवणाच्या प्लेटस घेण्यासाठी निघालो. मग जेवण करीत करीत एकमेकांच्या पत्त्याची आणि मुला-मुलींच्या शिक्षण, नोकरी विषयी बोलता बोलताच तो एकदम काही तरी आठवून म्हणाला-

'आरे, आनंद तुला तो गणेश देशमुख आठवतो का?'

'गणेश देशमुख ?' कोण गणेश देशमुख म्हणून मी आठवण्याचा प्रयत्न केला, परंतु कोण गणेश देशमुख तो काही मला आठवत नव्हता. ते पाहून देविदास म्हणाला, 'आरे, तो आपल्या सोबत सरस्वती हॉटेलमध्ये जेवायला होता तो. फिस्टच्या दिवशी बासुंदी केली की तो वाटीच तोंडाला लावायचा तो. त्याने एकदा तुझ्या ताटातील वाटीही पिऊन टाकली होती! तो...

'हां हांऽ तो? 'गोडखाऊ गण्या...'

'हं हं. अगदी खरं. गोडखाऊ गण्याच म्हणायचे आपण त्यास.'

'बरं, त्याचं काय?' जेवणासाठी एक कोपरा धरून आम्ही दोघे जेवण करीत करीतच बोलत होतो.

'आरे, बेटा गण्या फारच लकी! त्याची दोन्ही मुलं युकेला सेटल झालीत.'

'काय सांगतो?' ते ऐकून मलाही गण्या एवढाच आनंद झाला.

'शपथ आणि तो आता येथेच - नांदेडमध्येच राहतोय.'

'काय सांगतो?' मी उत्सुकतेने विचारले. 'नांदेडमध्ये म्हणजे नक्की कोठे?'

'माणिकनगरमध्ये. कालच मी फोन केला होता त्यास तर लग्न आटोपल्यानंतर ये म्हणाला घराकडे. तेव्हा आता तुही भेटलास तेव्हा दोघेही जाऊ त्याच्याकडे. गप्पा मारू थोडा वेळ. शिवाय माझ्या गाडीलाही थोडा वेळ आहे...'

'अरे, मग अगोदर माझ्याच घरी जाऊ, मग गणेशकडे जाता येईल.'

'हो. परंतु अगोदर गणेशकडे जाऊ आणि नंतर तुझ्याकडे. म्हणजे मग इकडून इकडेच स्टेशनकडे जाता येईल.'

'ठिक आहे.'

मग जेवण आटोपून आणि नवरदेव विद्यार्थी व नवरदेवाच्या वडीलास भेटून आम्ही दोघेही अंबिकामधून बाहेर पडलो आणि ॲटोची वाट पाहू लागलो. थोड्या वेळानंतर एक रिकामा ॲटो आला. देविदासनेच ॲटोवाल्यास हात दाखवून थांबविले आणि गणेशचा पत्ता सांगून भाडे वगैरे ठरविले आणि निघालो माणिकनगरकडे. थोड्याच वेळात ॲटो माणिकनगरमधील 'कैवल्य' नावाच्या प्रशस्त बंगल्यासमोर उभा राहिला. देविदासनेच ॲटोवाल्यास भाडे दिले आणि बंगल्याचे गेट उघडून आत प्रवेश करीत भिंतीवर असलेले बेल-बटण दाबले.

गणेश घरीच होता. त्यानेच दार काढले.

'या, याऽ' उभयंताचे स्वागत करीत तो म्हणाला.

'बरं, याला ओळखले की नाही?' माझ्याकडे हात करीत देविदास गणेशला म्हणाला.

'हाऽऽ...?' 'कदम्या' मी मध्येच माझी ओळख करून देत म्हणालो.

'हंऽ कदम, आनंद कदम. छान. अरे, किती दिवसांनी भेटतोय आपण?'

'करेक्ट. हा पण इथेच नांदेडलाच रहातो. तुम्ही नाही भेटला अगोदर?' आश्चर्य वाटून देविदास म्हणाला.

'नाही नं. अरे, मागच्या वर्षीच मुलांनी हा बंगला बांधून दिला. तो पर्यंत मी बेघरच होतो ना,' गणेश स्पष्टीकरण देत म्हणाला.

'ऐश आहे बाबा तुझी...'

मग पुन्हा किती तरी वेळ आम्ही कॉलेजमधील मुलं-मुली, प्राध्यापक यांच्या विषयी निरनिराळे 'फिश पाँड' आणि खाणावळीतील जेवणाविषयीही भरभरून बोलत होतो. परंतु बराच वेळ झाला तरी चहापाण्याचा वगैरे काहीच मागमुस लागत नव्हता. म्हणून देविदास स्वतःच म्हणाला.

'अरे, एवढ्या दिवसांनी आपण भेटतोय, काही चहा-पाणी वगैरे करणार की नाही?'

'अरे, बोलण्याच्या ओघात- सॉरी घरी आम्ही दोघेच आहोत न...' दिलगिरी व्यक्त करीत गणेश म्हणाला.

'वहिनी आहेत न? का मीच येऊ किचनमध्ये' सोफ्यावरून उठत देविदासचा टोमणा.

'अरे, नको नको. ती आहे, ती आहे. मी आलोच. तू बैस' म्हणत गणेश आत किचनकडे गेला.

'जेवण वगैरे झालं रे बाबा, फक्त चहाच सांग' अगाऊ माहिती देत देविदास म्हणाला.

'बाकी तू काही बदलला नाहीस देविदास,' त्याच्या स्वभावावर टिप्पणी करीत मी

'असं का म्हणतोस...'

'घ्या. पाणी घ्या तोपर्यंत' हातातील पाण्याचा ट्रे समोर करीत गणेश.

त्यानंतर थोड्याच वेळात गणेशच्या पत्नीने ट्रेमध्ये चहा आणला. ट्रेमध्ये एक कपबशी आणि दोन फुलपात्रात चहा होता, त्यातील कपबशी उचलून त्यांनी माझ्यासमोर धरली आणि फुलपात्रांचा ट्रे त्या दोघांसमोर ठेवला!

हा अजब प्रकार पाहून एकदम माझ्या काळजामधून सळळकन असी काही जोरदार कळ उठली की काही विचारूच नका!

तरीही मी मला सावरीत वेळ मारून नेत एवढेच म्हणालो, 'अरे व्वा! तुम्ही दोघेही ओमशांतीत वगैरे गेलात की काय?'

यावर त्या दोघांचेही चेहरे असे काही पडले की वापरून फेकून दिलेले विटाळाचे बोळेच!

आणि मला काय वाटले ते मात्र आपण माझ्या काळजातील तडकलेल्या कपबशीलाच विचारा!

**- आनंद कदम / नांदेड**
**मो.- ९८८१७८७६८४**

# व्यक्ती परिचय

## सर्वाधिक वयाचे सक्रीय मराठी साहित्यिक



दिवा दीपोत्सव हा ज्येष्ठ साहित्यिक अशोक दादा पाटील या एकमेव लेखकाच्या साहित्याचा समावेश असलेला आणि एकाच कवीच्या सर्वाधिक कवितांचा समावेश असणारा 'दिवा दीपोत्सव' प्रकाशित केल्यामुळे रसिक काव्यप्रेमी, अभ्यासू, चोखंदळ वाचकांना विशेष साहित्य मेजवानी 'दिवा दीपोत्सव' या दिवाळी अंकाच्या निमित्ताने प्राप्त झाली.

एकाच कवीच्या सर्वाधिक कवितांचा एकाच दिवाळी अंकात समावेश करून एक नवा विश्वविक्रम प्रस्थापित करणारे कवितासागर पब्लिशिंग हाउस, जयसिंगपूर या प्रकाशन संस्थेचे संस्थापक व प्रकाशक डॉ. सुनील दादा पाटील जेव्हा या विश्वविक्रमी विशेषांकाचे अतिथी संपादकीय लिहिण्यास आग्रह करतात, मला तो सन्मान प्राप्त करून देतात तेव्हा त्यांच्या कार्यास हातभार लावण्यास मिळालेल्या संधीला मी लगेच होकार देऊन लिहिण्यास सुरुवात केली.



कै. अशोक दादा पाटील

१११ वर्षांच्या दिवाळी अंकाच्या इतिहासातील हा एकाच कवीच्या सर्वात जास्त कवितांचा समावेश असलेला व संपूर्णपणे जाहिरात विरहित प्रकाशित होणारा एकमेवाद्धितीय असा दिवाळी अंक ठरला. दिवाळी म्हणजे तेजाचा उत्सव. दाट अंधारातून उमलणाऱ्या प्रकाशफुलांचा महोत्सव. आनंदाच्या विविध रंगांची उधळण करणारा, सकारात्मकतेचा प्रसाद ओंजळीत ठेवणारा सण. बदलांचं महत्त्व अधोरेखित करणारा क्षण. बदलांशी सहजपणानं मिसळून - समरसून जाणारा नवा अध्याय म्हणजेच दिवाळीचा महाउत्सव होय. 'कवितासागर इंटरनॅशनल मिडिया ग्रुप' चे संस्थापक, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सुनील

दादा पाटील यांच्याबाबत मी असे म्हणेन - 'दीप दाविला तुवा प्रेषिता - उजाळाया तमा' कवितांच्या अथांग सागरास...

खरं म्हणजे ज्येष्ठ साहित्यिक अशोक दादा पाटील या व्यक्तिरेखेला जवळून पाहण्याचा योग माझ्या जीवनात आला याला मी माझे भाग्य, नशीब समजतो. मी जयसिंगपूरमध्ये ज्या हेरवाडे कॉलनीत राहतो त्याच कॉलनीत तेही राहतात हे मला त्यांची तीन पुस्तके प्रसिद्ध झाल्यानंतर समजले. त्यांच्याशी बोलायचो, भेटायचो पण हेच ते अशोक दादा पाटील ज्यांनी आपल्या वार्धक्याच्या काळात, अर्थात ९४-९५ वरील वयात एका पाठोपाठ एक कथासंग्रह, कवितासंग्रह, समीक्षणे, व्यक्तिचित्रणे, अनुभव लेखन, आत्मचरित्र आणि लघुकादंबऱ्या लिहिण्याचा सपाटा लावलेला होता हे मला माहित नव्हते आणि जेव्हा त्यांच्या पुस्तकांचे प्रकाशक डॉ. सुनील दादा पाटील यांनी मला योगायोगाने अशोक दादा पाटील समोर आणले तेव्हा त्यांची, "हेच ते अशोक दादा पाटील" अशी ओळख करून दिली. तेव्हा मात्र मी, "अरे, यांना तर मी रोज सकाळी फिरायला जाताना भेटतो...!" असे न कळत शब्द पुटपुटलो. मी अचंबित झालो.

एक प्रमाणापेक्षा उंच, हडकुळी, ताठ उभी, ९४-९५ वर्षे वयाची व्यक्ती आणि तिने केलेला एवढा मोठा लेखन प्रपंच या सर्वांचे आश्चर्य मी चेहऱ्यावरून लपवू शकलो नाही आणि न कळत माझे दोन्ही हात त्यांच्या चरणाकडे वळले. मी लवून त्यांना नमस्कार केला. त्यांनी ही मला जवळ घेतले आणि प्रेमाने आलिंगन दिले. त्यांना भेटण्यापूर्वीच त्यांची दोन चार पुस्तके मी वाचून काढली होती. आज, आता मात्र त्यांची ती पुस्तके, त्यातल्या कथा, कथा गाभे आणि कथा प्रसंग यांना मी अशोक दादा पाटील या व्यक्तीरेखेशी जुळवून पाहू लागलो. त्या व्यक्तिरेखा कुठेच जुळेनात. कारण, मला समजेना. त्यांच्या पुस्तकातील बहुतेक सर्व प्रसंग, सर्व पात्रे, त्यातल्या त्यांच्या कल्पना आणि वातावरण निर्मिती ही आज मी ज्या अशोक दादा पाटील यांना पाहत होतो त्यांच्याशी, त्यांच्या वयाशी जुळतच नव्हती.

पुस्तके वाचतांना कथाभाग जसजसा पुढे सरकत होता तसतसे लेखकाच्या व्यक्तिमत्वाबद्दल माझी एक ठाम समजूत व्हायची की, लेखक एक पोरगेला, उमदा व रंगेल तरुण असणार. तो नक्कीच महाराष्ट्रातल्या एखाद्या दुष्काळी खेड्यात वाढलेला नवजवान असणार. खेड्यातल्या जीवनाशी व महाराष्ट्रातल्या मातीशी एकरूप झालेल्या कथा आणि त्या रंगवणारी व्यक्ती ही रांगडी व तरुण असणार ही माझी साधी आणि सरळ कल्पना होती. पण आज माझ्यासमोर उभ्या असलेल्या, माझ्या पितृतुल्य लेखक आजोबांना पाहताच माझे देहभानच हरपले.

मला प्रकाशक डॉ. सुनील दादा पाटील म्हणाले, "आबासाहेब सूर्यवंशी साहेब, जागे व्हा...! मनाचा आणि शरीराचा संबंध नाही, ज्याचे मन तरुण तो चिरतरुण. अशोक दादा पाटील यांच्या कथा तरुण मनाने लिहिलेल्या असून त्या आजच्या

नवतरुणालाही मागे टाकतील तसेच स्वातंत्र्याच्या लढ्यात त्यांचे सक्रिय योगदान राहिले आहे. मराठी साहित्यात मोजकेच पण अत्यंत सकस कथालेखन त्यांनी केले आहे. अनेक सामाजिक कार्यातही त्यांचा सक्रीय सहभाग आहे."

मला प्रकाशक डॉ. सुनील दादा पाटील यांचे म्हणणे पटले आणि आज मी, ज्येष्ठ साहित्यिक सन्माननीय अशोक दादा पाटील यांच्या साहित्यावरील स्वतंत्र दिवाळी अंकासाठीचे 'संपादकीय' लिहितोय. त्यांच्या साहित्याचे वाचन आणि समीक्षण करत असताना अशा समारोपापर्यंत मी आलो आहे की ते महाराष्ट्रातील सर्वाधिक वयाचे सक्रीय मराठी लेखक आहेत. अशोक दादा पाटील हे लेखक म्हणून मराठी साहित्यात जवळ-जवळ सात दशक सक्रीय आहेत.

पुढे अशोक दादा पाटील यांच्या दाट परिचयातून समजले की, ते 'शेडबाळ' तालुका - अथणी, जिल्हा - बेळगांव या कर्नाटकातला खेड्यात, पारतंत्र्यात जन्मलेली, बालपण व शालेय जीवन कानडी जास्त व मराठी कमी अशा समाजात व्यतीत केलेली अशी व्यक्ती आहे. लेखन मात्र मराठीत, मराठी मातीशी प्रामाणिकता ठेवणारे आणि लेखक मात्र कानडी मुलखात वाढलेला आणि तरीही सरस लेखन शैलीच्या व अमोघ ग्रामीण मराठी शब्द भांडाराच्या जोरावर त्यांचे लेखनकार्य अविरत चालू आहे. त्यांच्या कल्पनाशक्तीची भरारी एवढी उंच आणि आकाशाला गवसणी घालणारी आहे की, वाचकाला खिळवून ठेवण्यात, कधी-कधी कपाळावरील घर्मबिंदू पुसायला लावण्यात आणि प्रसंगी खळखळून हसायलाही लावण्यात यशस्वी झालेली आहे.

त्यांच्या 'आठवणींची साठवण' या पुस्तकात त्यांनी त्यांना आलेल्या विविध मान्यवरांच्या पत्रांचासंग्रह व काही ठळक आठवणींच्या नोंद पत्रांना प्रसिद्ध केले आहे. हे पुस्तक हाताळतांना त्यांचा पूर्वेतिहास, छंद व राजकीय अंग याची अगदी स्पष्ट कल्पना येते. त्यावेळचे केंद्रीय मंत्री बी. शंकरानंद यांच्याशी असलेले त्यांचे घनिष्ठ संबंध या त्यांच्या पत्रव्यवहारावरून दिसून येतात. स्वर्गीय इंदिराजी गांधी यासुद्धा लेखक अशोक दादा पाटील यांना चांगल्या ओळखत होत्या हेही दिसून येते.

'मुग्धा' हा त्यांचा प्रथम कवितासंग्रह. या कवितासंग्रहातील सर्व कविता या त्यांच्यात असलेल्या तीव्र प्रतिभा शक्तीची झलक दाखवितात. मी या कवितासंग्रहातील काही निवडक कवितांचे श्रोत्यांपुढे प्रकट कविता वाचन केले तेव्हा मलाच एवढा आनंद वाटला की, हा कवी एवढी वर्षे कुठे दडला होता...! असे क्षणभर वाटले.

'काटेरी वाट' नावाच्या त्यांच्या या कवितासंग्रहातील पहिल्याच कवितेने माझे मन वेधून घेतले आणि सर्व कविता सरळ व सलग एका दमात वाचूनही काढल्या. त्यांचा मूळ पिंड हा कविमनाचा आहे असे वाटते न वाटते तोपर्यंत त्यांचा 'काळी आणि गोरी' हा कथासंग्रह नजरेस पडला. कथासंग्रह हाताळतांना पहिली कथा, दुसरी कथा असे करत सर्व पुस्तक दिवसभरात स्वतःची कामे बाजूला ठेवून वाचून काढले. पुस्तक बाजूला ठेवूच वाटेना.

एके दिवशी त्यांची ही सर्व पुस्तके, जी दहा - बारा आहेत ती, सर्व डॉ. सुनील दादा पाटील, एक तरुण, कल्पना विलास ज्याच्या ठायी-ठायी गच्च भरलेला आहे अशा ध्येयवेड्या प्रकाशकाने 'कवितासागर पब्लिशिंग हाउस, जयसिंगपूर' यांच्या मार्फत प्रकाशित केली असल्याने, मला ती प्रकाशकाकडूनच ग्रंथभेट म्हणून सस्नेह एक गठ्ठा एकत्र मिळाला. मी ती एका मागोमाग एक, भराभर एका आठवड्यात वाचूनही संपविली. पुस्तकांचा आकार व प्रकार 'छोटी पुस्तके' या सदरात मोडत असलेने, मी ती भराभर वाचली. त्यांच्या लेखनाचे व प्रकाशकाच्या प्रतिभेचे हे एक वैशिष्ट्ये आहे की, जाडजूड आणि आकाराने मोठी असलेली पुस्तके नवोदित वाचक कदाचित वाचायचा कंटाळा करु शकतो हे जाणून त्यांनी आपली प्रतिभा छोट्या पुस्तकांच्याद्वारे सामान्य वाचकांपर्यंत पोहचवली.

लेखक अशोक दादा पाटील यांनी 'रझाकार' नावाच्या लघुकादंबरीद्वारे त्यांचा एक मोठी दीर्घकादंबरी लिहिण्याचाही या वयात आवाका आहे हेही सिद्ध केले. त्यांचा उमेदीचा काळ हा भारताच्या पारतंत्र्याचा काळ असल्याने व ते स्वतः स्वातंत्र्य सैनिक असल्याने, त्यांनी या पुस्तकात त्या काळातील माणसांच्यामध्ये असलेली मग्रुरी, आडदांडपणा वर्णिलेला आहे.

'रझाकार' ही व्यक्तिरेखा जरी दुष्ट प्रवृत्तीची असली तरी तिने स्वतःला काही जीवन तत्त्वाने बांधून घेतले होते. रझाकार मांसाचे भोजन कधीच इतर स्त्रियांकडून बनवून घेत नव्हता तर तो ते स्वतःच बनवायचा. लेखकाने त्यांच्या प्रत्येक पुस्तकातून समाजाला काहीतरी मूल्य दिले आहे. जगण्याचे आणि जन्माचे मूल्य म्हणजे काय व ते कोणत्या प्रकारच्या वागण्यात असते हे त्यांनी आपल्या कथा, कविता, लेख आणि लघुकादंबरीतून जगाला बहाल केले आहे.

'आहुती' या मराठी कथासंग्रहामध्ये काही कथा, तर काही व्यक्तिचित्रणे अशा लेखन प्रकारांचा समावेश केला आहे. त्यातील 'आहुती' ही कथा आणि 'आब्या' हे व्यक्तिचित्रण दीर्घकाळ लक्षात राहते. सर्व कथांची बांधणी ही नीटनेटकी, समतोल ढळू न देणारी, कथा प्रवासात कुठेही न अडखळता चालणारी अशीच सर्व साहित्यकृती आहे.

स्वतः लेखक अशोक दादा पाटील आणि प्रकाशक डॉ. सुनील दादा पाटील हे त्यांच्या नावातील साधर्म्यामुळे एकमेकांचे सख्खे भाऊ असल्यासारखे वाटतात. पण वास्तवात तसे काहीही नाही. त्यांच्या वडिलांची नावे व आडनावे योगायोगाने सारखीच आहेत एवढेच काय ते साम्य. पण दोघांच्या 'प्रतिभा व कल्पना' आपापल्या कार्यात एवढ्या प्रभावी व शक्तिमान आहेत की, पूर्वजन्मी कदाचित ते एकमेकांचे कोणीतरी सख्ख्ये असावेत यात शंका वाटत नाही.

खेड्यातील जीवन जगलेल्या वाचकाला त्यांचा 'विश्वास' हा कथासंग्रह निश्चितच आवडेल असा आहे. या कथासंग्रहात एकूण सहा कथा असून यात काही सूडकथा,

काही दारिद्रकथा, प्रेमकथा, बोधकथा अशा कथा असून 'विश्वास' या कथासंग्रहाच्या नावाची शीर्षककथा ही पेशंट व डॉ. यांच्या परस्पर विश्वासावर आधारलेली कथा आहे. पेशंट कितीही क्रूरकर्मा असला तरी डॉ. त्याचे कर्तव्य म्हणून त्याच्या प्राणाचे रक्षण करणारच हा बोध या कथेत आहे. ग्रामीण ढंग, ग्रामीण साज व ग्रामीण माज असा या सर्व कथांचा शृंगार असलेने 'विश्वास' हा कथासंग्रह माझ्या मनाला भावून व शिवून गेला.

गद्य प्रकारातल्या लेखनाचं वर्णन करता-करता शब्द अपुरे पडायला लागलेत. आता आपण त्यांच्या 'निसर्गगंध' या कवितासंग्रहाविषयी काही बोलूया. या पुस्तकाला शिरढोण येथील एका उमद्या, तरुण, लेखक, कवी, संपादक आणि समीक्षक अशा अष्टपैलू धन्वंतरी व्यक्तीने प्रस्तावना लिहिलेली आहे; त्यांचे नाव डॉ. कुमार रामगोंडा पाटील. यावरून या पुस्तकाचे महत्त्व आपण ध्यानी घ्यायला हवे. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात कडू-गोड, दु:खी-आनंदी असे एका मागून एक प्रसंगानुभव येत असतात. भावनांच्या अतिरेकाच्या प्रसंगी मन व्याकूळ होते आणि नकळत एखादी साहित्यपंक्ती किंवा काव्यपंक्ती तोंडातून आपोआपच बाहेर पडते...

आपण असतो एक एकटे
येतो एकटे, जातो एकटे
सोबत असते दैव एकटे
जीवनी असते फूल नी काटे

'एकटे' या कवितेतील वरील ओळी मानवी जीवनाचे सत्य सांगून जातात. कवी अशोक दादा पाटील यांनी आपल्या ९३ - ९४ वर्षांच्या जीवनात असे किती तरी चांगले आणि वाईट अनुभव झेलले असतील, पचवले असतील, रिचवले असतील तेव्हाच त्यांच्या मनातून वरील काव्यपंक्ती स्त्रवल्या आहेत. विशेष म्हणजे या काव्यसंग्रहात निसर्गातले पशु-पक्षी, मुके प्राणी यांच्यावरही विविध कविता केलेल्या आहेत. अगदी 'गाढव' या प्राण्यावर ही कविता आहे.

खाया मजला चारा नाही, उकिरड्यावर चरतो मी
कुठे दिसले गवत, कचरा पोटात भरतो मी
दया नाही माणसांना या, शिवी घालतो मला
जग म्हणती गाढव, म्हणुनी दु:खही होई मला

गाढवाच्या भावनांनाही माणसाने जाणावे म्हणूनच उपरोक्त काव्य प्रपंच असावा.

अशा हरहुन्नरी अष्टपैलू व्यक्तिमत्व लाभलेल्या श्री. अशोक दादा पाटील या लेखक, कवी, कादंबरीकार, समीक्षक, चित्रकार, नाटककार आणि कलाकार अशा व्यक्तीचे साहित्यकार होण्यापूर्वीचे जीवन पाहणे मनोरंजक ठरेल. त्यावेळच्या कोल्हापूर संस्थानामध्ये समाविष्ट असलेल्या नसलापूर, तालुका - रायबाग, जिल्हा - कोल्हापूर या गावी पारतंत्र्यातल्या त्या राजवटीत त्यांचा जन्म झाला.

कन्नड भाषेच्या त्या गावात मराठी शाळेत ते इयत्ता चौथी पर्यंत शिकले. नंतर इयत्ता पाचवी पासून शेडबाळच्या मराठी शाळेत आले. इयत्ता सातवी नंतर मात्र शिक्षक म्हणून खाजगी शाळांमधून अध्यापनाचे कार्य करू लागले.

एकदा मिरज जवळच्या आरग येथील काँग्रेसच्या सेवादल शिबिरात त्यांना वसंतदादा पाटील व जी. डी. पाटील या राजकीय नेत्यांनी बोलावले व त्यांनी राजकारणात उतरावे म्हणून सेवादलाचे कॅप्टन करून टाकले. पुढे काही काळ त्यांनी काँग्रेसच्या सेवा दलात राजकीय काम केले.

शिक्षण व त्या वेळेची परिस्थिती त्यांना शांत बसू देईना. सन १९५१ मध्ये निपाणी, जिल्हा बेळगाव, कर्नाटक येथे सरकारी (स्कूल बोर्ड) शाळेत त्यांना शिक्षक म्हणून तात्पुरते घेतले. तेथील शाळेत त्यांनी 'आनंद' नावाच्या कुमार मासिकाच्या मालकांच्या, गोपीनाथ तळवळकर यांच्या अध्यक्षतेखाली 'कुमार साहित्य संमेलन' भरविले. या संमेलनासाठी सन्माननीय दिनकर पाटील, पी. सावळाराम, लता मंगेशकर ही ख्यातनाम सिनेसृष्टीतील कलाप्रेमी व साहित्यप्रेमी मंडळी आली होती.

लेखक अशोक दादा पाटील यांची चित्रकला आणि पेंटिंग्ज पाहून लता मंगेशकर, दिनकर द. पाटील व पी. सावळाराम यांनी त्यांना सिनेमा क्षेत्रात येण्याची विनंती केली. पुढे शिक्षकी पेशातल्या ब्रेक कालावधीमध्ये त्यांना प्रभात स्टुडीओमध्ये पोस्टर आर्टिस्ट म्हणून कामावर घेतले. सिनेमाची पोस्टर्स करण्याची कामे त्यावेळी त्यांनी इमाने इतबारे केली. सिनेमा व्यवसायातील चुकीच्या गोष्टींमुळे तिथेही त्यांचे मन रमेना व्यवस्थापनाकडून होणाऱ्या अन्याया विरुद्ध त्यांनी तिथे कामगारांचा संप घडवून आणला आणि ते काम सोडून शेडबाळ या आपल्या गावी आले. त्यावेळी शेडबाळला परमपूज्य शांतीसागर महाराजांचा चातुर्मासानिमित्त मुक्काम होता. अशोक दादा पाटील महाराजांच्या सान्निध्यात आले.

लेखकाने पुन्हा सिनेमाच्या व्यवसायाकडे वळू नये म्हणून त्यांच्या घरच्यांनी शांतीसागर महाराजांना साकडे घालून अशोक दादा पाटील यांना शेडबाळ मध्येच राहण्यास भाग पाडले. मात्र एक चांगले झाले. शेडबाळ हायस्कूलच्या प्राथमिक विभागाकडे त्यांना अनुदानित वर्गावर प्राथमिक शिक्षक म्हणून कायम नोकरीवर कायम रूजू करून घेतले आणि या पदावर पुढे पस्तीस वर्षे सेवा केली. या काळात शाळा सांभाळत ते लेख, कथा, कविता लिहायचे व त्यांचे लिखाण दिवाळी अंकांतून प्रसिद्ध व्हायचे.

प्रसिद्ध झालेली त्यांच्या साहित्याची कात्रणे त्यांनी आजतागायत जपून ठेवलेली आहेत. कात्रणे काढण्याचा व ती जपून ठेवण्याचा त्यांचा छंद आहे. 'आठवणींची साठवण' या पुस्तकात त्यांनी मान्यवरांची, मंत्र्यांची, संपादकांची, वर्तमानपत्रांची, मित्रांची अशी अनेक पत्रे जशीच्या तशी आठवणी प्रीत्यर्थ जपून ठेवली आहेत व त्याचे स्वतंत्र पुस्तक प्रकाशित केले आहे.

'स्वप्नसुंदरी' नावाचा कवितासंग्रह त्यांनी निपाणी येथे असतांना लिहिला पण आज त्याची प्रत त्यांच्याकडे नाही. विशेष म्हणजे शेडबाळ व निपाणी येथे असतांना त्यांनी लिहिलेल्या प्रसिद्ध साहित्याची त्यांनी जपून ठेवलेली कात्रणे व त्यांची फाईल जेव्हा, त्यांच्या पस्तीस वर्षाच्या शिक्षकी जीवनाच्या यशानंतर जेव्हा-जेव्हा जयसिंगपूर येथे त्यांच्या चिरंजीवाकडे येणे झाले तेव्हा डॉ. सुनील दादा पाटील या उमद्या, चौकस व डोळस प्रकाशकाच्या समोर आले. मग संपादक आणि प्रकाशक डॉ. सुनील दादा पाटील त्यांना सोडतील कसे? या सर्व साहित्याची त्यांनी पाहणी, वर्गवारी करून कवितासंग्रह, कथासंग्रह व कादंबरी असे त्रिवर्ग साहित्य त्यांनी एकाच तारखेला म्हणजे दिनांक ८ मार्च २०१८ रोजी जगासाठी खुले केले.

डॉ. सुनील दादा पाटील यांची चौकस दृष्टी आणि नवोदित लेखक व कवींचा शोध घेण्याची वृत्ती हीसुद्धा अशोक दादा पाटील यांच्या साहित्य प्रसारणासाठी कारणीभूत ठरते यात शंका नाही.

माझी केवळ दोनच पुस्तके प्रकाशित झालेली असतांना, ज्येष्ठ साहित्यिक अशोक दादा पाटील यांच्यासारख्या मातब्बर साहित्यकाराविषयीच्या विशेष दिवाळी अंकासाठी संपादकीय लिहिण्याची जबाबदारी माझ्यावर प्रकाशकाने सोपवली याचे मला विशेष अप्रूप वाटते. मी याबद्दल स्वतःला नशीबवान समजतो.

अशोक दादा पाटील साहित्यकार आणि कवितासागर पब्लिशिंग हाउस, जयसिंगपूर चे प्रकाशक डॉ. सुनील दादा पाटील या दोघांना दीर्घायुष्य चिंतून आणि त्यांच्याकडून समाज शिक्षणासाठी अनेक भरीव ग्रंथ बाहेर पडोत अशी ईश्वरचरणी प्रार्थना करून मी माझे संपादकीय इथेच संपवतो. ज्येष्ठ साहित्यिक व स्वातंत्र्यसैनिक अशोक दादा पाटील हे महाराष्ट्रातील सर्वाधिक वयाचे सक्रीय मराठी लेखक ठरले असून त्यांचा विशेष सन्मान माझ्या हातून होत आहे याचे मला मोठे समाधान मिळाले. धन्यवाद...!
(०५ सप्टेंबर २०२०)


**- श्री. आबासाहेब सूर्यवंशी / जयसिंगपूर**
**मो. - ९४२१५४७४३०**

# इतिहासाच्या पानावर...



**मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा !**
**प्रणाम घ्यावा माझा हा, श्री महाराष्ट्र देशा !**

कवी गोविंदाग्रजांच्या कवितेमधला हा आपला महाराष्ट्र राकट आहे, कणखर आहे, नाजूक, कोमल, फुलांचाही आहे. या महाराष्ट्राला अनेक मान्यवरांनी आपल्या परीने लौकिक प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला आहे. अनेकांची नावे इतिहासाच्या पानावर सुवर्णाक्षरांनी लिहिली गेली आहेत. काही लोकांना इतिहासात समाविष्ट होता आले नाही. तरीही 'फुलांचा धर्म फुलायचा' याप्रमाणे आपण आपले काम जिद्द आणि चिकाटीने करत बऱ्याच मान्यवरांनी स्वतःचे अस्तित्व निर्माण केले आहे. अशा अनामिकांना जगासमोर घेऊन येण्याचे काम जयसिंगपूरमधील कवितासागर पब्लिशिंग हाउसचे मुख्य संपादक आणि प्रकाशक डॉ. सुनील दादा पाटील यांनी सुरु केले आहे. खरोखरच प्रत्येक वर्षी १ मे रोजी प्रकाशित होणाऱ्या 'महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्डस्' या पुस्तकामधून अफलातून गोष्टीचे ज्ञान ते करून देत असतात.




महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक खपाचे मराठी मासिक लोकराज्य आहे. भारतामधील पहिले रेल्वे विद्यापीठ बडोदयामध्ये आहे. जगातील सर्वात श्रीमंत गाव हुआस्की आहे. भारतातील सर्वात श्रीमंत गाव धरमाज व महाराष्ट्रातील सर्वात श्रीमंत गाव अजनाळे आहे. अशा वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी या पुस्तकामधून वाचायला मिळाल्या. हे ज्ञान स्पर्धा परीक्षा देणाऱ्यासाठी आवश्यक असते परंतू यापलीकडे जाऊन ध्येयाने प्रेरित झालेली माणसेसुद्धा असतात त्यांचे कौतुक करण्याचा प्रयत्न 'महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्डस्' च्या माध्यमातून झाला आहे. मे २०१९ मध्ये प्रकाशित या पुस्तकामधून वाचकांच्या

सामान्य ज्ञानात भर पडते एवढेच नाही तर आपणही काहीतरी नाविन्यपूर्ण आणि आदर्श कार्य करावे असे विचार वाचकांच्या मनात निर्माण होतात. उदाहरणार्थ - ८७ वेळा रक्तदान करणारे जयसिंगपूरमधील शुक्राचार्य उरूणकर. या माणसाने संकटात सापडलेल्या ११०० रुग्णांना आपले रक्त देवून जीवदान दिले. त्यांच्या कामाची दखल घेत 'महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्डस्' ने सन्मानित केले. महिला आणि मुलींनी स्वतःचे रक्षण करण्यासाठी सक्षम व्हायला हवे म्हणून मर्दानी खेळांचे मोफत प्रशिक्षण देणारे शिरोळ तालुक्यामधील कवठेसार गावचे सुपूत्र रोहीत गाडवे आणि उमळवाडगावचे अक्षय गोटखिंडे खरोखरच सन्मानाला पात्र आहेत.

शिरढोण येथील डॉ. कुमार रामगोंडा पाटील या युवकाच्या मार्गदर्शनाखाली पश्चिम महाराष्ट्रामधील सर्वात लांब पदयात्रा प्रत्येक वर्षी आयोजित केली जाते. शिरढोण ते श्री शैल ही ८०० किलोमीटर ची पदयात्रा उल्लेखनीय आहे. अभिनयाच्या क्षेत्रामध्ये ग्रामीण भागातील नकलाकारांना फार कमी संधी मिळाली पण शिरोळमधील राजेंद्र प्रधानसारख्या हरहुन्नरी कलाकाराने आपल्या खैंदूळ एकपात्री नाटकाचे सलग ३६ तास सादरीकरण करून दाखवले.

साहित्याच्या क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या लेखक, कवींची दखलसुद्धा या पुस्तकामध्ये घेण्यात आली आहे. आपल्या लेखनाची व्याप्ती जगभर पसरविणाऱ्या अभिषेक ठमके या लेखकाचे 'पुन्हा नव्याने सुरुवात' या पुस्तकाचे एकाच वेळी ११ वेगवेगळ्या प्रकाशकांकडून प्रकाशन करण्यात आहे. आजपर्यंत आम्ही हे असे चित्रपट प्रदर्शनात होताना पाहिले होते. पण हे एक वेगळेच रेकॉर्ड पाहायला मिळाले. धुळे जिल्ह्यातील देवपूर गावच्या योगेश रमेश पाटील यांनी मराठी साहित्यामध्ये आपली वेगळी शैली दाखवली. त्यांचा प्रत्येक शब्दावर वेलांटी असलेला तसेच एकच अक्षराने बनवलेला कवितासंग्रह कौतुकाचा विषय आहे. सांगलीमधील भिमराव रास्ते नावाच्या प्राथमिक शाळेच्या शिक्षकांनी सर्वाधिक नाटिकांचे लेखन केले आहे. हुंडा बंदी, एड्स, प्रदूषण अशा अनेक सामाजिक विषयावर लेखन करत प्रबोधन सुरू ठेवले आहे. सर्वाधिक प्रातिनिधीक कवितांचे संपादन करणारे सोमेश्वरनगरमधील साहित्यप्रेमी मंडळाचे अध्यक्ष प्रा. हनुमंत माने आणि प्रा. डॉ. जया राजेंद्र कदम यांच्याही कामाची दखल घेतली गेली आहे.

ज्येष्ठ साहित्यिक राज धुदाट हे वाचकांना नेहमी चांगल्या गोष्टी देत असतात. इतर देशामधील लोकांची झालेली प्रगती ही त्यांच्या बदलत्या आचार -विचारांनी झालेली आहे. आपले जीवनमान उंचावण्यासाठी जगभरातील चांगल्या गोष्टींचा स्वीकार करावा लागणार आहे हे सांगणारे लेखक राज धुदाट यांनी सर्वाधिक इंग्रजी साहित्याचा मराठी भाषेमध्ये अनुवाद केला आहे.

वाचकाला आश्चर्य वाटाव्यात अशा काही गोष्टी या पुस्तकामध्ये नमूद करण्यात आल्या आहेत. जसे की महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा उपस्थित

झाला होता. यादरम्यान संपूर्ण मराठा समाज एकवटला गेला. मोठी चळवळ उभा राहिली. मोर्चे निघाले वगैरे-वगैरे. पण सातारा जिल्ह्यामधील गुंडेवाडी गावामधील सर्व रहिवासी मराठा असल्याने गावाचे नाव बदलून मराठानगर ठेवले ही एक वेगळी घटना नोंद झाली. मराठा नगर हे महाराष्ट्रातील पहिले मराठा गाव ठरले आहे. त्याचप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्यामधील पन्हाळा गडाच्या पायथ्याशी असलेल्या गोलीवडे गावामध्ये गेल्या वीस वर्षापासून कोणतीच निवडणूक झालेली नाही ग्रामपंचायत असो अथवा सेवा सोसायटी बिनविरोध निवड करून गावाच्या विकासाला आजही प्राधान्य दिले जाते. सर्वाधिक दिवाळी अंकांचा वैयक्तिक संग्रह करणारे मनमाडमधील अनिल शिनकर या व्यासंगी व्यक्तिमत्वाची ओळख पुस्तकातून झाली.

वाचन संस्कृती दिवसें-दिवस कमी होत चालली आहे अशा परिस्थितीमध्ये सातारा जिल्ह्यामधील भिलारगावाने 'पुस्तकांचे गाव' म्हणून लौकिक मिळवला. गावाच्या काना कोपऱ्यात वाचकांसाठी पुस्तकांची सोय करून आदर्श निर्माण केला. अशाच प्रकारे कोल्हापूरमधील भागीरथी महिला संस्थेच्या वतीने सौ. अरुंधती धनंजय महाडीक यांनी एकाच दिवशी ११ वाचनालयांची निर्मिती करून ग्रंथालय चळवळीला बळ दिले. याकामी डॉ. सुनील दादा पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले आहे.

संपादक डॉ. सुनील पाटील यांचे कार्य खरोखरच वेगळे असते. त्यांची प्रत्येक गोष्ट दखलपात्र असते. आपल्या आयुष्यामध्ये आलेल्या २००० पेक्षा जास्त लेखक, कवींच्या पुस्तकांचा संग्रह त्यांनी त्या लेखक, कवींच्या स्वाक्षरीसह केला आहे. त्यांनी राबवलेला 'युनिवर्सल फ्री लायब्ररीचा उपक्रम' जगात कुठेच नाही. हा उपक्रम केवळ वाचकाच्या विश्वासावर चालतो. म्हणजे वाचकाला पुस्तक पोष्टामार्फत घरी पाठवले जाते. वाचून झाल्यानंतर त्याने पुन्हा पोष्टाने परत करायचे. यासाठी वाचकाला एक नवा पैसासुद्धा खर्च करावा लागत नाही; सर्व व्यवस्था प्रकाशक डॉ. सुनील दादा पाटील हे स्वतः करतात. पुस्तकांची, वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून त्यांनी राबवलेल्या 'बुके नको बुक दया' या उपक्रमाला सर्वत्र प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. सध्या वेगवेगळ्या सभा, समारंभामधून मान्यवरांच्या सत्कारासाठी हार, तुरे, फुले यावर होणारा अमाप खर्च टाळून पुस्तके भेट देण्यास सुरुवात झाली आहे.

'कवितासागर पब्लिशिंग हाउस, जयसिंगपूर' यांच्या मार्फत प्रकाशित झालेल्या एकाच लेखकाच्या पुस्तकाची समिक्षा अनेक वर्तमानपत्रे व मासिकामधून प्रसिद्ध झालेली आहेत. एवढेच नव्हे तर एकाच दिवशी अनेक लेखकांची पुस्तके प्रकाशित करण्याचा एक नवा विक्रम डॉ. सुनील दादा पाटील यांनी आपल्या प्रकाशनाच्या माध्यमातून घडवून आणला आहे.


'महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड्स्' हे पुस्तक वाचताना खरोखरच आनंद वाटतो. पण एखाद्या विक्रमवीराशी संपर्क करून अभिनंदन करण्याची इच्छा झाली तर वाचक ताबडतोब संपर्क करू शकत नाही ही उणीव आहे. पुरस्कार प्राप्त प्रत्येक विक्रमवीरांचे

संपूर्ण पत्ते व फोन नंबर स्वतंत्र पानावर छापायला हवे होते. असो. तरीही हे पुस्तक उपयुक्त आहे. सदर पुस्तकाचे मुखपृष्ठ आकर्षक आहे. कागद, छपाई, बायडींग छान आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून एक चांगली संकल्पना साकारल्याबद्दल संपादक, प्रकाशक डॉ. सुनील दादा पाटील यांचे अभिनंदन. भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा...!


**– मनोहर भोसले, सैनिक टाकळी**
**मो.– ९७६७०४४८०९**




व्यक्तिमत्व विकास
दिवाळी
अंक
2019
- संपादक -
श्री. मंगेश विठ्ठल कोळी.


व्यक्तिमत्व विकास
दिवाळी अंक 2018
संपादक - मंगेश कोळी.
मो.९०२८७१३८२०


व्यक्तिमत्व
विकास
सकारात्मक विचारांचा संग्रह
संपूर्ण जगभर वाचला जाणारा
मोबाईल, कॉम्प्युटरवर वाचता येणारा
दिवाळी अंक
२०१७


सकारात्मक विचार असणारा एकमेव अंक
संपूर्ण जगभर वाचले जाणारे
मोबाईल, कॉम्प्युटरवर वाचता येणारे
व्यक्तिमत्त्व
विकास
संपादक
मंगेश विठ्ठल कोळी
कार्यकारी संपादक
डॉ. सुनील दादा पाटील
अतिथी संपादक
प्रा. प्रवीणकुमार हेमचंद्र वैद्य
दीपावली
विशेषांक
२०१६